मृत्यूनंतर

आंतरभारतीय पुस्तकमाला

मृत्यूनंतर

शिवराम कारंत

अनुवादक

केशव महागावकर

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पहिली आवृत्ती: 1975 (शके 1896)

दुसरी आवृत्ती: 1989 (शके 1911)

Original Title—Alida Mele (*Kannada*)
Marathi Translation—MRUTYUNANTAR

रु. 11.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली-110016 द्वारा प्रकाशित.

भूमिका

कादंबरी तर लिहीत आहे, पण कादंबरीची भूमिका लिहिण्याच्या बाबतीत मात्र मी उदासीन आहे. कादंबरी जी गोष्ट समजावू शकत नाही ती भूमिकेत कशी सांगणार? आपला उद्देश कादंबरी स्पष्ट करू शकत नसेल तर कादंबरी लिहिण्याचे प्रयोजन तरी काय? भूमिका न लिहिण्याची हीच सगळी कारणे होत.

[illegible] कधी वेळाएक दोन शब्द लिहावेत असे मला वाटते; लिहितोही.

[illegible] मक ह्या कादंबरीत मानवाच्या जीवनात शिल्लक काय राहते [illegible] मी प्रयत्न केला आहे. केवळ आठवणीच त्यानंतर शिल्लक [illegible] करून गेल्यानंतर आपल्या पाऊलखुणा मागे सोडून जाणाऱ्या [illegible] जीवन संपल्यानंतर इतरांच्या मनावर उमटवलेले ज प्रभाव असतात तेच मानवमात्राची [illegible] ठरतात. आपल्या जीवनाचा गाढ ठसा उमटवू शकतील अशी माणसे क्वचितच आढळतील. तसा योग सगळ्यांना लाभणार नाही. या कादंबरीच्या "यशवंता" प्रमाणे लोक जन्माला येतात, जगतात, मरतात. आपल्या संपर्कात आलेल्या काहींना ही माणसे हितकर आणि आत्मीय वाटतात तर काहींना निरपेक्ष व न समजणारी अशी असतात. जीवनाच्या सहवासात उद्भवलेल्या हित आणि अहित या दोन्ही प्रभावांना मिळवून यशवंतांचे जीवन कशा प्रकारचे होते हेच हुडकण्याचा मी येथे प्रयत्न केला आहे. त्यांनी उमटविलेल्या पाऊलखुणांचा मागोवा घेत गेल्यासारखेच आहे हे.

त्यांनी वाटचाल केली आहे. त्यांचा थोडासाच परिचय असूनही कुतूहलाने त्या खुणा ओळखत गेलेला मी. मी माझ्या मोजमापाच्या दांडीने त्यांचे जीवन मोजण्याचा प्रयत्न करीत आहे. माझे पात्र निरीक्षकाचे आहे. "डोंगरातील जीव" या कादंबरीत जसे पात्र वठविले होते तसे तेथे दुसरे वठविले आहे. ते एक प्रकारचे तर हे दुसऱ्या प्रकारचे. ते पात्र जीवित असताना पाहिलेले तर हे पात्र जीवन संपल्यावर निवडलेले.

आपल्या निधनानंतर आपल्या जीवनाचे उद्या इतर लोक याचप्रमाणे निरीक्षण करतील. असेच समजतील. ते समजोत की न समजोत, आपल्या जीवनात उमटलेले ठसे सभोवारच्या जीवनावर परिणाम करतीलच. अन्य हजारो प्रभावांबरोबर आपलाही प्रभाव पडेलच. मृत्युमुखी पडलेले कुठलेही जीवन व्यर्थ जात नाही ते शक्यतो सार्थक होईल असे मार्गाने जगावे असे मला वाटते.

लिहिलेली कादंबरी छापल्यानंतर तिच्या प्रती माझ्या काही मित्रांना पाठविण्याचा माझा परिपाठ आहे. ती कादंबरी सगळेच वाचतात. सगळ्यांनी वाचलीच पाहिजे अशी मी अपेक्षा बाळगिली नाही. काही जण वाचून झाले की आपला अभिप्राय कळवितात. काहीजण भेट झाली की लिखाणासंबंधी काही शंका विचारतात. माझे मित्र श्री. बी. एस. तुंग हे याच स्वभावाचे गृहस्थ होते. ही कादंबरी लिहीत असताना मी त्यांना एक पत्र लिहिले होते,

"आज माझे मन तीव्र वेदना, व्यथा व तळमळींना बळी पडले आहे. एक दोन अनपेक्षित समाधानाचे प्रसंगही यावेळी आले आहेत. पण त्यांना बुडविण्याइतका व्यथा मला भेडसावीत आहेत. त्यांना हाणून पाडण्यासाठीच एका नवीन कादंबरीची सृष्टी रचण्याच्या प्रयत्नात मी गुंतलो आहे. तसा संतोष तरी माझ्या वाट्याला आला आहे." अशा आशयाचे ते पत्र होते.

लिहिलेला ग्रंथ छपाईस गेला. उद्या तो छापला जाऊन माझ्या मित्रांच्या हाती जाईल. तीव्र वेदनेने सृजित ही कादंबरी कशी असेल असे कुतूहल त्यांच्या मनात निर्माण होईल. त्यांचा संशय बळावेल. भडकून उठेल असे वाटले होते. पण ती वेळ मात्र आली नाही. कादंबरीला छापखान्यातून बाहेर पडण्यास बराच विलंब लागला. माझे मित्र तुंग तेवढ्यातच एका अपघाताला बळी पडले. त्यांच्या स्नेहमय आठवणींना हे पुस्तक अर्पण करण्याची पाळी आली. माझ्यापेक्षा वीस वर्षांहूनही अधिक ते लहान होते. हे लेखन म्हणजे त्यांना अर्पण होणारी आसवांजली ठरेल असे त्यावेळी मला मुळीच वाटले नव्हते. तुंगाचे जन्मस्थान 'बाककुद्दुरु' हे गाव माझ्या जन्मस्थानाजवळचेच. केवळ पाचच मैलाच्या अंतरावर आहे. असे असले तरी त्यांचा नि

माझा परिचय, स्नेहसंबंध अगदी अलीकडील केवळ सातआठ वर्षापासूनचा. १९५१च्या सार्वजनिक निवडणुकांच्या वेळी पी. टी. ए. चे वार्ताहर म्हणून ते आमच्या जिल्ह्यात आले तेव्हा माझा त्यांच्याशी प्रथम परिचय झाला.

अशा या अल्प परिचयाचे रूपांतर सहोदराच्या वात्सल्याहूनही गाढ अशा स्नेहात झाले.

तुंग हे सामान्य शरीरयष्टीचे, सडपातळ, गोऱ्या अंगाचे होते. मुखावर एक प्रकारचे मिस्किल हास्य विलसत असे. ते मृदू हास्य, चमकदार डोळे त्यांच्या सूक्ष्म बुद्धीचे प्रतीकच होत. त्यांची बुद्धी जितकी तीक्ष्ण तितकीच त्यांची जीभ चुरचुरीत. अशा बुद्धीला समतोल असे उघडे मन होते. मध्यम वयाचे, साहसी वृत्तीचे ते होते. पत्रिका-जगतात, पी. टी. आय संस्थेत त्यांनी नाव मिळविले. व्यावहारिक आणि मैत्री-संबंधीचा त्यांचा विस्तार मोठा होता. पाकिस्तानात तीन चार वर्षे पी. टी. आय. या संस्थेच्या वतीने त्यांनी वार्ताहर म्हणून काम केले. त्यांच्या दक्षतेवर भारत सरकार अतिशय खूष होते. अय्युबानी पाकिस्तानचे सर्वाधिकार हाती घेतल्याची बातमी सर्वांआधी बाहेर पाठविणारे वार्ताहर तेच होत. पाँडिचरीतील क्रांतिसमरात आश्रमाचा हात कितपत होता हे त्यांनीच उघड केले. मृत्यूच्या तीनचार महिन्यां-पूर्वीच नेफाला जाण्यासाठी ते आतुर झाले होते. त्याचवेळी आसाममध्ये झालेल्या एका बस अपघातात ते वारले. भारत सरकारच्या वार्ताविभागाचे मंत्री श्री. केसकर यांनी त्यांच्यासंबंधी व्यक्त केलेले दु:खोद्‌गार म्हणजे अतिशयोक्ती नसून त्यांचा गौरवच होय.

अतिशय दारिद्र्यात तुंग यांचा जन्म झाला. बापाला लहानपणीच ते मुकले, आईच्या ममतेपासून वंचित झाले, अनाथ झाले. शिक्षण झाले ते फक्त एस. एस. एल. सी. पर्यंत. जीवनाला चालविणारी धैर्य हीच एक महान शक्ती होती. धन आणि मान यांची त्यांनी कधी पर्वा केली नाही. मानवी जीवनाच्या गंभीर अशा खोलात उतरून तळाचा अंदाज घेण्याचे साहस करणे हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.

" मृत्यूनंतर " नामक कादंबरीचे यशवंत ज्याप्रमाणे 'कीर्तिरूप' उरणारी व्यक्ती त्याचप्रमाणे माझे मित्र श्री. तुंग हेसुद्धा आपल्या मित्रांच्या स्मरणात गाढ आणि सचेतन बिंब उमटवणारे होत.

आज आपण त्यांच्याशी बोलू शकत नाही पण त्यांचा अदृश्य असा जीव जणू आमच्याशी बोलतच असतो.

२९–१–१९६०
पुत्तुरु, द. क.

शिवराम कारंत

अध्याय पहिला

जीवन म्हणजे एक बहुदीर्घकालीन यात्रा. ते आरंभल्यापासून सात आठ वर्षापर्यंत आपली जाणीव आपल्यालाच झालेली नसते. आई, वडील, बहीण, भाऊ अशा अनेकांचा सहवास त्यावेळी जरी लाभत असला तरी कोवळ्या जीवनातल्या आपल्या अज्ञानामुळे, दुसऱ्यांच्या आश्रयाशिवाय तेव्हाचे आपला जीवन चरितार्थ होत नसते. त्या सर्व गोष्टी आपल्या आठवणीत क्वचितच राहतात. अशा रीतीने शैशव जाऊन बाल्य येऊन ठेपले की शाळेत आणि शाळेबाहेर समवयस्कांचा सहवास जेव्हा लाभतो तेव्हा आपल्या डोक्यात मित्रांच्या अनेक आठवणी साचतात. त्या आठवणीसुद्धा तात्कालिकच असतात. विद्यार्थीदशा संपून यौवनात पाऊल ठेवताना आपले जीवन अनेक गोड आठवणींनी समृद्ध असले तरी पुढे यौवनात संसाराच्या जंजाळात पाऊल ठेवले की आठवणींच्या भांडारात शिल्लक राहणाऱ्या मित्रांची संख्या एक किंवा दोनच; फारच झाले तर दहा किंवा बारा. पुढचा प्रपंचच वेगळा. जीवनरंगात भेटणारा मित्रवर्गच वेगळा. तेव्हासुद्धा आठवणीत खोल रुतणारे, जीवनात लाभ करून देणारे अथवा जीवनात विघ्न निर्माण करून, बुडवून आठवणींना तीव्रता देऊन मनात घर करून राहणाऱ्यांची संख्या विशेष राहात नाही. त्यानंतर म्हातार-पणात पाऊल पडले की जुन्या आठवणींचे कोठार पूर्ण रिकामे होऊन जाते. जे सम-वयस्क नाहीत अशाबरोबरचे व्यवहार म्हातारपणी कमी होतात. आपल्या सुख-दुःखांना, समाधानाला साथ देणाऱ्यांची संख्या आपल्या मुठीत सामावते. साठ, सत्तर वर्षाच्या आयुष्यात या जीवनयात्रेत भेटून बोलणाऱ्यांची संख्या, स्नेही म्हणून सह-वासात येणारांची संख्या, व्यावहारिक क्षेत्रात शिरून वेगळे झालेल्यांची संख्या वगैरे संख्यांची बेरीज केल्यास सहस्र घोड्यांच्या सरदाराएवढा विपुल परिचय झालेला असतो. पण हे जीवन सोडून जाताना तोच सरदार बायकोच्या गुलामाप्रमाणे अज्ञात व्यक्तीसारखा किंवा अल्प जनांनाच जाणवण्यासारखा निघून जातो. खरा भाग्यवान तोच ज्याच्या मृत्यूच्या आठवणीने आठदहा मित्र तरी हळहळ व्यक्त करतील. "अरेरे! बिचारा गेला का?", "वय झाले होते याला काही उपाय नाही." अशा

हजारो आठवणी त्यांना येतील आणि त्यासाठी डोळयांतून आसवेही गाळतील. काही लोक अश्रू न गाळता केवळ बोलण्यावर भागवतील. केवढा मोठा प्रवास आहे हा ! किती कालापासून चालत आलेला ? किती पुरुषांना साधलेला ? किती राबलेला? किती त्यागलेला ? अशा सगळया गोष्टींचा हिशेब लावल्यास घरदार, पैसा-अडका तरी शिल्लक राहील दुसऱ्यांचा आठवणींच्या भिंतीत, " असा एक जीव होता. तो गेला. त्याच्या जाण्यामुळे आपल्या जीवनातली संपत्ती तेवढीच कमी झाली " अशी अक्षरे उमटवून जाऊ शकणारे जीवन किती लोकांचे असते ?

जीवनयात्रा ही तशीच आहे. आपण एका गावाहून दुसऱ्या गावाला प्रयाण करतो हे त्या नाटकातील क्षणिक दृश्य होय. हे वास्तविक प्रयाण. कुठल्या ना कुठल्या कामासाठी आपण आगगाडी, आगबोट अथवा मोटरीतून फिरतच असतो. स्वतःचं गाव सोडून परगावी जातो. कामासाठी जातो, चैनीसाठी जातो. आम्ही, तुम्ही सगळे असंच करीत असतो. थोडयाच तासांचा बसचा प्रवास वगळला तर बोटीतून किंवा आगगाडीतून एकदोन दिवस आपण सगळे प्रवास करतोच ना ? त्या वेळी आपल्याला स्थायी जगाचा विसरच पडतो. आपण जातच असतो. बोटीत किंवा गाडीत शेकडो अथवा हजारो मैलांचा प्रवास करणारे उतारू भरलेले असतात. एकदा गाडीत, बोटीत चढलो की ते आपलेच घर असे समजतो. त्यातून आधीच माणसांनी भरलेली गाडी असली तर गाडीत चढणारे आपण नवीन उतारू म्हणजे आतील लोकांना शत्रू भासतो. आपले तोंड बघताच काही माणसे आणखी थोडे पाय पसरून बसतात. ऐन दुपारची वेळ असली तरी अंथरलेली सतरंजी थोडीसुद्धा न दुमडता काही झोपेचे सोंग करीत असतात. 'आलेल्यांना थोडीशी जागा देऊया' असा विचार फारच थोडया लोकांच्या मनात येतो. हो, तिथे जागाच नसेल तर बसण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तासन तास उभे राहूनच प्रवास करावा लागतो. अशा वेळी आपण उद्विग्न होतो. गाडीत बसलेल्या लोकांचा आपल्याला राग येतो. हजारो प्रकारच्या प्राण्यांना एकाच मृगालयात एकत्र ठेवल्यासारखा प्रवासाचा तो प्रसंग वाटतो. इतकं असूनही लोकांची कुजबूज ऐकू येतच असते. गावाला जाताना वऱ्हाडासारखी मित्रांची मिरवणूक घेऊन निघाल्यास हव्या-नको त्या गोष्टी करीत गाडीचा त्रास घालविता येतो. ही एक यात्राच आहे असे समजून अनोळखी लोकांशी बोलून दोनच तासांत गाडीतल्या उतारूंशी आपल्या शेजारी किंवा भावाप्रमाणे वागून, वेळ घालवून उतरताना नमस्कार करून जाणारी माणसेही काही असतात. पुढे मग ते कुठे नि हे कुठे ?

जीवनाचे एक अंग म्हणून प्रवास ज्यांच्या वाट्याला आला असेल अशा माणसांचेही विविध नमुने आढळतात.

इंग्लंडसारख्या देशात गाडीच्या प्रवासात आणखी एक विचित्र प्रकार आढळतो. तेथे कोणी दुसऱ्यांच्या जागेवर अतिक्रमण करीत नाही. ज्याला जागा मिळाली नाही तो उभाच राहतो. ज्यांना जागा मिळाली आहे ते बसलेलेच असतात. जवळ जवळच बसून आठदहा तासांचा प्रवास करतात. हातांत पुस्तक असेल तर वाचीत बसतात, नसेल तर देवासारखे स्तब्ध बसतात. 'आपण कोण ?' 'कुठे जाणार ?' 'काय काम आहे, 'किती संपादन केलंत ?' अशा प्रकारचा एकसुद्धा प्रश्न विचारीत नाहीत. आपापल्यातच दंग असतात. स्नेह वाढविण्यासाठी गाडीची व्यवस्था नसून ती रस्ता संपविण्यासाठी आहे अशीच त्यांची समजूत असते. यांत बरोबर कोणते व चुकीचे कोणते ?

माझ्या आयुष्यात उत्साह ओसंडून जाईपर्यंत तर कधी अगदी कंटाळा येईपर्यंत मी बोटीतून, गाडीतून मधूनमधून प्रवास केला आहे. माझ्या प्रवासाचा मनोधर्म फक्त एका संदर्भात सांगत आहे. लोकांची गर्दी मला आवडत नाही. संख्या वाढली तरी चालेल, बोलणे वाढले तरी चालेल मी मात्र अगदी स्तब्ध बसून राहतो. प्रवास करताना गाडीत गरुडभरारी असलेल्यांनाही मी पाहून चुकलो आहे. भगीरथासारख्या तप करणाऱ्यानाही बघितले आहे. संपूर्ण शवासन घालणारेही मला दिसले आहेत. लोकांची दाटीवाटी व अतिउत्साहाने श्वास घेणे ही अवघड होऊन 'केव्हा एकदा हा प्रवास संपेल !' असंही वाटलं आहे. म्हणूनच अलीकडे काही वर्षांपासून पैसा अधिक खर्च झाला तरी हरकत नाही पण स्वस्थ चित्ताने प्रवास करावा अशी माझी इच्छा आहे. या दृष्टीने तिसऱ्या वर्गाचा प्रवास माझ्या दृष्टीने तितकासा अनुकूल नाही. खिशाला परवडेल असा इंटरमीजिएट अथवा आताच्या सेकंड क्लासमधून प्रवास करणे बरे. पण स्वातंत्र्य आल्यावरही मध्यम वर्गातली माणसे अधमावस्थेला पोचली. इंटर अथवा दुसरा वर्ग म्हणजे जास्त पैसे खर्च केल्याचे मात्र सुख. तिसऱ्या वर्गाची दाटीवाटी, गडबड, गोंधळ सगळं यांतही सामावलं आहे. म्हणून इष्ट असो की नसो मी मात्र स्वतःपुरता पहिल्या वर्गानेच प्रवास करीत असतो. माझ्या इच्छे-प्रमाणे इथे मला काही मिळते असे समजू नये. बहुतेक आगाऊ तिकीट काढून जागा आरक्षित करीत असल्यामुळे बसण्यात काही अडचण येत नाही. एका कोपऱ्यात पाय सोडून किंवा पद्मासन घालून किंवा सरकून सरकून अवघडून बसण्याची पाळी आली तर मात्र मी त्रस्त होतो. या प्रवासात सहप्रवासी विचित्र प्रकारचे असतात हे निराळं

सांगण्याची आवश्यकता नाही. पहिल्या वर्गाचा पैसा खर्च केल्यानंतर यांची अशी समजूत होते की 'हे आपले घर आहे. यात दुसऱ्यांना स्थान नाही. आणि म्हणूनच चारआठ बेडिंग, आठदहा ट्रंका, फळांच्या करंड्या, फराळाचा डबे, मुलांचे कमोड, वगैरे जिनसा ब्रेक व्हॅनमधे भरल्याप्रमाणे भरून आपण पैसा खर्च केल्याचे संपूर्णपणे सूड घेणारे महाशयही असतात. आणि विशेष सामान नसेल तर जणू आपण ही गाडी विकत घेतली आहे अशा दिमाखात वागणारेही असतात. लोकस्वभाव सगळीकडे सारखाच. पैसाअडका असल्याने का देव बनतील? मात्र आपली कल्पना असते की यांच्यावर अधिक चांगले संस्कार घडले असतील. हे जरी पूर्णांशाने खरे नसले तरी तिसऱ्या वर्गाच्या काही उतारूंपेक्षा येथील उतारू किती तरी पटीने चोख असतात. या एकाच कारणामुळे तरी प्रवास सुखाचा होतो. शिवाय वरच्या वर्गाचा दंड भरणाऱ्यांची संख्या कमी असल्याकारणाने प्रवाशांची संख्या मर्यादित होते म्हणून इथे माणसे तितकी गर्दी करीत नाहीत. रात्री आपण झोपू शकतो. मी तर झोप-मोड करायला मुळीच तयार नसतो. 'जीवनात पूर्ण सुखाने संपणारा समय कोणता?' अस जर कुणी विचारलं तर ' सुखदु:खाची बाधा नसलेल्या झोपेचाच तो समय ' असं मी सांगेन. तरी पण माझ्या झोपेला सीमा आहे. अनेक प्रवाशांप्रमाणे फर्स्ट-क्लासचा डबा पाहताच मला झोप येत नाही. दिवसा झोप नकोशी वाटते. एखाद्या वेळी झोप आलीच तर दुपारी एक तास मात्र. आणि मग उरल्यावेळी जागे रहावे लागते. होय, मी जागाच असतो. त्यावेळी मी कुठले तरी पुस्तक हाती घेऊन वाचत असतो. नाही तर उगाच पडून राहतो. प्रवास नावाच्या नाटकात माझ्या समोरच्या रंगभूमीवर वावरणाऱ्या पात्रांचा संवाद, कथा, वर्तणूक वगैरे मूकपणे पाहात असतो. बहुतेक आपणहून संभाषणात मी फार कमी गुंततो. सुदवाने चांगले मित्र भेटले तर बोलतो, नाही असं नाही. मधून मधून तसे मित्र भेटतातही. परस्पराबद्दल गौरव वाटावा अशा प्रवासी मित्रांपैकी काही जण माझ्या स्मरणात राहिले आहेत. तशा एका व्यक्तीची कथा मी आता सांगणार आहे.

एका प्रवासात अर्धा दिवस माझ्याबरोबर असलेल्या एका वयोवृद्ध गृहस्थावर मी एक कादंबरीच लिहिणार आहे असे म्हटल्यास तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल. त्या प्रवासात त्या व्यक्तीचा अल्प परिचय होऊन काही वेगळ्याच कारणाने त्यांच्या-बद्दल माझी आस्था वाढून कालांतराने त्या आस्थेचे दृढ विश्वासात परिवर्तन झाल्यामुळे मी हे लिहीत आहे एवढेच. जीवनाच्या प्रवासात भेटलेली ती व्यक्ती माझ्या स्मृति-पटलावर छापली जाऊन तिने अधिक आस्था चेतविली आणि त्या आस्थेला पुष्टी

देण्यासारख्या एक दोन व्यक्ती आढळल्या; त्यांच्यामागे त्यांची एक रोजनिशी मला मिळाली म्हणून मला एका जीवन-चरित्रासारखे लेखन करावे लागले. यात अपूर्ण चित्रे अनेक असतील किंवा मध्येच संबंध तुटून गेलेली काही दृश्येही दिसतील. असे एक लेखन करण्याचा प्रसंग माझ्यावर येणार आहे याची मला त्यावेळी कल्पना आली असती तर ती व्यक्ती जिवंत असतानाच त्यांच्या एकटयाच्याच पार्श्वभूमीवर इतके अनुभव साचले आहेत हे समजून घेतले असते आणि मग लेखन केले असते तर हे शब्दचित्र अजून सरस झाले असते. कादंबरीऐवजी एक जीवन-चरित्रच रचले गेले असते. त्यांच्या जीवनातले मला न समजलेले भाग, काही समस्या प्रत्यक्ष त्यानाच विचारून समजावून घेतल्या असत्या तर बरे झाले असते.

त्याची माझी मैत्री अवघी पाच सहा वर्षांची. वर्षातून एक दोन वेळा, एक किंवा दोन दिवस गाठ पडायची. त्यादिवसांतही केवळ एक किंवा दोन तासांच्या काळात आमचा स्नेह वाढला. बोलण्याचे मनात आल्यावेळी मी जितका वाचाळ होऊ शकतो तितकेच माझे मित्र मितभाषी. मी बोलत असे त्याचे निम्मेही ते बोलत नसत. आमच्या परिचयाच्या आरंभी मी बोलत असे त्याचे दहा टक्केसुद्धा ते बोलत नसत. दहाचे पन्नास टक्के व्हावयाला सहा वर्षांचा अवधी लागला. मध्यंतरी आमचा विशेष पत्रव्यवहारही होत नसे. सुरुवातीस त्याना त्यांच्या घरी भेटून गावी परत आलो की उगाच बसून राहात असे. दुसऱ्यांदा त्याच्या गावी जाण्याचा प्रसंग आला तर, "मी तुमच्या गावी चार दिवसांसाठी येणार आहे. आल्यावेळी आपणास भेटेन." एवढेच लिहीत असे.

"अवश्य या. मला नेहमी सवडच असते. तुमची वाट पाहीन; आल्याशिवाय राहू नये." असे त्यांचे उत्तर येत असे. हेच आमच्या पत्रव्यवहाराचे स्वरूप होते.

शेवटच्या दोन वर्षात मात्र महिन्यातून एकदा, निदान चार महिन्यांतून एकदा तरी पत्र लिहीत असत. मीही त्यांना लिहीत असे. वयाने ते माझ्याहून मोठे होते. त्यांच्यावर माझा दृढ विश्वास होता. वयाने धाकटा असल्याने मला त्यांनी पत्र लिहिण्याचे काही कारण नव्हते. अनेक विषयांत त्यांचे परिपक्व असे अनुभव होते. त्या मानाने माझ्या जीवनात अर्धवटपणा होता. असे असूनही 'ते कसे? हे कसे?' अशाप्रकारे जेव्हा ते मला विचारीत तेव्हा विस्मय वाटत असे. जीवनासंबंधी काही प्रश्न मला सतावतात, त्याचप्रमाणे सगळ्यांना सतावत असावेत आणि विशेषेकरून त्याना ते अधिक बोचत असतील अशी कल्पना त्यांच्या पत्रावरून मला आली. त्यांनी विचारलेले प्रश्न गहनगूढ असत. त्यामुळे मी माझ्या कल्पनेस अधिक ताण न देता,

"ते तसे राहू शकत नाही का?' असे अनुमानित उत्तरच लिहीत असे. त्याशिवाय अधिक काही लिहिण्याचा मी प्रयत्न करीत नसे. त्यानी विचारलेले प्रश्न केवळ तर्कासाठी विचारलेले नसत. आपल्याला इतरांपेक्षा अधिक समजते या भावनेनेही ते विचारीत नसत.

"जीवनाचे प्रयोजन काय? जगावे कसे?"

अशा प्रकारच्या प्रश्नांचा संबंध तर्क किंवा पांडित्याशी नसून विवेक आणि प्रामाणिकतेशी आहे. आपल्या मान्यतेला चाळवणारे, छेडणारे प्रश्न असतात. त्यांची उत्तर अंधश्रद्धेने देता येण्यासारखी नसतात. म्हणूनच त्यांच्या प्रश्नांना समाधानपूर्वक उत्तर देऊ शकेन असा विश्वास मला नसल्याने फारच झाले तर "तुमच्याप्रमाणे मलाही हाच संदेह आहे" असे लिहीत असे.

वाचकांना या कादंबरीची पूर्वपीठिका म्हणजे एक मोठे कोडे वाटत असेल. होय, जीवन म्हणजेच एक मोठे कोडे आहे. माझ्या मित्रांचे जीवनही तसेच एक मोठे कोडे होते. त्यांनी मला लिहिलेले शेवटचे पत्र असे होते—

"तुम्ही आता मुंबईला केव्हा येणार? केवळ तीन महिन्यांपूर्वीच तुम्ही येऊन गेलात. तरीपण तुम्हाला भेटण्याची माझी उत्सुकता आहे. क्षमा करा. न जाणे का माझ्या मनात तुमची भेट पुन्हा होईल की नाही अशी शंका येत आहे! म्हणूनच असा प्रश्न करीत आहे. शक्य तो लवकर याल तर बरे होईल. वेड्यासारख्या काही गोष्टी मी लिहून ठेवल्या आहेत. त्या अजूनपर्यंत कोणालाही दाखविल्या नाहीत; सध्या दाखविण्याची इच्छाही नाही. मग लिहिणे व्यर्थ होईल ना? तसे होऊ नये म्हणून ते लिखाण तुमच्या हाती देऊ इच्छितो. माझ्या निधनानंतर आपण ते वाचावे अशी माझी अपेक्षा आहे. अधिक काही नाही.

"आणि हे पाहा, आपले पूर्वज अशा काही ऋषिमुनीनी जीव आणि जगताच्या बाबतीत—'हे कसे? हेच सत्य, हीच चरमवाणी' असे लिहून ठेवले आहे. यांना तुम्ही वाटल्यास वेद उपनिषद म्हणा, अथवा तपश्चर्येने समजून घेतलेल्या गोष्टी म्हणा किंवा स्वत: देवानीच हे सर्व कानांत सांगितले असे म्हणा; मला मात्र एक संशय आहे. हे विश्व, ही चराचर सृष्टी यांच्या बाबतीत अल्पस्वल्प वाचनाने मी काही ज्ञान मिळविले आहे, जीवनाने या यात्रेला केव्हा आरंभ केला, ही जीवनयात्रा कुठे चालली आहे, प्रवासाला आरंभ केल्यावर बऱ्याच काळापर्यंत वाटेतील स्टेशनावर गाडीत चढणाऱ्या उतारूप्रमाणे माणूस नावाचा प्राणी आत प्रवेश करून काही वेळ

बसून उतरून ही जातो पण जीवनाचा प्रवास तर अजून पुढेच जात असतो. त्याचे ध्येय काय हे अजून कोणालाच समजले नाही. पुढची वाट न मोजता येण्याइतकी लांबसडक असते. अशा स्थितीत एखाद्याने 'मी याचे रहस्य जाणतो किंवा अमूकच सत्य आहे' असे जर तारस्वराने सांगितले तर ते हास्यास्पद होणार नाही का ? "

हाच त्या पत्राचा आशय होय. त्यांनी उपस्थित केलेले हे प्रश्न म्हणजे कोणत्याही मताच्या, धर्माच्या पायाला हालविल्यासारखेच नव्हे का ?

श्रद्धेने, प्रामाणिकपणे सर्व गोष्टींचे निरीक्षण करून आपल्याला जे उमगले आहे ते मित सत्य असे समजून जगणारे असे ते मित्र होत. कोणत्याही चार विषयांवर त्यानी लिहिलेल्या आठ दहा ओळीना केवळ 'गप्पा' म्हणता येणार नाही. आपण जीवंत असेपर्यंतच्या काली ते लेखन कोणीही पाहण्याची आवश्यकता नाही अशी इच्छा बाळगणाऱ्या व्यक्तीने प्रतिष्ठेसाठी लिहिले नसेल तर लेखन कशासाठी ? कुणासाठी ? त्यात काय असेल ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात डोकावू लागले. ते स्वतः जीवंत असेपर्यंत त्यांचे लेखन जर मला वाचावयास मिळणार नाही तरी ते मी त्यानंतर वाचावे अशी विचित्र अपेक्षा त्यांनी का बाळगावी हे मला उमगेनासे झाले. मला जाणवलेले एकच एक अनुमान म्हणजे बाह्य जीवनात अतृप्ती मिळाल्यामुळे कासवाप्रमाणे हात पाय आत ओढून घेऊन एकलकोंडे जीवन ते जगत असावेत. आपल्या गोष्टींना आपलीच मान्यता नाही असे नव्हे तर आपल्या बोलण्याच्या ध्वनीमुळे लोकाना कदाचित हसू येईल. मरणोत्तर त्याबद्दल लोकांनी काही म्हटले तरी चिंता नाही. याच कारणामुळे त्यांनी तशी अपेक्षा बाळगिली असावी असे मला वाटले.

ते मुंबईला राहात असत. सध्या तेथे जाण्यासारखे माझे काही काम नव्हते. तसा प्रसंग अजून चार सहा महिने तरी येऊ नये असे मला वाटत होते. तरीपण मधूनच एखाद्या वेळी 'त्यांच्या भेटीसाठी मुंबईस जाऊन यावे' अशी उत्सुकता डोकावून जाई. पण या उत्सुकतेने माझ्यात चपलता आली नाही. चपलतेने आतुर होऊन मला जावयास प्रेरित करायला हवे होते. शिवाय सात आठ कामांत मी गुंतलो होतो. त्यांतून मुक्त न होता तिकडे जाऊन येण्याची तशी उत्कटता जाणवली नाही. त्यामुळ झाले असे की त्यांची इहलीला संपून जाईपर्यंत मी त्यांना भेटूच शकलो नाही. त्यासाठीसुद्धा मुंबईहून एक तार यावी लागली.

"तुमचे बंधू आजारी. तावडतोब या."

अशी तार त्यांच्या शेजाऱ्यांनी पाठविली. तार पाठविणाऱ्यांना मी त्यांचा भाऊच आहे असे वाटले असेल. कदाचित माझ्या मित्रानीच सांगितल्यामुळे त्यांनी तार केली

असेल. कुठलाही विचार न करता त्या दिवशी मी मुंबईला गेलो. त्यांच्या घरी गेलो तो ते घरी नसल्याचे आढळल्यामुळे शेजारी चौकशी केली. त्यांच्याकडून के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये त्यांना घातल्याचे कळताच तिकडे धाव घेतली. त्यांना आणखी कोणी इष्टमित्र, बंधू वगैरे नसल्यामुळे मला भेटण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली असावी. त्याबद्दल मी त्यांचा ऋणीच आहे. तरीपण त्यांनी ज्याप्रमाणे माझ्यावर विश्वास ठेवला त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याची माझी पात्रता नव्हती. खरंच नाही. ती असती तर त्यांचे शेवटचे पत्र ज्या वेळी आले त्या वेळी त्याचे उत्तर म्हणून स्वतःच येऊन त्यांना भेटायला हवे होते.

आता मात्र ते कोणत्या स्थितीत आहेत हे पाहण्यासाठी हॉस्पिटलला जावे लागले. त्यांना कसला आजार होता हे शेजारी स्पष्ट सांगू शकले नाहीत. तितकी आस्था बाळगण्याचं त्यांना कारणही नव्हतं.

"तुमचा पत्ता असलेला कागदाचा एक तुकडा त्यांनी दाखविला त्या वेळी त्यांना भलताच ताप भरला होता. तत्काळ एका वैद्याला बोलावून आणून मी त्यांची प्रकृती दाखविली. 'यांना तावडतोब हॉस्पिटलमध्ये हलवा' असे त्यांनी सांगितले. दोन चार दिवसांपासून ते झोपूनच होते. कदाचित दार उघडण्याचेही त्राण त्यांच्यात नव्हते. मी ते एकदा उघडले आणि त्यांची ती स्थिती पाहून घाबरून गेलो. बोलण्याचीसुद्धा शक्ती त्या वेळी त्यांना राहिली नव्हती. तुमचा पत्ता लिहिलेला एक कागदाचा तुकडा मेजावर होता तिकडे त्यांनी आपल्या दुर्बल हातांनी दाखविले. मी मग तुम्हाला तार पाठवली. तुम्ही आलाच आहात. आता पुढची जबाबदारी तुमची."

एवढे शेजाऱ्याने सांगितले. मी त्याबाबतीत काही विचार केला नव्हता म्हणून कावराबावरा झालो. त्यांनी सांगितल्याप्रमाणे हॉस्पिटलकडे धाव घेतली, पण मी तेथे पोचण्याच्या थोड्या वेळापूर्वीच त्यांचे कलेवर पलंगावरून उचलून शवालयात नेऊन ठेवण्यात आले होते.

मी येथे येऊनही काही उपयोग झाला नाही. असून नसल्यासारखे झाले. अर्धा तास तेथे दिङमूढ असा मी उभा राहिलो. कोणत्याच प्रकारची यातना नसलेला शांत, निद्रित असा त्यांचा वृद्ध चेहरा पाहिला. अधिक विचार करावयाला वेळ नव्हता. 'पुढची व्यवस्था करायला हवी' याची जाणीव झाली. 'एखाद्याच्या मृत्यूनंतर मागे राहणाऱ्यांचे काम लगेच संपत नाही.' असा विचार मनात आला. मुंबईत राहात असलेल्या माझ्या मित्रांना आठवून मी टेलिफोनने त्यांच्याशी संपर्क साधून माझ्या

एका आत्मीयांना मी बोलावून घेतले. त्यांच्या मदतीने माझ्या मित्रांचा अंतिम संस्कार संपविण्यात आला. आता पुढे?

त्यांच्या खोलीवर परत जावे का जाऊ नये? मी कोण? ते कोण? असे काही प्रश्न माझ्यापुढे उभे राहिले. मी त्यांचा मित्र खरा. दुर्दैवी मित्रही असेन! पण त्यांच्या वस्तूंवर माझा काय अधिकार असेही वाटले. तेथे जमलेल्या माझ्या मित्रांनी माझी समजूत घातली व म्हटले–

"तसं नव्हे. तुम्ही तिथं जा. त्यांच्या ज्या जिनसा खोलीत असतील त्या ताब्यात घेऊन, त्यांचे भाऊबंद कोण आहेत, कुठे आहेत, याचा शोध घेऊन त्या वस्तू त्यांच्याकडे सोपविण्यापर्यंतची सगळी जबाबदारी तुम्हीच उचला. त्यांचा जर तुमच्यावर विश्वास नसता तर त्यांनी तुमचे नाव कशाला सुचविले असते?"

मग मात्र मला एका मित्रासहित त्यांच्या खोलीवर जावे लागले. शेजाऱ्यांच्या परवानगीने त्या दिवसापुरता तरी त्या खोलीचा नि त्यांच्या वस्तूंचा मालक मला बनावे लागले.

माझे मित्र मलबार हिलवर निवास करीत असत. मुंबईतील मलबार हिलवरील वस्ती फक्त श्रीमंतांची अशी समजूत सामान्यांची जरी असली तरी श्रीमंतांच्या वस्तीच्या कडेकडेने शेकडो झोपड्या वसल्या आहेत. एके काळी श्रीमंतांची वस्ती असलेल्या त्या जागी जीर्ण होऊन आता झोपड्याप्रमाणे दिसणारी काही निवास-स्थानेही आहेत. तशाच प्रकारच्या एका घरी माझे मित्र राहात असत. 'बॅक बे'च्या काठाला लागूनच एक परस आहे. एका जुन्या कांपाउंडला लागूनच "out house" च्या नमुन्याचे एक घर तेथे बांधले आहे. त्याच्या तळमजल्यावर दुकाने आहेत. मागल्या भागी पूर्ण दरिद्री असे एक कुटुंब राहात आहे. माडी मोठी आहे आणि शेवटच्या भागी एक मंडप आहे. त्याच्याच पुढच्या भागात दोन कुटुंबांचा निवास होता. पायऱ्यांच्या लगतच असलेल्या वस्तीत माझे मित्र यशवंतराव राहात असत. तीन खोल्या असलेला तो ब्लॉक. मुंबईकराना, विशेषत: मध्यम वर्गीयांना ही जागा प्रशस्त वाटावी. खोल्या लहानसहान नसून विस्तृत, भरपूर उजेड व हवा असलेल्या. त्या फ्लोकडील भागीच मी यापूर्वी ज्यांना त्यांचे शेजारी म्हटले ते एक पारशी कुटुंब राहात असे. जमशेटजी कॉन्ट्रॅक्टर हे त्या कुटुंबाचे यजमान. त्यानीच मला तार करून बोलावले होते.

यशवंतरावांच्या अंत्य संस्कारात मदत करणारे माझ्या बरोबर असलेले माझे मित्र माधवराव होत. मुंबईमध्ये ते बरेच वर्षांपासून राहात असून व्यापार करीत

असतात. आम्ही दोघांनी अंधार पडल्यावर यशवंतरावांच्या घरी पाऊल ठेवले. मला पूर्ण परिचित असलेल्या त्या घराचे दार उघडून, दिवा लावून, तेथे असलेल्या दोन वेताच्या खुर्चीवर आम्ही येऊन बसलो. मी म्हणालो, "माधवराव, तुम्ही माझ्या-साठी आज खूप खटपट केलीत. शेवटची स्मशानयात्रा संपवून दिलीत. तुम्हाला अतिशय थकवा आला असेल. जेवण्याखाण्याच्या मनःस्थितीत मी तर मुळीच नाही. उगाच येथे पडून राहून विश्रांती घेऊन, सकाळीच सर्व काही विचार करावा म्हणतो."

"तुमचा यांचा काही संबंध होता का ? -का बऱ्याच दिवसांचा परिचय ?" असा त्यांनी प्रश्न केला.

तेवढ्यातच कोणीतरी बुटांचा आवाज करीत लगबगीने येत असल्याच भास झाला.

मी म्हटले, "आता नको. उद्या सर्व काही सविस्तर सांगेन."

एवढ्यात शेजारचे कॉन्ट्रॅक्टर आले. दार उघडून दिवा लावल्याचे पाहून केवळ सवयीमुळे त्यांनी 'हॅलो' म्हटले. यशवंतरावांच्या नावाने कदाचित ते हाक मारणार होते. पण आम्ही दोघेही नवीन त्यांना दिसलो. तसे त्यांनी मला काही वेळा पाहिले होते. आता तर माझे नावही त्यांना समजले आहे. म्हणून त्यांनी अतिशय कुतूहलाने विचारले, "मला हॉस्पिटलवर येणे जमले नाही. आम्ही सगळे दिनचर्येचे गुलाम! असो. आमचे यशवंतराव कसे आहेत ?"

हाताच्या संकेताने ते 'गेले' असे सुचवून मित्राच्या सहाय्याने अंत्यक्रिया संपवून मी नुकताच दादरहून परत आलो असे मी त्याना सांगितले.

"काय मेले ?" असा त्यानी उद्‌गार काढला व आपल्या बायकोला बोलावून त्यांनी ही बातमी सागितली. त्यांचे सगळे नातलगच तेथे जमले. कॉन्ट्रॅक्टर अतिदुःखी स्वरात बोलत होते.

"आपलं नाव कर्नात नव्हे का ?" त्यांनी विचारले.

"काही असो."

"नाही. बरोबर नाव ?"

"कारंत."

"हे ?"

"माझे स्नेही माधवराव."

" हे पाहा कारंत, आपण वर्षातून एकदोनदा येथे येत होता. तेव्हा तुमचा नि त्यांचा चांगलाच परिचय असावा. तुमचं नि त्यांचं जवळचं नातं होतं का ? मी मात्र त्यांना जवळचा. एकाच वेळी आम्ही दोघे या घरी आलो. त्या वेळी युद्धाच्या भयाने मुंबई रिकामी झाली होती. म्हणून थोड्याश्याच भाड्याने हे घर आम्हाला सहज मिळाले. तुमचे हे मित्र यशवंतराव, फारच मितभाषी बरं का. माझी मुले त्यांना आजोबा म्हणून हाक मारीत. माझ्या बायकोलाही त्यांच्याबद्दल अतिशय आदर वाटत असे. मुलांखेरीज मोठ्या माणसांशी क्वचितच ते बोलत असत. माझी मुले त्यांच्यापाशी चित्रासाठी हट्ट धरून बसत. त्यांना त्रास देत. ते मुलांना चित्रं काढून देत असत. कथा सांगत. तसे काही ते फार मोठे कलावंत नव्हते. ती गोष्ट वेगळी. पण त्यांना मी एक विरक्त व्यक्तीच मानतो. त्यांचा स्वभाव किती सरळ होता म्हणून सांगू ! अहो ते एक sage संतच म्हणा ना ! त्यांच्या वयावरून मी असं म्हणतो असं समजू नका. रोजच्या जीवनातही ते अतिशय सरळ होते. सदैव चिंतनात मग्न असत. त्यांच्या चेहऱ्यावर एक अपूर्व असे तेज विलसत असे. तुम्हाला नाही का तसं वाटत ?" त्यांनी मला विचारलं.

"होय." मी म्हणालो.

"इतकी अपूर्वाई जरी असली तरी ते माझ्याशी बोलत असत. अर्थात मोजकेच. जीवनात रस कसा निर्माण होतो, त्याचं स्वारस्य कशात आहे वगैरे सर्व काही सांगत असत. त्यांनी क्षुल्लक असे विचार कधी व्यक्त केलेच नाहीत. खरोखरच महान जीवन त्यांचे ! आपल्याशी त्यांचं काय नातं होतं म्हणता ?"

"एवढ्या लवकर आमच्यापासून ते दूर जातील असं वाटलं नव्हतं. परवा दिवशीच के. ई. एमला जाऊन चौकशी करून आलो होतो. cerebral malaria त्यांना झाला होता असे कळले. शिवाय मी बोलावून आणलेल्या डॉक्टरांनी तसा जगण्याचा पूर्ण भरोसा दिला नव्हता. सुदैवाने त्यांच्या मेजावर 'Will you contact this friend for me कृपा करून माझ्या या मित्राला बातमी द्याल का ? 'असे लिहून ठेवलेला कागद माझ्या दृष्टीस पडल्यामुळे मी तुम्हाला तार दिली.

"फार बरं केलंत."

"मला तर त्यांच्याशिवाय ही माडी शून्यवत भासते आहे. मी दुःखी–कष्टी असताना त्यांनी मला चार हितोपदेशाच्या गोष्टी सांगून धैर्य दिले होते. एकदा मी आर्थिक विवंचनेत असताना माझ्या बोलण्यावरूनच त्यांनी ते ताडले व 'तुम्हाला किती रुपये पाहिजेत सांगा ? थोड्याच अवधीसाठी हवे असतील तर मी देतो.' असे

सांगितले. ते ऐकून मला आश्चर्यच वाटले. त्यांनी ताबडतोब चेक काढून एक हजार रुपयांचा चेक माझ्या हाती दिला. त्या वेळेपर्यंत त्यांच्या जवळ पैसा असेल अशी मला कल्पनाही नव्हती. त्यांच्या नातलगांच्या बाबतीत काही विचारले तर ते काही सांगत नसत. माझी कल्पना अशी होती की, त्यांना त्यांची कमावणारी मोठी मुले असून ते दूरच्या गावाहून पैसा पाठवीत असतील. त्या दिवशी मात्र माझी अब्रू जाण्याचा प्रसंग आला असताना नेमक्या वेळी पैसा देऊन मला त्यांनी वाचविले. काही दिवसांनी मी त्यांचे पैसे परत करून ऋणमुक्त झालो.

" दोन तीन महिन्यांतून एकदा ते महाबळेश्वर, पुणे, बोर्डी वगैरे ठिकाणी जात असत. चित्र काढण्यासाठी जेव्हा ते परगावी जात त्या वेळी त्यांचे हे घर आम्हाला रिकामे-रिकामे वाटत असे. त्यांचे येथील राहणे म्हणजे एक गुलाबाचे झाड बहरून सुगंध फैलावल्यासारखे वाटत असे. "

त्यांनी बोलणे थांबविले. माधवरावाना, " तुम्ही आता जा " म्हणून मी बळ-जबरीने पाठविले. " मीही येतो आता " म्हणत कॉन्ट्रॅक्टरमहाशयही निघून घरी गेले. घरी यशवंतरावासंबंधीच ते बोलत होते. त्यांची बायको व मुले रडत असल्याचा आवाज ऐकू येत होता.

'आता मी कोठे आहे ? येथे मी का आलो ? पुढे काय करायचे ?' वगैरे मला काही सुचेनासे झाले. त्याच धुंदीत बसलेल्या खुर्चीवरच मला डुलकी लागली. जमशेटजी माझ्यापुढे येऊन केव्हा उभे राहिले हेसुद्धा कळले नाही.

थोडीशी जाग येताच ते म्हणाले, "तुम्हाला थकवा आला असेल. झोपा आता तुम्ही . . . पण तुमच्या जेवण्याची काय व्यवस्था ? हा जो दादा होता ना त्यांच्याकडे, तो त्यांना ज्वर येण्याच्या आठच दिवसांपूर्वी त्यांच्याशी भांडून निघून केला. पाच वर्षांपर्यंत त्यांच्या सावलीप्रमाणे होती ही व्यक्ती. पण एके दिवशी त्याने त्यांच्याजवळ कर्ज मागितले. त्यांनी ते दिले नाही म्हणून त्याला राग आला. " मरताना तुम्ही हे सगळं घेऊन जाणार का ?" म्हणत थुंकून शिव्या देत तो निघून गेला.

"ही कसली कृतज्ञता ?" असे मला वाटले.

" जेवणखाण सर्व काही देऊन दरमहा 40 रुपयांहून जास्तच त्याला ते पगारही देत असत. तरी त्याला समाधान नव्हते.

" त्याचे बरळणे ऐकून यशवंतरावांनी म्हटले, 'दादा, मी मरताना काय होणार आहे हे मला माहीत नाही. पैसाच नव्हे तर माझे प्रेत मात्र मी सोडून जाईन. तुझ्या

तोंडून असे शब्द निघायला नको होते. मेजावर ठेवलेले शंभर रुपये तू त्या दिवशी घेतलेस आणि वर "मी घेतले नाहीत" म्हणून शपथाही घेतल्यास ना तेव्हाच मी ओळखलं की तू माणूस नव्हेस. त्या दिवसापासून तू भाजलेल्या भाकरीचा घास माझ्या घशयात अडकत होता. तरीपण मी तुला 'निघून जा' म्हटलं नाही. आता कदाचित ती वेळ आली आहे. 'जा पाहू' म्हणून त्यांनी त्याला घालवून दिलं. त्याला घालविताना त्यांना अतिशय दु:ख झालं. 'दादा, दादा, पैसा येतो आणि जातो; मी स्वत: राबून कमावलं आहे नि गमावलंही आहे. अरे पण गमावलेला विश्वास परत मिळवणं कठीण असते.'

'त्या वेळी दादा क्रोधाने म्हणाला, 'तुमचा विश्वास हवा कोणाला?' पैशांचा किती अहंकार आहे या म्हाताऱ्याला." अशा प्रकारे आणखी शिव्या देत असताना माझ्या बायकोनेच दादाला दटावून बाहेर घालविले. त्या दिवसापासून स्वत:च स्टोव्ह पेटवून आपल्या हाताने चहा, टोस्ट वगैरे करून खात असत.'

आम्ही असे बोलत असताना जमशेटच्या बायकोने मुलाबरोबर माझ्या फराळासाठी ब्रेड, लोणी, काही फळे व थोडेसे दूध पाठविले. त्या वेळी यशवंतरावच माझ्यापुढे येऊन ठाकल्यासारखा भास झाला दादाला ते समजुतीच्या गोष्टी सांगत आहेत असे वाटले. माझ्याकडे पाहात कॉन्ट्रॅक्टरनी म्हटले, 'फराळ करा.'

"मला काहीच नकोसं झालं आहे." मी म्हणालो.

"सकाळपासून तुम्ही काही घेतलं नाही."

"कालपासून . . ."

"तसं असेल तर घ्यायलाच पाहिजे. तुमच्या बंधूची आठवण आल्यामुळे तुम्हाला अनिच्छा होणे स्वाभाविक आहे. पण मरण कुणाला चुकलं आहे?"

"त्यासाठी मला वाईट वाटत नाही. 'तुम्ही कधी याल' असं त्यांनी मला महिन्यापूर्वीच विचारलं होतं. त्याच वेळी मी यायला हवं होतं. काही विशेष त्यांच्याकडून समजावून घेता आलं असतं."

"होय खरोखरच मोठ्या मनाचे होते ते. पण फारच कमी बोलायचे. मी एवढा जवळ असायचा तरीपण त्यांच्याशी बोलणे नसे. असो. आपलं नि त्यांचं कोणतं नातं?"

"त्या प्रश्नाचं उत्तर त्याच क्षणी देण्याचं मला धैर्य झालं नाही. 'त्यांचा स्नेही' असे म्हणू शकलो असतो. पण तसे सांगितल्यावर त्यांच्या मालमत्तेवर माझा अधिकार

राहणार नव्हता. मी मालमत्ता मला हवी होती असं नाही. पण त्यांनी स्वतःच पत्र लिहिलं होतं. कधीतरी या सगळ्या गोष्टी मला समजावून घ्याव्याच लागल्या असत्या. त्यांच्या कागदपत्रावरून त्यांचे कोणी नातलग जिवंत असल्याचे दिसून आले तर त्यांचा शोध लावून हे सर्व त्यांना कळवायला हवं. म्हणूनच जमशेटजींना उत्तर देण्यास मी धजलो नाही.

माझ्या उत्तराला विलंब लागल्यामुळे की काय त्यांनी पुन्हा विचारले, "काही दूरचा संबंध होता का?"

"होय... तेवढंच." त्या वेळी मला थकल्यामुळे डुलकी येत होती. ते पाहून कॉन्ट्रॅक्टरांनी मला फराळ करण्याचा आग्रह केला. मी काय खाल्लं, काय ठेवलं हे माझं मलाच कळलं नाही. थकवा, डुलक्या, मित्रांचे स्वप्न वगैरे सगळेच एकमेकांत मिसळल्यासारखे झाले होते. त्यांनी दिलेल्या जिनसांपैकी थोडेसे दूध प्यालो असेन. ते निघून गेल्यानंतर मी दार लावून घेतले. दिवा मालवला. बाजूलाच असलेल्या जुन्या सोफ्यावर पाय पसरले. रात्रभर स्वप्नावर स्वप्न पडत होती. मला ताप भरला आहे असं वाटत होतं. माझ्या कपाळावर यशवंतराव हात ठेवून बसल्यासारखं दिसत होतं.

"मृत्यूची भीती वाटते ना?" मी विचारलं.

"भीती कसली? इथलं काम संपलं ना? आल्याप्रमाणे काम संपल्याचा माणसाला संतोष वाटावा." ते म्हणाले.

"उद्या काय होईल?"

"उद्याचं काम पुढं चालविण्याची जबाबदारी इतरांची."

"माझं कसं होईल?"

"नाहीसा होण्याची भीती वाटते का?"

"पुनर्जन्म आहे का?"

"कुणाला माहीत!"

"नाही का?"

"ते आता कशाला? माणूस आजचा. कालचा नव्हे; —उद्याचाही नव्हे." असे त्यांनी म्हटले.

त्यानंतर मला झोप आली असावी. सकाळी खिडकीतून घुसलेले कवडसे पाहून मी उठलो. शरीराचा सारा थकवा नाहीसा झाला होता. मला नवजीवन लाभल्या-

सारखे वाटत होते. यशवंतरावांची आठवण होऊनही मित्रहानीचे दुःख वाटेनासं झालं होतं. आपण एखादं नाटक पाहतो. ते पाहात असताना अनुकंपेने नटाशी समरस होऊन आपण क्रीडाशील झाल्यासारखं वाटत असतं. नाटक संपल्यावर घरी जाताना शिल्लक राहते ती फक्त आठवण. ती जितकी गोड किंवा कडू असेल तितकी ती अधिक काळ टिकून राहते.

अविस्मरणीय गोडी असलेली यशवंतरावांची आठवण मला अतिप्रिय आहे. मला आता ते कुठल्याशा स्वार्थासाठी लाभणार नाहीत. पण त्यांच्या आठवणी माझ्या जीवनात ठसून राहिल्या आहेत. केव्हाही त्या माझ्या हाती लागू शकतील. मी त्यांना वाचवू शकेन, विसरूही शकेन. 'व्यक्ती' हे चिन्ह मिटणं किंवा टिकणं त्याच्या चरित्रावर अवलंबून असतं. ते चरित्र आपल्या स्मृतींना चेतवून आपल्या जीवनात दृढमूल होऊन जिवंत राहिले, वाढले, पुढे सरकत गेले तर त्यालाच पुनर्जन्म म्हणावे असे मला वाटते.

यशवंतरावांना मी आठ दहा वेळा पाहिले आहे. त्यांच्या शिल्लक राहिलेल्या पाऊलखुणा पाहण्यासाठी मी आता आलो आहे. त्यांना जर मी खरोखरच ओळखले असेन तर त्यांच्या या पाऊलखुणाच मला त्यांच्या जीवनयात्रेची पद्धती दाखवतील असा विश्वास वाटतो.

उठून, आळस झाडून, तोंड धुऊन, आरशापुढे जाऊन तोंड पुसत असताना समोरच्या भिंतीकडे लक्ष गेले. आरशाच्या आजूबाजूला आठ दहा चित्रे टांगलेली दिसत होती. यशवंतरावांनीच ती चित्रे काढली होती. ते एक चित्रकलाभ्यासी व्यक्ती होते. चित्रकलेचा अभ्यास करत, त्याच्या तंत्राची काही माहिती नसताही केवळ आवड म्हणून, वेळ घालविण्यासाठी चित्रे काढीत असत. मागेही मी अनेक वेळा ती चित्रे पाहात असे. त्याबद्दल विशेष आकर्षण मला वाटले नव्हते. 'कलाकार' असं त्यांना म्हणता येणार नाही. तरीपण आपल्या मनातल्या कल्पनांना रंग देऊन चित्र काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला यात काही वाईट नाही अशी माझी समजूत होती.

या वेळी ती चित्रे दिसल्यानंतर त्यामध्ये तांत्रिक सौंदर्य मला आढळले नाही. तरी यशवंतरावांनी वेळ घालविण्यासाठी ती काढली आहेत ना ? काढू देत. चित्रकला त्यांची भाषा होऊ शकली नाही हे खरे. पण भाषा न येणारा माणूस परदेशी गेल्यास हातातोंडाच्या संकेताने मला अमुक ठिकाणी जावयाचे आहे, मार्ग दाखवा असे सुचविण्याचा प्रयत्न करतोच की नाही ? तशीच यशवंतरावांची चित्रकला असावी.

मग त्यांनी आपल्या चित्रातून काय सांगण्याचा प्रयत्न केला असावा असे कुतूहल वाटू लागले. अर्धा तास मी त्यात घालविला, पण मला ती चित्रे त्या प्रकारची असावीत असे वाटले नाही. त्यांनी कुठलाच अर्थ सुचविला नाही.

मग मात्र लवकरच कोणत्यातरी उपाहारगृहात जाऊन, फराळ संपवून त्यांची मालमत्ता काय आहे हे पाहून शक्यतो लवकर आपल्या गावी जाण्याचा मी निर्धार केला.

अध्याय दुसरा

मी अपेक्षा केली नसली तरी माझे मित्र माधवराव त्या सकाळी आपले काम सोडून माझ्याकडे आले होते. आपल्याकडून शक्यतो मदत करण्यासाठीच ते आले होते. आम्ही या कामासाठी एकत्र येणं म्हणजे आंधळ्याला आंधळा भेटल्यासारखंच झालं होतं. शेजारचे जमशेटजी सकाळीच आपलं तोंड दाखवून, नमस्कार करून निघून गेले होते. आम्ही दोघेही दार बंद करून पुढच्या विचारात गुंतलो होतो. यशवंतरावांचा नि माझ्या परिचयाचा इतिहास मी अगोदर माधवरावांना सांगितला. "माझ्यापासून त्यांनी कोणत्या प्रकारच्या मदतीची किंवा कार्यसिद्धीची अपेक्षा बाळगली होती हेच कळत नाही." असे मी म्हणताच– "ते मगळं त्यांचे कागदपत्र मिळवून वाचून काढले तर समजून येईल." असा माधवरावांनी सल्ला दिल्यामुळे आम्ही त्या कामाला लागलो. त्या खोलीत असलेल्या ट्रंकेत पुस्तके भरली होती. त्या पुस्तकांच्या डावीकडे चोख हिशेब ठेवलेल्या दोन वह्या होत्या. बँकेचे पासबुक होते. त्यावरून फक्त पाचच दिवसांपूर्वी पंधरा हजार रुपयाची रक्कम काढल्याचे दिसून आले. शिलकेत सुमारे दीड हजार रुपये मात्र होते. मग प्रश्न उद्भवला की, ही काढलेली रक्कम कोठे गेली असेल? ती कोठेतरी खोलीतच असायला हवी. त्यांच्या नोकराने मागे एकदा शंभर रुपये चोरले होते. त्याचप्रमाणे आताही चोरी करून तो फरारी झाला असेल का, असा संशय आला. संशयच नव्हे, चांगलाच घाबरलो मी! खरंच त्याने चोरी केली असेल तर पोलिसांना सूचना द्यायला हवी आणि त्याचा निर्णय लागेपर्यंत मला मुंबईतच रहावे लागेल. या नको असलेल्या व्यवहारात धडपड करावी लागेल अशा चिंतेने व्यग्र झालो. या भानगडीचे निवारण व्हावे म्हणून मला श्रीमती कॉन्ट्रॅक्टरकडे जावे लागले. तेथे जाऊन, दादाने काम केव्हा सोडले याची चौकशी केली. यशवंतरावांनी एवढी मोठी रक्कम काढण्यापूर्वीच तो गेला असल्याचे समजले. तरीपण माझ्या संशयाचे निवारण झाले नाही. काम सोडल्या-नंतरही यशवंतराव असतानाच तो फिरून येथे आला असावा का? द्वेषामुळे त्यांच्या खाद्यपदार्थांत त्याने काहीतरी विष मिसळलं असेल का? असे नाना संशय मनात डोकावू लागले.

त्यानंतर यशवंतरावांचा पत्रव्यवहार कोणाकोणाशी होता हे आम्ही हुडकून काढले. काही कागद मिळाले. जास्ती असा पत्रव्यवहार त्यांनी ठेवलाच नव्हता. माझ्यासाठी जे काही लिहून ठेवल्याचं कळविलं होतं ते मात्र मला मिळालं नाही. त्यासंबंधी दुसरेही कसले कागद आढळले नाहीत. सगळ्या कागदपत्रांतून, पुस्तकात हुडकून कंटाळलो. शेवटी एक विचार सुचून खुंटीवर टांगलेला त्यांचा सदरा काढला व त्याचे खिसे तपासले. त्यात एक लहानसे नोटबुक मिळाले. त्याच्यातच एक पोस्टाची रसीदही मिळाली. त्यावरून त्यांनी मला पोस्टाने रजिस्टर काहीतरी करून पाठविल्याचे दिसून आले. त्याशिवाय त्यांच्या पर्समध्ये दीडशे रुपयांची नगदी रक्कम होती. बँकेतून काढलेल्या एवढ्या मोठ्या रकमेचं त्यांनी काय केलं असेल याची कल्पनाच करता येण्यासारखी नव्हती. त्यांचे पैसे चोरीस गेले असते तर ही दीडशे रुपयांची रक्कम खिशात तशीच कशी वाचली असती ? आपल्या गावी जाऊन त्यांनी मला काय पाठविलं आहे हे समजेपर्यंत त्याचा चाकर दादावर संशय घेता येणार नाही असं मला वाटलं.

नुसता विचारच करीत बसल्यास पुढची वाट दिसण्यासारखी नाही. म्हणून आम्ही दोघे मिळून सगळ्या सामानाची एक यादी तयार केली. सगळी चित्रे जमा करून ट्रंकेत भरलो. त्यांनी वाचून काढलेली पुस्तके पाहिली. बहुतेक पुस्तके मत, धर्म, दर्शन यांविषयावरची होती. ती सगळी पुस्तके त्यांनी वाचून काढल्याचे स्पष्ट कळण्यासारखे होते. कारण पानावर मधूनमधून लाल-निळ्या पेन्सिलीची काही चिन्हे होती आणि मध्येच एखादे प्रश्नचिन्हही दिसे. कदाचित आश्चर्यसूचक अशी ती टीका होती. त्या वेळी त्यांचे कुतूहल जागविणारे विषय कोणते होते हे जाणण्याची जिज्ञासा निर्माण झाली नाही. कारण माझे मन त्यांच्या निधनामुळे नि पैसा नष्ट झाल्याच्या हळहळण्यामुळे पूर्ण भरून आले होते. सगळी सामग्री व्यवस्थित बांधून ठेवल्यावर त्यांच्या पेटीत मिळालेले हस्तलिखित साहित्य काढून चिठ्ठ्या, पत्रव्यवहार वगैरेंच्या आमूलाग्र वाचनात आम्ही गुंतलो. एखाद्याचा कुठं पत्ता मिळाल्यास त्या व्यक्तीबद्दल कुतूहल निर्माण होई. यशवंतरावाशी त्याचे काही नाते असावे का ? असा प्रश्नही उपस्थित होई. निरनिराळ्या गावाहून त्यांना पत्र लिहिणारे लोक होते. त्यांच्याकडून पैशांची मदत मागणारे होते. त्यांनी केलेल्या मदतीसाठी त्यांच्या उपकारांचे स्मरण करणारे होते. त्यासाठी वेळोवेळी पैसा काढून त्यांनी विनियोग केल्याचे त्यावरून दिसून येत होते. काही लोकांना तर महिना-सहा महिन्यांतून परतीची अपेक्षा न बाळगता रुपये पाठविल्याचे दिसून आले. त्यांच्या जीवनभर अशा रीतीने

दिलेल्या रकमेची बेरीज करून असलेल्या रकमेतून वजा केल्यानंतरही पंधरा हजार, दीड हजार आणि दीडशे रुपये इतकी रक्कम शिल्लक असावी असे वाटले.

कागदपत्रांत मिळालेल्या पत्यांचीही एक यादी केली. अनेक कागदावर त्यांनी शेरे मारले होते. "योग्य नाही" "दानाला पात्र असू नये का?" "किती वेळा मागावयाचे?" "तू आपल्या पायावर कधी उभा राहणार?" इत्यादी उद्गार त्यांनी मागणी केल्या गेलेल्या कागदावर लिहून ठेवले होते. घरभाड्याचे हिशेब करून मालकांना भेटावे म्हणून तो हिशेब पाहिला तर त्या वर्षाचे संपूर्ण भाडे दिल्याचे दिसून आले. ते राहिले होते फक्त तीनच महिने आणि नऊ महिन्यांचे भाडे मालकाकडे आगाऊच राहणार होते. दोन दिवस मी आणि माधवराव अशाच प्रकारचे काम करीत होतो. माझ्या घरी मी लगेच तार केली. मुंबईहून काही रजिस्टर्ड कागद किंवा पत्र आल्यास तारेने कळवावे अशी सूचना दिली होती. तिकडून तार येईपर्यंत माझं काम म्हणजे माझ्या मित्राचे शेजारी जमशेटजी दंपतीबरोबर यशवंतरावांच्या नित्य जीवनाबाबत बोलणे. मोकळा असल्यावेळी माधवरावांच्या घरी जाऊन पुढील कामासंबंधी विचार करणे व तेथेच जेवण करून परत येऊन यशवंतरावांच्या घरी असलेल्या सोफ्यावर लोळणे. कंटाळा आल्यास नि वाचण्याची इच्छा नसल्यास मी त्याची पेटी उघडून त्यांनी काढलेली चित्रे पाहात बसायचा. ते व्यावसायिक चित्रकार नव्हते हे मी पूर्वीच सांगितलं आहे. चित्रकलेसाठी कॅनव्हास, ऑइल कलर वगैरेसारख्या खर्चाच्या वस्तू ते वापरीत नसत. पेन्सिल, क्रेयॉन, पेस्टल आणि वॉटर-कलरसारख्या रंगाने ते चित्रे काढीत असत. कलाकृतीसाठी त्यांनी वापरला नाही असा एकही विषय नाही. त्यांच्या कुतूहलाला जागृत न करणाराही विषय राहिला नाही. तशा प्रकारच्या शेकडो कागदांच्या तुकड्यात केवळ आठदहा चित्रे मात्र माझ्या मनाला आकर्षून घेण्यासारखी होती. त्यांत कौशल्य जाणवत होतं म्हणून नव्हे, आश्चर्य-कारक काही होतं असं ही नव्हे, तर कलाचिंतकाचे स्वाभाविक तेज त्यात उमटले होते म्हणून. त्या चित्रांचा अर्थ लावणे तसे कठीण कामच होते. शास्त्राचे परिज्ञान असल्याखेरीज रंग आणि रेखांना हवे तसे मोहक रूप देता येत नाही. चित्रवस्तूची पार्श्वभूमी कोणती व विषय कोणता याची थोडीशीही सूचना मला नसल्यामुळे नि त्या कलेचा सामान्य परिचय असल्यामुळे त्या चित्रांचा अर्थ लावणे मला तरी कठीण जात होते. काही चित्रावर 'यशवंत' असे त्यांनी आपले नाव लिहिले होते. चित्र-विषयाचा उल्लेखही केला होता. तशा प्रकारच्या चित्रांना एकत्र करून बांधून ठेवले.

मी मुंबईला येऊन सहा किंवा सात दिवस झाले होते तेव्हा ' Draft wil manuscript received ' अशा मजकुराची तार माझ्या बायकोने पाठविली. त्यामुळे माझ्या आश्चर्यात भरच पडली. "कसले will ? पैसा माझ्याक पाठविण्याचे प्रयोजन काय ? मला काहीच समजेनासे झाले. तरीपण त्यांचे पैरे चोरीस गेले नाहीत याचे समाधान वाटले. ते कोणाला पोचवायचे हे गावी गेल्याव समजेल असे वाटले. पण आणखी एक चकित होण्यासारखी गोष्ट मला जाणवलं ती ही की यशवंतरावांना आपल्याला मरण एवढया लवकर येणार याची जाणीव कशी झाली असावी ? मी वाचावे अशी अपेक्षा बाळगून जे लेखन त्यांनी केले आहे, त्यात या गोष्टीचा उल्लेख असेल का ? आतापर्यंत त्यांनी करून ठेवलेली व्यवस्था जाणीव-पूर्वक व पूर्ण विचारानेच केली असावी. जणू आपली जीवनयात्रा संपली याची खात्री झाल्यावरच त्यांनी हे सर्व केले असावे. तर मग त्यांच्या मेंदूला मलेरियाने ग्रासणे ही एक आकस्मिक घटनाच म्हणायची का ? त्या तापाने त्यांनी अंथरूण धरले असते तर या सगळ्या गोष्टी करणे त्यांना शक्य झाले नसते. स्वत: बँकेत जाणं शक्य झालं नसतं. माझ्याकडे हे सगळं काही पाठवणं हेही शक्य नव्हतं. वैद्यांनी केलेलं " cerebral Maleria चं निदान चुकीचं असावं. ज्वर वाढण्यापूर्वी अनारोग्याचं कोणतं ना कोणतं तरी चिन्ह त्यांना दिसलं असावं. अशा प्रकारच्या अनेक विचारांनी माझ्या डोक्यात गर्दी माजविली. त्यानंतर घरमालकाला सर्व गोष्टी समजावून त्यांच्या वस्तूंचा मीच उत्तरधिकारी आहे अशी त्याची कल्पना करवून मी मुंबईनगर सोडले. गावी जाऊन माझ्या नावावर पाठविलेले कागदपत्र पाहीपर्यंत माझं चित्त ठिकाणावर नव्हतं. क्षणोक्षणी मनात यशवंतरावांचे जीवनचित्र तरळून जात होते. त्यांनी माझ्यावर टाकलेली जबाबदारी कशा प्रकारची असेल याच कल्पनेत गुंग असा मी मुंबईहून मंगळूरला जाणाऱ्या बोटीत जाऊन बसलो. पाचशे माणसांनी भरलेल्या त्या बोटीत जणू मी एकटाच आहे असे वाटत होते. नीलसागरात तरंगणारी बोट जितकी एकाकी तितकाच बोटीतल्या त्या जनसमुदायात मी एकाकी झालो होतो. असे दोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशी बोट किनाऱ्याला लागली. तेथून माझ्या घरचा रस्ता दोन तासांचा. बरोबर आणलेले सर्व सामान ट्रंका वगैरे लादून लगबगीने घरी येऊन ओसरीवर बसेपर्यंत, प्रवास करीत असताना वाट चुकलेल्या प्रवाश्याप्रमाणे माझी स्थिती झाली होती. यशवंतरावांखेरीज मला काहीही दिसत नव्हते.

घरी येऊन बसून, स्नान उरकून, फराळ संपवून प्रवासाचा थकवा मिटल्यानंतर यशवंतरावांनी पाठविलेले कागदपत्र मागविले. त्यांनी पाठविलेल्या कागदपत्रांचा गठ्ठा मोठा नव्हता. एक सामान्य असे नोटबुक मिळाले. त्यात त्यांनी आपल्या मनात

आलेले विचार व भाव त्या त्या दिवशी मनाला पटतील अशा पद्धतीने थोड्याशा वाक्यांत लिहून ठेवले होते. ते नोटबुक म्हणजे त्यांची रोजनिशीच. ती बरीच जुनी दिसत होती. आठ दहा वर्षांचे आपल्या जीवनात आलेले अनुभव त्यात त्यांनी निश्चित असे धोरण नसल्यासारखे लिहून ठेवले होते. हे लेखन विश्रांतीच्या वेळी वाचून बघण्यासारखे होते. त्यानंतर मला लिहिलेले एक सविस्तर असे पत्र होते. त्याबरोबरच त्यांनी मागे काढलेल्या पंधरा हजार रुपयांचा ड्राफ्ट जोडलेला होता. दादावर असलेला माझा संशय निराधार आहे हे त्या ड्राफ्टवरून स्पष्ट झाले. आता राहिला एवढ्या मोठ्या रकमेचा विचार. माझ्यासारख्या एका दूरच्या व्यक्तीवर विश्वास ठेवून त्यांनी ही रक्कम का पाठविली असावी ? ही जबाबदारी मी निभवावी तरी कशी ? त्यांचे पत्र वाचल्यानंतरही स्पष्ट न झाल्यामुळे ती एक माझ्यापुढे समस्याच होती.

पत्राच्या आरंभीच त्यांनी लिहिले होते–

" हे काही तुमच्यासाठी पाठविलं नाही. मी फार दिवस जगणार नाही असे मला वाटत आहे. माझा मनातील हा संदेह खरा ठरेपर्यंत माझ्या जागी आपणच आहात अशा भावनेने खर्च करण्यासाठी ही रक्कम आहे. हे काम कदाचित कठीण वाटेल. माझी ही भीती खरी न ठरली तर माझ्या नावानेच ती रक्कम ठेवावी. पण ती खरी ठरली तर मात्र मी नसलो तरी पैसा कुठल्यातरी कामाला येईल. दानाला पात्र काही बाबी असोत की व्यक्ती असोत. त्या असतातच. तेव्हा तुम्हाला पटेल अशा बाबींसाठी खर्च करा. त्यातूनच थोडेसे आतापर्यंत मी ज्यांना आश्रय देत आलो आहे अशा तीनचार माणसांना, ती माणसे जिवंत असेपर्यंत दरमहा पंचवीस रुपये देत जा. व्याजातून द्याल तर ठीकच आहे, मूल धनातून दिलं तरी चालेल. पण त्यांना ही रक्कम मिळत राहूद्या."

आणि त्यानंतर त्या लोकांचा पत्ताही त्यांनी दिला होता. पुढील पत्राचा भाग बराच प्रदीर्घ आहे. त्याचा सारांश मात्र आपल्यापुढे ठेवीत आहे :

"तुमच्याशी या विषयासंबंधी चर्चा करावी असे कितीतरी दिवसांपासून वाटत होते. पण तुम्हाला कशाला तसदी द्यावी असे वाटल्यामुळे तुम्ही येथे आल्या-वेळी हा विचार तुमच्यापुढे मांडण्याचे मला धैर्य झाले नाही. मी फार काळपर्यंत जगणार नाही एवढेच नव्हे तर फार दिवसही जगणार नाही अशी परवाच्या दिवशी अकस्मात माझ्या मनात भावना उद्भवली. आता फक्त काही दिवसच उरले असावेत असे वाटले. तशी मला मरणाची भीती मुळीच नाही पण 'मी जगल्याने कुणाचे हित होणार आहे?' हाच विचार मला कष्टदायक वाटला. एकूण माझ्या मनाला अलीकडे काही दिवसांपासून बोचणारा एक विषय म्हणजे जगण्याच्या हिशेबाने मी मिळविल्या-

पेक्षा दिलेले कमी तर झाले नाही ना, हीच ती भावना. पैशापुरतीच ही गोष्ट मर्यादित नाही तर मानवी जीवनाचाच हा हिशेब आहे. माणूस समाजाच्या ऋणाचा भार घेऊन आला आहे. त्या ऋणातच तो वाढतो. पुढे मरताना स्वतः मिळविल्यापेक्षा अधिक ऋण तो देऊ शकत असेल तरच त्याच्या जन्माचे सार्थक, नाहीतर त्याच्या जन्मामुळे समाजाची हानीच होते अशी माझी भावना आहे. या दृष्टीने पैसाअडका म्हणजे अल्प पदार्थच. तरीपण जगण्यासाठी आवश्यक त्या वस्तू आहेत एवढेच.

× × ×

"माझे बालपण मल्लापूर तालुक्याच्या एका खेडयात गेले. सधन अशा कुटुंबात माझा जन्म झाला. विद्या मिळविली. वाढलो. वडिलांच्या संपत्तीचा अधिकारी कोवळया वयातच झालो. दुसऱ्याचं दुःख मला बघवत नसे. ते दिसले की रडूच यायचं. त्या काळी अश्रू ढाळणाऱ्यांना मी मूठभर भरून पैसे दिले आहेत. त्या वेळी माझे मेव्हणे, सासरे वगैरे नातलग मला बजावून सांगत, "तू का पैसा उधळतो आहेस ?" वारंवार असे म्हणत. मी पैसा उधळला हे खरं आहे. लोकस्वभावाचा अनुभव नसताना आपण स्वतः राबून न मिळविलेले धन इतरांना वाटून टाकण्याचा मुळी अधिकारच काय ? नंतर मला अशी जाणीव झाली. असलेले सर्व घालवून पेचात पडल्यानंतर मला असा अनुभव आला. त्याची दुसरी प्रतिक्रिया म्हणजे आपण कोणावरही तसूभरही विश्वास ठेवू नये हीच. मनुष्यसमाजावरच विश्वास ठेवू नये असा कटू अनुभव मला आला.

× × ×

"सुमारे पंचवीस वर्षांचं जीवन विचारशून्यतेने रावण्यात गेलं म्हटलं तरी चालेल. तेवढयातच माझं लग्न झालं. मी सांसारिक झालो नि एका मुलाचा बाप झालो. त्या वेळी माझी संपन्न स्थिती जाऊन कर्ज काढण्याचा प्रसंग आला. त्यामुळे मन चिंताग्रस्त झाले. मध असेपर्यंत भ्रमराला फुलाची आसक्ती असते या कटू सत्याचा प्रत्यत्य आला. तरी पण मी खचलो नाही. मला वडिलार्जित संपत्ती आहे. कर्जात पडलेला का असेना पण जमीनजुमला अजून शिल्लक आहे. काही नसता रिक्त हाताने जन्मून तसेच वाढून आपला जीवनरथ चालविणारे या जगात नाहीत का असा विचार आला. तेव्हा माझ्या जीवनाचं क्षेत्रच मी बदलून टाकलं. माझ्या सासऱ्याच्या घराजवळ कुमठ्याला येऊन राहिलो. भागीदारीत एक व्यापार सुरू केला नि माझ्या जीवनात एका नवीन अध्यायाला आरंभ झाला. सुरुवातीला हे सर्व कष्टदायक वाटले. पण अनुकूल वेळ असल्यामुळे माझ्या राबण्याचे चीज झाले व मी पुन्हा पैसा मिळविला. जेवढा पैसा घालविला होता त्यापेक्षा अधिकच कमावला. तरीपण यशाने मी हुरळून गेलो नाही. संपत्तीशी संबंधित

असे ते सीमित यश होते. माझ्या जीवनात कटू अनुभव आल्यामुळेच कदाचित तेवढी संपत्ती मी अर्जित केली. पैसा आहे त्या ठिकाणी मोह आहे, दुराशा आहे, मत्सर आहे, कटुता आहे. त्यामुळेच माझी बायको, मुले माझ्या वैऱ्याप्रमाणे वागली. मी लोभी झालो हे खरे. पण त्या अध्यायाचा शेवट व्हावा म्हणून मी वडिलार्जित मिळालेल्या संपत्तीत आणखी थोडंसं मिसळून, ते सर्व बायकोमुलांसाठी ठेवून ते गाव सोडून त्याच्या दृष्टिआड झालो. मुंबईत ज्या वेळी आपली भेट झाली त्या वेळी मी विचित्र वानप्रस्थाश्रमी होऊन त्या नगरात प्रवेश केला होता. असं ऐकण्यात आहे की मागच्या काळी गृहस्थाश्रमातून लोक वानप्रस्थ होऊन अरण्यात जात असत. मी त्या प्रकारच्या अरण्यात न जाता जननिबिड अशा अरण्यात म्हणजे मुंबईत प्रवेश केला. तेथे अज्ञात व्यक्तीप्रमाणे राहिलो. आमचे शेजारी जमशेटजी कॉंट्रॅक्टर यांच्या कुटुंबाखेरीज कोणाशीही संपर्क ठेवला नाही. मनमोकळं असं जर कुणाशी बोललो असेन तर ते फक्त माझा नोकर 'दादा' याजबरोबरच. पोटापाण्याला काही नसल्यामुळं 'दादा' माझ्याकडं चाकर म्हणून राहिला. माणसाचा सहवास नको असं आपण किती जरी म्हटलं तरी त्यावाचून जगू शकणार नाही. पोटच्या पोराना सोडून आलेला मी. पण दादावर माझा लोभ जडला. कदाचित माझी दुर्बलता त्याने जाणली असेल म्हणूनच सेवक म्हणून आलेला तो 'दादा' अशा भीतीच्या संबोधाला पात्र झाला आणि शेवटी शेवटी तर माझ्या सख्ख्या मोठ्या भावाहूनही अधिकच त्याने अधिकार मिळविला. हेही माझ्या सहनशीलतेच्या बाहेरचे होते. तसं पाहिलं तर त्याला पळवून लावणं क्षणाचं काम होतं. पण करुणेनं व्याप्त अशा एका क्षणी मी अंतापर्यंत तुला अंतर देणार नाही असे त्यास वचन दिल्यामुळं मी काही करू शकलो नाही. तो मला लुबाडू पाहात होता. माझे पैसे चोरण्याचा त्याने प्रयत्न केला होता. शेजारच्या मुलांवर संशय घेण्यासारखेही त्याने सांगितले होते आणि शेवटी स्वतःच भांडून निघून गेला. अलीकडे एका वर्षापासून माझ्या शरीरात अशक्तपणा जाणवत आला आहे. तरी पण कुमठ्यात सुखाने राहात असणाऱ्या माझ्या नातलगांकडे जाण्याची मला मुळीच इच्छा झाली नाही. त्यांचीही कोणती बातमी मला कळली नाही.

"पुण्याहून मुंबईला जात असताना माझ्याबरोबरचा प्रवास तुम्हाला आठवत असेलच. त्या दिवसापासूनच आपला स्नेह वाढला. माझ्या जीवनाचे प्रतीक होता तुम्ही जगू काही! कसल्यातरी प्रकारचे भ्रातृभाव आपण दोघांत वसत असल्याचा मला भास झाला. माझ्या एकाकी जीवनाला मुंबईने आतापर्यंत आश्रय दिला पण शेवटच्या काळी हे गाव तेवढं योग्य वाटत नाही. मग कुठे जावे असा जेव्हा विचार

येतो तेव्हा तुमची आठवण तीव्रतेने येते. तुमच्याजवळ माझ्या जीवनाचा इतिहास सविस्तर सांगून टाकावा असे वाटते एवढेच. माझ्या जीवनात जे संदेह निर्माण झाले त्या सर्वांना तुमच्या गळयात बांधीत आहे की काय न जाणे! त्यासाठीच आपण कधी येणार असा प्रश्न आपल्या येण्याची उत्कट इच्छा बाळगून पत्राने विचारीत आहे. दादा गेल्यापासून तर न जाणे का, माझं जीवननाटक संपण्याचा काळ नजीक येऊन ठेपला आहे, आता लवकरच पडदा पडणार आहे असंच वाटत आहे. तो पडला नाही तर एकदा मी आपल्या गावी येऊ शकेन. आणि पडदा पडलाच तर ?—माझ्या बरोबरच माझ्या आठवणी मिटून जातील. अशा हजारो आठवणींत चारसहा तरी चांगल्या आठवणी राहू नयेत का ? असं वाटल्यामुळेच हे पत्र मी लिहीत आहे.

"या दोन दिवसांपासून निजून डोळे मिटताक्षणी माझे पालनपोषण केलेल्या आईचे विस्मृत चित्र डोळयांपुढे येऊन उभं राहतं. 'ये बाळ, इथलं नाटक संपलं ना ? तुझं काम तू केलं आहेस.' असं सांगितल्यासारखं वाटतं. मला बोलावल्यासारखं दिसतं. नाटकातलं पात्र झालं म्हणून काय झालं एकदा तरी चेहऱ्यावरचा रंग पुसावा लागतोच की नाही. आपलं रंगसाहित्य वाटेल तिथं फेकण्यापेक्षा पुढे ते पात्र वठविणाऱ्यासाठी मिळणं सुलभ व्हावं असं करणं हेच त्या नटाचं कर्तव्य नव्हे का ? मी पाठविलेले हे साहित्य म्हणजे तशाच प्रकारचं रंगसाहित्य आहे असं समजा."

× × ×

अपूर्व असं हे पत्र आहे. ही एक अमूल्य ठेव म्हटलं तरी चालेल. त्यासोबत आलेला पंधरा हजार रुपयांचा ड्राफ्ट म्हणजे अगदी क्षुल्लक वस्तू होय. ते धन त्यांचे आहे. त्याचा विनियोग त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणेच व्हायला पाहिजे. ते जर मुंबईहून माझ्या गावी येऊ शकले असते तर त्यासंबंधीची चिंता मला राहिली नसती. ती ठेव त्यांची त्यांना परत केली असती. पण आता त्यांनी पूर्ण विश्वासाने माझ्याकडे पाठविलेल्या रोजनिशीत दडलेले आठवणीचे मोती मात्र एक एक करून तपासले पाहिजेत. त्यांच्या चित्राप्रमाणेच यालाही गूढ अशी पार्श्वभूमी दिसते. ती पार्श्वभूमी कोणती हे ओळखायला पाहिजे. त्यांचे जन्मस्थान, वाढलेले घर, केलेला संसार, पोळलेले दांपत्य-जीवन. त्यानली कडू-गोड फळे यांची माहिती मिळविली पाहिजे. शेवटपर्यंत त्यांनी ज्या व्यक्तींना मदतीस पात्र असं समजून मदत दिली ते कोण आहेत हे जाऊन बघायला पाहिजे. जीवनाचा अर्थ त्यांनी कशाप्रकारे लावला हे मी ओळखू शकतो पण त्यांची आठवणच माझ्यासाठी एक प्रेरणा ठरेल. त्यांच्यापासून मला, माझ्यापासून पुढच्यांना.

या सगळ्या आठवणी बोलण्याच्यारूपाने व्यक्त होतात. बोलणं म्हणजे फक्त शब्दसमुच्चय, अर्थच्छटा देणारे वाक्यसमूह. पण सर्व काही सांगण्याची शक्ती त्यांत नाही. उपनिषदांच्या वाक्यांचा, बुद्धासारख्या महापुरुषाने सांगितलेल्या गोष्टींचा अर्थ लावता आला आहे. तो लागतोच असं मीही काही लोकांप्रमाणे समजू लागलो तर ती माझी समजूत म्हणजे शुष्क पांडित्य, एवढंच नव्हे तर मूर्ख पांडित्यही ठरेल. एक समाज, एक काल, त्या कालातील विशिष्ट विश्वास आणि मान्यता, त्या समाजातले विविध प्रसंग आणि त्या प्रसंगांशी समरस झालेल्या शीलसंपन्न व्यक्तींना काही सांगावेसे वाटून बाहेर पडलेले ते बोल होत. तो काळ संपला नि त्याची पार्श्वभूमी जाणणारी व्यक्ती निवर्तली तर आमच्यासाठी शिल्लक राहतात ती फक्त जड वाक्ये. अनेक अर्थ देऊ शकणाऱ्या एकेका शब्दाला ओवून रचलेली ती वाक्यसरणी. त्यावरूनच 'बुद्धाने असे सांगितले', 'वाल्मीकीने रामाकडून असे वदविले', 'कृष्णाने हेच सांगितले' असे धीटपणे सांगणाऱ्याचा काल संपूनही हजार दोन हजार वर्षांचा कालखंड सरून गेला आहे. कालाच्या प्रवाहात ती पार्श्वभूमी पूर्णपणे धुतली गेली आहे. त्या काळी वापरलेला एक एक शब्द मूळ अर्थाची व्याप्तीच हरवून बसला असावा. त्यालाच नवीन अर्थच्छटा लाभली असावी. तो मूळचा अर्थ आताची भाषा मात्र जाणल्याने स्पष्ट होईल का ?

यशवंतरावांच्या रोजनिशीच्या पानांतून येथे तेथे उल्लेखिलेल्या वाक्यांना योग्य अशी पार्श्वभूमी नसल्यामुळे माझ्यापुढे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नव्हते. त्यांनीच काढलेली आठ दहा चित्रे समोर ठेवली की ती काही तरी सांगू इच्छितात असे मला वाटे. चित्र नावाची वस्तू म्हणजे जणू काही पुढे मागे काल नसलेल्या बाहुल्याच एका क्षणाचे स्थिर असे रसभावाचे चित्र. त्या चित्रातील व्यक्ती कोण, संदर्भ कोणता, हे समजले तर समान अनुभवांच्या व्यक्तींना त्यात विशेष असा अर्थ दिसेल. माझे हे बोलणे तुम्हाला कोड्याप्रमाणंच वाटत असेल. मला जाणवल्याप्रमाणं, कथेच्या स्वरूपात शक्यतो सुसंगत अशा पद्धतीने ते गुंफून मी सांगत आहे. ती कथा सांगण्यापूर्वी माझा नि यशवंतरावांचा परिचय प्रथमतः ज्या प्रसंगी झाला त्याचेच वर्णन करून सांगतो.

आजपासून सुमारे सहा वर्षांपूर्वीची गोष्ट. एका उन्हाळ्यात आगगाडीने मी धारवाडहून मुंबईला चाललो होतो. मागील सगळी रात्र गाडीतच गेली होती. सकाळी पुण्याहून पुढची गाडी पकडायची होती. मुंबईला जाणाऱ्या गाडीत मी घुसलो. फर्स्ट-क्लासचा तो एक मोठा डबा होता. मी आत जाण्यापूर्वीच लोकांची गडबड चालली

होती. सामानाचा ढीग डब्याच्या लांबीइतका भरला होता. माझं सामान तसं काही फारसं नव्हतं. फक्त एक वळकटी होती. ती उचलून कुली एका दाराने व मी एका दाराने शिरलो. त्यामुळे एकमेकाला हुडकण्यात वेळ गेला व जागा मिळण्याला अडचण झाली. खिडकीत बसून वाटेवरचं दृश्य बघण्याची माझी इच्छा विफल झाली. मला बाजूला बसावं लागलं. खिडकीजवळ एक वयस्क असे गृहस्थ बसले होते. त्यांचा वेष सामान्य असाच होता. आमच्या समोरच्या बाजूस काळ्यासाहेबांचं एक कुटुंब बसलं होतं. बहुतेक ते गोव्याहून येत होते, पण जणू काही आपण इंग्लंडहून येत आहो अशीच त्यांची वागणूक होती. माझ्याजवळ बसलेली व्यक्ती माझ्याहून वयाने दहा वर्षांने तरी मोठी असावी. माझ्या दुसऱ्या बाजूला जे बसले होते तेही साहेब होते. ते सगळे साहेब तशा गोंधळात बोलण्यात गुंतले होते.

सकाळचा फराळ झाला नव्हता. कॉफी पिण्याची तलफ आली. त्यासाठी खिडकीतून इकडं तिकडं बघू लागलो. 'काही चोरीस तर गेलं नाही ना?' असे माझ्या जवळच बसलेल्या गृहस्थांनी विचारले. माझ्याहून वयाने मोठे असा मी ज्यांच्याबद्दल उल्लेख केला आहे ते हेच गृहस्थ होत. यांचं नाव यशवंतराव.

"नाही. फराळ झाला नाही, काल रात्रीपासून कसलाच आहार पोटात गेला नाही. त्यामुळे रेस्टॉरंटच्या मुलाला हुडकीत आहे." "येईलच आता. त्याचं ते काम आहे". ते म्हणाले. गाडी चालू झाली. रेस्टॉरंटची मुलं लोकांच्या सेवेसाठी धावू लागली. मी चुटकी वाजवून एकाला बोलावण्याचा प्रयत्न केला. ते त्याला दिसलं नाही ऐकूही गेलं नाही. मुख्य कारण माझा दरिद्री वेषच कदाचित असेल. साहेबांच्या झुंडीत एखाद्या बकरीसारखा दिसलो असेन. माझ्या वयस्क मित्रांनी 'बॉय' म्हणून एकाला हाक मारली. 'येतो' असे सांगून ती असामी जी गेली ती आलीच नाही. तेव्हा त्यांनी माझ्याकडे वळून विचारले, "ब्रेकफास्ट घ्याल का?"

"काही चालेल ! पण मुलगा आला नाही ना?" मी म्हणालो.

"हरकत नाही. माझाही फराळ झाला नाही. बरं तुम्ही काय घ्याल?"

"तो आल्यावर..."

"टोस्ट कॉफी एवढंच ना? का ऑम्लेट वगैरे...?"

"मी त्यापैकी नाही." असे म्हणेपर्यंत ते उठूनही गेले. मॅनेजरकडे जाऊन आपल्यासाठी व माझ्यासाठी फराळाची ऑर्डर देऊन आले. येऊन बसल्यावर परिहासात्मक स्वरात ते म्हणाले, "आपल्यासारखी माणसं चहा-फराळाचे पैसे देऊ शकणार नाहीत, असं त्या मुलांना वाटलं असेल." मला हसू आलं. तेही हसू लागले.

तोच एका बॉयने ट्रेमध्ये उपाहार आणून ठेवला. टोस्ट, चीज, जॅम आणि कडवट अशी कॉफी हे जिन्नस होते. मी भुकेने व्याकुळ झालो होतो. माझं सगळं लक्ष उपाहाराकडं होतं. माझा फराळ संपण्यापूर्वीच त्यांचा फराळ संपला. पायाखाली रिकामे पात्र आम्ही ठेवले तरी ते नेण्यासाठी कोणी आलं नाही. पुन्हा त्या मुलांना बोलवावंच लागलं. त्या पाठोपाठ 'बिल' आलं. एकच बिल पाहून मला आश्चर्य वाटलं. खिशातून पर्स काढून मी पैसे देऊ लागलो. पण त्यांनी पैसे देऊ दिले नाहीत.

"खाण्याची इच्छा मी व्यक्त केली. माझे पैसे तरी मी द्यायला हवेत."

"गाडीत मी—तू आलं का?" म्हणत ते हसू लागले. पैसे मात्र घेतले नाहीत. ही कुठली व्यक्ती असे मला वाटले.

"एकटंच बसून खाणं मला आवडत नाही." असं त्यानी सांगितलं.

"आपण मोठे आहात."

"वयानं असेन." ते म्हणाले. मी फक्त हसलो.

लोणावळा स्टेशन मागे पडले. पुढे येणारे खंडाळ्याचे घाट म्हणजे प्रवासी-जनांना रसमय भोजनच. पण मला जागा खिडकीजवळ मिळाली नव्हती. उभा राहून पाहावं म्हटलं तर साहेब आणि त्यांच्या बायकाचे पाय आडवे पसरले होते. बसल्या ठिकाणावरूनच मी आपली मान उंचावून डोकावू लागलो. माझं मन चलित अशा बूड तुटलेल्या निसर्गाच्या दृश्यात लीन झालं होतं. वाटेतल्या बोगद्यांचा काळोख त्याला आणखी कातरीत होता. पहिला बोगदा ओलांडून गाडी बाहेर पडली. तेव्हा ते शेजारचे गृहस्थ उभे होते. त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवून 'खिडकीजवळ बसा' असा आग्रह केला.

"नाही, हरकत नाही. आपणच बसा."

"तुम्हाला पाहण्याची हौस दिसते. पुण्याला अनेक वेळा मी जात येत असतो." असे म्हणून त्यांनी मला आपल्या जागेवर आग्रहानं बसविलं म्हटलं तर चूक होणार नाही.

'हा माणूस कोण?' दुसऱ्यांची मनीषा ओळखून इतकं औदार्य दाखविणाऱ्या व्यक्तीबद्दल कुतूहल वाटू लागले. काही वेळ खिडकीतून दृश्य पाहण्यात गुंतलो. त्यानंतर डोंगराच्या रांगा कमी होत गेल्या. पुढचं दृश्य सामान्य असं दिसू लागताच मी जागेवरून उठलो व त्यांना आपल्या जागी बसण्याची विनंती केली.

"आता काय, फक्त दोन तास . . . बसा." ते म्हणाले.

त्यांचा परिचय करून घ्यावा असे मला वाटले. तरी पण स्पष्टपणे काही बोलता येण्यासारखे नव्हते. समोरची माणसे रंगभूमीवरील नटाप्रमाणे मोठमोठ्याने कोकलत होती. ही गाडी म्हणजे आपले घर, समोर बसलेली माणसं असून नसल्यासारखीच या प्रकारचे त्यांचे वर्तन होते. या सर्व गोष्टींचा मला तिटकारा आला होता. एवढ्या गोंधळातही हळू आवाजात त्यांना मी विचारलं, "आपण कुठं जाणार?"

"गावाला."

"मुंबईचे का आपण?"

"ते माझं निवडलेलं गाव. जन्मलो दुसरीकडं. आता मुंबईत असतो. आपण मुंबईलाच जात असाल? आपली घरातली भाषा कन्नडच ना?" आमचं संभाषण आतापर्यंत इंग्रजीतच चाललं होतं. मी कानडी माणूस आहे हे यांनी कसं ओळखलं असेल? तसं मी त्यांना विचारताच ते म्हणाले, "रेस्टॉरंटची ती मुलं न आल्या वेळी 'अब्बा, जनगळे' (बाप रे, काय ही माणसं!) असं आपण पुटपुटलात त्यावरूनच मी ओळखलं."

"तुम्हाला कानडी येते का?"

"बोलणं सुटून बरेच दिवस झाले. पण कुणी आपली मातृभाषा विसरू शकतं का?"

"गाव?"

"उत्तर कन्नडातील एक खेडं. मी आता मुंबईतच आहे."

"कुठली नोकरी वगैरे आहे का?"

"होय. माझीच नोकरी करतो."

"म्हणजे स्वतंत्र असा व्यापारच ना?"

"व्यापार करून कंटाळलो. आता त्यापासून स्वतंत्र झालो आहे."

"निवृत्त जीवन?"

"जीवनापासून निवृत्त नव्हे." असं म्हणून ते हसू लागले.

मग मात्र स्वतःच हळूहळू मला प्रश्न विचारू लागले. मी कदाचित एक दोन शब्दांऐवजी काही वाक्यांतून उत्तरे दिली असावीत. कारण, 'मी असा आहे. मुंबईला अमुक कामासाठी आलो आहे. इतके दिवस राहणार आहे.' इतकं सांगत असतानाच "दादर स्टेशन यावं का? दादर ना?" असं विचारून गडबडून मी उभा राहिलो. त्या गडबडीत त्यांना काही न सांगता मी उतरूनही गेलो असतो. पण गाडी येथे दहा मिनिटं थांबते. तसं काही घाईचं कारण नाही याची जाणीव होऊन

अंथरूण गुंडाळण्यापूर्वी मी त्यांना नमस्कार केला. उपकृत भावाने त्यांना म्हणालो, "आता आपली भेट कुठं होणार कुणास ठाऊक ! आपलं नावसुद्धा विचारलं नाही." माझ्या मनात एक तऱ्हेचा गोंधळच उडाला होता.

पत्ता असलेली चिठ्ठी त्यांनी आपल्या खिशातून काढून दिली. "यात माझं नाव नि पत्ता आहे. आपल्यास सवड मिळेल तेव्हा आज किंवा उद्या या. या खेपेस येणं झालं नाही तर पुढच्या खेपेस, येथे आल्या वेळी तरी माझ्या घरी या. तिथं आपण शांतपणे बोलूया."

"बरं आहे." असं म्हणून मी त्यांना निरोप दिला नि गाडीतून उतरून प्लॅट-फॉर्मवर पाय ठेवले. तोच माझी प्रतीक्षा करीत असलेले माझे दोन मित्र 'हॅलो' म्हणत आले नि त्यांनी आलिंगन दिले. त्या वयस्क गृहस्थांचा मला पुन्हा विसर पडला. यशवंतरावांनी दिलेली चिठ्ठी अजून मी पाहिलीही नव्हती.

माझं मन पूर्णपणे इतरत्र धावत होतं. अंधाऱ्या खोलीत अेखादा काजवा मुलापुढे क्षणभरच चमकावा, उडावा आणि नाहीसा व्हावा म्हणजे मग त्या मुलाची किती निराशा होत असेल ?—तसंच झालं होतं माझं. इकडं माझे मित्र बोलत होते. मी त्यांना उत्तर देत होतो. तोच टॅक्सी मागवून मला उचलून नेल्यासारखं त्यांनी आपल्या घरी नेलं. मी त्यांच्या आधीन होतो. माझं मन मात्र यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वामुळं माझ्या स्वाधीन राहिलं नव्हतं.

त्या वेळी मुंबईत मी चार सहा दिवस घालविले. त्यांतच एके दिवशी सवड काढून संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमारास मलबार हिलवरील त्यांच्या बिऱ्हाडी पोचलो. समुद्राच्या काठी जुन्या काळच्या अेका कौलारू झोपडीवजा घरातल्या माडीच्या एका पार्श्वभागी ते राहात असत. त्याच्या एका बाजूला रस्ता, मलबार हिल दिसते नि दुसऱ्या बाजूला सुंदर असा समुद्र पसरला आहे. माडीवर चढताच त्या समुद्राच्या आकर्षणामुळे मी तेथेच थोडा वेळ थांबून दृश्य पाहिले. माझे मित्र घरी आहेत किंवा नाहीत हे पाहण्याचेसुद्धा भान राहिले नाही. इतक्यात त्यांचा चाकर खालून वर आला. "काय पाहिजे ? इथं का उभं राहिलात ?" असे त्याने मला दटावून विचारले. हाच या कथानकातला 'दादा' होय. त्याच्या रंगारूपावरूनच तो नोकर असावा हे दिसून येत होतं. पण पायऱ्या चढून वर येण्याची त्याची शैली, माझ्याशी बोलण्याची शैली मालकासारखी वाटत होती. मला ते सहन झालं नाही. तसाच मी त्याच्याकडे भिरभिरत्या नजरेने पाहात राहिलो. तोंड फिरवून तो घरी

निघून गेला. काही वेळ समुद्राच्या दृश्याचे थेंब न थेंब प्राशन केल्यावर झाकलेले दार ठोठावून मी "यशवंतराव" अशी हाक मारली.

त्यांनी आवाज ओळखला असावा. "आपण का ? या." म्हणत दार उघडून ते बाहेर आले. हस्तांदोलन करून मला त्यांनी आत बोलावून नेले. त्याच खोलीत पुढे मी अनेक वेळा गेलो आहे. हाच दादा अनेक वेळा माझ्या दृष्टीस पडला आहे. यशवंतरावांच्या आदराला मी पात्र आहे असं दिसल्यावर दादाचं वर्तन पूर्णपणे बदलून गेलं. "इथं येऊन किती वेळ झाला ?" मला पाहात यशवंतरावानी विचारलं.

"पंधरा मिनिटं." मी म्हणालो.

"कुठं होता ?"

"बाहेर व्हरांड्यातून समुद्र पाहात उभा होतो. अतिशय सुंदर दृश्य दिसतं. अशी जागा आपल्याला सुदैवानेच मिळाली आहे." मी म्हणालो.

त्या प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजी त्यांनी दादालाच विचारलं, "दादा, व्हरांड्यात तुला हे दिसले नाहीत का ?"

दादाने काहीतरी बडबड केली.

"मला का सांगितलं नाहीस ?"

तो निरुत्तर झाला. तेव्हा आपणहून मी म्हणालो,

"नाही. तसं त्यानं मला विचारलं होतं. मीच उत्तर दिलं नाही. त्याची बोलण्याची रीत. . ." एवढ्यावरच मी थांबलो. हसत ते म्हणाले, "घरच्या यजमानासारखीच होती, असंच ना ?"

गेल्या काही वर्षांपासून त्याच्या घरात शिरून राहिलेल्या दादाच्या गुणांची पारख त्यांना चांगलीच असावी. 'बरंय' असं म्हणत त्यांनी तो विषय बाजूस सारला नि, "दादा आमच्या चहापाण्याची व्यवस्था कर बघू" असे सांगून दादाचे संदिग्ध बोलणे चुकविले. घाईघाईत आत जाऊन त्याने काही फळं, बिस्किटं व चहा आणून दिला. मग आम्ही बोलण्यात दंग झालो.

"आपण एकटेच इथं असता का ?" मी प्रश्न केला.

"हा दादा आणि मी दोघेही."

"त्याचा आपला काही संबंध आहे का ?"

"संबंध नसला तरी ऋणानुबंध आहे." हसत ते म्हणाले. नि पुढं सांगू लागले, "तसा प्रश्न करू नका. मी मागचं सर्व सोडून इथं आलो आहे. मला माझं असं कुणी नाही असंही नाही. पण मला कुणाची गरज नाही. मी एकटा माझ्यापुरता मीच असा

राहतो म्हणून इथं आलो आहे. दहा वर्षांचा कालावधी लोटला. काय व्हायचं ? आरोग्य चांगलं असलं तर इतरांनी आपल्यासाठी काही करावं अशी अपेक्षा राहात नाही. दूर राहून प्रपंचाकडं पाहणं चांगलं नाही का ?"

"मग वेळ कसा घालविता ? उद्योग नसताना . . . ?"

"उद्योग नसताना कसं ? उद्योग नसता राहणं . . . ते पाहा. मी एक अमॅच्युअर आर्टिस्ट आहे. चित्रकला मी जाणतो असं मी समजत नाही. पण माझ्या मनातील वेड व्यक्त करायला ती एक संधी देते. शिवाय पुस्तकं आहेत. विकत घेतो किंवा वाचनालयातून आणवून वाचतो. दिवसातून दोन वेळा सकाळी, संध्याकाळी फिरून येतो. कंटाळा आला तर पलीकडच्या घरी मुलं आहेत, त्यांचा स्नेह वाढवितो. बदल हवासा वाटला तर पुणे, महाबळेश्वर किंवा खंडाळ्याला जाऊन येतो."

"नित्यं . . . ?"

"चित्रं काढायची, तऱ्हेतऱ्हेचे लोक पाहायचे. साहित्य निर्माण करणाऱ्याला असा प्रश्न केला तर काय उत्तर द्यायचं ?"

हसून मला माझी चूक कबूल करावी लागली. ते पुढं म्हणाले,

"चिंतन करणं हेमुद्धा एक काम आहे असं समजावं. पण ते चिंतनच आहे किंवा नाही याचा निर्णय कुणी करायचा ? अन्य लोकांना चिंतन करणारा माणूस आळशीच वाटत असावा. आळशी माणूससुद्धा मी चिंतनात वेळ घालवितो असं म्हणू शकेल."

"मी प्रश्न केला त्यात चूक झाली का ?"

"तसं काही नाही. तुम्ही मला प्रश्न करू शकता. मी त्याचं उत्तर द्यावं अशी माझ्यावर सक्ती तर नाही ना? मी उत्तर द्यावयाचं ते माझ्या तृप्तीसाठी. मी काही काम करीत नाही असं म्हटलं तर मला कोण विचारणार ? कामाशिवाय बसून राहणंही मला आवडत नाही. वेळ जात नसेल तर शेजारच्या मुलांबरोबर मीही मूल होऊन स्वतःला विसरून जातो."

त्याच वेळी सहा वर्षांच्या एका पारशी मुलाने, "दादा" अशी हाक मारली. दादाने 'ओ' दिली नाही. माझ्या चेहऱ्याकडं बघून 'मीच चा दादा' असं म्हणत पळत जाऊन यशवंतरावांनी त्या मुलाला उचलून आणले.

"जगाचं सुख आपल्याला हवं असेल तर सगळी आपलीच मुलं असं समजावं."

"खरं आहे. पण ती 'मुलं' असेपर्यंतच ना ? पुढे ते कुठं नि आपण कुठं !"

"होय. पण ती मोठी व्हावयाच्या आतच हजारो नवी मुलं जन्माला येतात मुलं नाहीशी होत तर नाहीत ना ?"

"मुलं मोठी झाली तर आमची प्रीती नि त्याची प्रीती– एकाच तऱ्हेची असते का ?"

"मोठी झाली तर ती मुलं नव्हत. त्यांचं जगच वेगळं होतं. ती स्वतंत्र होतात. तशांवर आपण प्रीती करावयाचं कारण नाही. आपली सहानुभूती, करुणा काही जरी असली तरी ती स्वतःचे जीवन न चालवू शकणाऱ्या कोवळ्या जीवावर मात्र. ती पुरेशी नाही का ?"

त्या मुलाला त्यांनी मांडीवर बसवून घेतलं. ते मूल घोडा पाहिजे म्हणून मागू लागलं. यशवंतरावांनी कागद पेन्सिल घेऊन घोड्याचं चित्र काढून दिलं. मग त्या मुलाने घोड्याची गोष्ट सांगा अशी मागणी केली.

"एका गावी एक घोडा होता." त्यांनी कथा सांगायला सुरुवात केली.

"एकच घोडा का ?" मुलाने विचारले.

"छे: छे: पुष्कळ घोडे आहेत. यापुढे एकानंतर एक असे ते येणार आहेत. पाहा." त्याच्या निराशेचे त्यांनी निवारण केले. कथा पुढे चालली. मी मूल होऊन कथा ऐकू लागलो.

त्या दिवशी मी त्यांच्याशी जास्त बोललो नाही. मी निघत असताना त्यांनी विचारले, "आता कधी येणार ?"

"पुढच्या वर्षी" मी म्हणालो.

"बरंय, अवश्य या." ते म्हणाले.

हा माझा नी यशवंतरावांचा पहिला परिचय.

अध्याय तिसरा

आपल्या माणसांशी संबंध तोडून दादासारख्या नोकराला प्रेमाने जवळ ठेवून घेऊन यशवंतरावांनी काळ कसा घालविला ही एक आश्चर्याचीच गोष्ट आहे. त्याला यांची एकट्याचीच चाकरी करावी लागत असे. एरव्ही तोच यजमान असं म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या हिशेबाची वही पाहिल्यानंतर असं दिसून आलं की घरी प्रत्येक महिन्याच्या पहिल्याच दिवशी ३० रुपये त्याला देत असत. एखाद्या महिन्यात चुकूनही त्यापेक्षा कमी रक्कम दिलेली नाही. पाच वर्षांच्या अवधीत ती रक्कम ४० पर्यंत वाढविण्यात आली. जेवण त्यांच्याच घरी, कपडे त्यांचेच, एवढंच नव्हे तर कित्येकदा आपल्याला आवडलेला सिनेमा पाहण्यासाठी त्याला ते पैसे देत व म्हणत, "मॅटिनी शो आहे, बघून ये" माझ्या समक्षच असे काही प्रसंग घडले आहेत. दादा त्यांच्याशी प्रामाणिकपणे वागत असेल असं मला वाटलं नाही. तो फक्त त्यांच्यापुढं प्रेमाचं ढोंग करतो असं वाटायचं. त्याच्या मानानं अधिक योग्य अशा उत्तर हिंदुस्थानी भय्याला नेमणं कठीण नव्हतं. एकदोनदा तर माझ्या समोरच त्यानं उर्मट उत्तर दिल्याचं मी ऐकलं आहे. म्हणूनच तो नसताना, 'आपण याचं वर्तन कसं सहन करता?' असं मी त्यांना विचारलं होतं. हसतच त्यांनी उत्तर दिलं होतं,

"तो एक ऋणानुबंध आहे."

"पूर्वजन्मावर आपला विश्वास आहे का?" मी प्रश्न केला.

"मला पूर्वही नाही आणि अपूर्वही नाही." हे त्यांचं उत्तर.

"मग...?"

"इथं रस्त्यात पडलेला तो मुलगा. इथंच खालच्या उपाहारगृहाच्या ओटयावर कण्हत पडला होता. तेव्हा, 'इथून जा.' असं त्याला हॉटेलचा मालक दटावीत होता. त्या वेळी त्याचं वय चोवीस वर्षांचं असावं. अतिशय रोडावून, सुकून, कंगाल होऊन त्याचं शरीर अस्थिपंजर झालं होतं. आपल्या दुर्बल देहाला ओढीत आठ दहा वेळा मागे समुद्राकडे जाऊन येताना मी त्याला पाहिलं होतं. येथे मुंबई कार्पोरेशनने भिकाऱ्यांच्या सोईसाठी रस्त्यावर संडास बांधले नाहीत न! घडीघडीला कण्हत

हा जात येत असल्याचं पाहून याला कसलातरी रोग झाला होता हे स्पष्ट झालं. हॉटेलवाल्याला हे अवलक्षणी पाप्याचं पितर आपल्या हॉटेलच्या कट्ट्यावर पडून राहिलेलं सहन झालं नाही. त्यानं तोंडानं सांगून पाहिलं, शिव्या देऊनही बघितलं. शेवटी वेताची पातळ अशी छडी काढली. माडीवर बसल्या ठिकाणी मला हा गोंधळ ऐकू येत होता. छडीने मारल्याचा ध्वनीही कानी पडत होता. शेवटी त्या परिचित हॉटेलवाल्याला मी दटावणीच्या स्वरात मोठ्यानं हाक मारली, 'अहमद.'

"मला राग आला आहे हे त्यानं ओळखलं. वर येऊन त्यानं आपली गाऱ्हाणी मांडली."

"कुठंतरी दवाखान्यात जाऊन पडायला याला काय झालं? ही अमंगळ घाणेरडी व्यक्ती इथं पडून राहिली तर चहा प्यायला येणारे माझे गिऱ्हाईक परत जाईल ना?'

"म्हणून त्याला मारायचं का? चालण्याचंसुद्धा त्याला त्राण नाही."

"अहो चांगल्या बोलानं सांगितलं तरी जात नाही, तर मी काय करू? पोलिसांना आणून दाखविलं तर ते म्हणतात, 'हे आमचे काम नाही."

"कधी आपल्यालाही तसं होणार नाही हे कुणी सांगावं?"

तेव्हा अहमदला राग आला. त्याची सहनशक्ती संपुष्टात आली.

"मग आपणच त्याला का पोसत नाही?" म्हणत तो खाली निघून गेला. मी त्याचा अपमान केला असं त्याला वाटलं असावं. आपला राग शमविण्यासाठी खाली जाऊन त्यानं म्हटलं, 'अरे हे बघ, वर तुझे दादा आहेत, तिथं जा. तुला चांगल्या अंथरुणावर निजवून, उपचार करतील."

"त्या ध्वनीतला टोमणा, त्या बोलण्यातलं व्यंग्य मला जाणवलं. मी खाली उतरून गेलो. पाहिल तर ओट्यावर पडलेली ती वस्तू माणसासारखी दिसत नव्हती. अहमदला दिलेल्या उपदेशाचं आचरण मीच करावं असं वाटलं. मी पुढं मागं पाहिलं नाही. त्या मुलाला माझ्या दोन्ही हातांनी उचलून पायऱ्या चढून वर घेऊन आलो नि त्याला माझ्या अंथरुणावर निजविलं. तेव्हा त्या मुलाला भीती वाटली असावी. मलाही काही उमजेनासे झाले. अहमद पुन्हा वर आला. त्यानं क्षमायाचना केली. "शेठजी, आपण त्याला टॅक्सीतून नेऊन कुठल्यातरी हॉस्पिटलमध्ये घालूया. इथंच ठेवून त्याला पोसणं शक्य होईल का? आपला मी अपमान केला. क्षमा करा."

"मी काही बोललो नाही. सरळ खाली उतरून गेलो. जवळच दहा घरांच्या पलीकडे डॉ. दारुवालांचा दवाखाना होता. त्यांना बोलावून आणलं. त्या अनाथ

व्यक्तीला पाहून त्यांनाही आश्चर्य वाटलं. हा एक वाटेवर पडलेला मुलगा आहे हेही त्यांना समजलं."

"याला आपण हॉस्पिटलमध्ये का घालीत नाही ?" त्यांनी विचारलं. मी म्हणालो, "नाही, मीच त्याची शुश्रूषा करीन. मेला तर कामच संपलं. जगून हुशार झाला तर त्याला हवं तिथं जाऊ देईन."

"तो मनुष्यरूपात यायला दोन महिने लागले. सूक्ष्म असा आमांश त्याला झाला होता. त्याचे मळकट कपडे काढून फेकून दिले. नवीन कपडे घालून त्याला निजवलं. त्या असह्य आजारातून मुक्त व्हायला बरेच दिवस लागले. ही डॉ. दारुवाल्यांचीच कृपा. शिवाय त्याच्या नशिबी जगायचं होतं म्हणून जगला. दिवसातून दहा वेळा त्याची घाण मला काढावी लागत असे. स्वतःहून संडासात जावयाची त्याला मुळीच शक्ती नव्हती. तशी शक्ती यावयाला दोन महिने लागले. सुरुवातीस पंधरा दिवस आमांशाबरोबर आणखी काही रोगही शिरले होते. माझी त्रेधा पाहून डॉ. दारुवाला आपल्या दवाखान्यातील दादीमेरी नावाच्या नर्सला दिवसातून दोन वेळा माझ्या घरी पाठवीत असत. या मुलाचं खरं नाव दादा नाही. अहमदच्या बोचऱ्या शब्दामुळे मी त्याला दादा म्हणायला प्रवृत्त झालो. तो एक मराठी मुलगा आहे. त्याचं नाव गणपत. तो आजारातून उठल्यानंतर कामासाठी मी त्याला इथंच ठेऊन घेतलं. साताऱ्याला त्याची मोठी का धाकटी बहीण राहते असं समजलं आहे. त्यानंतर वर्षातून एक दोन वेळा तो साताऱ्याला जाऊन येत असे."

"तर मग भरपूर दंड भरून घेतलेल्या पदार्थासारखंच झालं नाही का ? तशा स्थितीत तर त्यानं आपणाशी किती विनयानं वागायला हवं होतं." विस्मयानं मी बोललो.

हसून ते म्हणाले, "दंड भरला हे खरं; पण एका जीवाला वाचविण्यासाठी भरलेली किंमत ही दंड कशी ठरेल ? पैशाशी त्याचा संबंध काय ?"

"निदान त्याचे गुण तरी चांगले असावेत ना ? यांनीच मला वाचविलं एवढी भावना तरी असू नये का ?"

"म्हणजे काय ? दासांनी देवाची वारंवार स्तुती केल्याप्रमाणं 'तुमच्यावाचून मला गती नाही, तुमच्यावाचून मुक्ती नाही.' असं म्हणत राहावं का ?"

"वागणूक तरी..."

"मला वाटतं या मुलाची वाढच तशी झाली असावी. पुरेसे संस्कार नाहीत. त्याच्या आईला दोन मुली व एकच मुलगा असं ऐकतो. तिनं मोठ्या लाडानं याला

वाढविलं असावं. प्रीती म्हणजे माझा अधिकार असंच याला वाटलं असावं. म्हणून माझ्याबद्दलही आरंभापासून तीच बोथट भावना वाढत आली आहे. "

"तसं असलं तर...?"

"समजा याला पळवून दुसऱ्याला आणलं. त्यालाही दुसरीकडं चाकरी मिळेल. मलाही दुसरा माणूस मिळू शकेल. नवीन आलेला माणूस कदाचित असा राहणार नाही. पण त्याची एक दुसरीच तऱ्हा असेल. तसा मोठा फरक पडणार नाही."

"फरक पडणार नाही म्हणता?"

"माझ्या मुलाकडूनच मला जे मिळायला हवं होतं ते मिळालं नाही !"

"आपल्याला... किती... मुलं ?"

"त्या सगळ्यांना विसरून आल्यानंतर आता तो विचारच नको. ते एक संपलेलं प्रकरण आहे. सध्या हा दादाच माझा मुलगा. माझ्या मुलाप्रमाण तो चांगला आहे का वाईट याचा विचारच कशाला?" असे म्हणून ते खिन्न झाले.

वरील प्रसंग मी मुंबईस दुसऱ्या वेळी गेलो असताना यशवंतरावांना भेटलो त्या वेळी घडला. त्यांच्या तशा वागणुकीचा मला तरी अर्थच लागला नाही. दादा त्यांच्या औदार्याचा लाभ घेण्यास पुढं माग पाहात नसे. ऋणाची योग्य ती फेड करावी याची भावना त्याला असेल असं मला वाटलं नाही. दादाचा स्वभाव यशवंतरावांना पूर्णपणे समजला नसावा. एके दिवशी त्यामुळे त्याची कदाचित निराशा होईल. यशवंतरावांची रोजनिशी इतक्या दिवसानंतर मी वाचली व त्यांनी काढलेलं एक चित्र पाहिलं. त्या वेळी माझं मत पूर्णपणे चुकलं होतं हेच दिसून आलं.

"थंडी, वारा, पावसात थरथरत पडलेल्या एका पोपटाच्या पिलाला घरी आणून मी पाळलं. पोपट एक चांगला पक्षी म्हणूनच ना मी त्याला घरी आणलं ? ते मरेल की काय या विचारानेच मला दुःख होत असे. सुदैवानं ते जगलं, वाचलं. पहिल्यासारखं झालं. बोलणं शिकलं. माझ्या बोलण्याचं अनुकरण ते चिडविल्यासारखं करीत असे. पोपटाला भाषा येऊ शकेल का ? मात्र अर्थ समजला नाही तरी अनुकरण करण्याचा त्याचा गुण आहे. त्याची प्रीती माझ्यावर नाही का? पिंजऱ्यात ठेवलं तर ते चिरकतं. बाहेर काढलं तर बोचकारतं. हातावर, खांद्यावर चढून बसतं. आपल्याच नादात बोलून पंख फडकावतं. धरायला गेलं की हाताला चावतं. रागानं काही न बोलता बसून राहिलं तर त्यालाही समजतं. तेव्हा खांद्यावर चढून माझ्या गालाला चोच घासतं. तेव्हा त्याला उचलून मी पिंजऱ्यात ठेवतो. चांगले नि वाईट दोन्ही गुण

त्या पोपटात आहेत. तरी पण ते पिल्लू म्हणजे एक जीव. विचारं जगतं आहे तोवेळपर्यंत माझ्याजवळ जगू दें."

वरील गोष्टी दादासंबंधीच त्यांनी रोजनिशीत लिहिल्या असाव्यात. त्यांचा दुसरा काही अर्थच नाही. चांगलं नि वाईट मिळूनच माणूस हा माणूस म्हणवितो. माणूस जगत असेपर्यंतच कुटुंबातील माणसांचा नातलग असतो. आपल्या स्वार्थासाठी, कंटाळा घालविण्यासाठी इतर माणस पाहिजेतच. एकाकी जीवन व्यतीत करणं शक्य नसल्यामुळं तरी माणूस हा माणसाचा नातलग असतो. निव्वळ एकलकोंडं राहून, माणसाचा संपर्क सोडून, रस्त्यावर पडून मरण्याची कोणीतरी अपेक्षा बाळगील काय ?

यशवंतरावांचे हेच विचार त्यांनी काढलेल्या एका चित्रात मला दिसतात. दादाच्या स्वभावाच विश्लेषण माझ्यापेक्षा त्यांनी चांगलं केलं असावं. त्यांच्या काही चित्रांत मनुष्याकृती आहेत. त्या चित्राकृती आकार, अंगाची प्रमाणबद्धता वगैरे दृष्टींनी मुळीच चांगल्या नाहीत. त्यांनी चित्रांना मनाला येईल तो रंग दिला आहे. रंगसंगती त्या चित्रांत फार कमी जाणवते. वर्णानुवर्णाचा मेळ कमीच. बऱ्याचश्या मनुष्याकृतीत देहाचे दोन भाग करून डावीकडे अेक रंग तर उजवीकडे दुसराच रंग ते देत असत. एकीकडे काळा तर दुसरीकडं पांढरा. एकीकडं तांबडा तर दुसरीकडं जांभळा. तांबड्या रंगाला पूरक हिरवा रंग असतो हे जणू त्यांना माहीतच नव्हतं. त्या दृष्टीनं काळा पांढरा रंग जमून दिसेल.

एका तरुणाचं चित्र त्यांनी काळ्या-पांढऱ्या रंगात काढलं आहे. त्या मुलानं पायजमा घातला आहे. उघड्या अंगानं बोडक्या डोक्यानं तो उभा आहे. हातात कपबश्या धरल्या आहेत. डाव्या हातात चहादाणी धरून चहा ओतीत आहे. तो जरी नीट उभा असला तरी चित्राच्या दोन अर्ध्या भागाकडं पाहिल्यास एक पांढरा भाग दिसेल नि दुसरा काळा. दोन्ही जुळवून टाकल्यासारखं दिसतं. तोंडाचा पहिला अर्धा भाग वेगळा व दुसरा अर्धा भाग वेगळा. धडाचा भागही तसाच. पायजम्यामुळ पायाचा भाग तितका विकारयुक्त दिसत नाही. मनुष्याच्या आकृतीत उजव्या डाव्या-मध्ये अंतर असतेच. त्यातून चेहऱ्यात तरी ते अधिक जाणवते. चेहऱ्याचा फोटो काढून त्याचे दोन भाग केले तर ते दोन्ही भाग थोडेतरी कमीअधिक दिसतात.

एक चित्राचा भाग दुसऱ्या भागास जुळवला तर तो चेहरा वेगळाच दिसतो. पण यशवंतांच्या चित्रात स्वाभाविकपणे दिसण्यात हा फरक विपरीत वाढला आहे. स्वाभाविक मुखाच्या दोन अर्धभागांत थोडंसं अंतर असलं तरी त्यात समानता असते.

एका ओठाचा अर्धा भाग आखूड अथवा पातळ असू शकेल. दुसऱ्या ओठाचा लांबट आणि जाडही असू शकेल. भुवया, डोळे, नाकपुड्या, गाल यांत थोडं तरी अंतर भासतंच. यशवंतरावांनी व्यंग्यचित्रकाराप्रमाणं अतिशयोक्तिपूर्ण अंतर वाढविलं अशी कल्पना करावी तर तसही वाटत नव्हतं. हे रूप म्हणजे दोन भिन्न शरीराचे तुकडे करून ते एकत्र जोडल्यासारखं आहे. कपबश्या धरलेला उजवा हात हडकुळा, सडपातळ, दुर्बल काही धरण्याचं त्राणही नसल्यासारखा आहे. जणू चीनीमातीचे ते पात्र हातातून गळून पडेलसं वाटावं. चहादाणी धरलेला डावा हात मांसल आणि पुष्ट असा आहे. कुऱ्हाड धरणाऱ्या हातासारखा मजबूत आणि बलिष्ठ. त्याचं पोट व छाती बघण्यासारखी आहे. उजवी छाती क्षयरोगाने दडपून गेल्यासारखी दिसते. तर डावी छाती कसरत केलेल्या पहिलवानासारखी वाटेल. ते धड कितीतरी विकारग्रस्त आहे.

धडाला शोभण्यासारखं मुख वर आहे. उजवा ओठ खाली झुकलेला नि पातळ असा आहे. उजवा गाल दाढांचा खळगा दाखवितो. भुवई खाली उतरली आहे. तिला केस आहेत की नाहीत इतकी ती सपाट आहे. भुवया व डोळ्यांमध्ये जीवकळाच नाही. मढ्याच्या डोळ्यांसारखे पांढरे डोळे आहेत. चेहऱ्याचा डावा भाग तसा नाही. आखूड ओठ, त्याचं टोक वर उचलल्यासारखं आहे. डावीकडची नाकपुडी फेंदारल्या-सारखी आहे. काळ्या रंगाने काढलेला तो डोळा फुटलेला आहे. डोळ्यांची बाहुली एका बाजूला सरकून, कपटीपणा आणि खट्याळपणा सुचविते. त्यावर जाड भुवई रेखाटली आहे. हा सगळा विचित्रपणा पाहून हे कसलं व्यंग्य असा प्रश्न पडावा. डावा डोळा लहान, उजवा डोळा दुप्पट मोठा. हे पाहून मी ते चित्र खाली ठेवलं. यशवंतांनी आपणहून सांगितलं होतं की, त्यांनी शरीराच्या मोजमापाचा अभ्यास केला नव्हता. त्यांची चित्रं ती उणीव दर्शवीत. तरीपण हे चित्र कुणाचं असं विचारण्याची आवश्यकता नव्हती. आपल्या रोजनिशीत पोपटाच्या पिलाची त्यांनी उपमा दिली होती. त्यावरून मला दादाची आठवण झाली. चहादाणी धरलेला हा मुलगा दादा का असू नये असा विचार आला! दादाच्या तोंडाचा आकार काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला नसावा. त्या मुलाला हे तुझंच चित्र आहे असं म्हटलं असतं तर त्यानं तोंडावर चहादाणीच फेकली असती. त्याच्या चेहऱ्यापुढं आरसा ठेवण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. आपलं तोंड कुरूप आहे असं ऐकण्याची जगात कुणाचीही इच्छा नसते. कुणी म्हटल्यास ते सहनही होणार नाही. म्हणूनच त्यांनी तसला प्रयत्न केला नसावा. मात्र त्यांनी काढलेले चित्र त्यांच्या चाकराचेच होते. चहादाणी, कपबश्या म्हणजे

तो स्वयंपाक करीत असे याचे संकेतच. दादाचंच हे चित्र असं मला वाटताच त्यांनी दादाला कसे पाळले, कसे वाढविले या सर्व गोष्टी आठवू लागल्या. तेव्हा हसूही आलं. त्यांच्या घरी अनाथ म्हणून शिरलेल्या दादाचा सत्त्वशील अंश दर्शवितो तो चित्राचा उजव्या भागाचा अर्धा अंश. म्हणूनच त्यांनी तो पांढऱ्या रंगात काढला आहे. दुसरा अर्धा भाग दादाचा स्वार्थ, दुष्टपणा, वगैरे दर्शविण्यासाठी काळा चित्रित केलेला आहे. डोळे, ओठ, नाक वगैरे ही विशिष्ट अर्थ सूचकच असावेत. डाव्या बाजूची छाती भरदार, मांसल अशी तर उजवीकडची छाती नसल्यासारखी दुर्बल अशी. खरंच बहुतेक लोकांचं हृदय शरीराच्या डाव्या भागातच असतं. तसंच दादाच्या काळयाशा डाव्या भागात छाती नावाचा पदार्थ लपून गेलेला. बाहेरच्या संस्काराच्या मांसाने झाकला गेलेला. त्यामुळे छाती असून नसल्यासारखीच झाली आहे. हा तर्क सुचताच लगबगीने जाऊन ट्रंकेतून चित्र काढून बराच वेळ ते पाहात बसलो. यशवंतांना मनुष्यत्व समजलं नाही, विशेषतः दादाचा स्वभाव समजला नाही असं कसं म्हणता येईल ? जाणूनबुजून त्यांनी त्याचं पोषण केलं होतं, वाढवलं होतं, बलवान बनविलं होतं. कशाला ? त्याचं उत्तर त्यांनीच दिलं होतं. माणसाला माणूस हवा असतो. उजवा-डावा, काळा-पांढरा, शुद्ध-अशुद्ध वगैरे वास्तविक सत्य नव्हेत. मानवाचं शील हे चांगल्या-वाइटांच्या विचित्र अशा मिश्रणानं बनलं आहे. एक सोडून दुसऱ्याची निवड करायला गेलं तर माणूस नावाचा प्राणीच मिळणार नाही. आपल्या चांगल्या-वाईटाचा तोल करू शकणाऱ्या व्यक्तीला तसं वाटतं. स्वतःला सोडून इतरांचंच मोजमाप करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला सगळं जग काळं नि पांढरं असं परस्पराहून भिन्न असे रंग देऊन दाखविता येईल.

त्यांच्या चित्रांच्या राशीत एक पशूचं चित्र आहे. तो पशू चरत आहे. त्याच्या पाठीवर एक जंगली मैना बसली आहे. त्याला टोचून टोचून जखम केली आहे. त्या चित्राविषयी मी त्यांनाच एकदा विचारलं होतं.

"हा पक्षी म्हणजे सामान्य अशी मैनाच ना ? पशूंच्या शरीरावर असणारी ऊ खाणारी."

"होय."

"कुठं पाहिलंत हे दृश्य आपण ?"

"खंडाळयात हे दृश्य रोजचंच आहे. मधूनमधून मला कंटाळा आला की खंडाळयाला जाऊन महिनाभर तिथं मी राहून येतो."

"जनावराचा आकार तेवढा चांगला आला नाही."

"मी चित्रकार आहे असं मी म्हणालो का ?"

"तरीपण चित्रे काढण्याचा तुम्हाला नाद आहे."

"होय, चित्र काढण्याचा मला नाद आहे. या नादाला अर्थ असावाच असं म्हणता येणार नाही. वेळ जातो. या कामात मन रमून जातं."

"यात कसलं आकर्षण वाटलं, काही समजत नाही !"

"सोडून द्या तो विषय. मला ज्या वस्तूत आकर्षण वाटतं त्यातच तुम्हालाही वाटणं शक्य नाही. आणि वाटल्यादर मी स्पष्ट करून सांगण्याचं कारण उरणार नाही !"

"तरीपण थोडीशी तरी माहिती द्या. पार्श्वभूमी कळल्याशिवाय चित्रांचा अर्थ लावता येत नाही."

"मी काढलेल्या सगळ्या चित्रांना अर्थ आहे असं आपणाला वाटतं का ?"

"असलाच पाहिजे. नाहीतर चित्र कोण काढील ?"

"तेही साध्य आहे. आपल्या जीवनात आपण जी कामं करतो त्यांपैकी कितींना अर्थ असतो ? काम केल्यानंतरही ते का केलं याचा अर्थ न लागणारी कामं असतातच की !"

"तेही खरंच. आता या चित्राचा अर्थ सांगा पाहू."

माझ्या तोंडाकडे पाहात ते हसू लागले. त्यानंतर ते म्हणाले, "ही एक केवळ उपमा आहे. माझ्या जीवनाशी संबंधित अशी. या चित्राचा अर्थ तुम्हाला समजावून सांगायची वेळ अजून आली नाही." मग माझ्या हातातून ते चित्र घेऊन त्यांनी आत ठेवून दिलं. त्यानंतर ते चित्र मी पुन्हा पाहिल ते घरी आल्यावरच. त्या चित्रसंग्रहाचा मालक झाल्यावरच. ज्या दिवशी त्यांनी माझ्या हातून चित्र हिसकावून घेतलं होतं त्या दिवशी, त्या क्षणी ते बरेच अस्वस्थ दिसत होते. माझ्या अतिप्रसंगी प्रश्नामुळं तसं घडलं, का त्यांच्या जीवनाशी संबंधित प्रसंगाच्या आठवणीमुळे ते अस्वस्थ झाले न जाणे! मात्र ते बराच वेळ माझ्याशी बोलले नाहीत. कदाचित मी काहीतरी बोलून गेलो याचं त्यांना वाईट वाटलं असावं. तो विषय टाळावा म्हणून मी म्हणालो, "मलबार हिल किंवा चौपाटीवर जाऊया का ?"

"दादाला सिनेमाला पाठविलं आहे. मी एकटा बसून राहतो आपण वाटल्यास जाऊन या." ते म्हणाले.

"आता गेलो तर मी पुढच्या वर्षीच येईन." मी.

"ठीक आहे." ते म्हणाले. दारापर्यंत मला पाठविण्यासाठीसुद्धा आले नाहीत. जुन्या आठवणी जाग्या झाल्यामुळेच ते उदास झाले असावेत असेच वाटले मला. माडीवरून मी खाली आलो. पायऱ्या उतरून येत असताना पांढरी साडी नेसलेली एक बाई वर येत होती. तिचं वय सुमारे चाळीस वर्षांचं असावं. एका बाजूला सरकून मी पायरी उतरत असतानाच तिने प्रश्न केला, 'मिस्टर यशवंत आहेत का?' मी तिथूनच येत असेन हे तिनं जाणलं असावं आणि ते खरंही होतं.

"आहेत." मी कानडीत उत्तरलो.

कानडी भाषा तिला समजली किंवा नाही कोण जाणे!

खाली उतरून मान खाली घालून हळूहळू पावले टेकीत मी चौपाटीवर गेलो. तेथे वाळूच्या एका टेकडीवर एकटाच बसून राहिलो. त्या वेळी संध्याकाळचे पाच वाजले असतील. पाठीमागच्या रस्त्यावर वाहनांचा संचार वाढला होता. नगरातील जनसमुदाय विश्रांतीसाठी चौपाटीच्या वाळूवर मायानगरीसारखा भरून गेला होता. समुद्रावर मावळतीची वेळ होती. बॅक बेच्या लाटा तळ्याच्या लाटासारख्या दुर्बल अशा शक्तिहीन होऊन पुढे येत होत्या. आमच्या गावच्या समुद्राची स्वच्छता, चमक, उन्मत्तपणा वगैरे इथे जाणवत नाही. इथे समुद्र आहे पण नगराच्या गटारांचे पाणी मिसळत असल्यामुळे समुद्राचे पाणीही घाणेरडेच दिसते. त्यांतल्या त्यांत चौपाटीची वाळू स्वच्छ म्हणावी लागेल. मात्र आमच्या गावासारखी स्वच्छता तिथंही नाही. सहस्रावधी लोकांची थुंकी त्या जागेला झेलावी लागते. हजारो प्रकारचा कचरा, कागद, उच्छिष्ट त्या जागी फेकलं जातं. दिवसातून दोन वेळा समुद्राच्या लाटा उसळून तेथील घाण वाहून नेतात, तरीपण रोजरोज एवढी घाण साचतेच. आणि स्वच्छता म्हणजे तरी काय? घाण नाही असा लोक नाही, घाण नाही असा देह नाही. स्वच्छतेचं लक्षण म्हणजे वेळोवेळी साचलेली घाण काढून टाकणं होय.

मी येथे येऊन बसल्यावर एका तासातच त्या जलसमुद्रासमोर जनसमुद्र लहरू लागला. सागरगर्जनेलाही पुरून उरणारा वाहनांचा खडखडाट, नारींचा कलकलाट, भेळवाल्याचं कोकलणं, मुलांचा गोंगाट, नाना प्रकारच्या पिपाण्यांचा कर्कश आवाज आसमंतात भरून राहिला होता. माझ्या मित्रांनी मुंबईला जननिबिड अरण्याची उपमा दिली होती यात काही आश्चर्याचं कारण नाही. या जनारण्यात ते वानप्रस्थी होऊन राहिले हे मात्र नवलाचं. एका दृष्टीनं मुंबई म्हणजे अरण्यच. जनसमुदायात राहूनही न राहिल्यासारखं वागणं तिथं सोपं आहे. कुठंही जा, माणसं जमलेली, दाटीवाटी, धक्काबुक्की आहेच. इतकं असूनही सामान्यतः, 'आपण कोण? कुठून

आला?' असे प्रश्न विचारणारा कोणी भेटत नाही. घरे जवळजवळ असूनसुद्धा इकडच्या माणसाला तिकडच्या माणसाचा परिचय नसतो. आपणहून गेलं तर स्ने नाही, काही नाही. म्हणूनच त्या समुद्रात एका धोंड्याप्रमाणं संध्याकाळपर्यंत बसून राहिलो. त्याचाही कंटाळा आला. त्यानंतर उठून ग्रँट रोड स्टेशनकडं चालू लागलो विकारात मी मग्न झालो होतो. अशा माणसाने बाजूनेच चालणे योग्य असे वाटून इतर लोकांना डावीकडं रेटीत पुढं पाऊल टाकलं. गावदेवीचा भाग ओलांडला लांबरुंद रस्ता संपविला नि ग्रँट रोडच्या कोपऱ्यावर आलो. वाहनांची फार गर्द झाल्यामुळं तिथंच थांबावं लागलं. मोटारीची रांग चुकवून तीन तीन रस्ते ओलांडून स्टेशनाला जावे लागे. वाहनांचा प्रवाह केव्हा थांबतो याकडे जागृत दृष्टी ठेवून होतो. त्याच वेळी माझ्या समोरच्या एका बाजूचा रस्ता ओलांडताना यशवतराव दिसले. मी पायऱ्या उतरून येत असताना समोरून आलेली बाई त्यांच्याबरोबर असावी. कारण तिची साडी पांढरी होती. त्यांनी मात्र मला पाहिलं नसावं. क्षणार्धात ते जनसमूहात मिसळून गेले. पण त्या दोघांनी एकत्र फिरणं मला मात्र विचित्र वाटलं. 'वानप्रस्थ' असा शब्द यशवंतरावांच्या तोंडून मी दोन तीन वेळा ऐकला होता. या पाहिलेल्या दृश्याशी त्याचा मेळ बसेनासा झाला. स्वतःच्या संसाराला विटून ते मुंबईला आले होते. येथे त्यांनी दुसराच संसार थाटला असावा असा संशय स्वाभाविकपणेच माझ्या मनात डोकावला. हे दृश्य विसरण्याचा मी कितीतरी प्रयत्न केला तरी यशवंतरावांच्या बाबतीत तसा विसर पडणे कठीणच वाटत होतं. इतकं असूनही ती बाई मात्र त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत पुन्हा कधी त्यांच्या बरोबर दिसली नाही. तरीपण त्यांचा स्नेह गाढ असल्यास आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. मानवाची सहज दुर्बलता असते. तसा निकट संबंध असता तर त्यांच्या अंतकाळी तरी ती मला दिसली असती. के. ई. एम्. हॉस्पिटलमधे ते विस्मृतावस्थेत पडले असताना ती आली असेल का? आलीच नसेल असे तरी कसे म्हणावे! त्यांची इहयात्रा संपल्यावर मी तेथे गेलो. पण का कोण जाणे ही व्यक्तीसुद्धा दादाप्रमाणे त्यांच्या जीवनाला झोंबलेला एक किडा असावा असा संशय माझ्या मनाला कित्येक वेळा स्पर्शून गेला. त्याच्या पुढच्या वर्षीही मी मुंबईला गेलो होतो. मलबार हिलवरील त्यांच्या घरी जाऊन तास दोन तास घालवून आलो होतो. माडी उतरून येत असताना पांढऱ्या साडीतली ती स्त्री समोर येईल हा भ्रम भ्रमच ठरला. ती मला दिसली फक्त एकाच दिवशी, एकदाच. तोच शेवटचा दिवस. त्यांची रोजनिशी वाचताना या घटनेविषयी काहीतरी उल्लेख मिळेल असं कुतूहल वाटत होतं.

त्यात व्यक्तींच्या नावाचा उल्लेख त्यांनी हेतुपुरस्सर टाळला होता. कित्येक ठिकाणी एक्स. वाय. झेड. असं लिहिलेलं होतं. किंवा निरर्थक नावाचा वापर केला होता. तेवढ्या डायरीत 'दादा' या शब्दाला मात्र अमुक व्यक्तीच कारण आहे एवढं मी जाणत होतो. ज्या माणसाचं नाव असतं तो माणूस गेला की नाव म्हणजे केवळ शब्दच. त्या शब्दाच्या आधारानं ते नाव धारण करणाऱ्या व्यक्तीच्या शीलाची कल्पना येत नाही. रोजनिशीत कडू आठवणींचा घोळ नावं देऊन कशाला घालायचा ? वाचणाऱ्याची धारणा अमुक व्यक्ती इतकी वाईट होती अशी होऊ नये याच उद्देशानं कदाचित त्यांनी नावाचा वापर केला नसावा. रोजनिशी म्हणजे एक दाखला. ती कथा नव्हे की कादंबरी नव्हे. एका प्रकारे चरित्रच म्हणायचं. तिथं भीम भीमच असतो. राम रामच. गणपती लिहिल्यास गणपतीविना कोणी नाही. दादा असं लिहिलं असतं तर मला किंवा त्याचा परिचय असणाऱ्या जमशेटजी-दंपतीला तो कसा होता हे कळलं असतं. कारण आम्ही सगळेच दादाला पूर्वीपासूनच जाणतो. रोजनिशीची पाने वाचणाऱ्यांना 'दादा' वाय्. किंवा झेड्. मात्र होतो.

एके दिवशी विश्रांतीच्या वेळी मी त्यांच्या रोजनिशीची दोन चार पाने चाळीत असताना एक्स. वाय. झेड. च्या ऐवजी 'रीमा रीमा' असे नाव आठ दहा वेळा लिहिलेले दिसले. हेसुद्धा गुप्त नावच. 'कोण असावं बरं ?' खंडाळ्याला असताना असं त्यांनी लिहिलं आहे, म्हणून वाटलं असेल तिथंलीच एखादी व्यक्ती. पण पुढं 'रीमाची आई' असा उल्लेख आढळला. त्यांची चित्रे जशी विपरीत तसं त्याचं बोलणंही विपरीत पद्धतीचं होतं असं दिसून आलं. आठवण कुठून कुठं उडाली. त्या वेळी मला यशवंतरावांनी दादाविषयी केलेली चर्चा आठवली. दुर्दैवानं ती चर्चा मीच आरंभिली होती. अनाथ दादाचं त्याच्या घरी येणं, डॉ. दारूवाल्यांचा इलाज, यशवंतरावांनी केलेली त्याची सेवा, त्यांच्या मदतीसाठी डॉक्टरांनी दादीनामक नर्सला पाठविणं वगैरे गोष्टी माझ्या स्मृतिपटलावर उमटून गेल्या नि दादीचं नाव चटकन लक्षात आलं. त्यांनी तिला मेरी म्हटलं होतं. मेरी ख्रिश्चन नाव आहे. त्या दिवशी मी माडीवरून खाली येत असताना समोरून आलेली पांढऱ्या पातळातली बाई दादीच असावी असं वाटलं. तिच्या कपाळावर कुंकू दिसलं नाही. तिच्या हातात बांगड्या नव्हत्या. अस्सं ! तीच का मेरी ? तिची नि त्यांची ओळख तेव्हापासूनची. त्यात काही आश्चर्य वाटण्यासारखं नाही. रोजनिशीतली रीमा मेरीच असावी का ? हो. 'म' वरच्या मात्रेला खाली खेचून काना बनविला की मग मेरीची मारी झाली. अन् तीही अक्षरे उलटविली की रीमा हे जाणवलं. पुन्हा रोजनिशी वाचली. रीमाच्या स्थानी माझ्या स्मरणातल्या

मेरीची स्थापना केली. तिची आई असावी व ती खंडाळ्याला राहात असावी या कल्पनेनं मी वाचू लागलो.

" रीमा इथं आली आहे हे रीमाच्या आईला कसं कळलं ? तेही मी एकटाच राहतो अशा घरी ती आहे हे कुणी सांगितलं ? दादाच मला नकोसा झाला. त्याच्याशिवाय मी जगू शकतो हे दाखविण्यासाठी मी मुंबई सोडून येथे आलो आहे. माझं असं येणं काही नवीन नाही. वर्षातून एकदा तरी मी खंडाळ्याला येत असतो. मला हुडकीत रीमानं इथं यायला नको होतं. ती आली. येण्यास प्रवृत्त झाली. माझ्या दुर्बलतेचा, करुणेचा लाभ करून घेण्याचा तिनं प्रयत्न केला. दादाची शुश्रूषा करावयाला ती यावयास नको होती. ती आली. माझी जेवढी सेवा तिनं केली तेवढीच त्याचीही केली. 'पैसा मिळतो म्हणून मी राबते पण आपण त्याचा कुठलाही संबंध नसताना अनाथ म्हणून त्याच्यावर प्रेम करता. तुमचं मन किती मोठं आहे.' तिनं माझी अशी प्रशंसा केली. माणसाचं मन कितीही घट्ट असो, स्तुती ऐकली की ते वितळतं. रीमानं हेच काम केलं. दुसरं कोणतंही नाही. तिच्या स्तुतीला मी भाळलो. नाहीतरी कसं म्हणू ? स्तुतीच्या जलाशयात हत्तीप्रमाणं मी कोवळ्या वयात डुंबत असे. पुढं मात्र स्तुती करणारे चोर आहेत असं समजत आलो. आता पुन्हा कोवळ्या वयातील तीच वृत्ती उफाळून वर आली असावी. या बाबतीत माझी तुलना मीच करणं योग्य होणार नाही.

" माझा पराभव रीमानं स्तुतीनंही केला नाही. मी संसार सोडून आलो आहे हे तिला समजलं आहे. तो विषय मी कुणापुढंही सांगितला नाही, पण तिच्यापुढं का सांगितला असावा ? मनातल्या कटुतेमुळे ? का तिनं मला मदत केली म्हणून ? नाही, काहीच नाही. अेकाप्रकारे जीवनाचा उबग येऊन मी जरी इथं आलो असलो तरी स्त्री या वस्तूबद्दल वैराग्य धारण करून तर मुंबईला आलो नव्हतो. माझी हीच उणीव रीमानं कुशलतेनं जाणली असावी. या बाबतीत ती केवळ दादी, अविवाहित अशी स्त्री होती. लग्न झालं नाही म्हणून एखादी स्त्री एकाकी जीवन कंठणं शक्य नाही. तिच्या वाढत्या वयामुळे तिच्या वाट्याला मी पूर्णपणे लाभू शकेन असं तिला वाटलं असावं. तिला काही वाटो, मला मात्र ती सुलभ रीतीने लाभली होती हे खरं आहे.

" खंडाळ्याला आमच्या घरापुढे एक हिरवंगार गवताचं मैदान आहे. दररोज तिथं गुरं नि वासरं चरायला येतात. त्यांच्यापुढं मागं ' उवा ' वेचण्यासाठी गावातील मैना सदा सिद्ध असतात. बगळेही उडून येतात. या गुरांची नि त्यांची कसली मैत्री ? ते पक्षी हे पशू. यांचा आहार गवत तर त्यांचा आहार किडे. गुरावासरांना उवांची

एक पीडाच असते. ती पीडा निवारण करणाऱ्या या जंगली मैना म्हणजे स्नेहीच म्हणायच्या, अनादि कालापासून वाढत आलेली ती मैत्री आहे.

"ऊ नसल्यामुळं किंवा अतिशय भुकेमुळं एका मैनेनं एका हडकुळ्या गुराच्या पाठीवर चोच मारून जखम केली होती. हे दृश्य एके दिवशी माझ्या पाहण्यात आलं. त्या जखमेतून रक्त वाहात होतं. तेच चित्र मी काढलं आहे. माझी भावना त्यात कितपत उमटली आहे न कळे. 'रीमा' एक रानातील पक्षी, जगली मैना असं म्हटलं तर अन्याय होईल का? माझ्यासारख्या यःकश्चित माणसाबद्दल इतका अभिमान दाखवणारी ती आपल्या जन्मदात्री वृद्ध मातेला विसरू शकेल का? तिचं रडणं म्हणजे रडणंच आहे का? माझ्याविषयी दाखवलेला आदर तरी आदरच का? मला झालेली जखम ही जखम नव्हे का?"

ते चित्र. हे कथानक मी त्यांच्या तोंडून कितीतरी वेळा ऐकलेलं आहे. मानवी जीवनाची एक अगाध समस्या माझ्यापुढं ठाकली आहे. स्त्री-पुरुषांच्या प्रेमनामक उसळत्या पाण्याच्या फेसाला बडवलं तर त्याचा आकार कसा राहील? सत्याचा तोल किती अल्प आहे याचं चिंतन यशवंतांनी इथं केलं आहे. स्त्री-पुरुष, जंगली मैना-गुरं समीकरण बरोबर जमलं आहे. 'उवा' असेपर्यंत त्यांचा स्नेह असतो. अन्यथा नुसती जखम मात्र राहते. आपण प्रेम करतो ते परोपकारासाठी नव्हे, औदार्य म्हणूनही नव्हे, बहुतेक स्वतःसाठी, आपल्या स्वार्थासाठी हेच जणू त्यांना सांगायचं आहे. इतर जन कसेही असोत पण स्वतःला मात्र प्रामाणिकपणे जोखण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

"मी खंडाळ्याला असल्याचं समजताच माझ्या जीवनातील एकलेपणाचा कंटाळा घालविण्याच्या मिषानं ती इथं आली आहे. इथंच आहे ती. हे सगळं काही ठीक आहे. पण 'सीलू'बद्दल, तिच्या आईबद्दल तिनं जे सांगितलं ते खोटं असल्याचं समजल्यावर मला अतिशय वाईट वाटलं. आईला अर्धांगवायू झाला आहे. तिला मुंबईला नेऊन चिकित्सा करावयाची आहे असं सांगून तिनं शंभर रुपये मागितले. मी ते दिले. ती पैसा मागत असताना हे सगळं खोटं असेल अशी तिळमात्र शंका माझ्या मनात आली नाही. माझ्याजवळ पैसा आहे म्हणून दिला. सीलू म्हातारी आहे. ती जगो की मरो पण जिवंत असेपर्यंत मुलीनं उपचार करावाच ना? रीमाचा हेतू मला कळत का नाही? ती राबते, पैसा मिळवते. मी मात्र पैशाला किंमत नसल्यासारखा खर्च करतो. आपत्काली तिला मदत द्यावी लागली. पण ती मदतच होती का? का तिचा स्नेह हवा म्हणून दिलेली ती किंमत? असो. ती गोष्ट वेगळी.

"ती निघून गेल्यावर दुसऱ्याच दिवशी धडधाकट असलेली सीलूच माझ्याकडं आली. खंडाळ्यापासून चार मैल दूर लोणावळ्याला तिचं घर आहे. साठ वर्षांची ती म्हातारी अजूनही धडधाकट दिसते. आपल्या घरापासून फर्लांगावर असलेल्या एका पारशी गृहस्थाच्या घरी ती दररोज कामास जाते. सकाळी जाऊन संध्याकाळी परत येते. मुलीचा आणि तिचा संबंधच राहिला नाही असं तिनं मला सांगितलं. ती माझ्याकडे असते हे तिला कुठूनतरी कळल्यामुळे माझा पत्ता काढून त्या दिवशी माझ्याकडे येऊन सहेतूक तिनं विचारलं, " माझी मुलगी कुठं आहे ?"

'रीमा तुझी मुलगी का ग ? तू आजारी आहेस असं तिनं मला सांगितलं होतं.' माझ्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

" तेव्हा आपल्या मुलीवर असलेला सगळा राग तिनं माझ्यापुढं व्यक्त केला. सीलू निराधार अशी एकटीच आहे. आपल्या मुलीला तिनं कष्टानं वाढविलं, पालन-पोषण केलं, दुसऱ्याकडून मागूनमागून तिला नर्सविद्या शिकविली. नंतर मात्र ती आपल्या आईची ओळखच विसरली. हे सर्व तिनं मला सांगितलं. मुलं तसं करतात. ही मुलगी, हिनं आपल्या आईला विसरावं का ? आतापर्यंत आईला एक पैसासुद्धा दिला नाही असं कळलं. कधी लोणावळ्यास येऊन आपली आई जिवत आहे का मेली हेसुद्धा पाहिलं नाही. काही विचारलं नाही. यौवन यालाच म्हणतात. यौवनात माणसाला फक्त स्वार्थच दिसतो. गर्वानं वाढणाऱ्या वृक्षाला आपली मुळं कधी दिसतात का ? मला हीच जागृती देण्यासाठी सीलू आली होती.

"ती माझी मुलगी. तिला स्वतःची आईच नको तर मग तुम्ही किंवा आणखी कुणीतरी हवेत हे खरं वाटतं का ?" अशा काही बोधपर चार गोष्टी सांगून ती गेली.

" किती आश्चर्याची गोष्ट ही ! यौवनाला बाल्याची आठवण रहात नाही. म्हातारपणाचं व्यंग्य तर माहीतच नसतं. आपल्या लेकीला दूर लोटल्याचं तिच्या तोंडून ऐकल्यावर मी तिला विचारलं, 'तुझं जीवन कसं चालतं ? काय काम करतेस तू ?"

ती म्हणाली, "हातपाय धड असेपर्यंत मी राबेन."

"खरंच म्हातारी धड आहे. अजूनसुद्धा राबते आहे. राबण्याची शक्ती आहे असं मी म्हणू शकणार नाही. पण एक जिद्द दिसते तिच्या चेहऱ्यावर. आपल्या लेकीनं मदत केली नाही तरी मी जगू शकते, एवढं धैर्य आहे हे दाखविण्यासाठीच ती जगत असावी. तसं जगल्यावाचून गत्यंतरही नाही. तिचं दारिद्र्य बघून मी तिला पाच रुपयाची नोट देऊ लागलो. तिनं ती नाकारली.

'मी त्यासाठी आले नव्हते. स्वत:च्या आईला विसरणाऱ्या रीमावर विश्वास ठेवू नका एवढंच सांगायला आले होते.' म्हणत ती निघून गेली.

"वात्सल्य बिघडलं तर ते कुजून विष बनतं. रीमानं गुराच्या अंगावरील उवा वेचणाऱ्या मैनेशी नातं वाढविलं. मग अंगाला टोचून टोचून जखम करून दोन घोट रक्त प्याल्यास आश्चर्य काय ? तिच्या बाबतीत मला एवढा अनुभव आला होता. त्या पक्ष्याचा स्नेह तेवढाच. खंडाळा सोडून मुबईला जाण्यापूर्वी मी तिला एक पत्र लिहिलं होतं. "तू गेल्याच्या दुसऱ्या दिवशीच तुझी आई माझ्या घरी आली होती. ती मला धडधाकट स्थितीत दिसली. 'रीमा स्वत:च्या आईला विसरली आहे ती तुमचं ऋण मानून राहील काय ?' असं माझ्यापुढं सांगून ती गेली." असा मजकूर मी त्यात लिहिला होता. एवढ्याच कारणानं ती माझ्या जीवन-नाटकाच्या रंग-भूमीवरून निघून गेली. तसं मी लिहायला नको होतं का ? तुझी वंचना मला कळली असूनही माझं तुझ्यावरील प्रेम इतकं आंधळं आहे. अशी भावना तिची होऊ नये या उद्देशाने मी तसं लिहिलं होतं. तिचंही एक पत्र मला आलं. 'तुमच्याएवढा वंचक कोणी नाही.' असा आशय त्यात होता. प्रेमाची विशेष कदर नसणाऱ्या रीमाला असं वाटलं असेल तर माझ्यातच काही दोष असावा. मी तिची वंचना केली असेन ? कशी केली ? कोणत्या रीतीने केली ? मी केलेली वंचना मला तरी कशी कळणार ?'

अध्याय चवथा

एवढयावरच रीमाचा विषय संपला नाही. यशवंतरावांच्या चित्रराशीत एक चित्र दिसले. बहुधा ते तिचेच असावे. रोजनिशीची पुढची पानं पाहिल्यावर खंडाळा प्रकरणावर लिहिलेल्या गोष्टी शेवटच्या नव्हत्या हेही दिसून आलं. त्यात तिचा स्वभाव रेखाटण्यासाठी एक चांगली उपमा त्यांनी दिली आहे. "रीमा एखाद्या ऑर्चिडसारखी आहे. ऑर्चिड म्हणजे बांडगुळाचाच प्रकार नव्हे का ? परजातीच्या झाडांवर मूळ रोवून विलास करणारे सस्य नव्हे का ? सस्यसंग्राहक ऑर्चिडला जितकी मान्यता देतात तितकी मान्यता कोणत्याही वनस्पतीला देत नाहीत. तिची फुले विचित्र आकार घेतात. दीर्घकाळ टिकतात. अतिअपूर्व सौंदर्य दर्शवितात. पण ज्या झाडात ती शिरते त्या झाडाला अलंकृत करण्यासाठी ती फुले देत नाही. तिचा भार वाहणाऱ्या वृक्षालाही ऑर्चिड म्हणजे आपली प्रेयसी असं समजण्याचं कारण नाही. आपले कवी मल्लिकालता व आम्रवृक्षाचा मेळ जमवून वर्णन करीत असत. मल्लिकालता वेगळीच, आम्रवृक्ष वेगळाच. त्याचं बूड वेगळं, तिचं मूळ वेगळंच. दांपत्य-जीवनाचा विचार मनात येताच मला स्त्री-पुरुषांचं जीवन मल्लिकालता व आम्रवृक्षा-सारखंच वाटतं. ती लता आम्रवृक्षाला लपेटून घेते. 'तूच माझा आधार' असा विश्वास निर्माण करते व त्या वृक्षाला नुसती पानेच नव्हे तर फुलंही देते. बाह्यतः हा स्नेह किती सुंदर दिसतो, किती अन्योन्याश्रित वाटतो. जलजाने माझा आश्रय असाच घेतला नाही का ? बहुकालपर्यंत तिचा भार मीच उचलला आहे. ती माझ्यासाठीच जगते असा विश्वास वाटला होता. मी दिलेल्या आश्रयामुळे तिने आपला जीवनधर्म चालविला. पण आपल्या स्वतःच्या सुखासाठी जगलो हेच खरं ना ! दांपत्य-जीवन-सुद्धा एक प्रकारचा स्वार्थच नव्हे का ? असं म्हटलं तर आम्रवृक्ष मल्लिकालतेला मुकेल का ? दांपत्य-जीवन म्हणजे अन्योन्य संबंध असं म्हणतात. तसं माझ्या पाहण्यातही आलं आहे. मग माझ्या जीवनात तसं का घडलं नाही, हेच कळत नाही !

"रीमा बोलून चालून बांडगुळाचं बीज. वाऱ्याने उडून वृक्षाच्या एका फांदीत घुसून वाढणारी. रीमा अशीच आगांतुकपणे आलेली. आपल्या मोहकतेनं काही क्षण

माझ्या जीवनात तिनं मला सुखही दिलं आहे. मला तिचा स्वभाव कळल्यानंतर, माझी वंचना ती करू पाहते हे जाणून, निष्ठुर असं एक पत्र तिला लिहून तिच्यापासून मी स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला होता. तिच्या प्रत्युत्तरामुळं ते साध्य झालं असंच वाटलं. पण परपुष्ट अशी वस्तू परपुष्टच असते. बांडगूळ हे बांडगूळच. वृक्ष बांडगुळाला आपणहून झाडून काढू शकत नाही. मला ती बिलगली. देखाव्यापुरतं यश तिला लाभलं असेल. ते यश नव्हतं. दादासारखाच तिचाही तो एक दुर्बल प्रयत्न होता. ते सत्य जीवन नव्हतं, ते एक नाटक होतं."

वरील वाक्यांत माझ्या मित्रांनी स्वतःचं दांपत्य-जीवन आणि त्यांच्याशी असलेले मेरीचे संबंध यांना सुंदर उपमा दिली आहे. म्हणून त्यांनी काढलेले मेरीचं चित्र कसं आहे हे मी वारंवार पाहिलं. ते एक नेस्टल चित्र होतं. एका मोठ्याशा कागदावर वरील भागी एका बाईचा चेहरा काढला होता पण हातापायाच्या ठिकाणी फक्त मांसाचे लगदे मात्र दिसत होते. अंगावर कपडे असल्यामुळे पिकासोच्या 'दी वुमन' नामक चित्राएवढे मांसखंड दिसले नाहीत तरी कपड्यांत तशाच प्रकारची काया असावी. खरं म्हणजे मेरी तेवढी जाडजूड स्त्री नाही. तिचा आकार तसा प्रमाण-बद्ध आहे. मांसल कामनाच तिचं प्रमुख चरित्र असल्यामुळंच यशवंतरावांनी तसलं चित्र काढलं असावं. तिच्या गात्रांच्या शरीरावर केवल षोडशीचा चेहरा काढला होता. चित्राचा उजवा भाग पिवळा होता आणि डावा भाग हिरवा. या दोन रंगांत तसा मेळ दिसून आला नाही. ते मेरीचंच चित्र हे मी संशोधकाच्या दृष्टीनं ओळखलं. कारण चित्राच्या मागल्या बाजूस 'ऑर्चिड' असं लिहिलं होतं. चित्रावर यशवंत असे हस्ताक्षरही होते. ते चित्र त्यांनी मरणाच्या एका वर्षापूर्वीच काढलं होतं. तिच्या ओठांना हिरवा रंग दिलेला होता. त्यांची कल्पना काय असावी? उजवा डोळा हसरा नि सुंदर तर डाव्या डोळ्यांत बुब्बुळसुद्धा नाही. अेका डोळ्याची ती बाई. दुसरा डोळा असता तर दुसऱ्यावर थोडी तरी दयादृष्टी राहिली असती अशी सूचकता या प्रकारच्या मुखाच्या रचनेत असावी. केवळ ती रचना एका वर्षापूर्वीचीच असेल तर त्यांच्या जीवनात तिने आणखी काही गोंधळ माजविला की काय न कळे. परंतु आणखी काही तिच्यासंबंधी रोजनिशीत आढळलं नाही. त्यामुळं यशवंतरावांच्या जीवनाचा हा रहस्याचा पडदा आणखी उघडून बघता येण्यासारखा नाही. तरीपण त्यांच्या दुसऱ्या उपमेप्रमाणं दांपत्य-जीवनाशी संबंधित त्यांच्या विचारसरणीने मला विचार करावयास भाग पाडले. त्याबाबत मल्लिकालता नि आम्रवृक्षाची उपमा त्यांनी दिली होती आणि मल्लिकालता म्हणजे 'जलजा' असा उल्लेख केला होता.

'रीमा' म्हणजे मेरी. 'सीलू' म्हणजे तिची आई लूसी एवढे मला समजले होते. दादा म्हणजे त्यांचा चाकर गणपती. पण 'जलज' शब्दाला कितीतरी फिरविलं तरी तोच शब्द बनतो. आपल्या बायकोचं नाव ते जसंच्या तसं लिहितील असंही मला वाटलं नाही. आपलं भावजीवन चित्रित करण्यासाठी त्यांनी संकेत आणि संज्ञांचाच अधिक उपयोग केला आहे. मग 'जलजा' हे त्यांच्या बायकोचं खरं नाव, नसून सांकेतिक नावच असावं. 'कमला' असावं का? पंकजा असेल? वनजा? अशी अनेक अनुमाने येऊ लागली. चार सहा माणसांचा त्यांनी जो पत्ता दिला होता त्या व्यक्तींना भेटून त्यांचा पूर्वेतिहास जाणून घ्यावा अशी उत्सुकता माझ्या मनात निर्माण झाली.

मी मुंबईहून गावी येऊन दोन महिने झाले. माझ्या मित्रांनी मला दिलेला आदेश मी दुसऱ्या कामाच्या व्यापामुळे व स्वाभाविक अशा औदासिन्यामुळे विसरून गेलो होतो. चार व्यक्तींना दरमहा २५ रु. पाठविण्यास त्यांनी मला सांगितले होते. ते सगळं विसरून गेल्याचं मला वाईट वाटलं. ज्या दिवशी आठवलं त्या दिवशी सगळ्यांचे पत्ते काढून प्रत्येक व्यक्तीस २५ रुपये मनिऑर्डरनं पाठविण्याचं पहिलं काम मी केलं. सवडीनं त्यांच्या गावी जावं, त्यांचं जन्मस्थान स्वादी किंवा व्यवहाराचं स्थान कुमठे येथे त्यांचे जे नातलग असतील त्यांची विचारपूस करून त्यांच्या निधनाची वार्ता कळवावी असं वाटलं. कुमठ्यात त्यांची मुलं, बायको असेलच. बायको असेल तर माझं काम फारच बिकट. नवऱ्याच्या निधनाची अप्रिय अशी वार्ता बायकोला कशी कळवायची? त्यामुळंच यशवंतरावांची 'जलजा' मरून गेली असेल तर फार बरं होईल असं वाटलं. आता नवराबायकोचा संबंध राहिला नसावा असं वाटलं. कारण ब्राह्मण समाजात वैधव्य म्हणजे कधीही भरून न येणारी जखम आहे. सुवासिनी त्यासाठीच पतीच्या अगोदर मरणाची इच्छा बाळगतात.

या बाबतीत कसलाही प्रयत्न न करता पंधरा दिवस निघून गेले. मी पाठविलेल्या मनिऑर्डरीच्या रसिदी आल्या. एक रसीद सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरहून आली होती. ज्यांना रुपये मिळाले होते त्या व्यक्तीचं नाव विष्णुपंत घाटे. शिवाय आणखी तीन व्यक्ती ज्यांना रुपये पोचले होते, त्यांच्याशी बहुधा यशवंतरावांचं रक्ताचं नातं असावं अथवा आत्मीयता असावी. त्यांचं दप्तर उघडून मी त्यात असलेल्या काही जुन्या रसीदी हुडकून पाहिल्या. काही वेळा त्या चौघांनाही रक्कम पाठविली गेली होती. त्यात तीन माणसांनी आपलं नाव लिहिलं होतं. दोघांच्या सह्या कानडीत होत्या. विष्णुपंत घाटे यांची सही मराठीत होती. स्वादीजवळच्या बेनकनहळ्ळी

येथील चोच्चलमनी पार्वत्यम्मा नावाच्या स्त्रीच्या रसीदीवर मात्र अंगठ्याचा छाप होता. नि एकाची साक्ष होती. ती स्त्री एखादी निरक्षर म्हातारी असावी. स्वादी हे स्थळ यशवंतरावांच्या जन्मभूमीच्या फारच जवळचं. ही म्हातारी त्यांच्या जवळच्या नात्यातली असावी म्हणून दयाबुद्धीने तिला ते पैसे पाठवीत असावेत. यशवंतरावांचं पूर्वचरित्र जाणण्यासाठी तिलाच भेटावं असा निश्चय केला.

तिच्या अंगठ्याच्या ठशाच्या चारसहा पावत्या पाहिल्यावर असं दिसून आलं की प्रत्येक वेळी 'शंभु भट्ट' नावाच्या एकाच असामीची साक्ष होती. अंगठ्याचा ठसा असेल तर साक्ष हवीच. मी पाठविलेल्या मनिऑर्डरच्या पावतीवरही शंभु भट्ट याचीच साक्ष होती. कदाचित तो पार्वत्यम्माचा एखादा नातलग असावा. माझा विचार एवढ्यावरच कदाचित थांबला असता पण एका पावतीचा ठसा पाहिल्यावर मला तो वेगळाच वाटला. त्याखाली मात्र नेहमीप्रमाणंच लिहिलं होत— 'साक्ष देतो की हा ठसा पार्वत्यम्माच्याच अंगठ्याचा आहे.' नेहमीच्या जुन्या ठशांशी जुळवून पाहता हा अंगठा मला दुसऱ्याचाच असावा असं वाटलं. पहिल्या ठशात चक्राकार रेषा आहेत तर दुसऱ्यात शंखाकृती. डाव्या हाताऐवजी उजव्या हाताचा अंगठा वापरला असेल तर ? पण तसंही वाटत नव्हतं. हे असं का व्हावं याचा अनुमान मी करू लागलो. महिनाभर वाट पाहून पुन्हा रुपये पाठविले. वेळेवर पावती आली. शंभु भट्टाची साक्ष यावरही होती. शंखाकृतिरेषांचाच अंगठा उमटला होता. असं असेल तर यशवंतरावांनी पाठविलेले रुपये घेणारी व्यक्ती वेगळी व मी पाठवीत असलेले रुपये घेणारी व्यक्ती वेगळी असंच समजायचं ना ? शंभु भट्टही प्रामाणिक व्यक्ती नसावी. अशा व्यक्तीच्या हाती मी पाठवीत असलेले रुपये पडत आहेत. काही वर्षांपासून आपल्या जन्मस्थानाचे तोंडही न पाहणाऱ्या यशवंतरावांची वंचना त्याच व्यक्तीने केली नसावी हे कशावरून ? मी तर नवा माणूस ! म्हणूनच या विषयाची खात्री होईपर्यंत पैसे पाठवू नयेत असा मी निर्धार केला. पुढील महिन्यात पैसे पाठविले नाहीत. उरलेल्या तिघांना मात्र पैसे पाठविले. याच अवधीत स्वादीपर्यंत जाऊन यावे असा विचार मनात आला पण पावसाळा आला. मलनाडचा प्रवास पावसाळ्यात करणं हिताचं नाही. कित्येक भागांत बस जाऊच शकत नाही. पाऊलवाटेनं जावं लागतं. हे काम चार आठ दिवसांची सवड काढून गेल्यासच साधेल असं वाटून मी उगाच बसून राहिलो. असे दोन महिने गेले. तेव्हा तिथून मलाच एक स्मृतिपत्र आलं.

" जुलै महिन्यात यशवंतरावांतर्फे आपण पाठविलेले रु. २५ पोचले. यशवंतराव कुशल असावेत असं समजतो. ते आता कुठं आहेत ? ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात

आम्हाला रक्कम पाठविण्यासंबंधी त्यांनी आपणाला सांगितलं असेलच. पण काही कारणामुळे आपण विसरला असाल म्हणून हे स्मरणपत्र पाठवीत आहे. राग मानू नये. या महिन्याचे व मागील दोन महिन्यांचे मिळून रु. ७५ पाठविल्यास आपले उपकार विसरणार नाही. ते शक्य नसेल तर यशवंतरावांचा पत्ता द्या. त्यांना पत्र लिहू. आपल्याकडेच ते असतील तर तुमची आजी पार्वत्यम्मा मरणापूर्वी एकदा तरी भेटण्यासाठी तळमळते आहे असं कळवा." असा पत्राचा मजकूर असून त्याखाली 'या अंगठ्याचा ठसा पार्वत्यम्माचा. हे पत्र पार्वत्यम्माच्या सांगण्यावरून लिहिले आहे असं ' विवरणही होतं.

पार्वत्यम्मा म्हणजे यशवंतरावांची आजी हा संबंध कळल्यावर माझ्या मनात कुतूहल निर्माण झालं. ती यांच्या वडिलांची आई नक्कीच नसावी. आईची आई अथवा आणखी कोणतं तरी रक्ताचं जवळचं नातं असावं. मृत्युसमयी यशवंतरावांचं वय साठ वर्षांचं होतं ना ? मग ही म्हातारी त्यांच्यापेक्षा वीस वर्षांनं तरी मोठी असावी. तिला भेटायचच ठरविल्यास मी तिला लवकर भेटायला हवं असं दिसून आलं. तो ऑक्टोबरचा महिना होता. पावसाचा जोर बराच कमी झाला होता. मधूनमधून ऊन पडत असे व आकाशात पांढरे ढग हसत हसत वरवर जात असत. नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशीच सिर्सीला जाऊन तिथून स्वादी व स्वादीहून बेनकनहळ्ळीला जाऊन चोच्चलमनीचं घर हुडकून काढायला हवं. तिथं गेल्यास त्या म्हातारीची भेट होईलच. त्या वेळी यशवंतरावांच्या बालपणाविषयी बरंचसं कळेल असा मनाशी हिशेब केला. सध्या तिच्या पत्राचं उत्तर तरी द्यायला हवं ना ? तिला पैसा पाठवावा. याला मात्र माझं मन ग्वाही देईना. आणखी एक संशय आला. पार्वत्यम्मा मेली असावी हाच तो संशय. तिच्या नावे पाठविलेला पैसा मध्येच हडपणारा शंभु भट्ट पैसा मिळविण्याच्या आशेने ती मेली असली तरी कुठल्या तरी म्हातारीच्या अंगठ्याचा ठसा घेत असावा. म्हणूनच पैसे पाठवू नयेत असं मला वाटलं. तर मग मरण्यापूर्वी यशवंतरावांना भेटण्याची इच्छा म्हातारीनं व्यक्त केली हे खरं का ? गाव सोडून बरीच वर्षे होऊन गेल्यामुळं त्यांनी तिला पाहिलं नाही म्हणून केवळ उपचारासाठी, मेली असली तरी, मेली नाही असं भासविण्यासाठीच त्यानं तसं लिहिलं असावं. यशवंतरावांनी पैसा पाठविला नव्हता, त्यांच्यावतीने मी पाठविला होता. मी तर अजून अज्ञात अशी व्यक्ती, म्हणूनच विशेष धैर्यानं दुसऱ्याचा ठसा घेऊन माझी त्यानं वंचना केली आहे या निर्णयाला मी पोचलो.

नवरात्राची मी वाट पाहात होतो. सिर्सीच्या मित्रांनी भाषणासाठी निमंत्रण देऊन मी अवश्य यावे अशी विनंती केली होती. ते निमंत्रण मी तत्क्षणी स्वीकारलं

सिर्शीहून आठ दहा मैलांच्या आतच स्वादी आहे. स्वादी हे पुरातन व ऐतिहासिक ठिकाण आहे बेनकनहळ्ळी तिथून फार दूर नसावं त्या निमित्तानं मलनाडच्या परिसरात विहार करण्याचा सुयोग मला लाभून आनंदात दिवस जातील.

नवरात्रारंभ होताच प्रयाण करावं अशी योजना आखली. तो आरंभ होताच मी सिर्शीला गेलो. नवरात्र महोत्सवानिमित्त तिथं प्रतिवर्षी व्याख्यानमाला गुंफली जात असे. दोन दिवस एका मित्राच्या घरी राहिलो. दोन भाषणे दिली नि पुढचा विचार केला. सुदैवानं पावसाचा जोर ओसरला होता. एक दोन दिवस तास अर्धा तास झिमझिम पाऊस पडून उघडीप पडत असे. त्या प्रदेशातील गिरि-कंदर हिरव्यागार आच्छादनामुळं अत्यंत मनोरम दिसत होते. जिकडं पाहावं तिकडं डोंगर नि झाडी. मैदान असलं तर हिरवेगार आवरण. जिकडेतिकडे वाहत्या पाण्याचे पाट, कालवे. पाणी साचल्यानं तळी, सरोवरे तुडुंब भरून वाहणारे पाण्याचे प्रवाह. कुठल्याही भागात गेलं तरी वाहत्या पाण्याचा खळखळ नाद कानी पडत असे. विलोभनीय असं दृश्य मला नेहमीच आवडतं. आळशासारखं सावकाश चालत इकडं तिकडं पाहात आस्वादन करण्यासारखं माझ्या आवडीचं निसर्गाचं हे रूप. मलनाड माझ्यापेक्षाही जास्त आळशी प्रवृत्तीच्या माणसांनी भरलेलं आहे. जनजीवन सोडल्यास इतर जीवन तसं नाही. इथल्या लोकांचं चालणं व गुरांचं चालणं बहुतेक सारखंच. त्यातल्या त्यात मलनाडच्या म्हशी आणि रेडे तर बघण्यासारखे ! पाऊस पडला तर हिरव्या गवताला दुष्काळ नाही. गरीब शेतकऱ्यांचे हडकुळे रेडे ते हिरवं गवत चरून अंग धरतात नि पाण्याची डबकी जिथं असतील तिथं डुंबत जलस्तंभांची तपश्चर्या करतात. चपळ नसलेल्या म्हशी, रेडे बाह्यतः आपल्यासारखे जडजीवी आहेत. पण त्यांचं मनसुद्धा जड असतं का ? कदाचित नसावं. त्यानाही सुख-शांती हवी असते. पाणी दिसताच त्यांना आनंद होतो. मग त्यात उतरून डोकं वर काढून पोहत पोहत पुढं जातात नि बराच वेळ तिथं घालवितात. यावरून ते किती रसिक प्राणी असावेत याचा अंदाज येतो. आणि जर ऊन पडलं असेल तर ज्या जलसंचयात ते घुसतात, मग ते तळं असो की डबकं असो त्यांना अतिप्रिय वाटतं. खाणं-पिणंसुद्धा नकोसं वाटून ते पाण्यातच लोळत पडतात. बराच वेळ डोळे मिटून डुलकी घेतात. याच सुखाला खरं सुख म्हणत निर्विकल्प समाधी-पेक्षा अधिक असा आनंद अनुभवतात. सिर्शीला आल्यावर मलाही तोच रोग जडला. खावं, प्यावं, झोपावं हा मंत्र पार विसरून गेलो. शंभू भट्टाची साक्ष खोटी का खरी ? पार्वतम्मा मेली का जिवंत आहे ही चिंताच नकोशी वाटली. यशवंतरावांनी जोडलेला पैसा तिच्या नावे जाणारा दंड असावा. मग मी कशाला नसता शोध करावा असंही

एकदा वाटलं. पण त्यांच्या स्नेहास पात्र झालेली ही म्हातारी कोण ? त्यांनी द्यावयाचं हे ऋण कशा प्रकारचं ? हे जाणण्याचं कुतूहल माझ्या मनात जागं झालं नसतं तर सिर्शीतच चार दिवस मी रेड्यासारखा राहिलो असतो. सिर्शीला स्वादीहून कोणी-तरी येतील त्यांना दुरूनच विचारून परत फिराव असा विचार आला होता. शेवटी अंतरात्म्याने हे न मानल्यामुळं मला पुढं जावं लागलं.

बैलजोडीच्या गाडीत बसून मी स्वादीला गेलो. सवारीनं एक सबंध रात्र पाठीची हाडं मोडून घेऊन या गाडीचा प्रवास करण्यापेक्षा चालणं फार बरं असं वाटलं. आणि तिथं गेल्यावरही चालण्याचा योग काही चुकला नाही. तिथून दोनच कोसांवर बेनकनहळ्ळी होती. पावसाळ्यात रानावनातून जाणाऱ्या त्या दरिद्री वाटेवरून गाडी जाऊ शकत नाही. कारण चिखलानं ती भरलेली असते. कोसा कोसा-पर्यंत एखाद्या माणसाचं तोंडसुद्धा दिसत नाही. ' हे काय इथंच तर आहे बेनकनहळ्ळी ' म्हणतात. पण चालून चालून पाय थकून गेले तरी हळ्ळी (गाव)चं दर्शन होत नाही. या मलनाडमध्ये हळ्ळी (गाव) हे पद कुलकर्ण्याच्या दाखल्याच्या वहीत दडलेलं असतं. या डोंगराच्या कडेला एक घर, तर त्या दरीत एक घर. एका घरापासून दुसऱ्या घराचं अंतर पाव मैल एवढं, अर्ध्या मैलाएवढं. मी चाललेल्या वाटेवर गुरं चारीत असलेल्या एका म्हाताऱ्यानं जेव्हा बेनकनहळ्ळी म्हणजे हेच गाव म्हटलं तेव्हा दुपारची वेळ झाली होती. हिरव्यागार गवतावर पाय पसरून तो भूपती बसला होता नि पान खात होता.

ज्या ठिकाणावरून एकही घर दिसत नव्हतं तिथं बसून त्या म्हाताऱ्यानं ' हेच ते गाव ' म्हटल्याचं ऐकून मला आश्चर्य वाटलं. निदान त्याचं तरी एखादं घर असावं. गाई-वासरं आहेत, तो आहे त्या अर्थी एक गावही असेल.

" बेनकनहळ्ळी म्हणजे हेच गाव का ? इथं ब्राह्मणांची घर आहेत का ?" मी विचारलं.

त्यानं पुढं हात दाखविला. असं कळलं की पुढं दिसणाऱ्या वेळूच्या वनात बेनकय्या म्हणजे विनायकाचं देऊळ आहे, त्यावरूनच गावाचं नाव बेनकनहळ्ळी पडलं. चतुर्थीच्या दिवशी " बेनकबेनक वक्रदंत पाणी पीठ " अशी गाणी मुलं गातात.

" शंभू भट्ट नावाचे गृहस्थ इथंच राहतात ना ?" मी विचारणा केली.

" चोञ्चिलमनीचे का ?" त्यानं विचारलं.

" होय. होय तेच."

"चोच्चिलमनीची इथं दोन घरं आहेत. वरच्या घरचे का खालच्या घरचे ? आपणाला कोण पाहिजेत ? शंभू हेगडे का राम हेगडे ?"

"हेगडे नव्हे. शंभू भट्ट."

"मग वरचंच घर. या डोंगराच्या उतरणीला लागतं. खालचं घर बरंच लांब आहे. पण आपल्याला हेगड्यांचं नाही, कुणी भट्ट यांचं घर पाहिजे ना ?"

"बाबा रे मी चालून चालून थकलो आहे. हेगडे असोत की भट्ट असोत, अगोदर जवळच्या ब्राह्मणाचं घर दाखव. तुला पुण्य लागेल. "

"मालक तंबाखू आहे का ?"

"मी पानतंबाखू काही खात नाही."

"मी येऊन दाखवू म्हणता ? मग ही बिनडोक गुरं कुठं निघून गेली तर . . . ?"

खिशातून एक दोन आण्यांचे पैसे काढून मी म्हटलं, "हे बघ बाबा, एक उपकार माझ्यावर कर. मी परगावचा आहे. सध्याला एका ब्राह्मणाचं घर दाखव. तिथं चौकशी करून मी चोच्चिलमनी का बच्चलमनी जिथं जायच आहे तिथं जाईन. "

"खरंच ते पैसे मला देता का ?"

"अगोदर देतो. हे घे. पण घर दाखविण्याऐवजी वाघाची गुहा मात्र दाखवू नकोस झालं." मी म्हणालो.

"वाघाची एवढी भीती वाटते ? शहरातले दिसता तुम्ही ? अहो माणसाला वाघ काय करील ?" असं म्हणत त्यानं हातात काठी घेतली. "चला तर मग" म्हणत तो माझा मार्गदर्शक झाला. मी त्याच्या मागून चाललो. रुंद रस्ता सोडून अरुंद अशी पाऊलवाट त्यान धरली. वेळूच्या वनातून जात असताना मला सारखी वाघाचीच भीती वाटत होती. वाटेत एक पडकं देऊळ लागलं. त्याचा कळस ढळून पडला होता नि आत बेनकय्याला म्हणजे विनायकाला रोज पावसाच्या पाण्याचा अभिषेक होत असे. विनायकाच्या देवळापुढं थांबून म्हाताऱ्यानं नमस्कार केला व मग उतरणीला लागला. त्याच्या हाती काठी होती. चिकणमातीच्या चिखलात तो रोवीत "या, या" म्हणत तो खाली उतरला. माझ्या पायांत चिखलानं माखलेल्या चपला होत्या. जिकडंतिकडं चिखलच चिखल होता. इथं पाय ठेवला तर तिथंपर्यंत घसरत जायचा. त्यातून अतिशय निसरडी अशी वाट. एकदोनदा घसरून पडल्यामुळं चिखलाने कपडे माखले होते. मनातून शंभू भट्टाला शाप दिला, पार्वतम्मावर कुरकुरलो. थोड्याच वेळात तो रस्ता संपला. चिखलाने भरलेल्या एका अंगणात आम्ही प्रवेश केला. त्या म्हाताऱ्यानं मला पाठीमागील गोठ्याच्या दारानं नेलं होतं. त्याचं नातंच मुळी गुरांच्या गोठ्याशी

होतं. तिथंच उभे राहून "मालक, कुणी परगावचं पावणं आहे" अशी मोठ्याने हाक देऊन सांगितलं. त्याची ती हाक ऐकून एक मध्यम वयाचा गृहस्थ आम्ही जिथं उभे होतो तिथं आला. त्यानं मला आमूलाग्र पाहिलं. मीही त्याला पाहिलं. हडकुळा जीव, तोंडावर दाढी वाढलेली. कौपीनाशिवाय कुठलंही वस्त्र अंगावर नाही. मला त्या घरी दुपारचं जेवण मिळण्याची जी आशा होती ती पार नष्ट झाली.

"आपण कोण ? कोण पाहिजे आपल्याला ? कुठून आला ? केव्हा आलात ?" असे त्याने मला चार पाच प्रश्न विचारले.

"चोच्चिलमनीचं घर हेच ना ? या गावी पार्वत्यम्मा नावाची म्हातारी राहते ना ? एका कामासाठी तिला भेटावं म्हणून आलो आहे." मी.

"हे चोच्चिलमनींचं वरचं घर आहे. इथं पार्वत्यम्मा नावाची म्हातारी नाही. कशाला आलात आपण ? फार दुरून आला का ? त्यांचं तुमचं काही नातं आहे काय ?" पुन्हा त्यानं प्रश्नांचा भडिमार केला. तसाच उभा राहून हा पुण्यात्मा प्रश्न विचारीत होता. कदाचित चिखल अंगाला माखलेलं माझं हास्यास्पद रूप आपल्या घरात घेण्याची त्याची इच्छा नसावी.

'बरं तर मग मी जातो' म्हणून पुढचा रस्ता धरण्यापूर्वीच माझ्या सुदैवानं एक वयस्क गृहस्थ, बहुधा त्या घरचेच ते असावेत, एक एक बोट काठ असलेल्या पंच्यांचं गाठोडं घेऊन तिथं आले आणि "माणी, तुला काही अक्कल आहे की नाही? कुणी बिचारे परगावचे गृहस्थ वाट विचारीत इथं आले तर त्यांना गोठ्याच्या दारातच उभं करून आपलंच चऱ्हाट वळीत आहेस ?" अशा शब्दांत त्यांनी त्याला दटावलं. माझ्याकडं पाहून ते म्हणाले, "या घरी जाऊया. अरेरे ! तिम्मानं आपल्याला या गुरांच्या वाटेनं आणल्यामुळं आपण घसरून पडला वाटतं ? या तिम्माची अक्कल तेवढीच, गुरासारखी." नि सहानुभूतिपूर्वक त्यांनी मला आत बोलावून नेलं.

घरची ओसरी स्वच्छ होती. त्या वृद्धाचं नाव शंकर हेगडे नि तो कौपीनधारी गृहस्थ म्हणजेच त्यांचे पुत्ररत्न शंभू हेगडे. बापाचं दटावणं ऐकून मुलानं माझ्यासाठी चटई अंथरली. पाण्यानं भरलेला तांब्या समोर आणून ठेवला नि म्हणाला, "या पाय धुऊन घ्या."

मी अंगणातच उभा होतो ओसरीवर चढण्यापूर्वी चिखलानं माखलेले पाय तर धुऊन घ्यावेत ना ? कपडे बदलावेत. स्नान करावं. पिशवीही चिखलानं घाण झाली असावी. याच विचारात मी पुढंमागं पाहात उभा राहिलो. त्या वृद्ध गृहस्थानी आत जाऊन दोन धोतरं आणली. मग त्यांनी मला विचारलं, "आपण ब्राह्मणच ना ?"

मी मानेनंच होकार दर्शविला.

"मग स्नान करूनच या. तुमच्या मनालाही प्रशस्त वाटेल. शंभू, हे धोतर स्नानघरात ठेवून ये." असं ते म्हणाले.

अंगणापासून स्नानगृहापर्यंतची माझी यात्रा म्हणजे एक असिधाराव्रतच होते. अंगण सगळं शेवाळलेलं. इकडून तिकडं ओलांडून जाण्यासाठी ठेवलेल्या फळ्याही शेवाळल्या होत्या. विहिरीच्या पायऱ्यांवरही शेवाळ चढलं होतं. कसाबसा न्हाणीत गेलो. एका दगडी हौदात थंड पाणी भरलेलं होतं. हंड्यात गरम पाणी उकळत होतं. न्हाणीघरात अंधार भरला होता. तिथं अभिषेकास आरंभ केला. कढत पाण्यानं स्नान करण्यातच मलनाडमध्ये सुख असतं हे मी फार पूर्वीच ओळखलं होतं. अगोदर माझे कपडे धुतले. त्यानंतर पिशवीतले कपडे काढले. त्यांनाही चिखल लागला होता. म्हणून तेही धुवावेच लागले. घरच्या यजमानांनी दिलेले धोतर नेसावयाचा विचार नव्हता. पण स्नान केल्यानंतर त्यावाचून गत्यंतर नव्हते. त्यांनी लाल काठाची दोन धोतरं दिली होती. जुन्या काळी लग्नामुंजीच्या वेळी पुरोहित तशा प्रकारचे धोतर नेसत असत. सिर्सी, मल्लापूर वगैरे प्रांतातले लोक अजूनही अशाच प्रकारचे कपडे वापरतात. तसलं एक धोतर नेसून व दुसरं अंगावर पांघरून न्हाणीतून बाहेर येत असताना मी एक पुरोहित झालो म्हणून माझं मलाच हसू येत होतं.

माझा हा वेष पाहून यजमानांना मात्र आनंद झाला असावा. "आपण उडपी-कडचे आहात असं म्हणाला ना? आम्हा ब्राह्मणांना काठ नसलेलं धोतर मुळीच आवडत नाही. तुमचा तो सदरा, शर्ट वगैरे काही पसंत नाही. आता बघा कसे दिसता आपण! राग मानू नका. तुम्हाला पाहिल्यावर कुठल्या मतधर्माचे तुम्ही असाल असा संशय आला होता. या वेषात आपण ब्राह्मण आहात हे कसं अगदी उठून दिसतं." त्यांनी आपलं मत दिलं. मला मात्र हसू आलं. त्या दिवशी बोलण्याचं मुख्य काम त्या वृद्ध गृहस्थांनीच केलं. चाळिशी ओलांडलेला एकमात्र परंज्योती पुत्र आपल्या पित्यापुढं नमला होता. त्याचा स्वभावच वेगळा आणि त्या म्हाताऱ्याची रीतच वेगळी. त्यांचं वय सत्तर वर्षांचं झालं होतं. भरलेला चेहरा, डोक्यावरचे सगळे केस पांढरे झालेले. छोटीशी दाढी, भरलेल्या मिशा त्याही पिकलेल्या. कुळशीलाची कांती चेहऱ्यावर झळकत होती. त्यांच्या बोलण्यातही विनय होता. घरची गरिबी असली तरी आदरपूर्वक ते जगत होते. अगोदर त्यांनी मला जेवू घातले. "गरिबाचं घर, भाजीपाला काही विशेष नाही. भूक असली की सगळं काही रुचकर लागतं. आपल्याला फार भूक लागली असेल. अगोदर फराळ देऊन तोंडाची चव घालवू नये म्हणून जेवायलाच उठविलं." असा

खुलासा करून क्षमायाचनेची पूर्वपीठिकाच जणू त्यांनी मांडली. तसं जेवण चांगलंच होतं. कदाचित त्यांनी म्हटल्याप्रमाणं भूकच प्रमुख कारण असावं. मिठात बाळबलेल्या फणसाची भाजी, मिठाच्या पाण्यातच दडी मारलेल्या आंब्याचं लोणचं. आंबट ताक. पापड, सांडगी सर्व काही जिनसा होत्या. आमचं जेवण संपलं. बाहेर आलो. त्यांनी पानाचा विडा माझ्यापुढं ठेवला. पान खाताखाता मला डुलकी आली. ते म्हणाले, "खालच्या घरच्या पार्वत्यम्माला भेटायचं म्हणता ना ? अजून वेळ आहे. जाऊ शकता. अगोदर एक छोटी झोप काढा. थकवा घालवा. कुठलं काम आहे आपलं न जाणे!" त्यांनी वामकुक्षीसाठी आग्रह केला. एकीकडे थकवा, दुसरीकडं भरलेलं पोट यांनीही तसाच बोध दिला म्हणून झोपलो. आदल्या रात्री बैलगाडीच्या प्रवासात मला झोपच आली नव्हती; म्हणून गाढ झोप लागली असावी. उठलो तेव्हा सूर्य पश्चिमेला एका डोंगराच्या कड्यावर विसावत होता. 'इतका वेळ मी झोपी कसा गेलो' याचा मला विस्मय वाटला. इतक्यात घरचे यजमान आले. "तोंड धुऊन घ्या." ते म्हणाले. तोंड धुताच माझ्या पुढं फराळाचं ताट आलं. कासेच्या एका गडूमध्ये चहा आला. ताम्हणात सोनकेळी, तळलेल्या फणसाचे तुकडे होते. त्यांच्यासाठीही तसाच फराळ आला." "झालं ! असं झालं तर माझं काम झाल्यासारखंच आहे." मी म्हणालो. ऐकून ते फक्त हसू लागले. "मराठीत एक म्हण आहे म्हणे की, आधी पोटोबा नंतर विठोबा. म्हणून अगोदर फराळ तरी संपवा."

फराळ संपला.

त्यानंतर मी म्हणालो, "आता आपण मला पार्वत्यम्माचं घर दाखवाल का ? आपणच यावयाची गरज नाही. आपण वयस्क आहात. आपला मुलगा किंवा एखादा नोकर आला तरी चालेल."

माझ्या येण्याचा उद्देश काय हे जाणण्यासाठी त्यांच्या मुलाने जशा चांभार-चौकश्या केल्या होत्या, तशा प्रकारच्या चौकश्या करण्याच्या भानगडीत ते आतापर्यंत पडले नव्हते. फक्त "आपलं गाव कोणतं ?" एवढंच वेळोवेळी विचारलं होतं. मी त्यांना सांगितलंही होतं. माझी भूक, माझा थकवा मिटल्यानंतरच विचारण्यासाठी त्यांनी काही प्रश्न राखून ठेवले असावेत. झटकन उठून उन्हात वाळत घातलेले कपडे मी गोळा केले. त्यांनी दिलेले कपडे सोडून स्वतःचे घातले. तेव्हा ते म्हणाले, "माझा प्रश्न कदाचित आपणाला आगाऊपणाचा वाटेल. तसं समजू नये. आपलं गाव फार लांबचं आहे. उडपीकडचं म्हणता, तर ते लांबचंच झालं ना ? तसा या गावचा आणि तिकडचा काही संबंध दिसत नाही. आपल्या पूर्वजांपैकी कोणी इकडून तिकडं गेले होते का ?

नाहीतर पार्वत्यम्माची नि आपली ओळख कुठली ?"

"मी आपणहून आलो नाही. यशवंतराव नावाच्या एका मित्राच्या सांगण्यावरून इथं आलो. ते याच भागातले होते. या वृद्धेशी त्यांचं काही नातं असावं. मी सिर्शीला एका कामासाठी आलो होतो. तिला भेटून ती कशी आहे हे कळविण्यासाठी त्यांनी सांगितल्यामुळं आणि या खेड्याचाही भाग पाहावा असं वाटल्यामुळं मी आलो. सत्ययुक्त खोटं मला बोलावं लागलं. वस्तुस्थिती सांगितली तर त्या दोन ठशांच्या बाबतीत खरी माहिती मिळणार नाही असं मला वाटलं. त्या गृहस्थानी 'यशवंतराव' या नावाचा उच्चार करीत डोकं हलविलं. "राव . . . बीव म्हणण्याची पद्धत आमच्या गावी नाहीच. येथील ब्राह्मण म्हणजे भट्ट, शास्त्री, हेगडे वगैरे. हीच इथली पद्धत !"

"नावापुढे 'राव' मीच लावलं."

"असं म्हणा. यशवंत त्याचं नाव काय ? कुठं राहतात ?"

मुंबईला असतात असं म्हणावं का रहात असत असं म्हणावं या संदेहात मी पडलो.

"आमच्याही कुटुंबात यशवंत नावाचा एक मुलगा होता. मी लहान होतो तेव्हाची ही गोष्ट आहे. आमचं कुटुंब म्हणजे काय, आमचंच घर म्हणा ना ! एकाच नावाची दोन माणसं असत नाहीत असंही नाही. पण तो यशवंत मेला असावा. इतके दिवस तो जगू शकणार नाही. तो आणि मी म्हणजे थोरल्या नि धाकट्या भावांची मुलं. वाटण्या पूर्वीच झाल्या होत्या. आमच्या घराच्या त्या शेवटाला जंगल वाढलं आहे ना, वेळूचं वन ? तोच त्या घराचा पाया. घर मिटून वेळूचं वन उगवलं आहे; तेव्हा किती वर्षं झाली असतील ते तुम्हीच पाहा. . . झाली . . . फार वर्षं झाली."

"त्याच नावाची आणखी काही घराणी या गावी आहेत का ?"

"चोन्चिलमनी कुटुंबात कोणी नाही. चोन्चिलमनी म्हणजे आमचंच घराणं. तसं खालीही एक चोन्चिलमनीचं घर आहे. तीसुद्धा आमच्या पूर्वजांचीच जागा. आमचाच, आमच्या कुटुंबाचा यशवंत इथून कुठंतरी निघून गेला."

"जाताना त्याचं वय काय होतं ?"

हातानं कपाळ दाबीत त्या वृद्ध गृहस्थानं आठवण्याचा प्रयत्न केला. आपल्या बालपणच्या सगळ्या गोष्टी आठवीत ते म्हणाले. "तो यशवंत म्हणता होय ? माझ्या आणि त्याच्या वयात बारसहा वर्षांचं अंतर असावं कदाचित. माझ्यापेक्षा तो धाकटाच, मोठा नव्हे. त्याचं लग्नही इथंच झालं. त्या वेळी त्याचं वय वीस वर्षांचं असावं. हूं . . . तेवढंच ! पूर्वी आमचं कुटुंब मोठं होतं बघा. मोठं म्हणजे संख्येनं नव्हे. बऱ्याच गोष्टींची अनुकूलता होती. आता पाहा, वाटण्या झाल्यामुळं आमच्या अर्ध्या जमिनी, जंगलं,

नष्ट झाली आहेत. त्या यशवंतानं कर्ज काढलं बरं का, आणि सर्व काही कर्जात गहाण टाकून हे गावच सोडून गेला. बायकोच्या माहेराकडं म्हणजे कुमठ्याला गेला."

"बायकोचं नाव?"

"कुणाला आठवण राहिली आहे! लग्न झाल्यावर चार दिवसही ती मुलगी इथं नांदल्याचं आठवत नाही. माझ्या आणि त्याच्या वडिलांचं बरंच भांडण होतं. या जमीन जायदादीच्या भानगडीच मुळी दळभद्रधा असतात. मग तो यशवंत अजून जिवंत आहे म्हणता का?....नाही बाबा नाही, कसा जगेल! कुमठ्याला त्यानं सुपारीची वखार चालविली असं एकदा ऐकण्यात आलं. त्या गोष्टीलाही फार दिवस झाले. कुमठ्याला एकदाच काय तो मी माझ्या आयुष्यात जाऊन आलो. बस्स. काय काम? माझा काही संबंधही तिथं नाही. काही खरेदी वगैरे करायची झाली की सिर्शी किंवा मल्लापूरला जायचं. कारण तेच आम्हाला जवळचं आहे. पण पूर्वी मी ऐकलेल्या बातमीवरून एवढंच सांगता येतं की त्यानं कुमठ्यात संसार थाटला, व्यापार वाढविला. मुलाचा बापही झाला. त्यानंतर संसाराला विटून काशी किंवा हरिद्वारकडं जाऊन कुठंतरी मरण पावला. अर्थात माझ्या ऐकण्यात असं आलं. आता तुम्ही म्हणता हा यशवंत कोण असावा बरं? जवळपास आमच्यापैकी या माणसाचं घर कुठं आहे? बरं हे सांगा, तुमच्या या यशवंताचं वय काय?"

"तुमच्यापेक्षा आठ दहा वर्षं कमी असावं."

"तुम्हाला त्यांची माहिती चांगलीच असेल?"

"थोडीशीच आहे. मुंबईत त्याचा परिचय झाला."

"या पार्वतीचा आणि त्याचा काय संबंध?"

"दूरची का जवळची आजी किंवा असाच काहीतरी संबंध असावा."

"तिची भेट घेऊन तिची कुशल वार्ता कळविण्यासाठी त्यांनी तुम्हाला पाठविलं आहे म्हणता? त्यासाठीच आपण आला का? ठीक आहे. त्याचं म्हणणं आपण कबूल केल्यावर तिकडं जाणं उचितच आहे. पण आता संध्याकाळची वेळ आहे. पार्वतीचं घर म्हणजे एक झोपडी आहे. तिथं दुसरं ब्राह्मणाचं घरही नाही. आणि तिला डोळ्यांनी बरोबर दिसत नाही. अशा म्हातारीकडं तिन्ही सांजच्या वेळी कशाला जायचं? बोलायचं तरी काय? हो एक रात्र इथंच रहा. सकाळी गेलं तर चालणार नाही का?"

त्या प्रश्नाचं काय उत्तर द्यावयाचं? माझ्या मित्राचा जन्म ज्या घरी झाला त्या घराची ढासळलेली राशी वेळूच्या वनाखाली पडलेली मला दिसत होती. माझे मित्र यशवंतराव हेच असावेत असं मला वाटलं. कुमठ्याच्या मुलीशी यशवंतरावांचंच

लग्न झालं होतं. संसाराचा त्याग त्यांनीच केला होता. विरक्त होऊन काशी किंवा हरिद्वारला गेलेला तेवढा भाग वेगळा. मृत्यूची बातमी तेवढी वेगळी. ज्या लोकांचं त्यांच्याशी पटत नसे त्यांनी अशा खोटया कंडया पिकवून आपल्या आत्म्याला तुष्ट केलं असावं. जन्मस्थान सोडून गेलेल्यांच्या बाबतीत त्या बातमीवर शंकर हेगडयांनी विश्वास ठेवला तर नवलाची गोष्ट नाही. चाळीस वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरचा तो प्रसंग. पार्वती नावाची म्हातारी यशवंताची नातलग असल्यास शंकर हेगडयांचीही नातलग असावीच. आता त्या संबंधाचं कारण उरलं नसावं असं वाटतं. यशवंताच्या बायकोचं नाव तर आणखी दूरच! आता ती पार्वती,शंकर हेगडे यांच्या दृष्टीनं 'पोरोती' केवळ ओळखीची एक स्त्री असली तरी यशवंतरावांना त्यांच्या बालपणी एका प्रकारचा स्नेहाचा ऋणानुबंध लाभला असावा असा विचार माझ्या मनात डोकावला. तेवढयात तिन्हीसांजा झाल्या. आता आणखी एक मैल अर्धामैल वाट तुडवीत एका अपरिचिताच्या घरी जाऊन चौकशी काय करायची ? तरीपण ज्या जीवाला हुडकीत मी इथं आलो तो जिवंत आहे हे कळलं. मग तिचा अंगठयाचा ठसा पावतीवर का घेतला नाही ? मी एक अपरिचित व्यक्ती पैसा पाठवीत असल्यामुळं साक्षीदार शंभू भट्टानं माझी पूर्ण वंचना केली असावी याची खात्री झाली. यजमानाच्या प्रश्नाचं उत्तर न देता माझं मन कुठं कुठं भटकत होतं. अशा अन्यमनस्क स्थितीत मला पाहून शंकर हेगडयांनी पुन्हा विचारलं, "आताच तिथं जायला पाहिजे असं काही नाही ना ? सकाळी गेलं तर चालेल ना ?"

"चालेल." मी म्हणालो. त्या वेळी माझं मन मलनाडच्या जंगलाप्रमाणं, वेळूच्या वनाप्रमाणं, वेलींच्या हिरव्या मंडपाप्रमाणं फोफावत चाललं होतं. विचारमग्न झालं होतं.

"वेळ झाली; एक लहानसं आन्हिक आटोपून येतो. आपण इथंच बसा." असं म्हणत शंकर हेगडे आत निघून गेले. ते जाताच त्यांचे चिरंजीव शंभू हेगडे माझ्यापुढं येऊन उभे राहिले. पानसुपारी असलेले तबक त्यानी उचलले. 'बसा' असं मी औपचारिकपणे म्हटलं तरी तो बसला नाही. उभ्याउभ्याच त्यानं पानं घेतली. विनोदानं मी विचारलं, "आपल्याला पूजा, आन्हिक वगैरे नाही का ?"

"बाबा आहेत ना !" तो म्हणाला.

"म्हणजे त्याचं सगळं कंत्राट वडिलांनाच म्हणता का ?"

"आपण ?"

हसत मी म्हणालो, "संध्या जपजाप करण्याचा माझा काल चाळीस वर्षांपूर्वीच

संपला." आणखी दोन तास शंकर हेगडे बाहेर आले नाहीत. शंभू हेगडे मात्र उभाच होता. 'बसा' मी किती वेळा म्हटलं तरी त्यानं बसण्याचं नाव घेतलं नाही. माझ्याशी काहीतरी बोलण्याची त्याची उत्सुकता असावी. पण दुपारी वडिलांची बोलणी खाल्ल्यामुळं की काय काही न बोलता नुसता टक लावून माझ्याकडं बघत होता. त्याच-वेळी घरातून एक वयोवृद्ध विधवा स्त्री बाहेर आली. तिच्या हाती पेटलेले निरांजन होते. ते घेऊन ती बसलेल्या खांबाजवळ आली आणि तिनं निरांजन खांबापाशी ठेवलं. शंभूनं तिची माहिती दिली .

"ही आमची आत्या. आत्या म्हणजे बाबांची वडील बहीण. लहानपणापासून इथंच आहे ती. आमच्या घरी सर्वांत वयानं मोठी तीच आहे. घरी मार्गदर्शन करणारी तीच आहे. काही करायचं झालं तर बाबा तिला विचारल्याशिवाय काही करीत नाहीत. इतकी तिच्यावर भक्ती आहे. माझ्यापासून काही अंतरावर ती एका खांबाला टेकून बसली.

"फार लांबच्या गावाहून आला म्हणे? आमच्या पार्वतीला भेटायला आलात असं कळलं." असं ती म्हणताच मला आश्चर्य वाटलं. आतापर्यंत आमचं झालेलं संभाषण शंभूनं आडून ऐकलं असावं नि तिला सांगितलं असावं. नसता तिनं मला असा प्रश्न केला नसता! "आमची पार्वती" असा तिच्या तोंडी आलेला उल्लेख ऐकूनही चकित झालो. पार्वतीच्या बाबतीत तितकी आत्मीयता शंकर हेगडेंनी दाखविली नव्हती; तसा तिरस्कारही व्यक्त केला नव्हता. आवश्यक तेवढंच ते बोलले होते. या म्हातारीनं 'आमची' असा आत्मीयतेचा शब्द वापरल्यामुळं तिच्या बाबतीत हिला विशेष भावना असावी असं मला वाटलं.

"होय माई, त्यांना भेटायला आलो आहे. दुपारची माझी झोप फार लांबली. जागा झालो तो संध्याकाळच झाली. उद्या तिकडं नेण्याचं आश्वासन तुमच्या धाकट्या भावानी दिलं आहे."

तिनं माझ्या चेहऱ्याकडं निरखून पाहिलं. तिचं वय सुमारे ९०–९५ वर्षांचं असावं. डोळ्यांना तितकंसं दिसत नसावं. अंधू दृष्टीनंच माझ्याकडं निरखून पाहण्याचा प्रयत्न करीत असावी. पाहता पाहताच तिच्या डोळ्यांतून चार अश्रू गळाल्याचं दिसलं. माझ्या अंतःकरणात कालवाकालव झाली. कुठल्या तरी आठवणीनं ती रडत असावी. तिच्या प्रत्येक अश्रूच्या मागे सुखाची नव्हे तर कुठल्या ना कुठल्या कटू वेदनेचीच भावना असावी. आपल्या भाच्याकडून यशवंतरावांची वार्ता ऐकल्यामुळं तिला दुःख झालं असावं का? का आमची पार्वती तिच्या दुःखाचं कारण असावी? म्हातारी

दु:खी असताना मी कसलाच प्रश्न केला नाही. स्वभावाची पारख नसताना काही विचारणं मूर्खपणाचं होईल. मग तिनंच मला विचारलं, "यशवंताची तुम्हाला ओळख आहे म्हणे, तर मग त्याच्या मरणाची बातमी खोटीच म्हणायची!" तिच्या उद्‌गारात समाधान जाणवलं. मला मात्र जखमेवर बोट ठेवल्यासारखं झालं. यशवंत तेव्हा मेल्याचं जरी खोटं होतं तरी नुकतेच ते वारले हे खरंच होतं. कोणत्या शब्दात यशवंताच्या बाबतीत तिची समजूत घालावी ? तिची ही समजूत तशीच राहू द्यावी का मिटवावी ? शंकर हेगडेशी झालेल्या माझ्या बोलण्यात मी यशवंताच्या मृत्यूची वार्ता लपविली होती. या म्हातारीपुढं काय सांगावं ? माझ्या तोंडून 'ब्र' सुद्धा निघालं नाही. तिच्या तोंडाकडं पाहात राहिलो. तिच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा सारख्या वाहात होत्या. ते मला बघवेना. तेव्हा मी म्हणालो, "माई, काही जुन्या आठवणीमुळं तुम्हाला दु:ख होत आहे का ?"

"बाळा, तुम्हाला बाळ म्हणते हं – तुम्ही मोटे आहात. पण वयानं मीच मोठी आहे. पोटचं मूल वाढविण्याचं भाग्य मला लाभलं नसलं तरी जगातली सगळी मुलं माझीच मुलं."

शंभूनं मध्येच तोंड घातलं. "आमच्या आत्याचं सौभाग्य लग्नानंतर आठच दिवसांनी लोपल्याच तिनंच मला सांगितलं बरं का ! मी तेव्हा आठ वर्षांचा होतो म्हणे. मागच्या काळी 'अष्टवर्षं भवेत् कन्या' म्हणत असताना अष्टे वर्षांत तिचं लग्न लागलं म्हणे."

तो श्लोक आणि त्याचं कानडी बोलणं याचं मला हसू आलं. संस्कृतचा अष्ट म्हणजे आठ व अष्टेचा कानडी अर्थ तेवढंच. अष्ट म्हणजे आठ व अष्टे म्हणजे तेवढंच. या दोहोंचा त्यात मेळ घातला होता. सध्याच्या बोलण्यात त्याचं बोलणं म्हणजे विरसच होता. ते धुऊन काढण्यासाठी मी म्हणालो, "आपण संकटमय जीवन घालविल्यामुळं त्याच्या आठवणीनं त्यांना दु:ख होत असावं. त्या वेळी आपलं वय आठ वर्षांचं होतं तर आता ते पंचाऐंशी तरी असावं..... "

"त्यासाठी दु:ख नाही बाळा, ते ब्रह्मलिखित आहे. कुंकवाचा योगच मला नसावा. मागच्या जन्मी मी कोणतं पातक केलं होतं न जाणे! त्यासाठी मला देवानं ही शिक्षा दिली. माझं दु:ख दुसऱ्याच प्रकारचं आहे बरं."

"कुठल्या प्रकारचं ?"

"भावकीचं विष. हे विष सापाच्या विषापेक्षा भयंकर असतं बरं. कसं म्हणता ?

हे विष केव्हाही वाईटच. कुण्णाचं त्यामुळं भलं झालं नाही. यशवंतावरून मी सांगते हे. आमच्या पार्वतीलाही हे विष बाधलं की हो."

"म्हणजे ?"

"कपड्याचं भान नसलेल्या वालवयापासून पार्वती आणि मी एकत्र खेळलेल्या. तीसुद्धा कुंकवाचं लेणं न मागून आलेली अभागी स्त्री. तशी ती आमच्या कुटुंबातली नव्हे. तसं कुठलंच नातं नाही. दारिद्र्यामुळं आमच्या चुलत्याच्या घरी आश्रयाला येऊन राहिली, तिथंच वाढली. आमच्यातच फुटीरपणा आला. भावाभावांच्या भांडणात घर बुडालं. त्या गोष्टी सांगण्यासारख्या नाहीत. मी सांगितलं तर आपल्याच बापाची निंदा केल्यासारखं होईल. यशवंताचे वडील व माझे वडील म्हणजे सख्खे भाऊभाऊ. एकाच आईच्या पोटी त्यांचा जन्म झाला. पण कौरव-पांडवांची भाऊबदकी परवडली, यांची नको. एकदा माझ्या वडिलांनी तापलेल्या रक्ताच्या उन्मादात धाकट्या भावाला काहीतरी म्हटलं. रागाच्या भरात त्यांची बुद्धीच जणू भ्रष्ट झाली होती. त्याच्या म्हशीनं आमच्या परसात येऊन चार धाटं खाल्ली म्हणे. श्रम करून, पेरून वाढवणाऱ्यांना राग येणंही स्वाभाविकच आहे. पण बोलण्यात काही तारतम्य ? "देवाला डोळे असतील तर तुझं घर नष्ट होऊन तिथं वेळूचं वन वाढू दे" असा शाप दिला. आणि तो शाप खरा ठरला. ते पाहा त्या तिथं दिसतं ना, तेवढं मोठं घर ढासळून पडलं. मातीत मिसळून गेलं. त्या धाकट्या भावाचा मुलगाही नष्ट झाला. यशवंतानं हे गावच सोडलं. पूर्वी तिथं एक घर होतं याची खूणसुद्धा मिटून गेली आहे. वेळूचं वन फोफावलं आहे. क्षुद्रविषय. घराच्या वाटण्या झाल्या होत्या. आपापल्या परी ते सुखानं राहू शकले असते. दोन घरांमध्ये एक भिंत बांधून एकमेकांचं तोंड न पाहता राहायचं ठरविलं असतं तरी शक्य झालं असतं. पण भावकीचा तो मत्सर. माणसाच्या जिभेचं विष सापाच्या विषापेक्षा जहाल. एखाद्याच नशीबच तसलं असतं. माझ्या वडिलांनी तसा शाप दिल्या दिवसापासून दररोज शिव्याशापांचा जप त्या दोघा भावांमध्ये चालूच होता. साधी बोलणी म्हणजे शाप. त्या घरी ज्यांनी पाय ठेवला त्यांनी या घरी यायचं नाही. यशवंताच्या घरी मीसुद्धा जात नसे. वडिलांच्या आणाभाकांची भीती वाटायची. आमचे चुलते वारले. त्यांचा मुलगा यशवंत वयात आला. त्याची आई निवर्तली. त्याच्या लग्नालाही कोणी गेलं नाही. इतकं सगळं झालं तरी आमच्या वडिलांचा त्या पितृविहीन मुलावरचा द्वेष मिटलाच नाही. आई नसलेल्या मुलाला आपलाच मुलगा समजून वाढवलं ते आमच्या पारोतीने. आपल्या पोटचा नसूनही आश्रयाला राहिलेली पार्वती त्याची आई झाली. त्या मुलाला घोटभर दूध

कमी पडलं तर माझ्याजवळ मागत असे. मीही चोरून देत असे. आमच्या घरी काही झालं, फराळाचं काही केलं की मी चोरून परसाच्या दारानं जाऊन यशवंतासाठी तिच्याजवळ ते देऊन येत असे. एके दिवशी माझ्या वडिलांना हे कळलं. कसं कळलं देव जाणे ! "पुन्हा एकदा त्या पारोतीकडं गेलीस तर माझी शपथ." त्यांनी मला आण घातली. इतका राग कशासाठी ? त्याचं फळ काय ? इतकी सूडबुद्धी असणारे माझे वडील काळानं बोलावताच निघून गेले. यशवंताचं लग्न झालं. आम्ही कोणी लग्नाला गेलो नाही. मुलगी चांगलीच होती. 'मुलगा सुखानं राहू दे' असा मी आशीर्वाद दिला. तरी वडिलांचा शाप भोवलाच. त्यांच्या शापाचं मूळ वेळूच्या मुळासारखंच बळकट म्हणायचं. भलत्याच लोकांना पैसे देऊन याचा हात रिकामा झाला. अयोध्या सोडून रानात जाणाऱ्या रामाप्रमाणं हाही निघून गेला. त्यानंतर कुठंतरी जाऊन मरण पावला असं ऐकण्यात आलं. मरणच सुखाचं असं वाटलं. माझे वडीलही वारले. त्यांच्या आणाभाकांना आम्ही बांधले गेलो होतो ना ! पण झालं काय, यशवंत माझ्या काळजाचा वेलच नव्हे का ? या शंकरप्रमाणंच तोही माझा धाकटा भाऊ नव्हे का ? माझं आता कोण आहे, मरणाजवळ ठेपलेला नीरस ओंडका कुणाला हवा आहे. मी मेले तर हा धाकटा भाऊ उद्या काय करायचं ते करील. पण माझ्या यशवंताचे गुण, मी चोरून ज्याला दूध पाजविलं त्या मुलाचे गुण या कुणातही दिसणार नाहीत बरं."

ही कथा ऐकताना मी कुठं आहे, कोणत्या युगात आहे, कुठला समाचार ऐकत आहे हे काही मला कळेनासं झालं. ते सर्व ऐकताना असं वाटलं की, भावकीच्या द्वेषाचं विष उकळत आहे. माझे ते मित्र ऐकायला जरी इथं नसले तरी ते सगळं विसरायचं त्यांच्यात सामर्थ्य होतं ना ? या विषाची बाधा झाली तरी तारुण्यातून यौवनात, यौवनातून वृद्धावस्थेपर्यंत जगू शकले ! तशा कृतघ्न दादाला आश्रय दिला. त्या म्हातारीनं म्हटल्याप्रमाणं त्यांचे गुण कुणातही नाहीत हे खरं वाटलं. या वेळी पार्वत्यम्माच्या बाबतीत काही विचारणं योग्य नाही असंही वाटलं. विस्मृतीचं जीवन पूर्ण सुखाचं असतं. जो कटुता विसरू शकतो त्यालाच जगणं सहनीय होतं. ती शक्ती नसल्यामुळं खाणं-पिणं, कपडेलत्ते व अभिमान वाटण्यासारखा धाकटा भाऊ असूनही माझ्यापुढे बसलेल्या त्या वृद्धेला मन:शांती लाभली नाही. शापाला बळी पडलेल्या यशवंताच्या आठवणीनं तिला सुखही लाभलं नसावं. त्याच शापाला बळी पडलेली यशवंतांची मानलेली आई, पार्वती शापग्रस्त झाली असावी. ती ज्या घरी राहते त्या घरी जावयाचं नाही. तिचं राहतं घर गेलंच ना ? यशवंतांनी गाव सोडलं ना ?

आणि घर पाऊस-वाऱ्याच्या माऱ्यानं ढासळून मातीचा ढीग होऊन पडलं. त्यावर वेळूचं वन उगवलं. तेच वन एका तासापूर्वी शंकर हेगडे यांनी मला दाखविलं होतं. शापाची पार्श्वभूमी मात्र त्यांना माहीत नसावी. त्यामुळं एका सामान्य विषयाप्रमाणं त्यांनी ते सांगितलं. अलिप्ततेनं यशवंताबद्दल सांगितलं. नातं असूनही नसल्यासारखं दाखविलं. पण ही म्हातारी तशी नाही. मुलांना जन्म दिला नसला तरी जननी होण्याची इच्छा असणारी ती स्त्री आहे. आपलं स्वतःचं मूल नसलं तरी दुसऱ्याचं मूल आपलंच या मोहानं आपण त्याचं पालनपोषण करावं अशी ममता असणारी, अनुकंपा पावणारी अशी स्त्री आहे. म्हणूनच तसं भाग्य लाभलेल्या पार्वतीच्या जीवनाशी ती तादात्म्य पावते. यशवंत जरी आज दृष्टिआड झाले असले तरी आमची पार्वती जिवंत आहे. पूर्वजांच्या शापाच्या ज्वालेच्या लांब किनाऱ्यावर उभी आहे.

अध्याय पाचवा

रात्र संपून दिवस उजाडला. मुखमार्जन वगैरे संपवण्यापूर्वीच 'फराळाचं तयार आहे' असं शंकर हेगडे यांच्या सुनेनं येऊन सांगितलं. त्या वेळी त्यांनी 'शंभू' अशी मुलाला हाक मारली नि यांना फराळाला घेऊन जा अशी आज्ञा दिली.

"आपण ?" मी म्हणालो.

"माझं अजून सकाळचं स्नान झालं नाही. स्नान देवपूजा वगैरे झाल्याशिवाय मी कशाला स्पर्श करीत नाही. आपण अगोदर फराळ करा. त्यानंतर मग स्नान आटोपून जा. दुपारपर्यंत परत या. पार्वतीला फक्त भेटून यायचं आहे ना ? वय झालेली म्हातारी. माझ्या वडील वहिणीप्रमाणंच तीही डोळयानं अधू आहे. धड मरतही नाही, धड जगतही नाही."

"परत आल्यावरच मी स्नान करीन. वाटेत पुन्हा चिखलाचे शिंतोडे उडणार नाहीत कशावरून ? बरं तर मग आपण माझ्याबरोबर येणार नाही ना ? तशी यावयाची गरजही नाही. एखादा गडी पाठविला तरी चालेल."

तोच शंभू म्हणाला, "बाबा मी जातो त्यांच्याबरोबर."

"गप्प बैस. मीही नको आणि तूही नको. सुब्बू जाईल. हे पाहा, पूर्वजांपासून तिथं येण्याजाण्याचा आपण रिवाज ठेवला नाही. थोरांची काही आणभाक होती. तसा तिच्यावर काही राग नाही."

"होय ऐकलं तसं. तुमच्या ताईच म्हणत होत्या."

"अस्सं का ? आमच्या ताईनं नको ते पुराण उघडलं का तुमच्यापुढं ? पार्वती म्हणजे तिचा पंचप्राण. तिथं जात येत नसली तरी तिच्या आठवणीशिवाय एक दिवस जात नाही."

एवढं बोलत असतानाच त्यांच्या मळयाचा गडी सुब्बू आला. शंकर हेगड्यांनी मला तिकडं घेऊन जाण्याची आज्ञा त्याला दिली. शंभूचं तोंड त्या वेळी पार उतरलेलं दिसत होतं.

तो माझ्याबरोबर आला असता तर मला समाधान किंवा असमाधान काहीच

झालं नसतं. पण त्याचे वडील आले असते तर संतोष झाला असता. त्याचं न येण्याचं कारण कळल्यासारखंच होतं. शंभूबरोबर आत जाऊन फराळ संपवला. माझ्याबरोबर जो गडी सुब्बू येणार होता त्याला घेऊन मी पार्वत्यम्माच्या घराकडं निघालो. शंकर हेगडयांनी सुब्बूला समजावून सांगितले, "सुब्बू या साहेबांना मोकळ्या रस्त्यानं खालच्या घरी घेऊन जा. मळ्याच्या घरावरून जाताना तुझं पुराण उघडून बसू नको. हे पारोती आजीला भेटून येईपर्यंत वाट पाहा."

मग आम्ही दोघं निघालो.

हेगडयांच्या मळ्यातून बाहेर पडून एका मोकळ्या जागेवरून आम्ही चाललो होतो. सुब्बूबरोबर मी काही बोललो नाही. वेड्यावाकड्या साळीच्या चढणीच्या वाटेवरून सावधपणे चालत आम्ही अर्धा मैल अंतर चालून गेलो. पुढे एक सुपारीचा मळा लागला. तेवढ्यात तिथं शंभू हेगडे माझी वाट पाहात असलेला दिसला वहिवाटीच्या रस्त्यानं मला गाठण्यासाठी दुप्पट गतीनं आला असावा. आम्ही समोर येताच, "सुब्बू केवड्याची चार पानं काढून आण, पूजेला हवी आहेत. आणि तू इथंच वाट पाहा. मी यांना आजीचं घर दाखवून येतो." असं त्यानं सुब्बूला सांगितलं. ते ऐकून माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्याच्याबरोबर जाण्यावाचून गत्यंतर नव्हतं. दोघेही सुपारीच्या मळ्यात शिरलो. शंभूनं मला तिथं अडविलं. हळूहळू काही प्रश्न विचारू लागला. "आपण उडपीकडचे आहात ना ? आपलं नाव विचारलं नाही. यशवंतकाकांच्या ओळखीचे आहात मग नाव तरी कळायला नको का ?"

मी माझं नाव सांगितलं. ते ऐकताच त्याच्या चेहऱ्यावर घाबरल्याची छटा उमटली. चार क्षण आश्चर्यचकित दृष्टीनं माझ्याकडं तो पाहात असताना सगळ्या संदर्भाचा अर्थ लागला. मी हटकूनच त्याला प्रश्न केला, "का हो हेगडे, या गावी शंभूभट्ट म्हणून कोणी आहे का ?"

"आपण त्याच्या चौकशीसाठी आला आहात काय ?"

"कसली चौकशी म्हणता ? संदर्भ कळला नाही!"

तो जागचा हलला नाही. मीही ठाम उभा राहिलो. पुढं जाणंच थांबलं. माझे दोन्ही हात त्यानं धरले आणि विनवणी केली "आपण थोर आहात माझी मर्यादा राखणं तुमच्या हाती आहे. मला जिवंत मारायचं असलं तर आपण मारा पण त्या आजीपुढं आणि आमच्या बाबापुढं माझ्या लायकीचे धिंडवडे काढू नका."

"मी काय केलं हेच मला माहीत नाही. आपण असं का म्हणता ? मला काही कळेनासं झालं आहे." मी म्हणालो. माझ्या मनात केव्हाच शंका आली होती. मात्र ती

झाकण्याचा मी प्रयत्न करीत होतो. हाच तो साक्षी शंभू भट्ट, पार्वत्यम्माच्या नावे पाठवलेली मनिऑर्डर मध्येच उडवणारा हाच तो महानुभाव. गुरं चारणाऱ्या म्हाताऱ्यानं जेव्हा इथं कोणी 'शंभू भट्ट' नाही असं म्हटलं होतं तेव्हा मला कल्पना आली होती. पैशाच्या लोभानं हा पूर्वीपासूनच त्या म्हातारीच्या घरी वडिलांना न कळविता जात-येत असावा. यशवंतरावांनी मनिअॅर्डर पाठवायचे जेव्हा थांबविले आणि मी ती पाठवू लागलो तेव्हा तर मला काही कळणार नाही अशा समजुतीनं यानं सर्वच पैसा हडपला असावा. खेड्यातला हा बटवडा. पोस्टमनही याच्या कृतीत सामील झाला असावा. दोघांनी मिळूनच म्हातारीला फसविलं असावं. असा तर्क मी करीत असतानाच माझ्यासमोर उभ्या असलेल्या भित्र्या चेहऱ्याच्या शंभू हेगड्यानं रडायला आरंभ केला. उभ्यानंच वाकून माझे पाय धरून त्यानं विनंती केली, "मला वाचवा." पुढची सगळी संगती त्याच्या सांगण्यानंच लागली. अगोदरपासून म्हातारीला पाचच रुपये तो देत असे. एवढेच आले असं सांगत असे आणि उरलेले रुपये तो आणि पोस्टमन अर्धेअर्ध वाटून घेत. मी पैसे पाठवू लागल्यापासून तर तिच्या हाती काहीच पडलं नव्हतं. या दोघांनीच पूर्ण उडविले होते. 'बिचारी!' याच्या वाडवडिलांचा भावकीचा मत्सर पार्वत्यम्मालाही असा भोवला म्हणायचा. असं काही होईल याची मला कल्पना नव्हती. पैसा! दरिद्री पैसा! घरचे यजमान शंकर हेगडेच आहेत. बहुतेक मुलाच्या हाती ते पैसा देत नसावेत. हा वयात आलेला, यौवनावस्थेतला. मुलं-बाळं असलेला. पैसे मिळविण्यासाठी यानं हा आडमार्ग धरला. मी त्याच्या घरचं अन्न खाल्लं होतं. माझ्यापासून काही न लपविता आता हा माझे पाय धरून शरण आल्यावर काय करणार! मी "बरंय" म्हणालो.

"जा, घरी जा. वडिलांचं म्हणणं ऐका."

"माझं रक्षण कराल ना?" त्यानं पुन्हा विचारलं.

"मी बोल दिला आहे ना?"

"आजोलासुद्धा काही सांगू नका."

"नाही. जा." संयम सुटून मी म्हणालो.

"आपण रागावलात?"

"तुमच्यावर नाही."

सुदैवाने सुब्बू शंभर पावलावर आलेला दिसला. त्याच्या हाती केवड्याची चार पानं होती. केवड्याच्या वनातून त्यानं ती आणली होती.

"तुम्ही केवडयाची पान घेऊन घरी जा. काही काळजी करू नका. दुपारी जेवणाच्या वेळी कसाही मी येतोच." मी म्हणालो.

"तिथंच राहू नका."

"आताच मी ते सांगू शकणार नाही."

अशा प्रकारच्या वंचनेला बळी पडलेली निराधार अशी ही म्हातारी तिला भेटून बोलून यावयाला मला किती अुशीर होणार न कळे. त्यापेक्षा माझी भूक काही महत्त्वाची नाही असा विचार माझ्या मनात आला. सुब्बूबरोबर मी मळा ओलांडला. पुढं एक बरंचसं मोठं घर दिसलं. त्याच्या आवारातून जात असता सुब्बू म्हणाला, "चोच्चिलमनीचं खालचं घर म्हणजे हेच. मोठं सघन आहे. आता घर काही दूर नाही."

त्या घरचे यजमान ओसरीवर बसले होते.

"काय रे सुब्बू, कोणाला घेऊन जातोस तिकडे?" त्यांनी आतूनच विचारलं. न ऐकल्यासारखं करून मी चार पावलं पुढं गेलोच. सुब्बूनं त्यांना काय सांगितलं कोण जाणे! धावत येऊन त्यानं मला गाठलं. अजून शंभर पावलं पुढं गेलो आणि गवताची एक लहानशी झोपडी दिसली. त्या आवारात एक तुळशीचा ओटा होता. ओल्या कपडयात अेक म्हातारी त्या ओटयावर तुळशीला प्रदक्षिणा घालीत होती. हर्षानं मी विचारलं, "त्याच ना आजी?"

"होय." सुब्बू म्हणाला.

तिथूनच मोठयानं ओरडून त्यानं सांगितलं, "आजी, चोच्चिलमनी वरल्या घरवाल्यांनी या रावसाहेबाना इकडं पाठविलं आहे."

हाताच्या संकेतानं मोठयानं बोलू नको असं मी दर्शविलं.

तोंडातल्या तोंडात पुटपुटल्यासारखा जप करीत ती म्हातारी, तुळशीवृंदावनावर वाकली. त्यातली मृत्तिका घेऊन कपाळावर तिनं लावली व ती तिथंच थांबली. नंतर तिनं माझ्याकडं पाहिलं. "कुणी तरी उभं आहे का?" ती म्हणाली. अगोदर सांगितलेलंच सुब्बूनं पुन्हा एकदा मोठयानं सांगितलं. तेही तिला ऐकू गेलं नसावं म्हणून मी म्हणालो, "अम्मा, मी एक परगावचा माणूस आहे. तुम्हाला भेटायला आलो आहे. पार्वत्यम्मा कशी आहे हे तिला भेटून कळवा असं सांगून तुमच्या प्रिय माणसानं पाठवलं आहे." मला भान नसल्यासारखा मी दोन्ही हात जोडून उभा होतो. ते पाहून ती म्हणाली, "अगवाअी! मला कशाला नमस्कार करतोस, देवाला कर." मग तिनं तुळशीवृंदावनाकडे हात दाखविला.

"आपण वयोवृद्ध आहात. मी आपल्यापेक्षा वयानं कितीतरी लहान आहे." मी म्हणालो.

मान हलवीत ती म्हणाली, "अंहं, तसं नाहीच नाही. देवाला नमस्कार करायचा, मला नाही."

"देवालाही करूच ना ! पण मोठ्या माणसांना केला तर दोष नाही ना ?"

"तो एकटाच मोठा आहे बाबा!"

ती म्हातारी आणखी माझ्याजवळ आली. माझं तोंड तिनं बरंच निरखून पाहिलं. त्यानंतर 'तीर्थ घे' म्हणत तिनं तीर्थ दिलं. त्यानंतरही माझा चेहरा बघत ती म्हणाली, "बाळा, माझं वय झालं आहे सत्तर की ऐंशी. डोळ्यांना स्पष्ट दिसत नाही. जवळून पाहिलं तर आठवण येऊन ओळख लागेल असं वाटलं होतं. पण ओळख लागेना. फार जवळून पाहिलं तर ओळखीच्या आकाराचा अंदाज लागतो. माझा यशवंताच आहे की काय म्हणून पाहिलं. पण तो कुठून येईल! कुमठा सोडून गेल्यावर तो पुन्हा आलाच नाही. हा मुलगा मला विसरू शकणार नाही. दर महिन्याला पाच पाच रुपये मनि-आर्डर पाठवीतच असतो. तीन महिने झाले त्याची मनिआर्डर आली नाही. कारण कळत नाही. पाठवील." ती सांगत असताना माझ्या अंगावर रोमांच उठले.

"अम्मा, उभ्याउभ्याच तुम्ही बोलत आहात, घरी जाऊया. तुमच्या मुलांनी म्हणजे यशवंतानीच मला पाठविलं आहे. त्यामुळंच आलो. तुम्ही कशा आहात हे बघून जाण्यासाठी मी आलो."

"खरंच का रे बाबा ? तू पुण्यात्मा आहेस, ये बाळा." म्हणत ओसरीवर घेऊन गेली. इकडं तिकडं थोडीशी जमीन साफ केली. "एक पाटही माझ्या हाताला लागत नाही." असं ती म्हणत असता मी जमिनीवर बसलोसुद्धा.

"माझा मुलगा आता वयस्कर झाला आहे का ? मरण येण्यापूर्वी त्याला पाहून मरावं म्हणते. पण तो येईल का ? तो कुठं, मी कुठं ! त्याची आठवण झाली की माझ्या काळजात कालवाकालव होते. या म्हाताऱ्या खोडाची आठवण त्यानं अजून ठेवली आहे. एवढंच पुरे मला ! तोच माझा स्वर्ग ! आणि स्वर्ग म्हणजे तरी काय ? छी: माझी जीभ कसली ही ! तुमची ओळखसुद्धा नाही नि मी तुम्हाला तू तू म्हणते आहे."

"तुम्ही म्हणता तेच बरोबर आहे. तुम्ही मोठ्या आहात. माझ्या आजीच्या वयाच्या. मी लहान आहे. तुम्ही तू म्हटलं तरच मला संतोष होईल."

"कुठून आलास तू ? तुझं गाव कोणतं ? यशवंताचं तुझं काही नातं आहे का ?"

"तसा संबंध कसलाच नाही. स्नेह मात्र आहे. पण मी त्यांना वडील भावासारखं मानतो."

"घडीभर बसशील ना ?"

"त्यासाठीच तर आलो आहे ! तुम्हाला भेटावं म्हणून."

मला तिथंच सोडून पार्वत्यम्मा आत गेली.

मी उठून बाहेर गेलो नि सुब्बूला सांगितलं, "तू जा. मला यायला कदाचित उशीर होईल म्हणून सांग." त्याला पाठवून दिलं. तो जाताच मी पुन्हा ओसरीवर येऊन बसलो. आत म्हातारी काहीतरी करीत असावी. काहीतरी खटखट असा कुटत असल्याचा आवाज आला. मी तिथूनच ओरडलो, "आजी, माझ्यासाठी काही करू नका." त्या गरीब बिचारीच्या घरी असेल तरी काय ? कोणी नात्याचं नाही, गोत्याचं नाही. थोडासा आसरा म्हणून शेजाऱ्यांनी काही दिलं तर खावं. यशवंतांनी पाठविलेल्या पंचवीस रुपयांपैकी हाती पडणाऱ्या पाच रुपयांवर निर्वाह करावा. त्यातून इकडे तीन महिन्यांपासून ते रुपयेही लोप झाले होते. त्या सगळ्या गोष्टी आठवून मला दुःख झालं. त्या दुःखात आणखी एक भय मिसळलं. यशवंतराव जिवंत आहेत असं नाटक हिच्यापुढं चालविणं न्यायाचं होईल का ? हेच ते. तो प्रश्न निष्ठुरच. तेव्हा सांगितल्यावाचून गत्यंतर नाही. मग सांगावं का ? तोच स्वर्ग असं तिनं मघाशी म्हटलं होतं. ज्या मुलाचं पोषण केलं त्याचं प्रेम आठवून तिनं असं म्हटलं होतं. तिला ते अमृत वाटलं. हे कळूनसुद्धा ती तिची आवडती व्यक्ती तीन महिन्यांपूर्वीच नजरेआड झाली असं सांगावं का ?

तोच पार्वत्यम्मानं माझ्यासाठी फराळाचं तयार करून आणलं. ते पाहून मला नवल वाटलं. एका ताम्हणात भाजलेले चार पापड, काशेच्या एका गडूत कसलंसं पेय माझ्यापुढं तिनं ठेवलं. "तू दुरून थकून आला आहेस. दुसरं काही करण्याइतकं त्राण माझ्यात नाही. थोडेसे कच्चे मूग कुटून खीर केली आहे. घे, संकोच करू नकोस. मूग पौष्टिक आहे. शिवाय पोटात थंड असतं."

"आणि ते करता करता हे पापड भाजले ना ?"

"नुसते निमित्ताला पापड आहेत. हे उडदाचे नाहीत, रताळीचेही नाहीत. अरबीच्या गड्ड्याचं काहीतरी करून वाळवून भाजलं आहे. वय झालं तरी तोंडाची रुची म्हणून आहे ना ! मीठमिऱ्याची चव अजून जिभेला कळते. मधूनमधून माझी

मुकांबू आपल्या घरातून चोरून चार पापड आणून देते. हे तिनं केलेले आहेत की मी केलेले मला काहीच आठवत नाही."

मी पापड खाऊ लागलो. आजपर्यंत मी असले पापड खाल्ले नव्हते. निबरट असले तरी तिखटमीठ बरोबर मिसळल्यामुळे रुचकर झाले होते. ते चघळीत तिखटाचा परिहार करण्यासाठी मुगाची खीर पीत मी म्हणालो, "अम्मा, मी लहानपणी असाच मूग कुटून त्यात गूळ घालून पीत असे. पोटाला ते शांत आणि खरंच पौष्टिक आहे. तुम्ही आता मुकांबू असं म्हणाला ना ? कोण बरं ?"

"माझ्यासारखीच एक जख्खड म्हातारी आहे. माझी समवयस्क. दोन देह आणि एक जिवासारख्या आहो आम्ही दोघी. शंकर हेगडयांच्या घरून आला ना तुम्ही ? त्यांच्या वडील बहिणीला पाहिलं नाही वाटतं ? मुकांबू म्हणजे तीच." सांगता सांगता चार थेंब अश्रू तिच्या डोळयांतून गळाले.

"हे पाहा बाबा, काही ऋणानुबंधच असे असतात. यशवंताचे आणि माझे ऋणानुबंध आई–मुलाचे. मुकांबू आणि मी बहिणीबहिणीसारख्या. यशवंताला न बघता पंधरा की वीस वर्षे होऊन गेली तरी पण त्याला विसरेन का ? तो मला विसरेल का ? मुकांबू जवळ असली तरी ती तिथंच आणि मी इथंच. आम्ही दोघींमध्ये ओलांडता न येण्यासारखी नदी आहे."

"नदी म्हणजे ?"

"नदी नव्हे समुद्रच. हे पाहा बेटा, माझ्या मुलाच्या वडिलांच्या आणि मुकांबूच्या वडिलांच्या काही आणाभाका आहेत. भावकीच्या या गोष्टी. वरपांगी दाखविण्यासाठी तरी ते चालवायला पाहिजे ना. मी जिथं आहे तिथं तिने येऊ नये अशी शपथ तिच्या वडिलांनी घातली आहे."

"होय ते सगळं मला कळलं आहे. त्यांच्याकडूनच सगळं समजलं. यशवंतांना तुम्हीच वाढविलं, आपल्या घरून चोरून त्यांनी दूध आणून दिलं. ते त्यांच्या वडिलांना कळालं. वगैरे सगळंच काही त्यांनी सांगितलं. घरापुढच्या वेळूच्या बनाकडे पाहून त्या रडल्यादेखील. झाल्यागेल्या गोष्टींना आता काय करता येणार आहे अम्मा ?"

"ही सगळी कथा तुलाही कळली म्हणायची ! तरीपण मी आणि मुकांबू वर्षातून एक दोन वेळा तरी टेकडीवरच्या विनायकाच्या देवळात पूजेला गेल्या वेळी परस्परांना भेटतो. आपापलं सुखदुःख सांगतो. हृदय भरून आलं की चार अश्रू ढाळतो. माझ्यासारखेच तिनेही पुष्कळ कष्ट सहन केले आहेत बरं ! आता मी पूर्वीसारखी राहू शकते का ? राबण्याची शक्ती असेपर्यंत, बरचं घर आहे ना — तिथं चाकरी केली. आता

तेवढंही होत नाही. म्हणून इथं आले. माझ्या मुकांबूची माया माझ्यावर फार आहे. ती मला कधी विसरत नाही. घरी काही मिष्टान्न केलं की शंभूच्या हातून पाठवून देते. वडिलांना त्याची गंधवार्ता न लागू देता शंभू ते आणून देतो. तसं सांगून आलं तर कोणी डोकं उडवीत नाही. पण उगीच कशाला त्यांना रुष्ट करायचं म्हणून न सांगता येतो. यशवंतानं पाठविलेली मनिआर्डरही तोच आणून देतो. अंगठ्याला शाई लावून कागदावर ठसा घेतो. तोसुद्धा या तीन महिन्यांपासून आला नाही. रुपयेच आले नाहीत की काय न कळे !"

"अम्मा, महिन्याला पाच रुपये येतात, ते खर्चाला पुरतात का ?"

"माझ्या मुलानं पाठविलेले पाच रुपये मला पाचशे रुपयाएवढे वाटतात."

"तांदूळ, कपडा-लत्ता या सगळ्यांना महिनाभर पाच रुपये कसे पुरतील ?"

"माझं जेवण एका वेळचं ना ! किती लागतं एका वेळेला ? आणि कपडालत्ता म्हणजे तरी किती ? वर्षाला दोन फडक्याचे तुकडे. आता हे फाटत आले. मी ओलं नेसलं आहे ना ? या वेळेस त्याचे पैसे आले तर हेगडे राम किंवा शंभूकडून लुगडं आणवून घेते."

"यशवंतांचं तुमच्यावर फार प्रेम आहे का, अम्मा ?"

"होय प्रेम आहेच. तो म्हणजे माझं काळीजच नव्हे का ?"

"त्यांना तुम्हीच पोसलं म्हणे !"

"मी काय पोसते बाबा ! त्या देवानं माझ्या हातून तेवढं काम करविलं. माझं सौभाग्य गेल्यानंतर मला कुणाचाच आधार उरला नव्हता. आई, दादा मलेरियानं एकानंतर एक निवर्तले. खायलादेखील नसलेली मी भगवंत हेगड्यांच्या घरी आले. भगवंत हेगडे म्हणजे आमच्या यशवंताचे वडील. मोठे सज्जन होते. तोंडानं मात्र फटकळ. एकेकाचा तो जन्मगुणच असतो. या यशवंताची आई सावित्री नेहमी आजारी असायची. दोनतीन मुलांना तिनं जन्म दिला पण ती मरण पावली. हा चवथा मुलगा. आईच्या स्तनात दूध नव्हतं. जन्मला तेव्हा नुसता हाडांचा पिंजरा होता. रात्रंदिवस रडायचा. मी एकटीच त्याची देखभाल करायची. दोन वर्षांचा होई-पर्यंत हा जगेल असंसुद्धा वाटलं नव्हतं. त्याला त्या टेकडीच्या बेनकय्यानंच वाचवलं. विनायकाचीच कृपा ! मूल कसंतरी जगलं, पण आई वारली. हेगड्यांनी दुसरं लग्न केलं. दुसरीपासून काही मुलं झाली असती तर यशवंताला किती कष्ट झेलावे लागले असते कोण जाणे !

"यशवंताला मी काय वाढविलं, देवानं वाढविलं! राखलं. यशवंत मोठा झाला. याच अवधीत शंकर हेगड्याचे वडील आणि भगवंतरावांच्या आणाभाका झाल्या. यादवी कलहाला सुरुवात झाली. वाटण्या होऊन वेगळं झाल्यावरही भावकीचं शत्रुत्व नष्ट झालं नाही. मुकांबूनं चोरून दूध दिलं तेही त्याच दिवशी. कसला दळभद्री दिवस तो.

"पुढं माझा मुलगा मोठा झाला. आपला मुलगा लिहिणं-वाचणं शिकावा अशी भगवंताची इच्छा होती. शिकविण्यासाठी घरी एक मास्तर ठेवला. शेवटी दोन वर्षं कुमठ्याला ठेवून इंग्रजी शिकविलं. मुलाचं लग्न धूमधडाक्यानं लावलं. रतिसारखी बायको घरी आली. तिनं गृहप्रवेश केलेला मुहूर्तच चांगला नसावा. निदान मला तरी तसंच वाटतं. मुलाचा बाप मरण पावला. आमच्या डोळ्यापुढं अंधार दाटला. यशवंत, त्याची बायको...."

"तिचं नाव ?"

"काहीतरी आहे, बाबा. मला वाटतं . . . कमला असावं. होय कमलाच ती की नाही दिसायला किती चांगली असली तरी माझ्या मुलाला शोभणारी स्त्री नव्हे. नुसत्या असूयेनं भरलेली. मत्सरानं भडकलेली. एकेकाचा जन्मजात गुणच असतो तसा. असूयाच तिचा जन्मजात गुण. तिला कंगाल कोण वाटायचं माहीत आहे का ? अन्नाच्या ऋणामुळं त्या घरी राहणारी ही पारोती. मला पाहिलं की कमला संतापायची. जणू अहिनकुलाचंच नातं. निघून जावं म्हटलं तर यशवंत म्हणायचा 'माझा प्राण देईन पण तुला जाऊ देणार नाही.' असं द्विधा संकट घरी. या घराचा भाग ओलांडावा तर तिकडं शंकरच्या वडिलांचा सर्पद्वेष. सगळंच काही जमून आलं. समुद्र-मंथनात अगोदर विषच निघालं म्हणतात ना ? तरी कसाबसा यशवंत मोठा झाला. त्याचं लग्न झालं नि वडील वारले.

"तुम्हाला त्याचे गुण माहीत नाहीत. बालपणापासून तो तसाच आहे. त्याच्या हातात पोळी द्या, लाडू द्या आणि पुढं हात करून "माझ्या सोन्या रे, माझ्या हिऱ्या रे, मला थोडे दे रे राजा." असं म्हणा. मग तो हाती असेल ते सगळं देऊन टाकायचा. त्याच्या मित्रांना, गावकऱ्यांना त्याचे हे गुण माहीत होते. त्याची स्तुती करून, त्याला खूष करून, नसते उपद्रव देऊन पैसे मागत असत तरी तो देऊन टाकत असे. पण द्यावयाची काही सीमा ? वर बुडेपर्यंत देतच गेला. घरी आलेली त्याची बायको तीही तशीच. असेल नसेल ते सगळं माहेरी पाठवायची. या गावात त्याला फार कर्ज झालं. इतकं चांगलं उत्पन्न असूनही ते सगळं गेलं आणि सावकारांनी तगादा लावला.

छातीवरच येऊन बसले. तेव्हा त्याला गाव सोडून जावं लागलं. असलेलं सगळंच गहाण टाकून तो गेला. घराचा एक भाग विकू नकोस असं मी त्याला सांगितलं म्हणून तेवढं सोडून बाकीचं सगळंच त्यानं विकून टाकलं. राम हेगडयाच्या वडिलांनीच ते विकत घेतलं. विकत घेतलं का कर्जात वजा करून घेतलं कुणास ठाऊक. पार्वतीअम्मा जिवंत असेपर्यंत तिच्यासाठी एक भाग ठेवावा या अटीवरच त्यांना घर देऊन टाकलं होतं. मला सोडून जायचं मुळीच यशवंताच्या मनात नव्हतं. पण मी त्याच्याबरोबर गेले असते.... तर ? त्याची रती कशी होती हे का मला ठावूक नव्हतं ?

"खरं म्हणजे माझा ऋणानुबंध नव्हता राजा; माझ्या नशिबातच लिहिल नव्हतं. तो कुमठ्याला गेला. इथं जरी त्यानं सगळं गमावलं होतं तरी तिथं व्यापार-व्यवहारात फसला नाही. कसाबसा संसार साभाळून होता. होता म्हणजे जगत होता. वर्षा चार वर्षाला एकदा येऊन तांदूळ, कापड वगैरे मला देत असे आणि म्हणायचा, "अम्मा, माझं जग माझा देव सगळं काही तूच आहेस बघ माझ्या बायकोचा स्वभाव तर तुला माहीत आहेच ती माझी पूर्वजन्माची वैरीण आहे. सूड घेण्यासाठीच जणू जन्म घेऊन बायको झाली आहे मागताना रडायचा तोही एक जन्मजात गुणच. त्याला चार मुलं झाली. त्यापासून तरी त्याला सुख लाभेल असं वाटलं होतं. पण विधात्यानं तो योगही लिहिला नव्हता. आई, मुलं सगळी एक झाली. इथं पंचवीस वर्षे होता. तिथही तेवढीच घालविली. त्यानंतर मात्र असेल तसाच निघून गेला, पांडव वनवासाला गेल्यासारखा. जाण्यापूर्वी इथ आला होता. आपली सगळी कथा त्यानं सांगितली. कथा कसली तीच जुनी व्यथा ! नवीन काही नाही. 'पुरे झाला तो संसार. आता नको मला ते सुख. कुठंतरी जाऊन निश्चितपणे दिवस कंठतो.' त्यानं सांगितलं.

मी म्हणाले, "राजा, माझ्याजवळ तू राहू शकतोस ना ?"

तो म्हणाला, 'अम्मा, मीच तुला तिथं नेऊन पोसायला हवं होतं. त्याऐवजी तुझ्यावर ती पाळी यावी का ? दूर कुठंतरी जाऊन मी राहतो. मी राहो की न राहो पण आजपर्यंत मी माणूस म्हणविण्याला पात्र झालो असेन तर तुझ्यामुळंच. एवढं सांगून तो निघून गेला. त्यानंतर पुण्यात्मा आलाच नाही की रे !"

दाटून आलेलं दुःख आवरण्यासाठी कदाचित ती थोडा वेळ गप्प बसून राहिली. नि पुन्हा सांगू लागली, "तो माझा मुलगा कुठं असला तरी मला विसरेल का ? मी त्याला विसरू शकेन का ? आमचे देह असोत की जावोत आठवणी मात्र शिल्लक असतात. माझ्या डोळ्यांपुढं तो दिसला नाही असा एकही दिवस गेला नाही."

नंतर थोड्या वेळानं तिनं यशवंताच्या बाललीलाचं वर्णन केलं. ते ऐकत असताना तिचं ते मूल तीन महिन्यांपूर्वीच डोळ्याआड झालं हे सांगण्याचा कटू भार माझ्यावर होता याची जाणीव होत होती. पर्यायानं मी तिला सांगितलं, "अम्मा, तुमच्या मुलाचा, यशवंताचा परिचय केवळ पाचसहा वर्षापूर्वी झाला. दरवर्षी मी मुंबईला गेलो की त्यांना एक दोन वेळा भेटत असे. शेवटीशेवटी त्यांनी माझ्यापुढं एक अपेक्षा व्यक्त केली. थोडेसे पैसे त्यांनी माझ्याकडं पाठवून दिले. पार्वत्यम्माला दर महिन्याला पंचवीस रुपये पाठवावेत असं त्यांनी कळविलं आहे.

"त्याला पैशाचा मद चढला आहे ?"

"तसं नाही अम्मा, तुम्हाला देण्यासाठी त्यांनी माझ्या जवळ दिलेला पैसा मी तुम्हाला देऊ नये का ?"

"त्याला तसंच पत्र लिही. मीच तसं सांगितलं असं कळव"

"अम्मा, पण ते आता नाहीत."

"आता नाही म्हणजे ?"

"प्रत्येक माणूस शंभर वर्षं जगतो का ?"

"म्हणजे माझा मुलगा. . . ?"

"जगाचा निरोप घेऊन तीन महिने झाले."

इथंच आमचं संभाषण थाबलं. मी बोलू शकत नव्हतो. तीही बोलली नाही. एका क्षणाच्या मौनानं आमचा गळा आवळला गेला होता. ती सांगत होती, मी ऐकत होतो. त्यात एक व्यथा होती. माझ्या मित्राच्या स्मरणानं माझ्या डोळ्याना अश्रूंची धार लागली होती. तिनं ते पाहिलं. माझ्याकडंच ती पाहू लागली. काहीतरी सांगणार असं वाटलं. थोडा वेळ थाबून ती म्हणाली,

"तुझं वय काय साग बरं ?"

"पन्नासावं सरलं."

"मग मी तुझ्यापेक्षा तीस वर्षांनं मोठी आहे. मी मोठी आहे असं तूच म्हटलंस ना ? वयानं तरी तुझ्याहून मोठी आहे ना मी ?"

"वयानंच नव्हे; अनुभवानंही. सगळ्याचं दृष्टीनं."

"मग सांगते ऐक. जीवन म्हणजे पाण्यावरचा बुडबुडा आहे. तो स्थिर आहे का ? तू रडतोस कशासाठी ? तुझा मित्र मेला म्हणून ? पांडव मेले, कौरव मेले. अरे, कोण मेलं नाही हे सांग ? कोण मरत नाही हे सांग ? हा देह म्हणजे फाटका,

मळका सदरा. सदरा फाटत नाही का ? फाटका सदरा घालून जीव कसा रे राहील ? यशवंताचा सदरा फाटला. उद्या माझा अस्थिचर्माचा हा पिंजराही मिटून जाईल. आणि त्यापुढचा दिवस गेला तर तुझीही तीच दशा."

"खरं आहे !"

"खरं असेल ते मानायलाच पाहिजे. जो खऱ्याला खरं मानीत नाही, तो माणूस नव्हे. यशवंत मेला नाही. मरणारही नाही. अजूनही तो माझ्या डोळ्यांपुढे आहे. जो मेला तो त्याचा फाटका सदरा होता. माझ्या राजाला देवानं आपल्या जवळ बोलावलं. आपल्या जवळ तो हवा असं देवाला वाटलं असेल. मी म्हातारी झाले, 'मी येते' असं त्याला सांगितलं तर, "थांब. वाट पाहा. बोलावल्यावर ये" म्हणून मला सांगतो हा माझा देव. त्याला मात्र बोलावून नेलं ना त्यानं ? त्यानं बोलावलं नाही तर दु:ख व्हायला पाहिजे. बोलावलं तर रडायचं काय कारण ?"

"होय अम्मा, पण तशी दृष्टी सगळ्यांना लाभणं कठीण आहे."

"निदान तसा प्रयत्न करायला तर पाहिजे. असू दे. मग माझा मुलगा आता नाही म्हणतोस ?"

"तीन महिन्यांपूर्वीच ते मुंबईला वारले. त्या वेळी मी गेलो होतो. मला तशी तार आली होती. माझे मित्र होते म्हणून गेलो. पण फक्त प्रेत मात्र पाहिलं. जिवंतपणी त्यांना भेटू शकलो नाही."

"त्यालाही ऋणानुबंध पाहिजे बाबा."

"अगदी खरं आहे. सगळ्याच गोष्टी ऋणानुबंधाच्या असतात. बरं तर, त्यांनी दिलेले थोडेसे पैसे तुम्हाला देण्यासाठी आणले आहेत. ते घ्या. त्यांचं ऋण मी ठेवून घेऊ नये."

"बाबा, मी पैसा घेऊन काय करू रे ? हो. पाच दहा देशील तर घेईन."

"माझ्याजवळ ठेवून मी काय करू ? मला माझी मिळकत आहे. त्यांचा पैसा नको मला. तुम्हाला खरं सांगतो, अम्मा, मी त्यांचा कोणी नाही. मरताना माझ्याकडं काही हजारांची ठेव त्यांनी पाठविली आणि तुला योग्य वाटेल अशा कामासाठी खर्च कर असं एक पत्र लिहिलं. अमुकच कर असं स्पष्ट सांगितलं असतं तर चिंतेचं कारण राहिलं नसतं. पण आता ते मला जड जात आहे. काय करू ?"

"खरं सांगतोस का ?"

"तुमच्या पुढं खोटं सांगण्यासाठी इथंपर्यंत आलो का, अम्मा ?"

"माझी एक योजना आहे."

"कोणती ? सांगा."

"त्यानं मला पंचवीस रुपये द्यायला सांगितलं आहे ना ? मला पाचच पुरेत. मग महिन्याला वीस रुपये शिल्लक राहतील ना ?"

"हो. राहतील."

"त्या राहिलेल्या पैशातून त्याच्या नावानं एक काम करता येईल."

"कोणतं काम ? सांगा ना."

"टेकडीवरील आमच्या विनायकाच्या देवळाचा कोणी वाली राहिला नाही. या एवढ्या टापूत ते एकच देऊळ गाहे. पूर्वी शंभरएक ब्राह्मणाची घरं होती इथं, आता दहासुद्धा उरली नाहीत. सगळेच बेघर झाले. का, माहीत आहे ? त्यांनी विनायकाला धरलं नाही. देवानंही त्यांना धरलं नाही. नाहीतर विनायकाच्या देवळाची इतकी दुर्दशा झाली असती का ? चहूबाजूला माजलेलं गवत काढणारा कुणी नाही. शिखर ढासळून गेलं, छत कोसळून गेलं, भिंती पडल्या तरी आमच्या गावकऱ्यांना विनायक नकोसा झाला आहे. आम्ही नावाचे ब्राह्मण, ब्राह्मण्य कुणाला माहीत आहे ? अरे, देवालाच सोडलं तर ब्राह्मण्य असलं काय नि नसलं काय ?"

"राग मानू नका, अम्मा पण देव आहे का असा संशय मलाही कैक वेळा येतो."

"तर मग तूही यशवंताच्याच जातीचा म्हणायचं !"

"म्हणजे ?"

"माझ्यापुढं यशवंत शंभर वेळा हेच म्हणायचा. त्या बिचाऱ्याला कष्टही तसेच झाले होते रे. म्हणून देवावरचा त्याचा विश्वासच उडून गेला होता. गेला होता म्हणजे तसा गेला नाही..."

"... म्हणजे काय म्हणता तुम्ही हे समजलं नाही."

"त्याचं असं आहे पाहा. देव आहे असा ज्यांचा विश्वास असतो त्यांच्यासाठी तो आहे. त्याच्यावर विश्वास ठेवायचा म्हणजे त्याच्याकडून आपली चाकरी करवून घेणं असा त्याचा अर्थ नाही. मला अमुकच दे, तमूकच दे. दिल्यास चांगला, नाहीतर वाईट असं म्हणणे योग्य नाही. विनायकाच्या देवळातच देव आहे, दुसरीकडं नाही असं कसं म्हणायचं ? तो सर्वत्र आहे असं जाणत्यांनी सांगितलं आहे. त्या दृष्टीनं पाहिलं तर सगळेच देव आहेत. सगळे प्राणी देवच. तो जीव वेगळा, हा जीव वेगळा असा फरक करूच नये. जसा देव आपल्यामध्ये आहे तसाच तो इतरांतही आहे असं

मानलं तरच देव आहे म्हणणं सार्थक ठरेल. तो आहे असं नुसतं तोंडानं म्हणून काही होणार नाही."

"खरं आहे. शंकर हेगडयांकडं मी जेवायला येतो असं सांगून आलो होतो, आता हे रुपये तुम्हाला देऊन मी जाऊ का?"

"दोन चार घास इथंच खाऊन जा. आता एका घटकेत सारभात करून वाढते. एक घासभर तरी अन्न घरी आलेल्या माणसाला मी वाढायला पाहिजे आणि तूही जेवून जायला पाहिजे."

"नको अम्मा." असं सांगून मी रुपये मोजू लागलो.

"मी तुझ्या रुपयांना शिवणार नाही."

"माझे नव्हेत... तुमच्याच मुलानं दिलेले. मुलाच्या संतोषासाठी तुम्ही, जर घेणार नसाल तर मी काय करू हे तरी सांगा."

"मोठी हट्टी आहेस रे तू."

"तुमच्यासारखाच."

"बरं. अगोदर जेवून घे. नंतर सांगते."

स्वयंपाक करून प्रेमाने तिने वाढलेलं मिष्टान्न जेवण उरकून उठायला दोन तास लागले. तिला आनंद झाला. पण तिचं जेवण अजून झालेलं नाही हे माझ्या लक्षात न राहिल्यामुळं मी विचारलं,

"आता सांगाल का?"

"तू, मी, आपण सगळे एका क्षणासाठी येतो आणि जातो. पण मनुष्य जन्म तसा नव्हे. तुझे पिता कालचे, तू आजचा. तुझी संतती उद्याची. पुढं पुढं जाणारी. मी तू जरी नाहीसे झालो तरी आपण ज्यावर विश्वास ठेवला, मानलं ते मात्र शिल्लक राहतं. विनायक हा आपण मानलेला देव. यशवंताचे आजे, पणजे त्याला मानीत असत. त्याचं घर जरी नष्ट झालं तरी कुल राहिलं आहे ना? त्यांचा कुलदेव तोच. त्याला आपण विसरू नये असं मला वाटतं."

तिच्या बोलण्यातून जी एक सुप्त इच्छा व्यक्त होत होती ती माझ्या विचारांशी जुळणारी होती. म्हणून मी पुढंमागं पाहिलं नाही. माझ्या मित्राची स्मृती सदैव जागृत ठेवण्यासाठी, त्याच्या मानलेल्या आईची तीव्र इच्छा पूर्ण करणं हे माझं कर्तव्य होतं. म्हणून निर्धारानं मी म्हणालो, "आता तुम्ही काही एक सांगू नका. तुमची इच्छा कोणती हे मी ओळखलं आहे. तुमच्या यशवंताचं धन तुमच्यासाठीच आहे. शिल्लक राहणारे वीस रुपये मात्र नव्हेत तर लागतील तेवढे रुपये खर्चून तुमच्या मुलाच्या नावानं विनायकाच्या देवळाचा जीर्णोद्धार केला म्हणजे झालं ना?"

हे ऐकून ती आश्चर्यचकित झाली. यावर विश्वास ठेवावा किंवा नाही असंही तिला वाटलं असेल. म्हणून तिला भरवसा देण्यासाठी मी पुढं म्हणालो, "अम्मा, याची व्यवस्था होईपर्यंत मी हे गाव सोडणार नाही. रोज तुम्हाला भेटून जाईन. काही काळजी करू नका. तुम्ही ज्या मुलाला वाढविलं त्याच्या पुण्याईनं विनायकाचं देऊळ पूर्वीसारखंच होईल. जा. तुमचं जेवण झालं नाही. तुम्ही जेवून घ्या."

"आज कसं जेवायचं ? त्याऐवजी माझ्या यशवंतासाठी देवाचा जप तरी करते." असं म्हणून तिनं मला निरोप दिला.

तिला पाहात पाहातच मी शंकर हेगडयांच्या घरचा रस्ता धरला. माझ्या मनात जीर्ण झालेली दोनदोन देवळं दिसू लागली. दगडामातीचं एक देऊळ विनायकाचं आणि हाडामासाचं दुसरं देऊळ पार्वत्यम्माचं. या विचारानं मला आनंद झाला. तोच माझ्या मित्रांनी काढलेल्या एका चित्राची मला एकाएकी आठवण झाली. ते ज्यावेळी मी पाहिलं होतं त्या वेळी कोणतीच भावना माझ्या मनात उमटली नव्हती. ते चित्र त्यांनी खंडाळयाला असताना काढलं असावं अशी माझी कल्पना होती. त्या चित्राचा विषय असा होता. पांढऱ्या रंगाची एक हडकुळी गाय गवतात उभी होती. तिच्याशी संबंध नसलेलं एक वासरू तिच्या जवळ होतं. तिचं वासरू नव्हे. गाईचं वासरू नव्हे. पारडयासारखं दिसणारं ते वासरू तिचं आचळ ओढीत होतं. गाय त्याचं अंग चाटीत होती. वासराला काळा रंग दिल्यामुळं ते सारखं दिसत पारडाला दिसत असावं. काही वेळा पूर्वी पार्वत्यम्माला भेटून आल्यामुळे, तिची आठवण झाली आणि त्या चित्राबद्दल माझी कल्पना आता वेगळीच झाली. ते चित्र म्हणजे यशवंताचं आत्मकथनच होय. ती गाय म्हणजे पार्वत्यम्मा, त्यातील पारडं म्हणजे बालक यशवंत. आपलं अपत्य नसूनही आपल्या अपत्यापेक्षा अधिक ममतेनं वागवून पार्वत्यम्मानं जो वात्सल्यभाव दाखविला होता तो भाव व्यक्त करण्यासाठीच यशवंतांनी ते चित्र काढलं असावं असं मला वाटलं. ते खरं असो की खोटं. पण मला मात्र खरंच वाटतं. प्राणिसंग्रहालयात आईचं दूध नसणाऱ्या वाघाच्या छाव्याला कुत्री आपलं स्तन पाजते. स्त्रियामध्ये वसत असलेला हा मातृभाव म्हणजे एक अद्भुत वस्तू आहे. तो भाव व्यक्त करण्याची संधी मिळाली नाही तर तिचं जीवन वाळवंटासारखं रुक्ष होऊन जातं. स्वतःचं अपत्य नसलेली दुर्दैवी पार्वत्यम्मा, यशवंताची आई आजारी असल्यामुळं त्याच पालनपोषण करणारी आई झाली. जन्म देणाऱ्या आईपेक्षाही श्रेष्ठ ठरली. आणि आई वारल्यानंतर आईचं तिचं खरं हृदय उचंबळून आलं. या आठवणी यशवंतराव विसरले नाहीत. हा त्यांचा मोठेपणा होय.

गावी परत गेल्यानंतर कितीतरी वेळा मी ते चित्र पाहात असे. यशवंतरावांचा हा मोठेपणाचा गुण मी कधीही विसरू शकणार नाही. अशा व्यक्तीच्या जीवनात भरपूर कडवटपणा भरणारी त्याची बायको, मुलं याबद्दल माझ्या मनात मुळीच आदर निर्माण होईना. मी यशवंतरावाचा पक्ष घेतला आहे. त्यांच्या पक्षाची कथा वेगळीच असेल. पण ते मला कसं कळणार? ते समजून घेण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. या समस्येचा थोडासा उकल पार्वत्यम्मानं केला आहे. कुमठ्यांतील त्यांच्या नातलगांची माहिती शंकर हेगडेपेक्षा तिलाच अधिक चांगली आहे. जलजाचा अर्थ काय असेल हे जाणण्यासाठी मी डोक्याला ताण देत होतो. जलज म्हणजे कमल. कमला म्हणजे यशवंतरावाची बायको हे पार्वत्यम्मानं सांगितलं.

अध्याय सहावा

पार्वत्यम्माला भेटून दोन चार घटकांत परत गावी यावं या उद्देशानं मी आलो होतो. पण तीन दिवसांपर्यंत बेनकनहळ्ळीमध्येच काढावे लागले. त्यामुळं लाभच झाला. तोटा काहीच नाही. मनुष्यस्वभाव ओळखण्याची एक सुंदर संधीच तिथं मला मिळाली. सुंदर संधी मिळाली म्हटले म्हणजे मानवाचा सगळा स्वभावच सुंदर असा माझा आशय नाही. शंकर हेगडे यांच्या घरी परत आलो. त्यांच्या समाधानासाठी त्यांच्याशी बोलत बसलो.

"त्या म्हातारीबरोबर इतकं काय बोलण्यासारखं होतं?" असा त्यांनी प्रश्न केला. त्यांचं समाधान करणं आवश्यक होतं. परत यावयाला वेळ झाला होता ही एक चूक झाली होती. शिवाय घरी जेवण्यासाठी आलो नाही ही दुसरी चूक. आणि एकीकडं यशवंतरावांच्या निधनाची वार्ता सांगून दुसरीकडं न सांगणंही उचित नव्हतं. त्यामुळं त्यांच्या प्रश्नाला उत्तर देत मी म्हणालो, "तसं नाही. तुमच्या ताईबद्दल जसा आदर निर्माण झाला होता, तसाच त्या आजींना भेटल्यावर त्यांच्याबद्दलही झाला. म्हणून तिच्याशी बोलत बसलो. यशवंतरावांच्या बालपणीच्या गोष्टी ऐकण्याची इच्छा होती. त्यांच्या बाबतीत मी विचारीत होतो नि ती सांगत होती. ते सर्व ऐकत बसल्यामुळं उशीर झाला. जुनी माणसं. पाल्हाळ लावून सांगायची सवय. तसा मीही रमलो की मलाही थोडक्यात संपविता येत नाही."

त्यावर ते म्हणाले, "खरं आहे. तिला सगळं काही माहीत आहे. माहीत आहे म्हणजे काय, तिनंच तर त्याला वाढविलं. आम्ही जरी भाऊ भाऊ होतो तरी आमच्या वडिलांत शत्रुत्व होतं ना? अगदी अहिनकुलासारखं."

"तुमच्या ताईंनी त्या बाबतीत सर्व काही सांगितलं आहे."

"आता यशवंत कुठं आहे? कसा आहे? प्रकृती बरी आहे ना? घर सोडून गेल्यावर दुसरा काही व्यवहार करून काही पैसे वाचविले का नाही?" शंकर हेगडेंनी असा प्रश्न केला.

"त्यांना पैशाचा मोह नाही–"

"त्यामुळंच ना त्यानं इथं सगळं काही घालविलं. घालविलं नसतं तर त्याला जाणं का भाग पडलं असतं ? बरं ते राहूद्या. त्याची तब्येत चांगली आहे ना ?"

"आता तब्येतीला काहीच होणार नाही."

"म्हणजे ?"

"मेलेल्या माणसाला आजार येतो का ?"

"काय ? यशवंत वारला ? काल तुम्ही या बाबतीत काहीच बोलला नाही. विचारलं तरी काही सांगितलं नाही."

"सांगायला ती काय आनंदाची बातमी होती ?"

"आम्हाला सुतक आहे ना ? खरंच तो मरण पावला की काय ? कुठे ?" असं विचारीत असताना त्यांच्या मनात वाडवडिलांपासून चालत आलेल्या विद्वेषाची कसर राहिल्याचं जाणवलं नाही. उठून ते आत धावत गेले व 'अक्का, अक्का,' अशी हाक मारली. "आमचा यशवंत गेला म्हणे !" असं मोठ्यानं त्यांनी सांगितलेला आवाजही ऐकू आला. बराच वेळ ते बाहेर आले नाहीत. जेव्हा ते बाहेर आले तेव्हा त्यांच्याबरोबर त्यांची बहीणही होती. दोघंही बाहेर येऊन बसली. ताई मुकाबिका मान खाली घालून म्हणाली, "काल तुम्ही ही बातमी सांगितली नाहीत. कदाचित तुम्हाला संकोच वाटला असावा. माझ्या तोंडून सगळी कथा ऐकून तुम्ही आणखी संकटात पडला असाल. आम्ही भाऊबंद आहोत, तुम्ही मित्र आहात. तुम्हा आम्हात हेच अंतर आहे. ही वार्ता पार्वतीला सांगून आलात का? सांगितलं नसेल तरच बरं होईल. तिनंच वाढविलेला तो मुलगा नव्हे का ?"

"न सांगून कसं चालेल ? ज्यांना सांगायला पाहिजे त्यांना सगळं सांगायला नको का ?"

"सांगूनही झालं का ? काय केलंत हे आपण ? ती आता चार दिवसही जगणार नाही, हे मला माहीत आहे." असं म्हणत झटकन उठून ती निघून गेली. चेहऱ्यावर घाबरेपणा दिसत होता. "कुठं चाललीस ? कुठं चाललीस ?" असं भावानं विचारलं तर ती म्हणाली, "तुला कसं रे समजत नाही ? यावेळी तिचं कोण आहे ? कोणीतरी राहिलं आहे का ? मला काय पाप लागायचं असेल ते लागू दे. आतापर्यंत बाबांची आणभाक मानली तेवढं पुरे झालं." नि ती निघालीच. निरुपाया-यानं तिच्या भावाला तिच्याबरोबर जावं लागलं. तिथपर्यंत पोचवून ते आले. त्या रात्री ती परत आली नाही. तिथं कुणी कुणाची समजूत घातली असेल हे मात्र मी बसल्या ठिकाणीच कल्पना करू शकलो.

शंभू आमच्यापासून इतका वेळ तोंड लपवून बसला होता. आत्या व वडील बाहेर गेले तरी त्यानं बाहेर डोकावलं नाही. मी त्याला हाक मारली, बोलावलं. त्याच्या बायकोनंच त्याला बाहेर घालविलं असावं तेव्हाच तो माझ्याकडं आला हे जाणवलं.

" या. बराच कंटाळा आला आहे. चला विनायकाच्या देवळापर्यंत एखादी फेरी मारून येऊ या. " मी म्हणालो.

" सुतकाची बातमी कळविलीत ना ? "

" सुतक मला नाही. तुम्हाला मात्र आहे. तुम्ही दूर उभे रहा. " असं सांगून मी त्यांना घेऊन देवळाकडं निघालो. आल्या वाटेनंच गेलो. वाघाच्या आज्ञेला भिऊन मागे जाणाऱ्या जनावराप्रमाणे शंभू माझ्या पाठीमागून आपली मान वर न उचलता येत होता. दिवसभर ऊन पडल्यामुळे सायंकाळी रस्ता वाळला होता म्हणून पहिल्या दिवशी तिथून जाताना जितका त्रास झाला होता तितका आज झाला नाही. दोघेही पुढंपुढं चाललो. देऊळ येताच तो दूर उभा राहिला. मी त्या देवळाला प्रदक्षिणा घातली. त्यानतर समोर जाऊन उभा राहिलो. आत जाऊन सगळीकडे हिंडून पाहिलं. गाभाऱ्याच्या समोरच्या मंडपात गुरांचं शेण जिथंतिथं पडलं होतं. कोणी ते काढलं नव्हतं. विनायकाची ही दशा पाहून कोणाही भाविकाला दुःखच झालं असतं. त्याच्या सावलीत जगत असलेल्या पार्वतम्माचा जीव किती दुखावला असेल याची कल्पना आली. ते देऊळ पाडून पुन्हा नवीनच बांधायचं झालं तरी दोन तीन हजारांपेक्षा जास्त खर्च येणार नाही. ते काम करायलाच पाहिजे. माझ्यासाठी नव्हे, माझे मित्र यशवंतरावांसाठीसुद्धा नव्हे तर पार्वतम्माच्या भक्तीसाठी. त्या देवळाचा जीर्णोद्धार झाल्याचा पाहून ती सुखानं वारली तर यशवंतरावांनीच तिचं श्राद्ध करविल्याइतकं सत्कार्य होईल.

तिथून शंभूकडे येऊन मी म्हणालो, " का हो, तुमच्या गावात हे एकच देऊळ आहे असं ऐकलं आहे. इथं आठदहा तरी ब्राह्मणांची घरं आहेत ना ? निदान वर्षातून एकदा तरी तुम्ही सगळे इथं येत असाल ना ? "

" म्हणजे काय ? विनायकाच्या देवळाला आल्याशिवाय कसं चालेल ? अहो, हा आमचा कुलदेव आहे बेनकप्पा. " शंभू म्हणाला.

" तर मग तुमचं कुल गुरांचं म्हणावं लागेल. "

" म्हणजे ? "

" जिथं तिथं पडलेल्या त्या शेणाच्या राशी पाहा. देवळाच्या भिंती बघा. "

" मग मी काय करू ? सरकारी मदत मिळत नाही. गावकरी मनावर घेत नाहीत. ते बांधून काढणं आम्हा एकट्यांना शक्य होईल का ? "

त्याच्या तोंडाकडं काहीवेळ मी पाहात राहिलो. ते लक्षात येताच त्याचा चेहरा पडला. " माझ्या बाबांना काही सांगू नका. " अशी त्याने पुन्हा विनंती केली.

" एकदा मी तसं सांगितलं आहे ना ? हे पाहा, पार्वत्यम्माचा जो पैसा तुम्ही आतापर्यंत खाल्ला त्याच्यानं बरं होणार नाही. या देवळाचा जीर्णोद्धार व्हावा अशी तिची इच्छा आहे. पोस्टमननं खाल्लेला तो पैसा जाऊ द्या. खाल्लं ते गेलं. तुमच्या मुलाबाळांचं हित व्हावं अशी इच्छा असेल तर तुम्ही मात्र आतापर्यंतच्या पैशाचा हिशेब पाहून तितका पैसा या कामात लावा. " अशी मी आज्ञा दिली.

" बरं आहे. तसंच करतो. "

" एवढंच नाही. यानं तुमचंही भलं होईल. तसं हे फारसं मोठं देऊळ नाही. गावकरी पैसा देवोत अथवा न देवोत. तुमचे चुलते यशवंतरावांचे काही रुपये माझ्या-कडे आहेत. कमी पडलेला पैसा मी त्यातून घालीन. मात्र तुम्ही आणि तुमच्या वडिलांनी मिळून या देवळाचा जीर्णोद्धार एका वर्षाच्या आत करायला पाहिजे. पैशाची जबाब-दारी माझी. पुढची गणेश चतुर्थी यावयाला अजून दहा महिने आहेत. तोपर्यंत हे काम संपायला पाहिजे. त्या दिवशी पार्वत्यम्माच्या इच्छेप्रमाणं पूजा, अन्नसंतर्पण वगैरे व्हायला पाहिजे. " हे सर्व काही सविस्तर त्याला समजावून सांगितलं. त्याच्याशी चर्चा केली. त्याचं मन विरघळलं. आपलं पाप धुवून काढण्यासाठी हीच योग्य वेळ आहे असे कदाचित त्याला वाटलं असावं. त्यानंतर आम्ही घराकडे वळलो. शंकर हेगडयांपुढेही तो प्रस्ताव ठेवला. स्वतःचा पैसा आवळून धरण्याचा त्यानी थोडासा प्रयत्न केला तरी पण माझा सल्ला त्यांनी मानला.

" तुम्ही उद्या अजून राहणार आहात ना ? गावकऱ्यांना बोलावून घेऊ. खालच्या घरच्या चोच्चिलमनींनाही बोलावू. याचा निर्णय तुमच्यापुढंच होऊन जाऊ द्या. " ते म्हणाले.

" यात कोणी भाग घेतला काय नि न घेतला काय हे काम करवून घ्यावयाची जबाबदारी मात्र तुमची. जो पैसा कमी पडेल तो पुरविण्याची जबाबदारी माझी. " एवढं सांगितल्यावर त्यांनी ' बरंय ' असं उत्तर दिलं. ही एक दूरची व्यक्ती. देवळाचं काम उद्या संपलं नि यांनी पैसा दिला नाही तर काय करणार ? माझ्याविषयी त्यांच्या मनात असा संशय आला असावा. म्हणूनच त्यांना आश्वासन देण्याच्या स्वरात म्हणालो, " गावाला जाताच दोन तीनशे रुपये मी तावडतोब पाठवून देतो. "

आप्त-स्नेह्यांप्रमाणं त्या रात्री आम्ही बराच वेळ जुन्या गोष्टी बोलत बसलो. आपल्या बहिणीनं वडिलांचं वचन मोडलं म्हणजेच ती पार्वतीच्या घरी गेली हे योग्य की अयोग्य असा विचार शंकर हेगडयाना सतावीत असावा हे ओळखून त्यांची समजूत घालण्यासाठी मी म्हणालो, " वडिलांनी चांगली प्रथा पाडली असेल तर ती आपण चालवावी हे खरं आहे. पण त्यांनी चूक केली असली तरी त्याची जपणूक करणं योग्य नव्हे. मुलाच्या चुकांना मूक संमती दिल्यामुळं धृतराष्ट्राची काय दशा झाली सांगा पाहू ? तरी ते वडील होते. अशा आणाभाका घातलेली अनेक माणसं आहेत. देवाची शपथ घालणारी माणसंही आहेत. अन्याय दिसत असतानाही आपण त्या गोष्टी पाळल्या तर देव का संतुष्ट होओील ? आणि असा देव असून तरी काय कामाचा ? "

ती रात्र मोठया सुखासमाधानात गेली. मी जणू स्वप्नांच्या राज्यात वावरत होतो. पार्वती मुकांबिकेचं संभाषण ऐकत, हर्षानं ते दाटलं होतं.

दुसऱ्या दिवशी माझं स्नान फराळ वगैरे उरकून , शंकर हेगडे यांना बरोबर घेऊन खालचे चोच्चिलमनी राम हेगडे यांच्या घरी गेलो. शंकर हेगडे यांनी माझा त्यांना परिचय करून दिला. यशवंतरावांच्या गोष्टी निघाल्या. पार्वतीच्याही निघाल्याच. आपल्या संभाषणात राम हेगडे यांनी माझ्या मित्रांच्या गुणावगुणाचे वर्णन केले.

" मी लहान असताना यशवंत हेगडेला पाहिलं होतं. माझं नि त्याचं वय समानच नाही का ? माझ्या वडिलांनीच त्याला कर्ज दिलं होतं. त्या कर्जामुळंच तर हे घर आमच्याकडे आलं. आमचं घर अगोदर त्या खालच्या मैदानात होतं. माझ्या वडिलांनी तो मागेल तसा पैसा दिला. हा मुलगा पण वयात आलेला. त्यात वाटेल त्याला पैसा देऊन आपला दरबार जमवला. त्याचा पैसा खावून खावून आमच्या गावची आठदहा दहा माणसं मोठी झाली. त्याला चार हिताच्या गोष्टी माझ्या वडिलांनी सांगायला हव्या होत्या. ' असा वेडयासारखा पैसा खर्च करू नकोस. ' असं सांगून त्यांना आपला हात आवरता आला असता. इतर भाऊबंद कर्ज देऊ शकले नसते. या गावी चार पैसे बाळगून असणारे माझे वडीलच होते. त्यांचा डोळा आरंभापासूनच या घरावर असावा. त्यानं कर्ज मागताच यांनी ते दिले. पैसा हाती नाचत असताना विवेक सुचावा तरी कसा ? दुसऱ्याकडून व्याजानं घेतलेला पैसा या यशवंतानं बिनव्याजानं इतरांना दिला. " ' तुझ्यासारखा कर्ण कोणी नाही,

दगीची नाही ' असं चार लोकांनी म्हटलं की तो आनंदानं फुलून जायचा. एकूण काय तसा तो चांगलाच होता. वाईट तर मुळीच नाही. तुम्ही काय म्हणता शंकर हेगडे ? '

" अगदी खरं आहे. आता त्या गोष्टी सोडा. हे पाहा, यांच्याकडं यशवंताचा थोडा पैसा आहे म्हणे. त्याच्या नावानं इथल्या विनायकाच्या देवळाचा जीर्णोद्धार व्हावा अशी यांची इच्छा आहे. त्यासाठी त्यातून ते काही पैसा देणार आहेत. "

राम हेगडे यांचे डोळे चमकले. मोठेपणाचा दंभ चेहऱ्यावर उमटला. छाती फुगवून ते म्हणाले, " होय. हे काम आतापर्यंत झालं नाही हीच मुळी चूक झाली. हे काम व्हायलाच पाहिजे. आणि जे काम करावयाचं ते चांगलंच करायला पाहिजे. मग त्याला पाच हजार लागोत की दहा हजार लागोत. काम वेगारासारखं होऊ नये. " त्यांच्या बोलण्यात मोठा डौल होता.

म्हणूनच हमत मी प्रश्न केला, " एवढ्या लहान देवळाला पाचदहा हजार रुपये लागतील का ? "

" का लागणार नाहीत ? आताचा भाव काय आहे ? अहो जे करायच ते चांगलच करायला नको का ? पुरेसा पैसा मिळाला तर ताम्याचे पत्रे मढवून घ्यावेत. म्हणजे तीनतीन दिवसाला रिपेरीची पाळी येऊ नये. "

तेव्हा मी म्हणालो, " आपण गावचे आहात मोठ्या मनानं मोठी वर्गणी दिल्यास हे काम केल्याचं सगळं श्रेय तुम्हाला मिळेल. यशवंताच्या वाट्यास जे येईल ते मी देईन. " ते ऐकताच राम हेगड्यांचा उत्साह मावळला. त्यांनी विषय. बदलला.

" अहो शंकर हेगडे, शिर्सीच्या मुनसिफ कोर्टातल्या त्या तिम्म हेगड्यांच्या दाव्याचा काय निकाल लागला ?" त्यांनी विचारले. आता मी निघायला पाहिजे हे ओळखून तेथून निसटून मी पार्वत्यम्माच्या घरी गेलो. तेथे त्या दोन म्हाताऱ्या बाय भिंतीला टेकून काहीतरी बोलत होत्या. त्यांच्यापुढे मी बेनकय्याच्या देवळाच प्रस्ताव ठेवताच त्यांचा उत्साह उफाळून आला.

पार्वत्यम्मा म्हणाली, " ते एक काम तुझ्या हातून घडलं तर विनायकाच्य नवीन मूर्तीची पूजा मी करीन आणि सुखानं मरेन."

" माझं म्हणणंही तेच आहे " तिची मैत्रीण म्हणाली.

" पार्वत्यम्मा चिंता कशाला ? तुमचा विनायकच सर्व काही करवील." अ मी त्यांची समजूत घातली.

"बाबा, तू इथं का आलास सांग? त्याच्या इच्छेवरूनच तू इथं आलास ना? माझ्या यशवंताची वार्ता देण्यासाठी जरी तू इथं आलास तरी माझी ही मुकांबू सगळं बंधन तोडून काल इथं आली याचा मला किती आनंद झाला म्हणून सांगू! अशी घडी येण्यासाठी माझ्या यशवंताला मरावं लागलं." असं म्हणून काही क्षण स्तब्ध राहिली नि पुन्हा म्हणाली, "आठवलं तर एकेकदा दु:ख दाटून येतं बाबा. पण मेलेल्या माणसाबद्दल दु:ख मानू नये असं कालच मी तुला सांगितलं आणि आज मीच करुणेनं व्याप्त झाले तर कसं? माझ्या आठवणीतला यशवंत मरणार आहे का? आता हेच पाहा, मी आणि मुकांबू एकमेकांना न भेटता किती दिवस झाले! ती इथं आली होती का? आता ती आली आहे. लहानपणी ती मला जशी दिसली तशीच मीही तिला दिसत असेन. खऱ्या आठवणी कधी विसरता येतील का बाबा?"

त्यानंतर त्या दोघीजणी आईस पारख्या झालेल्या यशवंताच्या अनेक आठवणी वर्णन करून सांगू लागल्या. विशेषत: त्यांच्या वडिलांनी दुसरं लग्न लावल्याचं, सावत्र आई इथं आल्यावरचं, वयात आल्याचं, वयात आल्यावरही मूल न झाल्याचं, त्यामुळं मुलावर प्रेम करण्याऐवजी वैर केल्याचं, त्यामुळं त्यांनी भोगलेल्या अनेक कष्टांचं वर्णन पार्वत्यम्मानं केलं. स्वत:लाही ही नवीन यजमानीण कशा शिव्या देत असे आणि तरीही आपले कष्ट विसरून त्या एका लेकराला, यशवंताला सुख देण्यासाठी सर्व काही विसरल्याचं ही तिनं विवरण दिलं.

पार्वत्यम्मानं हसत हसत यशवंताच्या बाळपणची एक आठवण सांगितली. "मुलाचं खेळणं, बोलणं मोठं मोहक असतं. मग ते मूल कुठलंही असो. मुलांना वाकडेपणा माहीतच नसतो. याची आई सदैव आजारी असायची. म्हणून त्याला कडेवर घेणं, मुके घेणं, जेऊ खाऊ घालणं, झोपविणं, गोष्टी सांगणं वगैरे मीच करायची. घर म्हणजे घरची चाकरी का कमी असते? केर काढणं, सारवणं, दळणं-कांडणं, सैंपाक-पाणी सगळंच माझ्या वाटच काम होत. त्या वेळी मी धडधाकट होते. घरी तरी फार माणसं नव्हती. माझं सौभाग्य हरवलेलं. मला वाटतं त्या वेळी यशवंताला तिसरं वर्ष लागलं असावं. एकदा त्यानं मला विचारलं, "पारम्मा, तुला बाबा चांगलं लुगडं आणून देत नाहीत का? नेहमी तू पांढरं लुगडं नेसतेस. त्याला काठ नाही, पदर ही नाही. एवढंसं सोनंही अंगावर नाही. माझ्या त्या आईला कित्ती तरी सोनं आहे; लुगडी आहेत."

मला हसू आलं. मी म्हणाले, "तुझ्या बाबांनी तिच्याशी लग्न केलं आहे राजा. सोन्याचे दागिने घालूनच ती या घरी आली. तुला जन्म दिल्यापासून आजारीच आहे बिचारी."

"जन्म दिला म्हणजे काय ग पारम्मा?" त्यानं विचारलं. मला हसू आलं.

"मला माहीत आहे. परवा आपल्या कपिलेनं वासरू दिलं तसंच ना?"

"होय रे सोन्या." मी म्हणाले.

"तू मला जन्म दिला नाहीस का?"

"नाही रे, राजा. त्यांनीच दिला. तुझ्या जन्मापासून आजारीच आहेत. बिचारी. तू त्यांना मुळीच त्रास देऊ नकोस. हट्ट करू नकोस."

"बरं. बरं. पण तू एवढं सगळं काम करतेस; बाबा तुला चांगलं लुगडं, बांगड्या, सोनं का आणून देत नाहीत?"

"मला कशाला रे सोनं? बेटा, माझं सोनं पुष्कळ आहे."

"कुठं आहे?"

"आहे. ते तुला माहीत नाही. मलाच माहीत आहे."

"खोटं सांगतेस तू."

"नाही यशुराजा," म्हणत मी त्याला उचलून गालाचा मुका घेतला. आणि म्हटलं, 'हेच बघ सोनं.' त्याला किती आनंद झाला म्हणून सांगू! अशाच उपायानं त्याला कितीतरी वेळा गप्प बसवावं लागत होतं.

"पुढं हा मोठा झाला. त्याची आई फार काळ जगली नाही. हेगडे यांनी घाईत दुसरं लग्न केलं. घरी आल्यावर ती बायको काही दिवस नरम होती. हा यशु मला चिकटलेला पाहून तिला काय वाटलं न जाणे. माझ्याकडे तिरप्या दृष्टीनं तिनं पाहिलं. त्यालाही ती तसंच पाहायची. कसल्यातरी रागात एके दिवशी तिनं माझ्याविषयी म्हटलं, 'या अवलक्षणी रांडेनं येऊन माझं घर बुडविलं.' ते माझ्यानं ऐकवलं नाही. माझं म्हणून तेव्हा कुणी राहिलं नव्हतं. अन्नदाता खोचून बोलणारच. तरीपण मलाही राग आला. मी बाहेर निघून गेले. गेले विनायकाच्या देवळात. हा मुलगा कुठं होता न जाणे. मी घरी नसल्याचं दिसताच हाक मारीत बाहेर आला. हिनं तरी त्याला अडवावं? त्याच्यावर कसला राग? त्या देवळाजवळ "पारम्मा, पारम्मा" त्यानं मारलेली हाक ऐकू आली. मी पळतच त्याच्याकडे गेले नि आपल्याबरोबर देवळात घेऊन गेले.

"मीच तुमचं घर बुडविलं असं तुझी सावत्र आई म्हणते. ते ऐकून मला अतिशय दु:ख झाल्यामुळं मी इकडं निघून आले. आता कुठंतरी रानावनात जाऊन जीव देते." वैतागून मी म्हणाले. माझं दु:ख पाहून त्याला काय वाटेल याचा मी विचारच केला नाही. त्यानं मला घट्ट धरून ठेवलं. मारून बडवून घेतलं आणि तो विनायकाच्या पुढं लोळू लागला. त्याचं ते संकट मला बघवलं नाही. त्या घरी पुन्हा पाऊल ठेवायचं

नाही असा निर्धार करून मी आले होते. पण या मुलाच्या मोहामुळं काही करू शकले नाही. त्याचं समाधान मला करावं लागलं.

"आमचं हे बोलणं फार मोठ्यानं चाललं असावं. गुरांना बांधायला गेलेल्या मुकांबूला ते ऐकू आलं. ती इथं आली. ती येताच तिच्यापुढं मी माझं दुःख ओकून टाकलं. संध्याकाळची वेळ होईपर्यंत आम्ही तिघंही तिथंच होतो. त्या वेळी स्वादीहून भगवंतराव चप्पलांचा चर्र चर्र आवाज करीत येत होते. नेहमीच्या पद्धतीप्रमाणं ते सगळे देवळाकडे आले. चप्पल काढून उभे राहिले. आम्ही अजून त्यांच्या दृष्टीस पडलो नव्हतो. पण हा यशू म्हणाला, "बाबा, पारम्मा जीव द्यायला चालली आहे. ती पळून जाणार म्हणते. त्या छोट्या आईला मारून टाका." मी त्याचं तोंड दाबून धरले होते. मुकांबिकेवर त्यांचा विश्वास होता. तिनं सगळी हकीकत सांगितली. तेंव्हा ते म्हणाले, "पारू ती माझी बायको जरी असली तरी घरचा यजमान अजूनही मीच आहे. ये, चल." त्यांनी मला घरी नेलं. आपल्या बायकोला बोलावून बजावून सांगितलं, "हे वध ही पार्वती कामाला आली हे खरं आहे. पण मातृविहीन माझ्या मुलाचं तिनं आईच्या ममतेनं संरक्षण केलं आहे. या घरचा सगळा भार तिनं सांभाळला आहे. पुन्हा जर असं काही घडलं तर हे घर सोडून कोणाला बाहेर जावं लागेल हे तुला तेव्हाच कळेल."

"तेव्हापासून राग, द्वेष, ताप सर्व काही तिनं आवरलं होतं. समोरासमोर काही जरी म्हणत नसली तरी कोणी आल्या गेल्या वेळी घालूनपाडून बोलून घेत असे. मोठा झाल्यावर तर येशूच्या ती खिजगणतीतच नव्हती. त्याचा उद्धटपणा वारंवार मलाच आवरावा लागत असे. काही झालं तरी तुझ्या वडिलांचा हात धरून आलेली आहे ती, त्याचं मन दुखवलं जाईल." अशी त्याची समजूत घालायची. "बाबा"वर यशूचं फार प्रेम होतं. त्यांचीही माया याच्यावर होती. घरी असायलाच एक रत्न होतं. त्यावर प्रेम न करता राहणं शक्य तरी होतं का ? शिवाय मूल होतंही तसंच."

एकेक घटनेच्या आठवणी तिनं सांगितल्या. शेजारची मुकांबू हितोपदेश करण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी गोठ्याच्या पाठीमागून किंवा विनायकाच्या देवळाच्या भिंती मागून अथवा सुपारीच्या झाडाआडून युक्ती सुचवीत असे. तिचं समाधान करीत असे. अशा अनेक प्रसंगांचं शब्दचित्र ऐकून मी सुखावलो. बालपणापासून यशवंताचं जीवन म्हणजे काट्याची शेज झालं होतं असंच मला वाटलं. स्वतः भोगलेल्या कष्टांची जो आठवण ठेऊ शकतो त्यालाच दुसऱ्यांच्या सुखदुःखाची कल्पना सुलभपणे येते. यशवंत त्या प्रकारचे होते म्हणूनच वयात येताच त्यांनी इतरांच्या

बाबतीत औदार्य दाखविलं. हाती सगळा कारभार आल्यावर त्याचा हात आणखी सैल झाला. अंथरुणापेक्षा अधिकच त्यांनी पाय पसरले. देणारा असतो तेव्हा त्याची वंचना करणारी काही माणसंही सदैव सिद्धच असतात. चोरांनी, लबाड माणसांनी त्यांच्या करुणेचा ओघ आपल्या लाभासाठी वळविला असेल तर आश्चर्याचं कारण नाही. राम हेगड्यांनीच सांगितलं होतं, की त्याच्या वडिलांनी अर्थलाभासाठी व्यवहार केला होता. तशी माणसं सर्व कालात असतात. मात्र देणारा नी अपात्र माणसांचा तोल ओळखायला पाहिजे.

आलेल्या पत्रांवर यशवंतांनी 'पात्र, अपात्र' वगैरे शेरे मारले होते हे पूर्वीच सांगितलं आहे. तशा प्रकारच्या अडचणींचे प्रसंग त्यांच्या आठवणीत वरेच दिसतात. एखादा माणूस अपात्र असं ठरल्यानंतरही आपलंच बरोवर का दुसऱ्याचं याचा संघर्षही चुकलेला नाही. सूक्ष्म विचार करणाऱ्या माणसांचं जीवन म्हणजे एक काटयाची शेज होऊन जाते की काय नकळे!

गाव पाहात, शंकर हेगडे याजकडून माझं काम करवून घेण्याची योजना आखीत, विनायकाच्या देवळाच्या फेऱ्या घालीत, पार्वत्यम्मा मुकांबूकडून गतकालाचे पुराण ऐकत, एकूण तीन दिवसांचा काळ मी बेनकनहळ्ळीत घालविला. गाव सोडण्यापूर्वी त्या दुर्दैवी स्त्रीजवळ पुन्हा एकदा जाऊन, "अम्मा, पुढच्या महिन्यापासून दरमहा दहा रुपये पाठवू का? या तीन महिन्यांचे इथंच घेऊन टाका." असं म्हणून रुपये देऊन टाकले.

"इतके रुपये मी कुठं ठेवून घेऊ? रामाच्या हाती दे" ती म्हणाली.

"त्यांच्या हाती?" मी विचारलं.

"काय झालं? तो शेजारचा आहे. मला काही लागलं, केलं तर तोच आणून देतो."

"ते ठीक आहे. पण...?"

माझा आशय तिच्या लक्षात आला असावा. ती म्हणाली, "तुझं म्हणणं काय की राम ते खाऊन टाकील? अरे खाऊ दे. तोही माझ्या मुलासारखाच आहे. या आवारात कुठलंही भूत नाही. आणि पैसा खाण्यासाठीच असेल तर मग मी खाल्ला काय नि त्यानं खाल्ला काय?"

तेव्हा मला खूप हसू आलं. "तसं असेल तर अम्मा, मीच ते खाऊन टाकतो. पैशांच्या बाबतीत माझी पचनशक्ती चांगली आहे. हजार रुपये दिले तरी एका दिवसात हजम करून टाकीन."

ते ऐकून तीही हसू लागली. "अरे, तशी बुद्धी झाली असती तर तू इथपर्यंत कशाला आला असतास? माझ्या यशवंतानं तुझ्याही डोक्यावर हात ठेवल्यासारखं दिसतंय. हे पाहा बेटा, पैसा आहे म्हणून असं बोलू नये. पैसा म्हणजे लक्ष्मी. लक्ष्मी-देवीच्या बाबतीत तसं हलकं बोलल्यामुळंच त्याला कष्ट झेलावे लागले."

पुन्हा हसत मी म्हटलं, "अम्मा, शेवटी तुमचा वेदान्त हाच ना? तुमच्यासारखी माणसंच 'पैसा देव' म्हटल्यावर त्या मूर्खांनी जर तसं म्हटलं तर नावं कशी ठेवायची?"

"तसं नव्हे बाबा, पैसा लक्ष्मीच आहे. लक्ष्मी देवी आहे. पैशानं चांगलंही होतं, वाईटही होतं. भर्तृहरि का कोण— कुठल्याश्या ऋषीनं म्हटलं आहे, की दान आणि भोग या दोहोंसाठी न मिळणारा पैसा नाशासाठी आहे. चांगलं झालं, सीमेत असलं तर पैसा म्हणजे लक्ष्मी देवीच. नाहीतर तीच पिशाच्च!"

म्हातारीच्या त्या लोकानुभवावर भाळून, पुढच्या वर्षी पुन्हा मी येतो असा तिला भरवसा देऊन मी शंकर हेगड्यांच्या घरचा रस्ता धरला. दुसऱ्या दिवशी मला पाठविण्यासाठी शंभू स्वादीपर्यंत माझ्याबरोबर आला होता. त्याच दिवशी शिर्सीला एका मित्राकडे मी गेलो. तिथून थेट आपल्या गावी परत जावं का यशवंताच्या कुटुंबियासाठी कुमठ्याला जावं या भ्रमात मी पडलो. एका घोटातच सगळं काही घेण्यात काही स्वारस्य राहणार नाही असं वाटून गावी जाण्याचाच मी निर्धार केला, नि सरळ आपल्या गावी परतलो.

अध्याय सातवा

मी गजनीचा महंमद नव्हे की पार्वत्यम्माच्या भक्तीच्या परंपरेतलाही नव्हे. विनायकाच्या देवळाचा जीर्णोद्धार करवून देतो असं कबूल करून मी गावी परत आलो नि नंतर ते काम पुढं चालविण्यासाठी शंकर हेगडे यांना पैसे पाठवीत होतो. पण त्यांच्यावर विश्वास ठेवावा किंवा नाही याबद्दल माझ्या मनात संशय येत होता. त्यांच्याकडून मात्र पैसा पाठविण्यासाठी वारंवार पत्रे येत असत. त्यांचा मुलगा शंभू 'शंभू भट्ट' हे अभिधान सोडून शंभू हेगडे या नावानं देवळाचं काम कुठपर्यंत आलं हे पत्रानं कळवीत असे. पत्त्यांचा खेळ खेळण्यास नवीनच बसणाऱ्या माणसाप्रमाणे आपल्या हातातली सगळी पानं मी हेगड्यांना दाखविली हे उचित का अनुचित असाही प्रश्न माझ्या मनात उद्भवला. यशवंतांनी माझ्यावर विश्वास ठेवून जो पैसा ठेवला होता नि मी जे धोरण अवलंबिलं होतं हे बरोबर आहे की नाही याबद्दलही मी साशंक होतो.

बेनकनहळ्ळीतल्या लोकांनी जे काम करायला हवं होतं ते काम मी माझ्या मित्रांच्यावतीनं करण्याचा पुढाकार घेतला याचं कारण एवढंच की त्यांचं पालन-पोषण करणाऱ्या आईला समाधान लाभावं. यशवंतांचा जेवढा विश्वास विनायकावर राहू शकला असता तेवढाच माझाही होता अर्थात पूजेच्या त्या प्रकाराबद्दल आम्हा दोघांचा विश्वास कमीच म्हणायला हरकत नाही. मग यशवंत असते तर ते स्वतः पडक्या देवळाच्या उद्धारासाठी धावून गेले असते का? कुणास ठाऊक? चांगली वास्तू आणि चांगलं शिल्प असतं तर तिचा उद्धार करण्यात मलाही हुरूपच आला असता. त्या दृष्टीनं पाहिलं तर हा गणपती निव्वळ उघडा विनायकच. मला समाधान एवढंच होतं की पार्वत्यम्मानं ही अपेक्षा यशवंतापुढे व्यक्त केली असती तर त्यांनी अक्षरशः त्याचं पालन केलं असतं असा माझा विश्वास आहे. त्यांच्या मनाला संतोष होईल असं काही करायला पाहिजे. त्यापेक्षा दुसरं मोठं काम नाही. मी थोडासा चलाख असतो तर माझ्या हाती असलेली पत्त्याची पानं मी लपविली असती आणि चार दिवस त्यांच्यात राहून, शंकर हेगडेंनाच पुढं करून, "गावात तुम्हीच वृद्ध आणि ज्येष्ठ आहात.

या देवळाची ही अवस्था होऊ दिलीत ते तुम्हाला शोभतं का ?" असं हिणवून, टीका करून, किंवा त्यांची स्तुती करून, फुगवून " याच्यानं तुमचं नाव अजरामर होईल " असं म्हणून पैसा खर्च करण्याचा माझा भार मी चुकवू शकलो असतो. पण त्यासाठी देवळाचं काम संपेपर्यंत मला त्या गावी जाऊन यावं लागलं असत. तरीही भक्तीपेक्षा धनावर अधिक मोह असलेले लोक त्या गावी आहेतच ना ? म्हणून तर देऊळ पडून गेलं तरी कुणाचं तिकडं लक्ष गेलं नाही. राम हेगडेसारखी आणखी चार माणसं तिथ नसतील काय ? मी अधिक उत्साह दाखविला असता तर माझ्या पाठीमागे हेच लोक बोलले असते की, "हा परगावचा माणूस आम्हालाच विनायकाच्या देवळाच्या जीर्णोद्धाराच्या उपदेशाच्या गोष्टी सांगतो तर यात त्याचा काहीतरी हेतू असलाच पाहिजे."

हे "काही तरी" म्हणजे दहा जणांच्या वर्गणीचा पैसा हडपणे असाच अर्थ नव्हे का ? असो. माझ्या मित्रांच्या नावावर मी चूक केली असेल तर चिंतेचे कारण नाही. अनोळखी गावी जाऊन विनाकारण संशयाचा बळी होणं योग्य नाही. त्यापेक्षा मी आपल्या हाती असलेली पत्त्यांची पानं दाखविली हे बरंच झालं असं मला वाटलं.

मी गावी परत येताच हिवाळा लागला. त्यानंतर ऋतुमानाप्रमाणे उन्हाळा आला. दर महिन्याला शंकर हेगड्यांकडून बिल येत असे. चालू असलेल्या कामाचं विवरण शंभू हेगडे देत होता.

"पावसाळा संपल्याच्या दुसऱ्या दिवशीच आम्ही जुनं देऊळ पाडून टाकलं आहे. त्याच्या लाकडी वस्तू कुठल्याच कामाच्या राहिल्या नाहीत भिंती फुगून गेल्या-मुळं पायापर्यंत सर्व उकरून काढावं लागलं. मजबूत दगडांचा पाया घालावा का ?" असं एकदा त्यानं लिहिलं होतं.

त्याच्या दुसऱ्या पत्रात असा मजकूर होता.

"आमच्या आवारात असलेले झाड बाबांनी नुकतेच तोडून घेतले आहे. पण आमच्या गावी लाकडं कापणाऱ्यांचा अभाव आहे. इथं सुतार नाहीत. शिर्सीहून किंवा कुमठ्याहून त्यांना बोलावून आणावं लागेल. एका कामाला ते दुप्पट मजुरी मागतील."

"मग तसंच करा. विश्वासू लोकांना बोलावून घ्या. आगाऊ पैसा देऊन फसण्याचा प्रसंग येऊ देऊ नका." असा मीही उपदेश दिला.

"दगडी कामाला आरंभ झाला आहे. बांधकाम चालू आहे. सुतार आले आहेत. या उन्हाळ्यापर्यंत देवस्थानावर छत पडेल." असं आशादायक पत्रही आलं.

नंतर आणखी एका पत्रात त्यानं लिहिलं होतं.

" राम हेगडयांचं म्हणणं असं आहे की, एवीतेवी बांधकाम हाती घेतलंच आहे तर गाभाऱ्यापुढं एका खणाऐवजी चार माणसं अधिक बसू शकतील अशा दोन खणांची जागा व्यापून ओसरी का बांधू नये ? गाभाऱ्याच्या भिंती उंचावून छतासाठी तांब्याचेच पत्रे वापरावेत. काम शाश्वत व्हायला पाहिजे. असं त्यांचं मत आहे."

त्यानंतर मी देवळाचं मोजमाप मागवून नकाशा तयार करवून दिला होता. पुन्हा एकदा गाभाऱ्याच्या प्रत्येक भिंतीची उंची, छताची रचना वगैरेचा नकाशा पाठवून दिला.

" इतकी वर्षं गवताच्या छप्पराखाली तुमचा विनायक भिजत होता. त्या मानानं कुंभाराची जुनी कौलं किंवा मंगळूरी कौलं निश्चित बरी आहेत. सुबुद्धी उपजून तुमच्या राम हेगडयानी तांब्याचे पत्रे आणून दिले तर पुढं मागं न पाहता खुशाल घालून टाका." असं मी उत्तर दिलं. त्यावर शंभूचं पुन्हा पत्र आलं की—

" अहो, पन्नास रुपये देतो देतो म्हणून राम हेगडयांनी अजून काहीच दिलं नाही. मिळण्याची आशाही नाही. त्या ऐवजी पार्वत्यम्माला गळ घालून आम्हालाच तिच्याकडून काही ना काही कळवीत आहेत." ही मात्र गमतीची गोष्ट आहे. यशवंतरावांची ठेव माझ्या हाती पडली आहे ही बातमी शंकर हेगडेकडून किंवा पार्वत्यम्माकडून त्यांच्या कानी पडली असावी. म्हणूनच आपण घरचे यजमान आहोत हे दाखविण्यासाठी त्यांनी पार्वत्यम्माला कसं हिणवलं होतं हे कळविण्यासाठी शंभूनं पत्र लिहिलं होतं. त्या पत्राचा मजकूर असा होता—

" तू भित्री आहेस. दरमहा खर्चाला निदान पन्नास रुपये तरी मागायचे. ते सोडून दिलंस. मी तुला आजपर्यंत आधार नि आदर देत आलो त्याचं हेच का फळ ? आलेला तो दूत यशवंताच्या कुटुंबातला नाही. तुझ्यासारखाही नाही. मी जर त्याच्या-जागी असतो तर यशवंताचं रक्षण करणाऱ्या मातेच्या चरणी ते धन ओतून टाकलं असतं. तूही तशीच. काही मागितलं नाहीस. फक्त देऊळ बांधून काढण्याची इच्छा व्यक्त केलीस. अर्थात ते काम व्हायला पाहिजे. माझीही तशी उत्कट इच्छा आहेच. ते आपलंच देऊळ नव्हे का ? विनायक म्हणजे का असातसा देव आहे ? त्या देवळावर तांब्याचे पत्रे घालायला नको ? त्यासाठी एक दोन हजार रुपये जास्त लागतील एवढंच ना ? पैसा देतो म्हणजे का आपल्या बापाचा पैसा देतो ? तो यशवंताचाच आहे ना ? देऊ दे मग. यशवंत या गावी जन्मून वाढला. तो असता तर त्यानं दिलाच असता की नाही ?

"हे बघ, कुमठा सोडून जाताना यशवंतानं दोन लक्ष रुपये मुंबईला नेले असं माझ्या ऐकण्यात आहे. बायको-मुलांवर रागावून त्यांना फसवून त्यानं दोन लक्ष रुपये नेले. त्या मुंबईत साहेबी थाटात राहून दरबार भरवला, आणि मरून गेला. तुला तो पैसे पाठवीत असे ते किती होते ? फक्त पाच रुपये महिन्याला पुरतील का ? काल परवा जो घरी आला होता ना, मी म्हणतो त्याच्या हाती फक्त पंधरा हजार रुपये नव्हे तर निदान पन्नास हजार तरी पडले असतील. कदाचित लक्षही असतील. सगळ्याच गुपितांचा स्फोट आपणहून कोण करील ?"

राम हेगडयांचा हा प्रलाप म्हणजे केवळ शंभूची कल्पना नव्हे असं मला वाटलं. इतक्या खोटयानाटया गोष्टी तो लिहू शकणार नाही.

हिवाळ्याचे दिवस होते. त्याच अवधीत पार्वत्यम्माच्या छळाचा उल्लेख करून शंभूनं मला एक दीर्घ पत्र लिहिलं होतं.

"आपण छतासंबंधी कळविलेला विचार आजीना कळविला. तिला आपली सूचना मान्य आहे. पण शेजारचे राम हेगडे यांचा तिला छळ फार होत आहे. मधून-मधून ते तिला सतावतात. म्हणतात, 'इतके दिवस पाटाला नसताना आम्हीच तुला अन्न, वस्त्र पुरविलं. यापुढे तुझ्या पाच रुपयांत तू स्वतंत्र होऊन रहा. आमची मिधी का राहतेस ? त्याला पत्र लिहून यशवंताच्या पैशातून निदान पन्नास रुपये तरी मागवून घे म्हटलं तरी तू ऐकत नाहीस मी आजारी पडलो तर तुला कोण पाहणार ? तुझी काय इस्टेट आहे, का तुझ्याजवळ पैसा आहे ? मागं दहावीस वर्षे आमच्या घरी चाकरी केलीस. पुढं म्हातारी झाल्यावर आम्ही तुला दयेनं पोसलं. अजूनही तुझं पोषण आम्हीच करावं अशी तुझी अपेक्षा आहे काय ?"

ते वाचून मीही चकित झालो. "पैसा म्हणजे लक्ष्मी" पार्वत्यम्मानं म्हटलं होतं, 'पैसा दुष्ट राक्षसी आहे' हे मनाला पटून व्यथित होण्याची वेळ आली आहे. तिला त्रास देऊन तिच्यावतीनं 'माझं नसलेलं' धन माझ्यापासून ओढण्याचं नवं तंत्र त्यांनी अवलंबिलं होतं. त्यासाठी विनायकाचं देऊळ एक निमित्तमात्र. पार्वत्यम्माच्या उतारवयात त्रास दिला तर थोडं तरी हाती पडेल अशी त्यांची दुराशा असेल. त्यामुळं दिवसेंदिवस तिच्या वर दडपण आणून तिचं संकट वाढवायचं हेच त्याचं धोरण होतं. मी जरी पन्नास रुपये तिला पाठविले असते तरी ते तिच्या हाती न पडता, शंभू किंवा पोस्टमन ऐवजी यापुढे त्यांच्या हाती पडत गेले असते. पैसा म्हणजे शुद्ध मीठ. ते थोडंसं जिभेवर ठेवलं तर रुचकर असतं. जास्त खाल्लं तर दाह होतो. राम हेगडयांना तर नुसतं ऐकूनच दाह होतो आहे. दरमहा दहा रुपयाप्रमाणे मी पार्वती

अम्माला देत आलो हेच त्यांच्या दाहाचं कारण. तिने सांभाळलेल्या मुलाचा हा पैसा आहे असं म्हणणं हे राक्षसी भुकेचं लक्षण होय. म्हातारपणचे दिवस सुख-शांतीने जाण्याऐवजी माझ्या अविवेकीपणामुळे पार्वत्यम्माचे कष्ट वाढत आहेत याची मला चिंता लागली. अजून वर्ष दोन वर्षं ती जगायला पाहिजे. ती जागा सोडून ती बाहेर निघेल का ? मला काही सुचेनासं झालं. म्हणूनच ताबडतोब एक तात्कालिक व्यवस्था करण्यासाठी मी शंकर हेगडे यांना एक पत्र लिहिलं.

"तुमची ताई जिला आपला दुसरा जीव मानते त्या पार्वत्यम्माला तुम्ही आपल्या घरी ठेवून घ्या. तशी तुमची तयारी असेल तर जो काही खर्च येईल तो मी पाठवीत जाईन."

त्यांनी आपल्या ताईशी विचारविनिमय केला असावा. आपल्या आतेला हे कळविल्याचा शंभूच्या पत्रात उल्लेख होता. अशा कामासाठी शंभूच मध्यस्थ म्हणून धावपळ करीत होता. माझी सूचना शंकर हेगड्यांनी मानली. त्यांच्या ताईला या बाबतीत विशेष उत्साह होता. आपल्या मैत्रिणीकडे जाऊन तिला बोलावून आणण्याची कामगिरी मुकांबूनं स्वीकारली. पण तिला संशय होता. राम हेगडे अतिलोभी आणि वंचक जरी असले तरी त्यांचा आश्रय पार्वत्यम्माला बरेच दिवस लाभला होता म्हणून ती आपल्या घरी येईल किंवा नाही हाच तो संशय. शिवाय वाडवडिलांच्या जुन्या द्वेषाला ती बळी पडलेली. आपली मुलगी तिच्याशी बोलते हे पाहूनच ज्या माणसाला राग आला होता त्याच्याच घरी जाऊन राहिल्यास त्या मृतात्म्याला काय वाटेल असा विचार कदाचित पार्वत्यम्माच्या मनात उद्भवेल. ही गोष्ट ही मुकांबूच्या मनात सलत होती. परस्पर प्रेम असल्यामुळं तसं कधीमधी येण्यास ती भीत नसे पण, 'कायमच राहण्यास घरी ये' असं म्हटल्यास ती राजी होईल का ? हाच प्रश्न होता.

मुकांबूनं तो महाभार उचलला होता पण त्यात तिला यश आलं नाही नि ती परत आली हे शंभूच्या पत्रावरून समजलं. मुकांबूच्या मनातील दोन्ही संशयच त्या म्हातारीच्या मनात उफाळत होते. पार्वत्यम्मानं मुकांबूला जे सांगितलं त्याच्या आशय असा होता—

"मुकांबू, कुणाकडून काही बोलणी न खाता आतापर्यंतचं माझं जीवन गेलं का ? चोन्चिलमनींच्या वरल्या घरीसुद्धा मला बोलणी खावीच लागत. यशवंताच्या सावत्र आईनं तर जे म्हणू नये ते म्हटलं. काहीच न म्हणणारी फक्त यशवंताची आई मात्र होती. त्यानंतर या खालच्या घरी आले. राम हेगडे, याचा बाप काही ना काही दररोज म्हणतच असत. मला कोणी नाही. पोटासाठी मी राबते हे का त्यांना

माहीत नव्हतं? सकाळपासून रात्रीपर्यंत अंग मोडून मेहनत केली तरी शिव्यांची लाखोली माझ्या नशिबी चुकली नाही. मला वाटतं, माझा जन्मच तेवढ्यासाठी आहे. आता तू जा. माझ्या डोळ्यांना दिसत नाही, त्यातून काही काम करवत नाही. कुणी काही म्हणतात तर म्हणू देत. शिव्या देणारी ही मुलंसुद्धा माझ्या माहितीचीच ना? मी मेल्यावर तरी यांच्या तोंडून असे उद्‌गार निघतील की 'आम्ही इतक्या शिव्या दिल्या तरी बिचारीनं उलट उत्तर दिलं नाही. अरेरे मेली बिचारी पार्वती!' म्हणतीलच. अग शिव्या देणं हासुद्धा जन्मजात स्वभाव असतो." असं बोलून तिने मुकांबूची निराशा केली.

शंभू हेगडे याच्या पत्रावरून राम हेगड्यांची बोचणी वाढली होती हे कळत होतं. आलेले पैसे पुरत नाहीत आणि म्हणून मुकांबू तिला स्वतःच्या घरी नेण्यासाठी आली होती ही वार्ता त्यांना ज्या दिवशी समजली त्याच दिवशी राम हेगड्यांनी ब्रह्मास्त्रच सोडल्याचं कळलं.

"आऽहो– पार्वती मी सांगितले ते अति झालं नाही का? तुझ्या हितासाठी म्हणून सांगितलं तर गावभर त्याचा बोभाटा करतेस नाही का? कर, बोभाटा कर. या म्हातारपणी तुझी वरात काढून शंकर हेगड्यांच्या घरी जाऊन तू खुशाल रहा. आमचं काय नुकसान होणार आहे?"

त्या रात्री पार्वत्यम्मा तळमळली. तिची काय स्थिती झाली असेल याची मला कल्पना आहे. दुसऱ्या दिवशी उजाडताच त्यांनी आपल्या पत्नीकडून दुसरा शुभसंदेश पाठविल्याचंही कळलं.

"जा महाराणी, जा. ज्या घरी आणाभाका झाल्या त्या घरी जाऊन प्राण सोड. उद्या तू मेल्यावर श्राद्ध होईपर्यंत ठावठिकाणा नसल्यामुळं गावातल्या सगळ्या लोकांना पीडा लागू दे. मात्र यापुढं तू आमच्या घरची पायरी चढू नकोस." असं तिच्याकरवी सांगून त्यांनी आपला स्नेहसंबंध तोडून टाकला. पार्वत्यम्माने ते विष शंकराप्रमाणं गटागट पिऊन टाकलं पण प्रत्युत्तर दिलं नाही.

"असं झालं तर मला वाटतं की ही आजी पोटात अन्न नसल्यामुळं, व मनाला चिंता जाळीत असल्यामुळं व्याकुळ होईल, दुर्बल होईल, पुढचा पावसाळा काही पाहू शकणार नाही." शंभू हेगड्याचं हे पत्र वाचून मला धक्काच बसला. विनायकाच्या देवळाचा जीर्णोद्धार कोणाकरिता? यशवंतरावांच्या नावे मी उचललेला तो महाभार कुणाच्या तृप्तीसाठी? कुणाच्या शांतीसाठी?

आमच्यासारखी सुशिक्षित माणसं ग्रामजीवनातील शांती या विषयावर मोठ मोठी भाषणे देतात. विकृत मनाची किती तरी माणसं आपल्या खेड्यात आहेत त्यांनी कसल्या शांतीचं विराट रूप दाखविलं असं मला वाटलं. दूरच्या गावी उगा बसून कोणाच्याही वाटयाला न जाता माझ्या समजुतीप्रमाणे मी मनिऑर्डरीने पै. पाठवला असता तर बरं झालं असतं. शंभूच्या बाबतीत शंका आली नसती के पार्वत्यम्माचे कष्ट वाढले नसते. आता मी आपणहून सगळयांना छेडलं होतं. दोन मैल दूर अंतरावर बसून बुद्धिवंताप्रमाणं दुसऱ्यांना उपदेश करीत होतो. तो उपदे ग्रहण करणाऱ्यांना मात्र कष्ट भोगावे लागत होते. एकदोन दिवस माझं मन अति उद्विग्नतेनं भारावून गेलं होतं. देवालयासंबंधी दोन चार गोष्टी शंभूला लिहिल्या आणखी काही लिहिल नाही. या पुढं उपदेश करण्यापूर्वी चांगला विचार करावा अस वाटलं. सवड मिळाल्यास तिथं जाऊन, पार्वत्यम्मा वेगळं राहण्याची शक्यता असेल तर तशी सोय करूनच यावं, नाहीतर आतापर्यंत झाला तो उपद्व्याप पुष्कळ झाल असा विचार केला.

याच अवधीत आणखी काही गोष्टी मी अंगावर ओढवून घेतल्या होत्या. यशवंतरावांचे आणखी तीन आश्रित होते. त्यांना मी यशवंतरावांच्या निधनाची वार्ता कळविली होती. एवढच नव्हे तर, "त्याच्या बाबतीत आपणाला असलेली माहिती कळविल्यास मी फार आभारी राहीन." असं पत्रही लिहिल होतं. विष्णुपंत घाटे यांजकडून त्या पत्राचं उत्तर वरील कालात आले. यशवंतरावाबद्दल अत्यंत आदर असणारी ही व्यक्ती असावी. वर्षातून एकदा माझे मित्र महाबळेश्वरला जाऊन विश्रांती घेत असत. त्याच वेळी त्याचा नि यांचा स्नेह जमला. घाटे या वेळी मात्र तिथं राहात नाहीत. आपल्या लिखाणाला, अभ्यासाला अनुकूल होईल या अपेक्षेने ते पुण्यातल्या आपल्या लेकीकडे येऊन राहिले आहेत." माझं आरोग्य चांगलं राहात नाही. नेहमी काही ना काही पीडा असते. अध्ययनात, लिहिण्यात वेळ घालविणारा मी. वयही झालं आहे. वेड्यासारखं कुठलंतरी एक काम हाती घेतलं आहे. ते आता संपत आलं आहे. अजून सहा महिन्यांत संपेल. यशवंतरावांनी मदत दिली व प्रोत्साहित केले; त्यामुळंच या कार्यात उडी घेण्याची शक्ती आली. आपण कोण, मी कोण, त्यांच्या-विषयी असलेल्या अभिमानामुळं आपण त्यांच्याबतीनं मदत करीत आहा. मी आपला ऋणी आहे. पुण्यावरून कुठं जाण्याचा आपल्यास प्रसंग आल्यास आमच्या घरी या म्हणजे त्यांच्या बाबतीत बऱ्याच गोष्टी मी सांगू शकेन." असं त्यांनी लिहिलं होतं. प्रथमतः माझ्या मित्रासाठी मी स्वतःचेच पैसे पाठवितो अशी त्यांची चुकीची समजूत

झाली असावी. म्हणून मी वस्तुस्थितिदर्शक पत्र लिहिलं. "तसं नाही. हे पैसे त्यांचेच आहेत. त्यांच्या इच्छेनुसारच हे रुपये पाठविले आहेत." त्याचबरोबर, "बघूया, पुण्यावरून कुठं जाण्याचा प्रसंग आला तर अवश्य येतो." असंही कळविलं होतं. त्यानंतर कुतूहल जागं झाल्यामुळं, "आपलं काही लेखन चाललं आहे असं आपण कळविलंत. हे कसलं लेखन आहे मला कळवू शकाल का?" अशी विचारणाही केली.

महिन्यानंतर किंवा त्याहीपेक्षा उशिरानंच त्यांचं उत्तर आलं. विलंबाचं कारण त्यांचा आजार हे त्यांनी कळविलं होतं. लेखनाच्या बाबतीत त्यांनी लिहिलं होतं की, "धर्मशास्त्र विचार या विषयावर माझी हौस भागवीत आहे." त्यानंतर मी पत्रव्यवहार वाढविला नाही.

आता आणखी दोन आश्रित राहिले. कुमठ्याजवळचे होनगद्दे मंजय्या या नावाचे गृहस्थ त्यातलेच एक होत. मी एकेकाळी होनगद्देला गेलो होतो. तिथून तीन किंवा चार मैल लांब आहे. तिथं मी मध्यरात्री आठदहा श्रोत्यांना जमवून एका सभेत भाषणही दिलं आहे. कुठल्यातरी निमित्तानं पुन्हा कुमठ्याला जावं लागेल त्या वेळी या मंजय्याची भेट घेता येईल असा विचार केला. मी त्यांना लिहिलेल्या पत्राचं उत्तर चार सहामहिन्यांपर्यंतही आलं नाही. मनिऑर्डरच्या पावतीवर त्यांचीच सही होती. त्यांतील अक्षरे कापऱ्या हातांनी लिहिलेली असल्यामुळं ते एक वृद्ध गृहस्थ असावेत असं वाटलं आणि म्हणून मीच जाऊन चौकशी करावी नुसतं, 'आपलं उत्तर नाही' असं लिहू नये असा निर्धार केला. दुसरा आश्रितही कुमठ्याच्या आसपासचाच. बराच काल लोटल्यानंतर त्याच्याकडूनही एक पत्र आलं. त्यानं उपकाराचं स्मरण केलं होतं. "यशवंतांच्या निधनाची वार्ता ऐकून माझ्या आईनं तीन दिवसांपर्यंत अन्न-पाण्याला स्पर्शही केला नाही." असं कळविलं होतं. त्यानंतर "तू कोण? तुझी आई कोण?" वगैरे प्रश्नांच्या पत्राचं मात्र उत्तर आलं नाही. त्याला पुन्हा पुन्हा खोदून विचारणं मलाच बरं वाटलं नाही म्हणून गप्प राहिलो. या व्यक्तीचं नाव धारेश्वर शीन असं आहे. धारेश्वर हे मी ऐकलेलं नाव व पाहिलेलं गाव आहे. पण हा गृहस्थ कोडकणी नामक खेड्यात राहतो. कुमठ्याला गेल्यावर तसा प्रसंग पडला तर त्याला भेटणं शक्य आहे.

शंभू हेगड्याच्या इकडच्या दोन-तीन पत्रांतून असा मजकूर आला होता—

"आपण आजीच्या बाबतीत काही लिहिलं नाही. ती अजून तिथंच आहे. राम हेगड्यांनी वैर धरल्यापासून ती सारखी झुरत आहे. आम्ही बोलावलं तर ती येत नाही. या दोन तीन महिन्यांत ती पार उतरून गेली आहे. पुढच्या गणेशचतुर्थी-

पर्यंत म्हणजे विनायकाची प्राणप्रतिष्ठा होईपर्यंत ती जगू शकेल की नाही हीच मला भीती लागून राहिली आहे. देवस्थान काढून टाकलं आहे. नवीन मूर्तीची प्रतिष्ठा होईपर्यंत देवळात पूजा कशी होईल ? आजीची इच्छा पूर्ण करण्यासाठी तुम्ही एवढं सगळं केलं पण मध्येच ती गेली तर माझ्या दृष्टीनं देवच परतंत्र झाला असं होईल. एकूण तो विनायकच तिचं रक्षण करो."

आणखी एका पत्रात, " देवस्थानाच्या भिंती बांधण्याचं काम एका आठवड्यात संपेल. लाकडी काम तयार होत आहे. तत्काळ वासे वगैरे चढविले जातील. अजून कौलं आली नाहीत. लवकरच येतील." असं कळविलं होतं.

हे सगळं आठवलं की काही वेळा मला हसूही येतं. मीच तयार करविलेल्या नकाशातून विनायकाचं नवं देऊळ साकार होत असलेलं स्वप्नात, दिवास्वप्नातही स्पष्ट दिसत असे. अगोदरच्याच जागी उठत असलेलं हे नवीन देऊळ थराथरानं चढत असताना मला दिसलं आहे. छताचं काम संपून भिंती सारवल्या जाऊन प्रतिष्ठेचा दिवसही पार पडतो नि पार्वत्यम्माच्या नवसाप्रमाणं पूजाविधी संपून हजार नारळांच्या राशी पडलेल्या दिसतात. तर काही वेळा स्वप्नातली ही दृश्ये बदलतात. सगळंच काही विरुद्ध दिसू लागतं. देऊळ वर न चढता बांधकाम अर्ध्यावरच थांबलं आहे. विनायक रणरणत्या उन्हात तापत बसला आहे. राम हेगड्यांचा शाप खरा ठरून पार्वत्यम्मा मेली असून ती भूत होऊन शंकर हेगड्यांच्या घरच्या पश्चिमेस असलेल्या वेळूच्या बनातून विनायकाच्या देवळापर्यंत हडळीसारखी किंचाळत फिरते आहे. तो चित्कार ऐकून मी भ्यालो आहे. अर्थात हे सगळं स्वप्नातच. एवढाच फरक. स्वप्न पाहात असता त्यास बळी पडलेल्या जीवाला सुख-दुःख, भय-भीती सगळं सगळं काही खरंच वाटत असतं. जीवन एक मायाच आहे असं म्हणतात ना ? तसंच स्वप्नही एक मायाच. मेल्यानंतर जीवन म्हणजे एक मायाच. जिवंत असेपर्यंत सुख-दुःख, भीती पूर्णपणे खरीच वाटतात. दुसऱ्याचं सुख-दुःख आम्हाला मायेप्रमाणं दिसतं की नाही ? मग आमचं सुख, दुःख म्हणजे माया की नाही हे समजण्यासाठी आपल्या वर्तनाचं परिशीलन करायला पाहिजे.

" चैत्र शुद्ध प्रतिपदा येऊन सरकून गेली ; पाडवा संपला. विनायकाच्या भिंतीवर आता छत पडलं आहे. लाल कौलावर सूर्याचे किरण पडले असता हिरव्या वेळूच्या बनातून लाल पताकांप्रमाणं ते फार छान दिसत आहे."असं शंभूनं कळविलं. त्याबरोबर, " हे पाहा, लिहून लिहून मला कंटाळा आला आहे. आपण एकदा अवश्य येऊन जा. निदान काम झालेलं पाहण्यासाठी तरी या किंवा पार्वतीआजीची समजूत घालण्या-

साठी तरी." या दोनच ओळीत त्यानं आपली उत्कट इच्छा व्यक्त केली होती. माझा आत्माही हेच सांगत होता. देऊळ पूर्ण झालं आहे. सारवणं संपलं नसलं तरी चालेल. प्राणप्रतिष्ठा होऊ शकेल. हा विचार विशेष महत्त्वपूर्ण नव्हता. त्यापेक्षाही महत्त्वाचं काम होतं पार्वत्यम्माला भेटून येणं. पण तिथं जावं, का जाऊ नये याच द्विधा मनोवस्थेत मी होतो.

त्या दोन दिवसांतच अनपेक्षित अशा स्थळावरून एक पत्र आलं. बेनकनहळ्ळी-पासून हळूच सरकत सरकत यशवंतरावांच्या मृत्यूची वार्ता कुमठ्यापर्यंत पसरली असावी. त्या पत्राचं कारण तेच होतं.

" महाशय,

आपण कोण काय वगैरे समाचार मला माहीत नाही. त्यामुळे माझ्या लिहिण्यात काही कमी जास्त झालं असेल तर क्षमा असावी. मात्र मी कोण हे तुम्हाला कळायलाच पाहिजे. आपण सगळ्या गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न न केल्यानंच मला फार वाईट वाटत आहे. माझे वडील वारल्याचे माहीत असूनही आपण त्यांच्या कुटुंबियांना म्हणजे आम्हाला, त्यांना पिंडप्रदान करणाऱ्यांना, ती वार्ता कळवायला नको होती का? आमची आई अजून जिवंत आहे ना . . .

"असं असताना आपण बेनकनहळ्ळी येथे एका जख्खड म्हातारीच्या घरी जाऊन आमच्या वडिलांच्या नावावर स्वतःची बढाई सांगितल्याचं ऐकून मलाच नव्हे तर कोणालाही आश्चर्यच वाटेल. माझ्या वडिलाच्या जमीनजायदाद, धन आणि देणगीचे वारसदार आपण नसून मी आहे. त्या सर्वांवर माझा हक्क पोचतो. त्यांचा भरपूर पैसा तुमच्या हाती आल्याचे कळले आहे. त्यांच्या मृत्यूची बातमी न देण्याचा उद्देश चांगला नसावा हे उघड आहे. त्याचे जे काही असेल त्याची सविस्तर माहिती देऊन अजूनही ते सर्व माझ्या स्वाधीन करून क्रमेण पावती घ्यावी. नाहीतर एखादा वकील नेमून आम्हास कायदेशीर इलाज करावा लागेल असे कळविण्यात येत आहे.

इति चोच्चिलमनी सीताराम हेगडे."

बरं वाटलं मनाला. जाऊ द्या. वडिलांच्या हाती मृत्यूच्या वेळी चार दमड्या शिल्लक राहिल्या असतील या विश्वासानं तरी त्यांना पिंड देण्याची सद्बुद्धी मुलाला झाली. आपल्या वडिलांची आठवण मुलाला सुमारे पंधरा वर्षांचा अवधी लोटल्या-नंतर तरी झाली. त्याचबरोबर त्याची आई, (कमलाबाई ना तिचं नाव?) अजून जिवंत असल्याचं ऐकून मला थोडंसं वाईट वाटलं. कारण कोणत्याही कारणानं का होईना सुवासिनीला वैधव्य येणं वाईटच. तरीपण या माझ्या मित्रानं माझ्यावर

अयोग्यतेचा आरोप करून योग्य कायद्याचा आधार घेण्यापूर्वी त्याची भेट मला घ्यावी लागेल. भेट खचित होईलच. पण तितकी घाई नव्हती. तसे माझे मित्र सांप्रदायिक मनोवृत्तीचे असते तर मी मुंबईहून परत आल्या दिवशीच त्यांच्या मुलाला वडिलांच्या निधनाची वार्ता कळविली असती. पण त्याला आडव्या आलेल्या गोष्टी म्हणजे यशवंतरावांची रोजनिशी आणि त्यांच्या काही मान्यता.

"माझं अस्तित्व आता आहे. मेल्यानंतर राहणार नाही. जन्मण्यापूर्वी मी नव्हतो. मेल्यानंतर राहतील त्या माझ्या वर्तणुकीच्या आठवणी. मी नव्हे. नसलेल्या माझ्यासाठी श्राद्धादिकर्म करणे मला संमत नाही. माझ्या जीवनात जर कुठले चांगले गुण आढळले असतील तर ते आचरणात आणावेत. तीच मला अर्पण केलेली श्रद्धा असेल. असलं श्राद्ध कोणीही कोणासाठीही करू शकेल. ते श्राद्ध मानवतेचं, व्यक्तीच नव्हे. मानवत्व चिरंतन आहे. आम्ही फक्त चार दिवस मात्र दिसणारे." यशवंतरावांनी या गोष्टी रोजनिशीच्या पहिल्या पानावरच लिहून ठेवल्या आहेत.

यशवंतरावाचा मनोधर्म असा असताना, ते जिवंत असताना त्यांना अश्रद्धेनं डिवचून सतावून, मेल्यानंतर त्यांना पिंडदान केलं तर त्याचा काय उपयोग ? तो फक्त काकपिंडच होईल. पितृभक्तीचं कोणतंही लक्षण त्यात नाही.

म्हणूनच कुमठ्याला राहात असलेल्या त्यांच्या मुलाचा पत्ता हुडकण्याचा मी प्रयत्न केला नाही. माझ्या मित्राच जीवनचरित्र जाणण्यासाठी सवडीनं मी त्यांचा परिचय करून घेणार होतो. तरीपण त्यांच्या बँकेच्या पासबुकावरून दीड हजार रुपये नगद रक्कम शिल्लक असल्याचे समजले होते. ते बँकेत तसेच पडून राहण्यापेक्षा कायद्याप्रमाणं वारसदारांना मिळायला हवेत म्हणून त्या धनासंबंधी मी घरवाल्यांना अगोदरच कळविलं असतं तर योग्य झालं असतं की नाही कुणास ठाऊक ! म्हणून यशवंतरावांच्या मुलाला मी प्रत्युत्तर म्हणून चार गोष्टी लिहिल्या.

"माझे परमप्रिय मित्र यशवंतरावाचे आपण चिरंजीव असल्याचं वाचून मला अतिशय आनंद झाला. केवळ ऐकीव गोष्टीवरून आपण माझ्यावर मोठा आरोप केला आहे. सवड असल्यास आपण येथपर्यंत अवश्य यावे. आपल्या वडिलांचा पैसा माझ्याजवळ आहे, हे खरं आहे. आपल्या अवसानकाळी, त्या पैशाचा विनियोग कसा करावा यासंबंधी योजना आखून, स्पष्ट निर्देशनाचं पत्र सोबत ठेवूनच त्यांनी तो पैसा ड्राफ्टनं माझ्याकडे पाठविला. त्यांच्या आदेशाचं ते पत्र आपण पाहू शकता. शिवाय त्यांनी काढलेली काही चित्रं आहेत. पुस्तके आहेत. आपण येऊन ते सगळं नेऊ शकता. मुंबईच्या इंडियन ओव्हरसीज बँकेत नंबर २५१६ या अकौंटमध्ये रु. १,६१३–७–०

त्यांचे शिल्लक आहेत. आपण सरळ बँकेला नेश्वी कळवून ते पैसे शक्यतो लवकर मागवू शकता. आपल्या वकिलानी कायद्याच्या आधारानें आणखी काही योग्य तो सल्ला दिला तर तसंही करू शकता." असं मी त्याला कळविलं.

या भानगडी निर्माण करणारा महानुभाव कोण असावा हे जाणण्याचं कुतूहल साहजिकच माझ्या मनात निर्माण झालं. माझ्या डोळ्यापुढं या कामाला योग्य अशी अेकच अेक व्यक्ती दिसली ती म्हणजे राजेश्री श्री. राम हेगडे होत. त्याच्या आठवणी-वरून त्याच्या वडिलांची आठवण आल्यावाचून राहिली नाही. यशवंतरावांवर जाळं फेकून, कर्ज देऊन, मासा धरायला जाऊन, देवमासा मिळविलेले महानुभाव ! अशा प्रकारचा मत्स्यव्यवसाय करून हा ब्रह्मवृंद जीवनाला भूषणावह समजतो. तेव्हा पार्वत्यम्माच्या निःस्वार्थ जीवनाला, निरपेक्ष बुद्धीला हे लोक मान्यता देतील का ?

सीताराम हेगड्यांच्या पत्राला अुत्तर दिल्या दिवशीच शंभू हेगडेला ही एक पत्र लिहिलं. " हे पत्र पोचण्यापूर्वीच कदाचित मी तुमच्या गावी येअीन."

पत्राच्या वेगाला मागं टाकून कुमठा, पुढं शिर्सी मार्गे स्वादीला जाऊन तिथून बेनकनहळ्ळीला गेलो. कुमठ्याला मी जाताना उतरलो नाही. सीताराम हेगड्यांना एवढ्या अवधीत माझं पत्र पोचलं असेल किंवा नाही असा संशय होता. त्याच वाटेनं परत येण्याचा विचारही नव्हता. कुमठ्याला गेलो असतो तर तिथं आठदहा दिवस तरी रहावं लागलं असतं. कारण तिथं यशवंतरावांचे दोन दोन आश्रित राहतात. कुटुंबांची आतली व बाहेरची माहिती मिळवायची असल्यास अन्य मित्रांचीच मदत घ्यावी लागणार होतं. ते सर्व विनायकाच्या कृपेनंच घडून येईल असं वाटून मी पुढं निघालो.

या खेपेनं स्वादीला जाताना बैलगाडीचा योग चुकला. तिथं बस चालू झाली होती. दीड तासात माझा प्रवास संपला. तेथून मी पूर्वीच्याच मार्गानं रानातील खुणांच्या अनुरोधाने बेनकनहळ्ळीला गेलो. मागं गेल्यावेळी पावसाळा संपत आला होता. यावेळी कडक उन्हाळा होता. उन्हामुळं वनश्री दमल्यासारखी दिसत होती. जिथंतिथं शेकडो पक्ष्यांचा कलरव ऐकला. पानं गळालेल्या सावरीच्या फांद्या फांद्यातून लाललाल फुलं उमलून झडत असल्याचं दिसलं. उन्हामुळे घाम येऊन, तहानेला होऊन मी वेगानं पावलं टाकीत विनायकाच्या टेकडीवर आलो. त्या देवळाच्या चहूबाजूला असलेले वृक्ष, वेळूचं वन वगैरे कापून स्वच्छ करण्यात आलं होतं नव्या देवालयाच्या छतावर कौलं घातली गेली होती. समोरच्या मंडपावरही कौलं पडली होती. आमच्या शंभूनं आपल्या पापाचं उचित प्रायश्चित्त केल्याचं

पाहून मनाला समाधान झालं. देवळाचं लाल छत पाहून मन हर्षानं फुलून आलं. पार्वत्यम्मानं एवढंतरी पाहिलं असेल का? नसेल तर गणेश चतुर्थीपर्यंत तिचा जीव तग धरून राहील का? असा विचार आला. मी दुरूनच ते देऊळ पाहात होतो. हे स्वप्न रंगवीत असतानाच जोरात वाहणाऱ्या वाऱ्यानं शंभूचा आवाज माझ्या कानी घातला.

"आलात का? आलात, बरं झालं. मला हीच भीती होती की तुम्ही आला नाहीत तर पार्वत्यम्माचं कस होईल." असं बोलत शंभूनं माझं स्वागत केलं. त्या देवळाला चार फेऱ्या घालायला लावल्या मी मोठ्या हर्षानं पाहून घेतलं. लाकडी काम फार चांगलं करवून घेतलं होतं. जुन्या पद्धतीचे जाडजाड खांब होते. खांबावर तुळईचा आधार होता. लाकूड तासून, अलंकृत करून उभे केले होते. देवळाच्या आतल्या भागी चुना लावून झालं होतं. मी शंभूची पाठ थोपटून स्तुती केली, "भले, शाबास." आतापर्यंत गोगलगायीसारखा दिसणारा शंभू आता माणसात आलो या आनंदात ताठ उभा असलेला दिसला मी बोलून त्याला फुगवलं. "काय शंभूमहाराज! तुमचे वडील घरी असतील ना?" मी विचारलं.

"यावेळी कुठं जातील? पूजा करीत असतील."

"तुम्हाला काही नाही वाटतं?"

"ते असेपर्यंत सर्व काही तेच करतील."

"तसं असेल तर देव प्रत्येकाला......"

"मला ते काही माहीत नाही आपणही माझ्यासारखेच आहात ना? आपण त्या दिवशी जेवणापूर्वी संध्यावंदन, जप वगैरे काही केल्याचं मला दिसलं नाही."

"हे काय नवीनच? मला तसलं काही माहीतच नाही."

"एवढी भक्ती विनायकावर असून...."

"विनायकावर भक्ती असल्यामुळे नव्हे भक्ती असणाऱ्यावर भक्ती आहे म्हणून." पण ते काही त्याच्या डोक्यात शिरल्याचं जाणवलं नाही. मला हवं असलेलं काम वेगळंच होतं. त्यासाठी मी म्हणालो, "चला. अगोदर पार्वत्यम्माची भेट घेऊन येऊ. त्यानंतर तुमच्या घरी जाऊ."

"तहान भागवून थकवा मिळविल्याशिवायच जाणार का?" असं म्हणत हात धरून ओढीत तो खाली उतरला. पूर्वीचा रस्ता लागला. "प्रथम ग्रासे"ची आठवण झाली म्हणून ती जागा येण्यापूर्वी त्याला विचारलं, "आता चिखल नाही ना?" अहो बघा तर खरं," तो म्हणाला. खरोखरच तो रस्ता सुधारला होता. त्याची

रुंदी वाढवून जागजागी दगडांच्या चांगल्या पायऱ्या बांधून काढल्या होत्या. त्यांच्या घरी गेलो. जाताच शंकर हेगडयांना मोठ्यानंच समाचार कळविला. त्यांच्या ताईला हाक मारून, 'लवकरच येतो' असं तिलाही सांगून, शंभूला बरोबर घेऊन मी निघालो. माझी दृष्टी पश्चिमेकडच्या पडक्या घराकडं वळली. भावकोच्या पैशाच्या रूपानं वेळूचं वन दिसलं. घराचं परस ओलांडताच मी शंभूला प्रश्न केला, "शंभू महाराज, तुमच्यावर ठेवलेल्या विश्वासास तुम्ही पात्र आहा. त्याचं श्रेय तुम्हाला आहेच. पण माझी आणखी एक आशा आहे. ती आपण पूर्ण कराल का ? सांगा."

"कोणती आशा ? सांगा. मला जेलमध्ये आपण पाठवू शकला असता. पण मोठ्या मनानं आपण क्षमा केलीत. असं असताना . . . ."

"तेवढंच मोठं मन तुम्हीही कराल तर झालं."

"काय ते सांगा. करू शकत असेन तर नाही म्हणणार नाही."

"तुमच्या शक्तीबाहेर असलेलं काम मी सांगणार नाही. आमच्या यशवंतांची जागा आता कुणाकडे आहे ? तुमच्या कुटुंबाच्या ताब्यात आहे की राम हेगडयांच्या ?"

"ती जागा राम हेगडयांच्या वाटयास गेली नसावी. परंपरेनं ती आमच्याकडंच आहे. त्या जागी आणखी कुणी आलं नाही. येऊ शकणार नाही. आणि कुटुंबाचा हक्क किती हेही मला माहीत नाही. तो हक्क कुणाचा जरी असला तरी गेली चाळीस वर्षे ती जागा कोपऱ्यातच पडून राहिली आहे."

"हो तेही खरंच आहे. तर मग तुम्ही तियलं वेळूचं वन तोडून, जाळून ती जागा स्वच्छ करा आणि तियं अेक लहान झोपडी उभी करा. ती दुसऱ्या कुणासाठी नाही तर पार्वत्यम्मा करताच हवी आहे. तुमच्या घरी राहणं पार्वत्यम्माला रुचत नसेल, कष्टाचं वाटत असेल तर तिला इथं आणून ठेवता येईल. पंधरा दिवसांत हे काम करू शकाल का ? तुमच्या आतेलाही संतोषच होईल." मी म्हणालो.

"हा उपाय उचितच आहे. हे काम करायला तसा काही त्रास होणार नाही. मात्र आजी इथं येऊन राहावयाला कबूल व्हायला पाहिजे."

"ते काम माझ्याकडं लागलं. तिला मी कबूल करायला लावीन."

असं बोलत बोलत, मैदान संपवून, राम हेगडयाचा मळा व आवार ओलांडून पार्वत्यम्माच्या घरापुढं जाऊन आम्ही उभे राहिलो. शंभूनं तियं असलेल्या विहिरीचं पाणी काढून माझ्या पायावर घातले व मग स्वतःचे पाय धुऊन तो आत गेला.

"आजी यशवंतांचे मित्र आले आहेत." असं त्यानं ओरडूनच सांगितलं. त्याच्या पाठीमागून मीही आत शिरलो. तिथं अंधार भरला होता. इथंच नाही का

मी एकदा जेवण केलं होतं– मला जेवू घालून स्वत: मात्र न जेवता आपण पोसलेल्या मुलासाठी तिनं देवाचं नामस्मरण केलं होतं. तियंच एका फाटक्या चटईवर आता ती म्हातारी आडवी पडली होती. मी पूर्वी पाहिली होती त्याच्या निम्म्याहून अधिक ती कृश झाली होती. त्या वृद्धेला मी वाकून नमस्कार केला.

"बाबा, या गरीब म्हातारीला भेटायला इतक्या दुरून कशाला रे आलास ? एवढ्यासाठीच ना आलास तू ?" असा तिनं प्रश्न केला.

"अम्मा त्यासाठीच आलो. आपणच मला बोलावून घेतलं. तुम्ही पार्वत्यम्मा, तुमचा मुलगा यशवंत आणि विनायकाचं देऊळ हेच माझ्या येण्याचं कारण."

माझ्याकडं काही वेळ ती पाहात राहिली. तिनं मृदू हास्य केलं.

"त्या विनायकाची तुझ्यावर कृपा असू दे बाबा; त्या देवळाचा जीर्णोद्धार दाखविण्यासाठीच तू आला आहेस. माझ्या मुलानं तुझ्याकडून तेवढं काम करविलं आहे पण माझ्या नशिबात . . ."

एवढ्यावरच ती गप्प झाली.

"अम्मा, हाच का तुमचा वेदान्त ? तुम्हाला काय झालंय ? विनायकाची आपण जी सेवा केली, ती पूर्णपणे घेतल्याशिवाय तो तसाच तुम्हाला बोलावून घेईल काय ?"

"तेवढं झालं तर बरंच की रे होईल !"

"तसंच होईल. तुमचा विनायक खरोखरच देव असेल तर तुमची अपेक्षा पूर्ण केल्याशिवाय राहील का ?" फारच भक्ती असल्यासारखा मी बोलून गेलो. पण तिच्याकडं पाहून माझ्यामध्ये तिळमात्र धैर्य राहिलं नव्हतं. उंच आवाजात शंभूनं, राम हेगड्यांनी तिचा केलेला छळ वर्णन करून सांगितला.

"तो एक जन्मजात स्वभाव." पार्वत्यम्मा म्हणाली.

"अम्मा, तुमच्या मुलाच्या पैशाच्या बाबतीत मी बोलून गेलो म्हणूनच ना तुम्हाला एवढा त्रास झाला ? तुमची अपेक्षा मी पूर्ण करतो असं मी म्हटलं होतं. मी कुठल्या गावचा, कुठल्या कुळाचा !"

"तू माझ्या पोटचा मुलगाच आहेस रे. कुठल्या तरी जन्मी मी तुझी आई असेन किंवा मी तुझी मुलगी झाली असेन." ती म्हणाली.

"तुमचा विश्वास महान आहे. त्याच विश्वासावरून मी तुम्हाला एक गोष्ट विचारतो." असं म्हणून मी माझी इच्छा व्यक्त केली. माझी गोष्ट ऐकून शंभूही

म्हणाला, "आजी, तू नाही म्हणू नकोस. यावयाला कां कूं करू नकोस. इथं असं पडून अन्नपाण्यावाचून कुजण्याची पाळी येऊ देऊ नकोस. होय म्हण."

तिची मूक संमती मिळवून आम्ही दोघेही परत आलो. आम्ही परत येत असता राम हेगडे आपल्या ओसरीत पान चघळत बसले होते. त्यांनी आम्हाला पाहूनही न पाहिल्यासारखं केलं. आम्हीही तसंच त्यांना पाहून न पाहिल्यासारखंच सरळ निघून आलो.

हेगडयांच्या घराकडे आलो त्या वेळी ते जप-तप, देवपूजा वगैरे आटोपून, अरण्यातून चुकून आलेल्या हडकुळ्या वाघाप्रमाणं अंगावर विभूतीच्या पट्टया ओढून बाहेरच्या ओटयावर आमची वाट पाहात बसले होते. मला पाहताच "हो ऽहो. . . हो" असं पाच सहा वेळा म्हणत अतिशय संभ्रमानं त्यांनी माझं स्वागत केलं. या खेपेस मी त्यांच्या घरी तीन दिवस नव्हे तर चांगले सहा दिवस राहिलो. शंकर आणि शंभू हेगडयांच्या मदतीनं दोनच दिवसांत आठ-दहा गडयांकडून वेळूच वन कुऱ्हाडीनं तोडून स्वच्छ करविण्यात आलं. भगवंताच्या घरचं जुनं आवार स्वच्छ करून बांबूच्या काठ्या गोळा करून रचून ठेवण्यात आल्या. जुन्या घरचे पायाचे दगड काढून टाकून तिथे खांब रोवून, तट्टया आवळून दोन दिवसांत एक झोपडीही तयार झाली. पाऊस पडण्यापूर्वी अेका खणाच्या जागेपुरती मातीची भिंत बांधून देण्याचं हेगडयांनी आश्वासन दिलं. या कामाला पन्नास रुपये लागतील असा त्यांचा अंदाज होता. सर्व काही यशवंतरावांच्या हिशेबात यायला पाहिजे म्हणून शंकर हेगडयांच्या हाती मी बळजबरीने रुपये दिले. त्यांनी ते आढेवेढे घेतच घेतले. यावेळी भावकीच्या भावना पार बदलून गेल्याचे स्पष्ट जाणवत होते. पाचव्या दिवशी मी, शंभू व मुकांबिका सर्व मिळून पार्वतीअम्माकडे गेलो. दुसऱ्याच दिवशी चांगला दिवस असल्याचं पाहून त्या मुहूर्तावर तिला तिच्या मुलाच्या घरी नेऊन तो कार्यक्रम आम्ही पार पाडला. तिथं आणून बसविल्यावर मुकांबिका म्हणाली, "पार्वती, यशवंताला तू मांडीवर घेऊन शंभर वेळा झोपवलेलीच ही जागा आहे." या पूर्वस्मरणामुळं तिच्या डोळयातून आनंदाश्रू ओघळू लागले. कदाचित ते स्वप्न खरंच तिनं पाहिलं असावं.

"माझ्या विनायकानं एवढं तरी केलं ना !" ती म्हणाली. आपल्या कोवळया वयात आपल्याला अन्न देणारं घर, आता झोपडी झाली असली तरी शेवटच्या क्षणी तिने सावली करून दिली या आठवणीनं कदाचित तिला संतोष झाला असावा.

सहाव्या दिवशी दुपारी पुन्हा एकदा तिला जबरीने विनायकाच्या देवळात नेल्याचा तो क्षण. दोन खांबांना टेकून मुकांबिका आणि ती स्वप्नसुख अनुभव

असल्याचं पाहून माझ्या सगळ्याच संशयाचं निवारण झालं. यशवंतरावाच्या मान्यतेस उतरणारं हे काम पाहून समाधान झालं. त्यांच्या विश्वासाचा मी दुरुपयोग केला नाही म्हणून धैर्य आलं.

बेनकनहळ्ळीत मी तिसऱ्यांदा जाईन असा आपण तर्क केला असावा. माझाही तसाच निर्धार होता. विनायकाच्या पुन:प्रतिष्ठेच्या उत्सवासाठी मी गेलो होतो; पार्वत्यम्माच्या डोळ्यापुढंच त्याची होत असलेली पूजा पाहण्यासाठी. ते संपलं नि त्याचा आशीर्वाद घेऊन मी त्याच दिवशी माझ्या गावी परतलो. घरी आलो तोच " त्या पार्वतीअम्माला विनायकानं बोलावून घेतलं " ही दु:खाची बातमी माझ्या अगोदर येऊन ठेपलेली होती.

अध्याय आठवा

चैत्र मासांत मी बेनकनहळ्ळीला जाऊन पार्वत्यम्माला वरील घरी बोलावून आणल्यानंतर कुठंही न जाता आपल्या गावीच परतलो होतो. त्याच पंधरवडयात चोन्चिलमनी सिताराम हेगडे यांचे आणखी एक पत्र मला आले. पहिल्या पत्रापेक्षा ते जहाल असेल अशा असमाधानानेच मी ते फोडले. या पत्रात रावांनी काही सावधगिरी बाळगिली होती.

" महाशय,

आपण आमच्या वडिलांच्या मृत्यूसंबंधी मी लिहिलेल्या आक्षेपाकडे लक्ष न देता उत्तर दिले आहे. आम्हा पिता-पुत्रांमध्ये आणि आमच्या कुटुंबात अंतःकलह होता हे बहुतेक आपणास माहीत होते म्हणूनच ती वार्ता आपण वेळेवर दिली नाही पण आपण जरी कळविले नाही तरी आम्हाला दूरच्या नातलगांकडून समजलेच. तत्क्षणी वडिलांसाठी जी काही क्रियाकर्मे करावी लागतात ती पार पाडली. बँकेत असलेल्या रकमेची बातमी दिल्याबद्दल आपला फार आभारी आहे. पण आमच्या वडिलांकडून आपणास किती पैसे मिळाले, काय काय मिळाले, या बाबतीत आपण मौन धारण केलं आहे. ही काही योग्य वर्तणूक नव्हे. वडिलांच्या जमीन-जायदादीवर संपूर्णपणे आमचा अधिकार आहे हे कोणीही कायदे जाणणारा आपणाला सांगू शकेल. योग्य मार्ग न सुचल्यामुळे यापेक्षा जास्त मी या वेळी काही लिहू शकत नाही. शक्य तो लवकर मी आपणाकडे येईन. त्यावेळी आपल्याजवळ आमच्या वडिलांचे असलेले कागदपत्र आपण दाखवाल असा विश्वास आहे. शिवाय आमच्या वडिलांची स्वतःची सामुग्री मुंबईस कुठे आहे, काय काय शिल्लक राहिले आहे वगैरे कळविल्यास तेथे जाऊन निरवानिरव करण्यास अनुकूल होईल. आमच्या वडिलांचे आप्त आमचेही आप्तच या विश्वासाने हे पत्र लिहिले आहे. याशिवाय अन्यथा समजू नये. इति नमस्कार.

— सिताराम हेगडे "

माझ्या समजुतीप्रमाणं यशवंत हेगडे यांना एकच मुलगा व तीन मुली असाव्या. सगळया मुलींची लग्नं होऊन बाहेर गेलेल्या होत्या. सितारामानं या पत्रांत 'आम्ही

आम्ही ' असा जो उल्लेख केला आहे त्यात या मुलींचा समावेश असावा असं मला वाटलं नाही. या 'आम्ही' मध्ये स्वामित्वाची भावना व्यक्त होत होती. आमची आई, आमचे वडील, आम्ही असं म्हटलं तर त्यांत विशाल बुद्धीही जाणवत नाही. आलेल्या पत्राला उत्तर द्यायला पाहिजे म्हणून थोडयाशा व्यंग्यानंच मी एक कार्ड लिहून टाकलं.

"विश्वासानं भरलेलं आपणा सर्वांचं पत्र पोचलं असून अभिप्राय समजला ज्या विषयाशी आपला संबंध आहे त्या बाबतीत पूर्वीच कळविलं आहे. ते ज्या घरी मुंबईला राहात असत त्याचा पत्ता खाली दिला आहे. तिथं त्यांची काही भांडी, टेबल-खुर्च्या वगैरे सामान आहे. मी ते सगळं काही इथं वाहून आणलं नाही. त्या जिनसा मी घरमालकाच्या स्वाधीन करून आलो आहे. जेव्हा हवं तेव्हा आपण इथं येऊ शकता. मला जेवढी माहिती आहे तेवढी सांगायला मी सदैव सिद्ध आहे. इथं असलेल्या त्यांच्या सगळ्या वस्तू आपण पाहू शकता– इति. कळावे.

आपला–."

पत्र लिहून होताच परतीच्या टपालानं ते टाकून कर्तव्य निभावलं.

हे पत्र पोचताच तो येईल असा माझा अंदाज होता. त्याऐवजी माझ्यावरील त्याच्या स्वाभाविक अविश्वासामुळे निदान मोटार भरून सामान मिळेल या आशेनं ही स्वारी मुंबईस जाऊन आल्याची बातमी तेथील माझ्या परिचयाचे श्री. जमशेटजी कॉंट्रॅक्टरकडून समजली. तिथंही यानं आपल्या स्वभावानं खूप गंमत केली असावी.

खालील अभिप्राय त्यांच्या पत्रात दडलेला होता :–

"आपला पत्ता मी घेऊन ठेवला होता. पण आतापर्यंत एक वर्ष संपून गेलं तरी पत्र लिहिले नाही. तुमची आठवणही मला राहिली नाही. एका घटनेवरून आता पत्र लिहावे लागले. चार दिवसांपूर्वी सिताराम नावाचे एक गृहस्थ तुमच्या गावाकडून येऊन गेले. आपण यशवंतरावांचे पुत्र आहोत असं त्यांनी सांगितलं असं माझ्या पत्नीनं सांगितलं. त्या वेळी मी घरी नव्हतो. माझ्या बायकोनं त्यांना घरी बसवून समाचार विचारला. बोलण्या चालण्याची त्यांची पद्धती तिला मुळीच आवडली नाही. मी आल्यानंतर भेटायला सांगताच हे गृहस्थ निघून गेले. त्यानंतर मी घरी आलो. आपण यशवंतरावांचे बन्धू असाल अशीच माझी आतापर्यंत समजूत होती. ते पुन्हा आल्यानंतर त्यांच्या वडिलांचा नि आपला कुठल्याही प्रकारचा संबंध नसल्याचे त्यांच्याकडूनच समजले. आपणहून त्यांच्याशी आपलं नातं आहे असं जरी आपण सांगितलं नसलं तरी माझी मात्र तशी समजूत होती. यशवंतरावसुद्धा कधी स्वतःच्या कुटुंबाविषयी काही बोलत नसत. तरीपण मुलांकडून त्यांना पैसा मिळत असावा

अशी माझी समजूत होती. माझा तो अभिप्राय चुकीचा होता असं दिसून आलं. बोलत असताना सारखी त्यानं तुमची निंदा केली हे काही मला बरं वाटलं नाही.

" मी त्याला सांगितलं, 'शेवटच्या क्षणी यशवंतराव अस्वस्थ होऊन पडले त्यावेळी त्यांचा पत्ता देऊन बोलावून घेण्यास त्यांनी सांगितले म्हणून मी त्यांना बोलावले. ते आले. पण त्यांची भेट होण्यापूर्वीच यशवंतराव निवर्तले. त्यानंतर त्यांनी घरी येऊन त्यांची चीजवस्त ताब्यात घेतली. घर, मालकाच्या स्वाधीन केलं नि निघून गेले. आता तिथं बरीच माणसं भाड्यानं राहण्यासाठी आली आहेत. आपल्या काही जिनसा असतील-तर त्या घरमालकाकडून मिळवा." पण त्याची बोलण्याची पद्धत अशी होती की जणू तुम्ही आणि मी मिळून त्यांच्या वडिलांच्या हजारो रुपयांचं अपहरण केलं असावं. त्यामुळं मला राग आला. 'निघून जा' असं ओरडून मी त्याला घालवून दिलं. दुसऱ्या दिवशी ती स्वारी घरमालकाकडे गेली होती असं ऐकलं. आपण सोडून गेलेल्या खुर्च्या, सोफा वगैरे जिनसा घरमालकांनी त्याला दाखवून ते हलविण्यास सांगितलं. घरमालकाशीही तो टाकून बोलला असावा म्हणून त्यांनी झाडून टाकलं असावं. म्हणूनच तिसऱ्या दिवशी माझ्याकडं येऊन तो म्हणाला, "या सामानाची काय किंमत द्याल ती द्या. हे तुमच्याकडंच असू द्या."

" इथल्या वस्तू म्हणता' असं म्हणत मी शंभर रुपये देऊन पावती घेतली व त्या सर्व जिनसा ठेवून घेतल्या. याची तृप्ती झाली नसावी. तसं पाहिलं तर मलाही ते सामान नको होतं. आपल्या मित्राच्या वस्तू म्हणूनच मी त्या ठेवून घेतल्या.

" त्यानंतर दोन तासपर्यंत तो आपल्या वडिलांसंबंधी बोलत होता. त्यांच्याजवळ लक्षावधी रुपयांची संपत्ती होती. आपल्या बायको मुलांना निराधार सोडून ते मुंबईला येऊन राहिले. येथे येऊन त्यांनी पैसा उडवला. त्याची आई, बहीण व त्यालाही त्यांनी हजारो तऱ्हेनं त्रास दिला वगैरे त्या महानुभावानं सांगितलं. आपल्या पित्याबद्दल जे सांगू नये ते सर्व त्यानं सांगितलं. कान झाकून मी नुसतं ऐकत होतो. त्यानं सांगितलेली बातमी खरी असेल तर कुटुंबियांच्या बाबतीत यशवंतरावांनी पाळलेलं मौन या प्रकारच्या वैराचंच कारण होतं असं वाटतं. पण मुलानं केलेले हे आरोप कितपत खरे आहेत हे एक देवच जाणे !

" दादाला वागवून घेण्याची त्यांची रीत, त्यांच्याकडं येणाऱ्या दायीबरोबरची त्यांची वर्तणूक मी पाहिली आहे. एवढंच नाही तर कुणी अन्याय केला तरी सूड घेण्याचा यशवंतरावांचा स्वभाव नव्हता, हे मला केव्हाच कळलं होतं. आपले वडील अत्यंत विषयलोलुप होते अशी आणखी एक बातमी या सितारामानं मला

सांगितली. मला कधी त्यांचा स्वभाव तसा वाटला नाही. त्या गृहस्थाचे जास्त आरोप तुमच्यावरच आहेत. यशवंतरावांनी तुम्हाला पन्नास हजार किंवा सत्तर हजार रुपये दिले आहेत असं त्यांचं म्हणणं आहे. जे धन त्यांनी तुमच्याकडे ठेवून घेण्यासाठी व कुटुंबियांत पोचविण्यासाठी दिलं, ते तुम्ही खाऊन टाकलं आहे आणि म्हणूनच यशवंतरावांच्या मृत्यूची बातमीसुद्धा त्यांना कळविली नाही असंही त्यानं सांगितलं.

" तरीपण त्याच्या येण्यामुळं एका सन्मित्राविषयी नाही तो संदेह मात्र रुजला."

'आयत्या बिळात नागोबा' या म्हणीप्रमाणं स्वार्थी माणसांचा स्वभाव असाच असणार यात आश्चर्य वाटण्याचं काही-कारण नाही.

पैशाच्या बाबतीत असा विचार आला तर त्याला कोणी अपवाद ठरत नाही, मग मीच एकटा कसा अपवाद ठरेन ? एवढा गोंधळ माजविण्यापूर्वी हा सिताराम माझ्याकडे आला असता आणि सगळं काही समजावून घेतल्यावर असं म्हटलं असतं तर तीही एक रीतच झाली असती. पण लोकांना रीती शिकविणारा मी तरी कोण ? माझ्या हाती आलेल्या यशवंतरावांच्या ठेवीचं निवारणं मी एकदम करू शकलो असतो तर मलाही सुखानं झोप घेता आली असती.

मला हे पत्र मिळून पंधरवडाही झाला नव्हता तोच सीताराम हेगडयांची स्वारी माझ्या घरीच आली. त्याचं तोंड पाहताच हाच यशवंतरावांचा मुलगा हे चटकन समजत होते. मध्यम वयाचा, सडपातळ देहयष्टी, हडकुळा जीव. उत्तर कन्नड जिल्ह्यातील ग्रामीण शौकाचे संस्कार त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटून दिसत होते. चापून चोपून बसवलेले केस, त्यावर काळी टोपी. कानात एकेका पाचूचे कर्णालंकार, पांढरे धोतर, पांढरा सदरा, गुंडया नसलेला कोट, त्यावर एक जरीचा शेला पांघरलेला, फर्लांगाच्या अंतरावरूनच आगमनाची सूचना देणारे कुमठा भागातील पादत्राण; तोंडावर जवानासारख्या आकडेबाज मिशा; त्याची चालण्याची शैली ही तितकीच चांगली होती. 'कोण असेल' असा विचार करीत असतानाच दुरूनच त्याची शैली पाहून 'विसरू कसा मी ?' अशी एक गाण्याची लकेर माझ्या तोंडून अजाणपणे निघाली. हीच ती अपेक्षित व्यक्ती असं वाटताच तो नमस्कार करण्यापूर्वी मीच चटकन नमस्कार केला.

" कुमठ्याकडचे का ? " मी प्रश्न केला.

" हूं."

" बोम्मिलमनी सीताराम हेगडेच ना ? "

" हूं."

" या, बसा. तुम्ही याल असे मला वाटलंच होतं. अगोदर हात पाय, तोंड धुवून घ्या. चहा करवू का कॉफी चालेल ? "

" कुठल्याही गोष्टीसाठी आम्हाला सवड नाही. तुमच्याकडचं काम संपवून आजच मंगळूरला जाणार आहे. कुमठा म्हणजे काही जवळचं गाव नाही. जाणंयेणं तेवढं सुलभ नाही. "

" होय हो; बसचा रस्ता, वाटेत सहा—आठ ओढे. मीही त्या बाजूला जाऊन आलो आहे. या पाय धुवून घ्या. चहा, कॉफी घेऊन सावकाश बोलू या. " मी म्हणालो.

" तशी सवड आम्हाला नाही म्हटलं ना ! "

त्याच्या बोलण्यात पावलोपावली आढयता दिसल्यामुळं, " तर मग मलाही बरीच कामं आहेत " असं म्हणून बोलणंच थांबविलं व ओसरीच्या एका कोपऱ्यात जाऊन बसलो. दुसऱ्याच क्षणी ते बरं न वाटल्यामुळं आपल्या खोलीत जाऊन, एक पुस्तक काढून वाचीत बसलो. सुदैवानं मला भेटण्यासाठी माझे एक अध्यापक मित्र त्याच वेळी आले. मला फार आनंद झाला. त्यांच्याबरोबर हवं नको ते बोलण्यात अर्धा तास घालविला.

माझ्या अध्यापक मित्रांनी विचारलं, " अहो ते बाहेर कोण आहेत ? सुंदर रावणासारखे दिसतात. चंची काढून पान चघळीत, ओठावर बोट ठेवून तांबुलाची पिचकारी उडवीत बसले आहेत. "

ते ऐकताच मलाही लहर आली आणि मी, " ना मारो पिचकारी ऽऽ" ही ओळ घोळून घोळून म्हणू लागलो.

अध्यापक म्हणाले, " छे: छे: अहो, त्यांना ऐकू जाईल ना ? "

" चार लोकांनी ऐकण्यासाठीच संगीत असतं. " मी म्हणालो. तेव्हा बाहेरूनच सीताराम हेगडयांनी, " अहो महाशय, काही कागदपत्र दाखवितो म्हणाला होता, दाखवाल का ? " ओरडून विचारले. मीही आतूनच म्हटलं, " आपला राग उतरला असेल तर इथं या. दाखवीन. " मलाही एका साक्षीदाराची या कामासाठी गरज होतीच. त्यांच्या हाती कागद देताच त्यांनी ते मुठीत घट्ट धरले, फाडून टाकले तर मी संकटात पडलो असतो ही भीती होतीच. त्यावेळी हेगडयांची स्वारी आत आली. मी एक खुर्ची दाखविली, त्यावर तो बसला. इतक्यात घरच्या मुलानं आम्हा तिघांसाठी चहा, कॉफी उपाहार वगैरे आणून ठेवलं. " या, घेऊ या " मी म्हणालो.

" चूळ भरायला थोडसं पाणी पाहिजे. "

मुलानं पाणी आणून दिलं. माझ्या घरच्या पाण्याला स्पर्शही करणार नाही अशी प्रतिज्ञा करून आलेल्या त्या [illegible] महाशयानं तोंड धुवून घेतलं. हळूच

फराळही संपविला. मीही इतर गोष्टी करीत करीत हळूच, " हे पाहा, मला मुंबईहून आलेलं पत्र " म्हणून जमशेटजी कॉन्ट्रॅक्टरकडून आलेलं पत्र दाखविलं. वाचून पाहिल्यावर त्यानं ते परत दिलं.

त्यानंतर मी तार दाखविली. " ही पाहा, तुमचे वडील आजारी पडल्यावर त्यांनी पाठविलेली तार. " तीही त्यानं वाचली.

" हे पाहा, मरणाच्या एका आठवड्यापूर्वी तुमच्या वडिलांनी मला लिहिलेलं पत्र. "

तेही वाचून त्यानं परत दिलं. त्यानंतर ड्राफ्ट बरोबर त्यांनी पाठविलेलं पत्र दाखविलं. " हे पाहा, पंधरा हजार रुपये ड्राफ्टनं पाठविल्यावेळी तुमच्या वडिलांनी लिहिलेला कागद. " ते वाचून होताच मनात काय वाटलं कोण जाणे; " यात मी येतो. आलो तर मी आहेच ना. " असं लिहिलं आहे. यावरून हे धन त्यांना परत मिळावं असा याचा अर्थ झाला. आता त्यांना म्हणजे, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसदारांना, म्हणजेच आम्हाला.... "

" तसं त्यांनी लिहिलं आहे का ? त्या पुढच्या ओळीत " मी न राहिल्यास त्याचा असा विनियोग करा म्हणून पूर्ण विवरण दिलं आहे ना ? मग तुम्हीच सांगा मी त्यांची आज्ञा मानावी का मानू नये ?" असं म्हणत हळूच जाऊन तो कागद त्याच्या हातातून हिसकावून घेतला. मलाही संशय होता.

"ते नसले तरी आम्ही आहोत ना ? "

" तुम्ही आहात असं त्यांनी मानलं नव्हतं. त्यामुळंच तर ही अडचण उद्भवली."

हातातून कागद हिसकावून घेणं, माझं तशा रीतीनं बोलणं यामुळं स्वाभाविकपणेच त्याला चेतवल्यासारखं झालं असावं.

" पोटच्या मुलापेक्षा आमच्या वडिलांना तुम्हीच जवळचे नी हक्कदार वाटला काय ? आम्ही सगळे सोडून त्या खेड्यात कुजत पडलेल्या विधवेला मात्र त्या बँकेत शिल्लक पडून असलेली रक्कम होय ? " असा त्यानं उद्गार काढला.

मलाही थोडा राग आला, तेव्हा मी म्हटलं, " तुमचे वडील जिवंत असताना हे सगळे प्रश्न तुम्ही सोडवून घ्यायला हवे होते. माझ्यापुढं ते सगळं सांगून काय उपयोग ? यशवंतरावाची इच्छा मी पूर्ण करणार. त्याला कुणाचाही निर्बंध येणं शक्य नाही."

" मला वाटतं तेवढ्याचसाठी त्या पार्वत्यम्माच्या इच्छेच्या निमित्तानं देऊळ बांधून, वाचलेला पैसा खाऊन टाकायचा तुमचा विचार होता. म्हणूनच कुटुंबियांना

काही न देण्याची योजना आखलीत. आमच्या राम हेगडयांनी सांगितलेलं खोटं नाही म्हणायचं ! " तो म्हणाला.

" अस्सं ! आपले गुरू ते आहेत तर ! ठीक आहे. हे पाहा अजून दोन ट्रंकांत त्यांचं सामान आहे. एकात पुस्तकं आहेत व एकात त्यांनी काढलेली चित्रे आहेत. ती पाहता का ? तेवढीतरी सवड आहे का ? हे सगळे त्यांनी मला दिलं नव्हतं. मी आपणहून आणलं आहे. वाटल्यास ते सगळं आपण नेऊ शकता. "

" ते सगळे नेऊन नदीत बुडवा. मात्र माझ्या वडिलांनी लिहिलेलं हे पत्र मला द्या."

" नदीत ? " इथून आठ मैलांच्या अंतरावर कुमारधारा नदी आहे. जवळपास कुठलीच नदी नाही. तुम्ही मागता ते पत्र मी देऊ शकणार नाही. "

दहाएक मिनिटांत त्याचा चेहरा लाल पिवळा झाला. फार चरफडला तो. इकडं तिकडं पाहिलं. माझ्या जवळच बसलेल्या अध्यापकाकडे पाहून तो म्हणाला, " हे पाहा, महाशय, मुलाबद्दल एवढा कडवट द्वेष बाळगणाऱ्या पित्यासंबंधी पुराणातही कधी कथा ऐकली नाही. " वडिलांना दोष दिल्यामुळं माझी सहनशक्तीही संपुष्टात आली.

" तसंच पुराणात पित्याचा द्वेष करणाऱ्या मुलांची कथाही बहुधा आली नसावी. " मी म्हणालो.

हे सर्व काय चाललं आहे हे मुळातून काहीच न समजल्यामुळं माझे अध्यापक मित्र दिङमूढ होऊन बसले होते. म्हणून थोडक्यात काय चाललं आहे हे मी सांगितलं.

" तर मग मी जाऊ म्हणता ?" त्यानं प्रश्न केला. पण घरी आलेल्या पाहुण्याला तसं कसं म्हणता येईल ? तेही माझ्याच मित्राच्या मुलाला ! " एक दिवस राहून, समजूत पटल्यावर गेला तर आल्याचं सार्थक झाल्यासारखं होईल." मी म्हणालो.

सीताराम हेगडे त्या दिवशी माझ्याकडे पाहुणा म्हणून राहिला असं मी म्हटलं तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्याच्या वडिलांबद्दल मी मात्र जागरूकतेनं काही बोललो नाही. तो मात्र ऐकण्यासाठी हट्ट धरून बसला. विचारल्यावर यशवंतरावांबद्दलचा अभिमान मी व्यक्त करायचा. सीताराम हेगडयानं एक उपाय सुचून माझी स्तुती केली. माझी सहनशीलता, माझी समाधानी वृत्ती वगैरेची प्रशंसा केली. आपल्या सुखदु:खाची, कष्टांची माहिती दिली. आईचं दु:ख सांगितलं. आपल्याला फार कर्ज झाल्याची रडकथा सांगितली. एकूण करुणेच्या अपेक्षेचे परोपरीने नाटक केले. राक्षसवेषधाऱ्यापुढं बसून यक्षगान या नाट्य पद्धतीत ज्याप्रमाणं भागवत " अरेरे, आहो....हो....हो, आहा. " वगैरे म्हणतात त्याप्रमाणं, त्याला दुखवू नये म्हणून

त्यांच्या वडिलांनी लिहिलेल्या पत्राची नक्कल करून याची मूळ प्रत माझ्याजवळ आहे, असा उल्लेख करून माझी सही केली व ते कागद त्याच्या स्वाधीन केले. माझं त्यात काय जाणार होतं ?

त्यानं सांगितलेल्या एकाही गोष्टीवर माझा विश्वास बसला नाही. त्याचा वेष, त्याची बोलण्याची शैली, त्याची आढ्यता यामुळे त्याच्या सुखदु:खाच्या वर्णनाचा माझ्या मनावर काही परिणाम झाला नाही. त्याच्याबद्दल जरी नसलं तरी त्याच्या बहिणींना कुठलाही त्रास होऊ नये असं मात्र वाटलं. म्हणून तो जात असताना मी म्हणालो, " हे पाहा हेगडे, आपण इथं आला. हे बरं झालं. तुमच्या वडिलांनी मला दिलेला पैसा मी काही आटवीत नाही. विनायकाच्या देवळासाठी काहीसा पैसा खर्च झाला आहे. त्यांच्याच इच्छेनुसार दरमहा चार माणसांना थोडा थोडा पैसा पाठवीत आहे. तुमच्या गावाकडंही मी एकदा येतो. त्यांच्या संततीपैकी कोणालाही त्रास असला तर त्याची माहिती मिळवून शक्यतो मी मदत करीन. " हे ऐकून निदान माझ्यापुढं तरी शांतचित्त होऊन हेगडे परत गेला.

गावी गेल्यावर एक जहाल पत्र व एक मवाळ पत्र, एक प्रशंसेचं तर एक निंदेचं असं वारंवार पत्र लिहीत असे. त्या पत्रांची उत्तरं देण्याच्या भानगडीत मी पडलो नाही. त्याची त्वरा व तृषा मला माहीतच होती. पण मी घाई करण्यासारखं नव्हतं. मी गप्प होतो. विनायकाच्या देवळाच्या उत्सवानिमित्त गेलो होतो. त्यावेळी परत येताना कुमठ्याला जाऊन यावं असा विचार केला होता तरी त्या वेळी मला सवड झाली नाही. बेनकनहळ्ळीला जाऊन आल्याची बातमी राम हेगड्यांनी सीताराम हेगड्याला दिलीच. आमची ग्रामीण जनता 'सीताराम' या नावाचा उच्चार 'शीताराम' असा करते. पण ही व्यक्ती शीतही नव्हे व आरामही नव्हे

नवरात्रीच्या सुमारास त्यानं कुमठ्याच्या एका वकिलाकडून " या नोटिसाद्वारे तुम्हाला कळविण्यात येते की " अशी एक नोटीस पाठविली. त्यानुसार मी माझ्या स्वत:च्या हातानं पन्नास हजार रुपये, शिवाय त्यावर शेकडा आठने येणारे व्याज, परत करावेत. एवढंच नव्हे तर रजिस्टर्ड नोटिशीचा खर्च चार आणे व वकिलाचा एक रुपया द्यावयाला पाहिजे असं कळविलं होतं. " न दिल्यास ? माहीत आहेच ना ? पुढचा परिणाम चांगला होणार नाही. "

ते पत्र वाचून मला फार हसू आलं. यशवंतरावांचं ते पत्र मृत्युपत्राचं रूपच पावलं होतं. म्हणून एका वकिलाला गाठणं भाग पडलं. माझे एक वकील मित्र खूप हसून म्हणाले, " याला काय उत्तर द्यायचं ? अहो, या पत्रात सगळे अधिकार त्यांनी

तुम्हालाच दिलेले आहेत. याचं Cuase of action हेच गाव होईल. त्यालाच येऊन इथल्या कोर्टात दावा दाखल करू द्या....ओहो....तसं नाही, इथं होणार नाही. पंधरा हजार रुपयाचा व्यवहार आहे. मंगळूरलाच होईल. त्याला जरी याचा फायदा होणार नसला तरी आमच्या गावच्या एका वकिलाला मिळणारा पैसा चुकवू नका." असा त्यांनी उपदेश केला.

"तुम्ही वकील म्हणजे गिधाडासारखे."

"म्हणजे ?"

"गिधाडं तरी बरी. ती फक्त प्रेतच फाडून खातात पण तुम्ही वकील लोक जिवंत असतानाही टोचून खाता व मेला तरी फाडून खाता." ऐकून ते हसू लागले.

त्यानंतर तीन महिन्यांचा काळ लोटला. "या नोटिसाद्वारे कळविण्यात येते की" चा सीताराम हेगडे तिकडंच गप्प बसून राहिला. गेला तर एक दगड आणि पडली तर चार फळे असा सल्ला त्याच्या वकिलानं दिला असावा. दगड गेला हे खरं पण नसलेली फळं कुठून पडतील ?

त्या उन्हाळ्यात कुमठ्याला जावं असा मी निर्णय घेतला होता. तिथं तर जायला पाहिजेच. गेलो तर हेगड्याला भेटायला पाहिजे. साधल्यास त्याची आई, बहीण वगैरेनाही भेटाव. माझ्या मित्रांच्या स्नेहास पात्र ठरलेल्या धारेश्वर शीन व होनगद्दे मंजय्या या दोघांनाही भेटावं. यशवंताच्या स्वजनांकडून त्यांच्याविषयी काही चांगलं ऐकायला मिळेल अशी माझी अपेक्षा नव्हती. सिताराम हेगडे याचा परिचय अर्ध्या दिवसाचा. मात्र त्याच्या पत्रांनी मला विस्मयात टाकलं होतं. आपल्या सांसारिक जीवनाबद्दल माझ्या मित्रांनी रोजनिशीत मल्लिका व आम्रवृक्षाची उपमा देऊन लिहिलं होत. मल्लिका एक गौरवयुक्त पुष्प आहे. मल्लिकालतेची असहायशून्यता ते दर्शवीत असावेत. मुलाविषयीमात्र एकही ओळ त्यांनी रोजनिशीत लिहिली नाही. त्याच उद्देशानं मी सीताराम जाताच रोजनिशी उघडली होती. त्या बाबतीत काही नव्हत. आपल्या मुलीच्या बाबतीतही त्यांना विस्मृती झाली होती का ? आपल्या मुलीविषयी कोणताही पिता खचितच उदासीन राहणार नाही. आपल्या पित्याला त्यापैकी कुणाचं पत्र आल्याचंही दिसलं नाही. आपल्या बायकोविषयी माझ्या मित्राच्या मनात परमावधीचा तिरस्कार असल्याचा परिणाम कदाचित मुलीना भोगावा लागत असेल असं मला वाटलं. एवढी तीव्र भावना संततीविषयी त्यांनी बाळगायला नको होती. ते खरं असेल तर त्यांना तितकंच सबळ कारण असावं. ते कारण कोणतं असावं ? आपले पूर्वसंबंध विसरून जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला

होता. ते चित्रे काढीत. तियंही एक प्रकारची विशिष्ट साधना दिसून येत होती. एकच विषयवस्तू पंधरापंधरा वेळा काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्यांच्या मनात असलेली भावना कुंचल्याच्या रंगातून कागदावर उतरत असे. पेन्सिलीच्या रेषांतून उमटत नसे म्हणून जिद्दीनं ते पुन्हापुन्हा चित्रे काढीत असावेत.

एके दिवशी रोजनिशी उघडी असता एका उपमेकडं माझं लक्ष वेधलं.

" दूध दुधात मिसळून गेल्याप्रमाणंच पाणी पाण्यात मिसळून जातं. दूध दुधात मिसळलं तरच चांगलं, पाण्यात मिसळल तर दूध दुर्बल होतं. त्याची चव कमी होते. फारच पाणी मिसळलं तर दुधाचा रंग मात्र शिल्लक राहतो. ते तरी असावं....

" ताकाचं आणि पाण्याचं मात्र तसं नाही. ताक हा आंबट पदार्थ आहे. आंबट ताकात ताक मिसळलं तर तेही एका प्रकारे बरंच. त्या ताकाबरोबर पाणी मिसळलं तर ते समरस झाल्यासारखं वाटतं. वाटतं इतकंच. ते समरस होऊ शकेल का ? शेवटी ते नासक्या दुधासारखं होतं. ताकाचा अंश वेगळाच, पाण्याचा वेगळाच.

दूध असो की पाणी असो मडक्यात ठेवू शकतो. दुधाऐवजी ताक घातलं तर ? आंबट पाणी व ताक घातलं तर ? ताम्रपात्रात घातल्यास ते तसंच राहील का ? त्यामुळं ते कळंकतं. गरिबीच्या मडक्यात ठेवलेल्या आंबट ताकाचा स्वभाव लोकांना कळत नाही. श्रीमंत कासेतही ते जनाला कळत नाही. त्याऐवजी ते ताक तांब्याच्या पात्रात घातलं गेलं तर ताम्र आपल्या प्रभावानं ताकाला कळंक देऊन, स्वतः बिघडून संसारात विष कालवितं."

संसाराच्या कोणत्या स्वरूपाला पाहून माझ्या मित्रानी हे विधान केलं असावं ? अवतीभोवतीचे आठदहा संसारांचेही तरी त्यांनी अवलोकन केले असावे. त्याबरोबर आपला संसारही पडताळून पाहिला असावा. गरिबांच्या संसाराला मडक्याची आणि श्रीमंताच्या संसाराला कासेची उपमा दिली असावी. विविध दांपत्यांना आठवून पांचट ताक, ताक आणि ताक, दूध आणि दूध, पांचट दूध यांच्या मिश्रणाने पात्रात निर्माण होणाऱ्या किल्मिषाचे वर्णन केले असावे. त्यांच्या मनात आपलं स्वतःचं दांपत्य-जीवन दूध आणि दुधासारखं नाही. दूध-पाणीही नाही. तर तांब्याच्या पात्रात भरलेल्या ताक आणि पाण्यासारखं झालं असावं. मग किल्मिषच निर्माण नाही होणार तर आणखी काय होणार ? असा उद्‌गार काढला असावा. दोन समान वस्तू असतील तर सामरस्य निर्माण होतं. पण त्यांना धारण करणारे पात्र तांब्याचं असेल तर केवळ संसारातच नव्हे तर समाजातही विष कालविलं जातं. यासाठी पात्र मडक्याचं असलं तरी चालेल, कासेचं असलं तरी चालेल असं त्यांचं म्हणणं असावं. दुधात पाणी मिसळ-

त्यास दुधाचे गुण कमी होत असले तरी ते आपलं अस्तित्व त्यामध्ये मिसळत असल्या- मुळं तसं वाईट काही होत नाही. कित्येक नवराबायको दूध दुधात मिसळल्यासारखे असतील. त्यातून एखादं पाणी असलं तरी दांपत्य-जीवन टिकू शकेल. मिसळूनही न मिसळल्यासारखे दिसणारे नाक आणि पाण्यासारखं माझ्या मित्राचं दांपत्य-जीवन असावं. तेही तांब्याच्या पात्रात ओतलेलं. त्यामुळंच ते वळंकून संसाराला व समाजाला विषासारखं झालं अशी त्यांची भावना असावी ते सर्व त्यांना सहन करावं लागलं. म्हणूनच मुंबईच्या अरण्यात त्यांनी प्रवेश केला. त्यांच्या विषम दांपत्य-जीवनात विष निर्माण झालं होतं हे सीताराम हेगडे यांच्या जीवनाच्या निरीक्षणानं स्पष्ट झालं. पण सगळीच मुलं, त्यातून मुली तशा प्रकारच्या नसतील असं वाटलं. त्यांना तरी भेटून माहिती काढावी या हेतूनं मी कुणालाही न सांगता कुमठ्याला निघालो.

कुमठा ! चिनी नाटकात म्हटल्याप्रमाण आमच्या गावापासून "फार दूर म्हणजे फार फार......दूर, आणि जवळ म्हणजे अगदी इथंच" असं आहे. उत्तर कन्नड व दक्षिण कन्नड जिल्हे मिळून असलेले प्रांत तसेच आहेत. माझ्या गावापासून कुमठा दीडशे मैलही दूर नाही. पण प्रवासाला निघाल तर दोन दिवस लागतात. 'बस बस' वाटेपर्यंत बसचा प्रवास. पुन्हापुन्हा बसायचं उतारायचंच काम; नदी- नाले आले की ते नावेनं ओलांडावे लागतात. मग पुढं पुन्हा बसची वाट पाहात तपश्चर्या करावी लागते. अशा प्रकारच्या प्रवासान मी बेजार झालो. माझ्या घरी आल्या वेळी सीताराम हेगडे जेवढ्या करपल्या चेहऱ्यानं आला होता, होनावरची नदी ओलांडून शेवटची बस गाठेपर्यंत उकाड्यानं मीही तितकाच करपून गेलो होतो. आता काय फक्त बारा मैलांचं अंतर असं मनाचं समाधान करून रथारूढ झालो. गेल्या महायुद्धात अनेक रणरंग बघून आलेल्या. घायाळ झालेल्या धुरंधरा- सारखी ती बस होती. दम कोंडण्याइतकी चिक्कार माणसं आत भरली होती. मीही त्यांतच बसलो. कर्की-आल, हळदीपूर ओलांडलं. धारेश्वर येत आहे. त्या पुढंच कुमठा. धारेश्वरला ठप्पकन् बस उभी राहिली. का, हेच कळलं नाही. धारेश्वर हे एक मागील काळातलं पुण्यक्षेत्र आहे. तिथून बस बाहेर निघालीच नाही. कुठला तरी भाग स्लिप झाला असं सांगण्यात आलं. कुठलं तरी लोखंड तुटलं आणखी कुणी म्हटलं. एकाच वेळी तीन तीन आजारांच्या आक्रमणामुळं आमचं वाहन थांबलं. आम्ही खाली उतरलो. आता दोन तासापर्यंत एकही बस नाही. आली तरी एवढ्या सगळ्या प्रवाशांना आत जागा मिळेल याची खात्री नाही. "ड्रायव्हरसाहेब, रिपेरी किती वेळात होईल ?" असं विचारल्यावर कळलं की कुमठा किंवा शिर्सीहून कोणालातरी

पाठवून जादा भाग आल्यावरच रिपेरीची शक्यता आहे. अर्थातच त्या दिवसापुरता प्रवासाचा बेत मी रहित करावा. दुपारची दोन वाजण्याची वेळ, ऊन रणरणत होतं. माझे एकदोन सोबती निघून गेल्यावर मीही जाणंच योग्य असं वाटलं. ' हे धारेश्वर ' म्हणून मला माहीत होतं. माझ्या रेकॉर्डमध्ये नमूद केलेला ' शीन ' नावाचा गृहस्थ इथलाच. म्हणून तिथंच राहिलो. एका उपाहारगृहात जाऊन बसलो. चहा, पोहे मागविले. खाऊन संपलं. उपाहारगृहाचा माणूस म्हातारा दिसत होता म्हणून केवळ कुतूहलानं त्याला विचारलं, " स्वामी, इथं पूर्वी धारेश्वर शीन म्हणून कोणी राहात होतं का ? "

" पूर्वी कशाला, आताही आहेत " तो म्हणाला ; " धारेश्वरमध्ये दहा माणसं शीन नावाची आहेत. डोंगरीवरचा शीन, मैदानातला शीन, चिखली शीन, असा शीनचा त्यानं जपच चालविला.

आत्ताच एवढे शीन असतील तर पूर्वी किती होऊन गेले असतील असं आश्चर्य वाटलं. मी गप्प बसलो आणि माझं गाठोडं बगलेत धरून त्या उन्हात लाल माती तुडवीत कुमठ्याला निघालो.

अध्याय नववा

दोन दिवसाचा प्रवास. त्यातून उन्हात धुळीचं स्नान अनुभवल्यामुळं कुमठ्याला जाऊन पोचेपर्यंत मला पुरे पुरे झालं होतं. कुमठ्याला पोचेपर्यंतही प्रथम कुणाला भेटावं हे मी ठरविलं नव्हतं. गाव जवळ आल्यानंतर तेथील माझ्या जुन्या मित्रांना एकेक करून आठवू लागलो. या जुन्या काळातील आठवणी. आता ते गावात असतील का ? माझी स्मृती मी चालविली. अर्थात माझं पहिलंच पाऊल चकू नये. सीताराम हेगड्याकडं जायचं नाही असं मी ठाम ठरविलं होतं. सीताराम या नावावरून दुसऱ्या एका त्याच नावाच्या गृहस्थाचं स्मरण झालं. हे हेगडे नव्हेत, तर सभावंत ! गावात शिरण्यापूर्वी लागणारं त्यांचंच पहिलं घर. जुन्या काळातल्या गोड आठवणी मनात साठल्यामुळे त्यांच्याकडे गेलो. जुन्या मित्रांना भेटण्याच्या उत्सुकतेनं तिथं गेलो. " मालक आहेत का घरी ? " अशी हाक देताच स्वतः सभावंतच पुढं आले. " ओहो, कारंत ? या या " म्हणत आदरानं त्यांनी माझं स्वागत केलं. फराळ आला. " या गावी कशाला आला ? " असं विचारण्याऐवजी " दोन दिवस रहाल का ? " असा त्यांनी प्रश्न केला.

" दोन नाही. कदाचित चार दिवस रहावं लागेल. " असं म्हणताच " फार बरं झालं. " ते म्हणाले. मी सतत फिरणारा आहे हे त्यांना माहीत आहे. ' काही काम असेल म्हणूनच आलात ' असं मनात म्हटलं असावं. पण " का आलात ? कशाला आलात " वगैरे विचारण्याच्या भानगडीत पडले नाहीत. त्यांच्याप्रमाणेच मीही 'सीताराम'चे पुराण उघडून बसलो नाही. पोलिसासारखी चौकशी मला थोडीच करायची होती ? माझे अजून चार सहा मित्र त्या गावी आहेत. एकेकाकडं जाऊन युक्तियुक्तीनं कुतूहल असूनही नसल्यासारखं भासवून जी काही बातमी बोलण्यातनं मिळेल तेवढ्यावरून माझ्या कल्पना पडताळून पाहणार होतो.

आल्या दिवशी सभावंतांच्याच घरी राहिलो. स्नान आणि झोप या दोन्ही गोष्टींची मला आवश्यकता होती. त्याबरोबर भोजनादि आतिथ्य झाल्यावर त्या रात्री संपूर्ण झोप काढली.

सकाळचा फराळ संपवून आणखी एका मित्राकडे गेलो. मी जात असलेल्या रस्त्यावरच चोच्चिलमनी यांची वखार होती. समोर पायऱ्या, दरवाजा. त्यानंतर आंगण, पाठीमागच्या घरी निवास असेल. पुढच्या भागी 'वखार' होती. बाहेरच्या भागी बोर्ड असल्यामुळं तिरप्या दृष्टीनं पाहून, वेग वाढविला व माझे मित्र मुर्डेश्वर वकील यांच्या घरी गेलो. ते अर्धनिवृत्त वकील होत. वकिली कमी झाल्यामुळं ते अर्धनिवृत्त असे वकील होते. मी आल्याची खबर देणं एवढंच माझं काम होतं. मला पूर्णपणे जाणणारी ती एक स्थानिक व्यक्ती होती. माझ्या मित्रांच्या बाबतीत त्यांचे स्वजन विकृत रूपात टीका मात्र करतील पण ज्यांचा संबंध नाही अशा लोकांकडूनच निःपक्षपात अशी वार्ता मिळू शकेल अशा कल्पनेनं मी त्याना माझ्या आगमनाची वार्ता दिली व म्हटलं, "संध्याकाळी येतो. आता तुम्हाला कोर्टात जायचं असेल." एवढं सांगून मी निघून आलो. माझं पुढचं पाऊल म्हणजे तिथून तीन मैलांवर असलेल्या होनगद्देला जाणं. ते खेडं मी 'रातोरात' पाहिलेलं होतं. पाहून न पाहिल्यासारखंच. वाट धरून एकीकडे भाताची रिकामी शेती व दुसरीकडे मधूनमधून जनवस्ती पाहात गेलो. दोन मैल चालून गेल्यावर सुमारे चौदा वर्षांचा एक शाळकरी मुलगा माझ्या समोरून आला. उगीचच इकडं तिकडं भटकण्यापेक्षा त्यालाच थांबवून मी विचारलं, "मुला, कुणीकडून गेलं तर होनगद्दे मंजय्याचं घर लागेल?"

"होनगद्दे म्हणता ना? आलंच की. इथून पुढंच आहे. मंजय्याचं घर म्हणजे आमचंच घर का? कारण दुसरेही एक गृहस्थ आहेत मजय्या नावाचे." तो म्हणाला.

त्या मुलानं त्याच्या घराचा रस्ता समजावून सांगितला. वडाचं झाड, तिथून देऊळ, उजवीकडं ताडाचं झाड, डावीकडं उंबराचं झाड अशा खुणाही सांगितल्या. वनस्पति-शास्त्राची माझी माहिती फार थोडी आहे. शिवाय गावात ताडीमाडाची एवढी झाडं असतील असं वाटलं नाही. म्हणून त्यालाच म्हटलं. "ते कोणते, थोडसं दाखवशील का? पण तुला शाळेला उशीर होत असेल तर नको."

"दाखवितो ना." म्हणून लांबलांब पावलं तो टाकू लागला. मीही त्याच्या पाठीमागून जाऊ लागलो. नुसतं चालणंच होऊ नये म्हणून "तुमचं घर किती लांब आहे?" असं विचारलं.

"एक दोन फर्लांग."

"घरी कोण कोण आहेत?"

"बाबा, आई, धाकटे दोन भाऊ. झालं."

"धाकटे भाऊ शाळेला जात नाहीत का?"

" जातात ना. लहान शाळेला जातात."

" तू ? "

" गिब हायस्कूलला. "

" दुपारी घरी जेवायला यायचं म्हणजे दूर पडत असेल नाही का ? "

" हो दूरच. मी येत नाही."

" मग शाळेतच सगळा वेळ काढतोस का ? तसं असलं तर जेवण ? "

" नाही. " त्याचं उत्तर ऐकून व त्याचं दुर्बल शरीर पाहून मला वाईट वाटलं.

" तुमच्या नात्यागोत्याचे कोणी पेठेत नाहीत का ? एकदा जेवू घालू शकणारे असे ? "

" आहेत. पण मी जात नाही. "

" गरीब आहेत का ते ? "

" खाऊन पिऊन उरण्याइतकं आहे त्याना. माझ्या सख्ख्या मामाचंच घर आहे. घर आणि वखार दोन्ही पेठेतच आहेत. पण त्यांचं आणि आमचं तेवढं बरं नाही. "

" काय नाव त्यांचं ? "

" चोच्चिलमनी म्हणतात. "

" म्हणजे तू त्यांचा.... "

" भाचा. त्यांच्या धाकट्या बहिणीचा मुलगा. "

" तुझ्या वडिलांचं नाव मजय्या म्हटलस ना ? "

" होय. तुम्हाला कुठली ओळख ? तुम्ही तर परगावचे दिसता ! "

" मी दूरचाच. मंगळूरकडचा. "

" तिथून इथं का आलात ? " असं म्हणत म्हणताच त्यानं घर दाखविलं.

" ते पाहा. तेच वडाचं झाड. त्याच्यापुढच घरच केतरकी मंजय्याचं घर. " माझ्या मनात गोंधळ माजला. मी त्याला परत बोलावलं. " थांब. तुझं नाव सांग. "

" यशवंत. " मी रोमांचित झालो. नाव सांगून तो वेगाने परतही चालला.

" यशवंत, थांब थांब. अजून एक विचारायचं आहे. "

मुलगा परत आला. " काय पाहिजे ? मला शाळेची घाई आहे. "

" होय, घंटा होण्यापूर्वीच जावं खरं. माझ्यामुळं तुला फार त्रास झाला. हे पाहा तुझे आजोबा माझे मित्र म्हणून थांब असं म्हणालो. "

" कोण ? चोच्चिलमनीचे मोठे हेगडे का ? मग आपण कोण ? "

" माझं नाव शिवराम कारंत. "

" आमच्या घरी आपण येणार नाही का मग ? माझ्या बाबांना दर महिन्याला तुम्ही मनिऑर्डर पाठविता ना ? " असं म्हणून मुलानं मला हात धरून थांबविलं. केतरकीच्या घरी पुन्हा गेलं तर चालेल. तुम्हाला पाहून माझ्या आई-बाबांना फार आनंद होईल. " आपल्या घराकडं तो मला ओढून नेऊ लागला. मला हवे असलेले मंजय्या हे जुने गृहस्थ असतील असं माझ्या मनात ठसल्यामुळंच हा गोंधळ झाला होता. मंजय्या हा माझ्या मित्रांचा जावईच असावा. त्यांच्या कापऱ्या हाताच्या सहीमुळं ते म्हातारे गृहस्थ असावेत अशी माझी कल्पना होती. म्हणूनच मी तिथं गेलो होतो. या मुलाचा बाप तेवढा जुना असावा असं काही वाटलं नाही म्हणून विचार करीत थोडासा तिथंच थांबलो.

" कसला विचार करता सांगा ना ? " तो मुलगा म्हणाला.

" तुझ्या वडिलांच्या कापऱ्या हाताच्या सहीमुळं तुझे वडील म्हातारे असावेत असं वाटलं होतं मला. म्हणून मी तुझ्या घरी जाण्याऐवजी दुसरीकडं चाललो होतो. "

" अगोदरच मी तुमचं नाव विचारलं असतं तर बरं झालं असतं. या, आमचे बाबा निजूनच आहेत.....त्याना एक तऱ्हेचा वात आहे. सुमारे एका वर्षापासून ते अंथरुणावरच पडून आहेत....." दीन वदनानं तो म्हणाला. त्यानंतर माझे धरलेले हात छोट्या यशवंतानं सोडले नाहीत. अर्धा मैल दूर असलेल्या आपल्या घरापर्यंत त्यानं मला बोलावून नेलं. घरी जाताच आपली शाळेची पिशवी एकीकडं फेकून दिली. आत पळतच जाऊन वडिलांना खबर दिली. आईला सांगितलं व मला पाय धुण्यासाठी कळशीभर पाणी आणून ठेवलं. ओसरीवर चटई अंथरली. तेवढ्यात एक कृश झालेली स्त्री माझ्यापुढं आली. चांगली सौभाग्यवती. दारिद्र्याची छटा शरीरावर दिसत असली तरी खरोखर गृहलक्ष्मी म्हणविण्याला योग्य अशीच ती होती. माझ्यापुढे येऊन, न भिता तिनं नमस्कार केला नि म्हणाली, " आमच्या बाबाच्या पुण्याईनं आपण आमच्या घरी आला. आपण सगळे चांगले आहात ना ? माझे यजमान निजूनच........" आणि यशवंताला तिनं बोलावून सांगितलं, " यशू, तुझे भाऊ शाळेत गेले आहेत. तू गेला नाहीस तर बरं होईल. "

" होय आई, मी जाणार नाही. आमच्या घरी हे आले असताना मी कसा जाऊ ? मी यांची सोय करतो. तू आत जा. काही फराळाचं कर. तुम्ही बाबांना आताच भेटता का फराळ वगैरे संपवून थकवा मिटल्यावर ? " असा त्यानं मला प्रश्न केला.

" फराळ अगोदर होऊ दे राजा. " त्याच्या आईनं सांगितलं.

मी त्याला जवळ बसवून घेतलं. त्याचे भाऊ आई, शेतीभाती वगैरेसंबंधी बरेच प्रश्न विचारले. इतके दिवस त्यांच्या घरी येण्यास उशीर केल्याबद्दल माझ्या मनात हुरहूर निर्माण झाली.

" आमच्या आजोबांना तुम्हाला चांगला परिचय आहे का ? ते मुंबईत वारले म्हणे. मरताना त्यांच्याजवळ कोणी होतं का ? सीताराम हेगडे गेले असावेत. " असे त्याने प्रश्न करताच मी म्हणालो, " सगळं काही सावकाश सांगतो. तुमची शेती फक्त तीनच गुंठ्याची का ? एवढ्या कमी जागेवर पुरेसं भात पिकतं का ? "

" पुरत नसलं तरी पुरवावं लागतं. दुसरा उपाय नाही. आमची आई म्हणते की आमच्याकडे खूप होतं. पण वाटण्या झाल्या. कर्जामुळं वडिलांचं सगळं गेलं त्यानंतर तिच्या वडिलांनी कसंबसं एवढं तरी चालविलं. "

त्याच वेळी यशवंताच्या आईनं तांदळाच्या चुरीचे उपीट आणि थोडं दूध व पाणी आणून माझ्यापुढं ठेवलं. " हे गरिबाचं घर. घरी चहाची पत्ती नाही. आणायची पद्धत नाही. हे उपीट रव्याचंही नाही. तांदळाच्या चुरीचं केलं आहे. सुदाम्याचं हे आतिथ्य आहे. " तिनं विनयाने सांगितलं.

" हे पाहा ताई, तुम्ही असं नका म्हणू. आतिथ्य असतं ते मनापासून करण्यामध्ये. तांदूळ किंवा रवा अथवा चहा-कॉफीत नसतं. "

" बरं तसंच म्हणा. "

मी फराळ करीत असताना तो मुलगा उगीच बसला होता. मी म्हटलं, " यातलं थोडसं तूही घे. "

" मी गंजी खाल्ली आहे. " तो म्हणाला.

मीच माझ्यातला वाटा करून आग्रहानं खाऊ घातला. फराळ संपताच माय-लेकांनी मला एका खोलीत नेलं. माझ्यासाठी एक पाट घातला. एक दिवा लावून मंजय्याच्या बाजूस असलेली खिडकी उघडली. ते उठू लागताच मी नको म्हटलं तरी त्यांनी ऐकलं नाही. हळूच उठून आपणहून मागच्या भिंतीस टेकून बसले. मी त्यांच्या समोर जाऊन बसलो. बोलायला त्यांनीच सुरुवात केली.

" मी दिवसातून दोन वेळा तसं उठून स्नान, एकी वगैरेला जात असतो. धरायला थोडासा आधार लागतो. नाव नसलेला कुठला तरी रोग लागला आहे. वात म्हणतात. करायचा तो इलाज करून झाला पण गुण नाही. जीवनात काही स्वारस्य नाही. करायचं ऋण असलं तर करायलाच पाहिजे ना ! आणखी कुठली चिंता नाही. हा आमचा यशू मोठा झाला तर काही भय नाही."

" आजोबाचंच नाव ठेवलंत आपण त्याला ?"

" आपण आमच्या सासऱ्याविषयी लिहिलं होतंत . . . मी अशा स्थितीत असल्यामुळं उत्तर दिलं नाही. कुणाकडून तरी लिहून घेता आलं असतं . . . आमच्या सासऱ्यांची आपली फार दिवसांपासूनची ओळख आहे का ?"

तेव्हा त्यांच्या सासऱ्याचा नि माझा कसा परिचय झाला याची सविस्तर हकीकत मी सांगितली. त्यानंतर त्यांचं पालनपोषण केलेल्या मातेचीही हकीकत सांगितली. भागवताची कथा ऐकत असल्याप्रमाणं तिघंही श्रद्धेनं ऐकत होते. पार्वत्यम्माच्या अंतकाळची हकीकत सांगताच त्यांना रडू कोसळलं.

" आम्ही त्या पुण्यवतीला कधी पाहिलं नाही. आपण भेटून आलात, फार चांगलं काम केलंत. माझ्या सासऱ्याचं नाव श्वाश्वत राहील असं आपण केलंत. पाहा ना असे होते माझे सासरे ! पण बायको मुलांनी त्याच्याशी वैर साधलं ! सगळेच त्यांची आता निंदा करतात. त्यांच या मुलीवर अधिक प्रेम होतं. तिच्याशी माझं लग्न झालं त्यावेळी आमच्या घराण्याचा डोलारा मोठा होता. मोठं कुटुंब. वाटणी होताच कर्जामुळं कोलमडून पडलं. वडिलोपार्जित कर्जामुळं काही शिल्लक राहिलं नाही. आमच्या सासऱ्यानीच त्यावेळी मदतीचा हात देऊन वाचविलं. घरासाठी, कोर्टाच्या खर्चासाठी बराच दंड भरला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. पण सर्व निरर्थक झालं. त्यानंतर जमिनीचा एक तुकडा त्यांनी आमच्यासाठी काढून दिला म्हटलं तर चूक होणार नाही. पण ते माझे मेव्हणे सीताराम याना आवडलं नाही. माझं नि माझ्या मेव्हण्याचं सासरे असतानाही पटत नव्हतं. काही वर्षांनंतर सासऱ्यानी तर गावच सोडलं. त्यांच्याशी कुठलाही संपर्क राहिला नाही. ते कुठं असत तेही आम्हाला समजलं नाही. त्यांना किती त्रास झाला होता. त्यांनी तसं का केलं काहीही समजू शकत नाही."

बोलून बोलून मंजय्या थकल्याचं पाहून मी त्यांच्या बायकोला विचारलं, " बाकीच्या मुली तुमच्याहून धाकट्या का मोठ्या ? आता कुठं कुठं असतात ?"

त्यांच्या बायकोनं सांगितलं, " आमच्या वडिलांची आम्ही चार मुलं. सर्वांत मोठा तो सीताराम. कुमठ्याला 'वखार' चालवितो. माझी आई त्याच्याजवळच असते."

" इतक्या जवळ आहात मग तुम्ही माहेरी कधी जाता की नाही ? ते इकडं कधी येतात का ?"

"हे आपण कशाला विचारता ? हे चांगले असेपर्यंत आणि आमचे वडील गावी असेपर्यंत आम्ही मधूनमधून जात येत असू. मुलींत मात्र मीच सर्वांत मोठी. आई आणि दादाचं तऱ्हेवाईक वागणं आहे. त्यांना आमच्यापेक्षा, आमच्यापेक्षा फार काय, देवापेक्षाही मोठा म्हणजे पैसा . . ." ते ऐकून मी हसू लागलो.

"मी हे सांगायला नको होतं. आमच्यावर संकट आलं तरी त्यांनी मदत केली नाही म्हणून निंदा करायला नको होती. नाही का ? आता सांगून टाकलं ही एक चूक झाली. माझे यजमानही तसंच म्हणतात. . . पण असा त्रास झाला म्हणून तोंडून निघून गेलं."

तेवढ्यात मंजय्यानी, "जलजा, तू आत जाऊन लवकर सैंपाक कर" असं सांगितलं.

"नाही. जेवण्यासाठी मी कुमठ्याला परत जातो. 'दुपारी जेवणाच्या वेळी मी परत येईन' असं मी सभावंतांना सांगितलं आहे. थोडा उशीर झाला तरी चालेल."

"मोठे पुण्यवान आहेत ते. सभावंताना आणि मला आमच्या सितारामाची चांगलीच माहिती आहे. सभावंताच्या वडील भावाचाही परिचय बराच होता. तो पुण्यात्मा मरून गेला. आजच्या परिस्थितीत जाणारे पुण्यात्मेच म्हणायचे."

"संसाराच्या कष्टांमुळं आपण तसं म्हणता. अहो कष्ट कुणाला चुकले आहेत ? कष्टाविना सुखाच्या शयनावर पहुडणारे शंभरात एक किंवा दोन असतील. म्हणून आपण आपल्या मनात विषाद वाटू देता कामा नये."

"खरं आहे तुमचं म्हणणं. तसं बोलू नये. निदान मुलांच्या समोर तरी मुळीच म्हणू नये. वाढत्या वयांची ती बिचारी. आपण जन्माला का आलो असं त्यांना वाटू देऊ नये."

तेव्हा यशवंत म्हणाला, "बाबा, हे कष्ट शेवटपर्यंत राहतील असं तुम्ही समजता का ? एक एक वेळ असते असं तुम्हीच म्हटलं होतं ना ?"

"होय बाळ, देवानं एवढं तरी चालविलं आहे ना ? तू एक आता काही काम करण्याच्या स्थितीत आल्यास. . . ."

"सगळं चांगलं होईल. तुमच्या मुलाचं भाग्य तुमच्यापेक्षा मोठं असेल. काय ? यशवंत, तू शिकून मोठा झालास तर आईबापांचं पोषण करायला मागंपुढं पाहशील का ?" मी म्हणालो.

"मग मुलं असावीत कशाला ?" तो म्हणाला.

9

"बरं तर, मग मी येऊ का ? अजून दोन तीन दिवस मी कुमठ्याला राहणार आहे. पुन्हा एकदा येऊन भेटतो." मी म्हणालो.

"ते काही नको." म्हणत मुलाकडं त्यांनी पाहिलं आणि "यशू" अशी हाक मारली.

"बरं आहे बाबा, मी आता पळत जाऊन सभावंताच्या घरी सांगून येतो." म्हणत यशवंत उभा राहिला.

"नको बाळ." मी सांगण्यापूर्वीच दुप्पट वेगानं तो पळत सुटला. यशवंतही आपल्या बालवयात किती चपळ असतील असा विचार माझ्या मनात आला. विषयांतर करण्यासाठी मी मंजय्याना विचारलं, "आपल्या बायकोचं नाव जलजा म्हणाला ना ?"

ते हसत म्हणाले, "आमच्या सासऱ्यांना डोळे पाहिले की परमानंद व्हायचा. म्हणून डोळ्यांवरूनच त्यांनी तिन्ही मुलींची नावं ठेवली. जलजाक्षी, वनजाक्षी, मीनाक्षी."

"अजून मुली झाल्या असत्या तर कामाक्षी, हरिणाक्षी, अशी नावं ठेवली असती की काय कोण जाणे !" मी म्हणालो. त्यानंतर हसत विचारलं, "त्या दोन्ही तुमच्या मेव्हण्या कुठं असतात ?"

"वनजाक्षीचं घर दक्षिणेत केक्कारीजवळ आहे. खूप श्रीमंत घराण्यात गेली आहे ती. चांगला संसार चालला आहे. सुखात आहे ती. 'याण' नावाच्या अतिशय खेडवळ गावी दुसरीला दिलं आहे. माझ्या माहितीनुसार तिलाही कसली चिंता नसावी. आमच्या सासूबाईच्या कारभारानं या दोन्ही मुलींची सोयरीक जमली. मी मात्र माझ्या सासऱ्याचा जावई बरं का ! माझ्या लग्नाच्या वेळी असली सोयरीक पाहिल्याबद्दल सासूबाईनं त्याना खूप हिणवलं म्हणून ते चिडले. म्हणून पुढचे दोन्ही जावई सासूबाईनीच हुडकून काढले. एकूण आमच्या सासूबाईचाच विजय झाला म्हणा ना.

"मी मॅट्रिक पास होऊन तालुक्याच्या ठिकाणी कारकून झालो होतो. शिकलेला मुलगा आहे, मोठे कुटुंब आहे, कसतरी चालवून नेईल अशी माझ्या सासऱ्यांची समजूत होती. माझ्या सासूबाईना मात्र ज्या घरी मुलगी द्यावयाची ते घर संपन्न असावं, जास्त वाटण्या होण्यासारखं घर किंवा कमी पैसा असलेलं घर असू नये असं त्याचं मत होतं. त्या स्वतःही श्रीमंत घराण्यातून आल्या होत्या. पण माहेरून त्यांना काही मिळालं नव्हतं. यांनी तरी आपल्या पोटच्या मुलींना काही दिलं की नाही मला माहीत नाही."

" दिलं आहे " असं सांगत जलजाक्षी आली, " असणाऱ्यांनाच द्यायचं असतं. नसणाऱ्याला कोणी तरी देईल का ?"

" आई असो की वडील असोत, आपण कधीही त्यांच्याकडून काही अपेक्षा करू नये. आपल्या पायावर आपण उभं राहायला पाहिजे. या आजारानं मला अंथरुणावर पाडलं नसतं तर असं कुरकुरण्याचा प्रसंगच आला नसता."

त्यानंतर त्यांनी विषयाची पुनरावृत्ती केली. आपल्या सासऱ्यासंबंधी काही गोष्टी विचारल्या. मी त्यांना सांगितलं. बोलण्याच्या ओघात त्यांच्या सासऱ्याकडून आलेलं पत्र – मृत्युपत्राचं रूप कसं पावलं, पैशासंबंधी त्यांनी मला काय काय सूचना दिल्या होत्या वगैरे बाबी काही न लपविता सांगून टाकल्या. त्यानी ते सगळं ऐकून घेतलं. त्यानंतर त्यानी प्रश्न केला,

" आमच्या सितारामाला हे कळलं नाही का ?"

" कळलं आहे. त्यानंतर एकदा ते मुंबईलाही गेले होते. यशवंतरावांचे 1500 रुपये बँकेत शिल्लक पडून असलेले, त्यांना मिळालेच असतील." मी म्हणालो.

" त्याच्या घरी जाऊन आला का आपण ?"

" नाही. अजून गेलो नाही. एकदा जावं म्हणतो. गाव सोडण्यापूर्वी एकदा गेलं म्हणजे झालं."

" माझ्या मेव्हण्याची प्रत्यक्ष भेट झाली आहे का ?"

" एकदा तेच माझ्याकडेच आले होते. त्यांनी मला पत्रही लिहिलं होतं. पत्र न लिहिणारे मात्र आपणच."

" चूक झाली माझी. राग आला की काय तुम्हाला ?"

" छे छे: तसं काही नाही. शिवाय तुमचे अक्षर कापऱ्या हाताचे होते यावरून आपण म्हातारे असल्यामुळं पत्र आलं नसावं असा विचार केला."

माझ्याकडं त्यांच्या सासऱ्यानी पैसा ठेवला आहे हे मी सांगितलं तरी मंजय्यांनी त्याविषयी काही आसक्ती दाखविली नाही.

" माझ्या सासऱ्यानी मागं असंच सर्व काही घालविलं असं म्हणतात. मी तसं म्हणणार नाही. माझ्या सासूबाईना मात्र तसंच वाटतं. आमच्या सासऱ्याचं मन मात्र मोठं. कुणी काही रडगाणं सांगितलं की ते हातात असेल ते देत असत. आपलं धन चांगल्या कामासाठी खर्च करा असं सांगून तुम्हाला त्यांनी पैसा दिला हे त्यांच्या स्वभावाला अनुसरूनच आहे. अशी सुबुद्धी किती लोकांना सुचते ?"

काही शिल्लक राहिलं की सगळं काही आपल्या मुलांना मिळावं असं आम्हाला वाटत. त्याना आपली नि परकी मुलं सारखीच वाटली. शिवाय सितारामासारखी त्या पैशाबावतीत त्यांनी अपेक्षाही व्यक्त केली नाही. 'पंधरा हजार रुपये मिळाले का ?' असा उद्गारसुद्धा मंजय्याच्या तोंडून न निघाल्याचं पाहून मला फार आनंद झाला.

किती नको म्हटलं तरी त्या दिवशी दुपारचं जेवण त्यांनी आमच्याबरोबर केलं. त्यांच्या बाजूलाच यशवंत बसला होता. पानं वाढताना त्यांची दोन्ही धाकटी मुलं आली. येताच त्यांनी हात पाय धुतले. नि वडील भावाप्रमाणं आपापल्या वाट्या ओळीनं ठेवून जेवायला बसली. त्या तिन्ही मुलांचे चेहरे आईच्या चेहऱ्याशी जुळणारेच होते. सगळ्यांच्या चेहऱ्यावर गरिबीची छटा होती. ज्यांना पोटभर खायला मिळत नाही त्याचं चित्र दुसरं कसं दिसणार ? देशात नव्वद टक्के घरं अशीच नाहीत का ? जेवता जेवता मी म्हणालो, "यशवंत, तुझ्या धाकट्या भावाचं नाव काय आहे ?"

"हा जयंत, हा भगवंत" त्यानं सांगितले.

"ए भगू, तुझ्या पणजोबाचं नाव काय होतं माहीत आहे का तुला ?" मी विचारलं. मी त्याला अपरिचित असल्यामुळं त्यानं मला निरखून पाहिलं.

"कोणाचं नाव म्हणाला ?" मंजय्यानी विचारलं.

"तुमच्या सासऱ्याचे वडील भगवंतरावच ना ?"

"ओहो. असं आहे काय ? भगू तुझ्या पणजोबाचं नाव तुझंच नाव बरं का." ते म्हणाले.

"बाबा हे कोण आहेत हो ? त्यांच्याबरोबर इथं येऊन तुम्ही जेवू लागला ?"

"ते किनई बाळांनो, फार लांबून आले आहेत. आपली पुण्याईच म्हणा. तसं नेहमी येणारे नव्हेत म्हणूनच उठून मी इथपर्यंत आलो."

"भगू, मी इथं कशाला आलो, माहीत आहे का ?" मी त्या मुलाला प्रश्न केला.

"मला माहीत नाही."

"कशाला, सांगू ?"

"सांगा."

"सांगू का ? होनगद्देला मंजय्या नावाचे गृहस्थ आहेत."

"त्यांना भेटायला."

"नाही."

"त्यांच्या मुलाला."

"यशवंताला"

"नाही."

"जयंताला."

"नाही."

"मग ?"

"हनुमंताला. पण मी इथं येण्यापूर्वीच हनुमंत जाऊन भगवंत झाला होता." तेव्हा सगळी मुलं हसू लागली. सर्वांत धाकटा मात्र 'हंऽ हंऽ, तुमची थट्टा पुरे तुम्ही आमच्या बाबाला भेटायला आलात.' म्हणाला.

"नाही. भगवंताला आमच्या गावी घेऊन जाण्यासाठी."

"मी येणार नाही."

"मी तुला सोडून जाणार नाही. तुला नेण्यासाठी तुझ्या बाबांना विचारलं आहे मी. 'देतो' म्हणून त्यांनी सांगितलं आहे. त्यांना यशू पाहिजे, तुझ्या आईला जयंत पाहिजे म्हणून भगवंत तरी मला द्या म्हणताच 'देतो' म्हणाले." भगवंताचं वय दहा वर्षांचं होतं. त्याचा चेहरा कावराबावरा झाला. डोळ्यातून पाणी वाहू लागलं. वाढायला आलेल्या त्याच्या आईनं ते बोलणं ऐकलं. आपल्या मुलाची ती स्थिती न बघवून ती म्हणाली, "भगूराजा, त्यांनी चेष्टेनं म्हटलं. माझा भगू मला भार का रे झाला ?" त्याची समजूत घातली.

मी खूप हसताच त्याचं समाधान झालं. जेवण उरकताच ती तिन्ही मुलं शाळेला दांडी देऊन माझ्याभोवती जमली.

"मुलांनो, त्यांना थोडी विश्रांती घेऊ द्या." त्यांच्या आईनं किती सांगितलं तरी "आई, तू उगी रहा, अण्णाला त्यांचं गुपित कळलं आहे. ते गोष्टी लिहितात म्हणे."

आम्हाला एक गोष्ट सांगायलाच पाहिजे म्हणून भगवंतानं विनवणी केली. म्हणून मी गोष्ट सांगू लागलो.

"एका गावी एक हनुमंत होता. . . . ."

"असू द्या मी काही त्याला भीत नाही." मुलगा म्हणाला.

गोष्टीच्याऐवजी मी त्यांना वानराच्या खऱ्या जीवनाच्या कथा सांगितल्या. वानराच्या पिलाप्रमाणंच त्यांनी उत्सुकतेनं ऐकून घेतल्या. "आता वाटलं तर थोडंसं टेकून घ्या." त्यांनी मला झोपण्याची अनुमती दिली. मी झोपलो.

एक सुखनिद्रा होताच मी तोंड धुऊन आलो. तोच चहा तयार असल्याचं पाहून घरमालकिणीला म्हणालो, " घरी चहा नाही असं तुम्ही म्हटलं होतं ना ? माझ्यासाठी कशाला मागविला ? तो घ्यायलाच पाहिजे इतकी काही मला आवश्यकता नव्हती. एखाद्या वेळी चहा किंवा कॉफी चुकली तर काय होतं ?"

" सवय असणाऱ्यांना चहा किंवा कॉफी न मिळाली तर डोकं दुखतं म्हणतात."

" सभावंतांच्या घरी तसा माझा चहा झाला होता."

" होऊ द्या. आता इथंही तयार आहे."

" तसं घ्यायला काही हरकत नाही." असं म्हणत मी आलेला चहा पिऊन टाकला व अंथरुणावर पडून राहिलेल्या मंजय्याकडं बोलण्यासाठी गेलो. मी जाताच पुन्हा एकदा ते अंथरुणावर उठून बसले.

" एकदम जास्त वेळ बसल्यास पाठ दुखेल ना ? " मी म्हणालो.

" नाही दुखणार."

" अशीच पुढेही कधी दुखणार नाही. मात्र हे दुखणं बरं होईल अशी दररोज तुम्ही मनाची समजूत घालायला पाहिजे. डॉक्टर लोकांचं असं म्हणणं आहे की अनेक वेळा मनातील दुखणीच शरीराला पीडा देतात."

" माझंही तसंच झालं बघा सुरुवातीला. वाटण्या झाल्यावर घरातलं सगळं काही गेलं नि कर्जाचं ओझं वाढलं हे पाहून माझे हातपायच गळून गेले. ते जे गळले ते गळूनच गेले बघा."

' अरेरे ! बिचारा ' असं वाटलं. त्याच वेळी त्यांच्या भावांनी किंवा बायकोनं त्यांना धैर्याच्या गोष्टी सांगितल्या असत्या तर कदाचित ते सुधारले असते. त्याऐवजी सासऱ्यानी दाखविलेली करुणा, दिलेली मदत, एका प्रकारे त्यांच्या निरुत्साहाला कारण झाली असावी. नि त्यांच्या मनाला टोचणी लागली असावी.

फक्त थोड्याशाच माहितीने मी रोगनिदान करू गेल्यास कसं होईल ? म्हणून मी त्यांना धीर देण्यासाठी म्हटलं,

" याचा उपाय शोधून मी गावी गेल्यावर एक औषध पाठवतो. त्या औषधाने कसे कसे वातरोग बरे झाले आहेत. दररोज हातापायांना ते चोळावं आणि हळूहळू अंग व पाय दाबून घ्यावेत. तुमच्या इष्ट देवाचं स्मरण करीत जा व मनात म्हणत

ना ' आता काय गुण आलाच.' भीमासारखे तुम्ही लट्ठ होणार नसला तरी पुन्हा घरातल्या घरात फिरण्यापुरते चैतन्य निश्चित येईल."

"खरंच का ?"

"काही लोकांना तसा गुण आला आहे म्हणून तर सांगतो. तसा मी काही पंडित नाही की वैद्य नाही."

"तुमच्या बोलण्यावर माझा विश्वास आहे."

"इतका विश्वास असला तर अवश्य गुण येईल."

"तसंच होऊ द्या बाबा."

त्यानंतर मी कुठल्या कुठल्या गावच्या गप्पा मारून गेलो. बायको मुलं तिथं नसल्याचं पाहून हळूच मी त्यांना विचारलं, "हे पाहा, तुम्ही कोडकणी म्हणाला ना ? दरमहा पंचवीस रुपये तुम्हाला जसे पाठवितो तसेच तिथंही एका गृहस्थाला रुपये पाठवीत आहे. तुमच्या सासऱ्यांनी तसं कळविलं आहे. "

"कोडकणी दोनतीन आहेत. कोडकणीत कोण ?"

"धारेश्वर शीन . . ."

ऐकताच त्यांनी मृदू हास्य केले, त्यानंतर इकडं तिकडं पाहून म्हणाले,

"ती आणि मुलं नाहीत ना ?"

"नाही."

"माझ्या सासऱ्याचं मन विचित्र झालं होतं . . . तशी काही चूक नाही; शीन म्हणजे त्यांचा मुलगा."

"मुलगा म्हणजे ?"

"मला फार काही समजलं नाही. आमच्या सासऱ्यांच्या रखेलीचा मुलगा. म्हणजे असं पाहा, आमच्या सासऱ्यांची विवाहित पत्नी होती हे खरं पण त्यांच्यापासून त्यांना मिळालेलं सुख बेताचंच. म्हणून धारेश्वर सरशी नावाच्या एका कलावंतिणीला त्यांनी ठेवून घेतलं असं म्हणतात. असंही ऐकलं आहे की तिच्यापासून एक की दोन मुलं आहेत. हा शीन तबला फार छान वाजवितो म्हणतात. माझं लग्न झालं त्याच सुमारास गावात याची चर्चा सुरू झाली होती. या चर्चेमुळं त्यांचं दांपत्य-जीवन संपुष्टात आलं की ते विकोपाला गेल्यामुळं असं घडलं कुणास ठाऊक ? नाही तरी आपल्यापेक्षा जुन्या पिढीतल्या लोकांना हा एक प्रतिष्ठेचा विषय होता. शिवाय..."

"म्हणजे ?"

"तुमचं काय मत आहे कुणास ठाऊक ? मागचे लोक असंच करीत असत. हुपापल्यासारखं रोज एका घरी जाऊन येत असत नाही का ! तोही एक प्रकारे रीतिरिवाजच होता. एवढंच नव्हे तर काही माणसं आपल्या बायकांना समान वागणूक देत असत. रखेलीलासुद्धा हात धरून आलेल्या बायकोपेक्षा अधिक मर्यादिनं वागवणारे अनेक असत. मी जे काही ऐकलं त्यावरून एवढं मी सांगू शकतो की ही धारेश्वर सरशी एका मर्यादिनं वागली. तिच्याशी ठेवलेल्या संबंधामुळेच आमच्या सासऱ्यांचं डोकं बिघडलं असं म्हणतात. म्हणजे वेड लागलं असं नव्हे. मुलापुढं, मुलीपुढं, आलेल्या गेलेल्या नातलगांपुढं आमच्या सासूबाई तिचं नाव काढून त्यांना हिणवीत असे. त्यावेळी आमचा मेहुणा सीताराम वयात आला होता आणि व्यवहार शिकत होता. आपल्या मुलाच्या धैर्यावर आमच्या सासूबाई उड्या मारू लागल्या. या सासूबाईंना आमच्या सासऱ्यांनी थोडेथोडके का दागिने दिले ?"

"कुणाला धारेश्वर. . . ?"

"नाही हो. त्यांनी तिला काय दिलं माहीत नाही. दिलं असलं तरी स्वत. त्यानी राबून कमावलेलंच दिलं ना ? मी सांगितलं ते सासूबाईंच्या बाबतीत. त्यांना काही कमी पडू दिलं नाही. त्यांनी हाताने दिला त्यापेक्षा दुप्पट पैसा घेतला आहे. हट्टाला पेटून आमच्या सासऱ्यांनी त्यांना नाहीसं करावं असं म्हटलं नाही. ते स्वत: तेवढं राबले होते ना ? चोच्चिलमनीहून आले त्यावेळी यांच्या माहेरच्यांनी सुरुवातीला काही कर्ज दिलं असलं तरी सव्याज ते परतही मिळवलं.

"अगोदर ज्या रीतीनं त्यांचा पराभव झाला, नुकसान झालं, तेवढाच फायदा सुपारीच्या व्यापारात त्यांना झाला. तेजी-मंदीच्या व्यवहारात ते जरी हरले तरी विकत घेणं, भाव ठरविणं, देणंघेणं यांत त्याचं लक्ष असे. म्हणूनच त्या एकाच व्यापारात त्यांनी लक्षावधी रुपये कमावले.

"गाव सोडून जाताना त्यांनी काय कमी सोडलं होतं ? म्हणूनच स्वत:साठी जास्त पैसा त्यांनी नेला नाही म्हणतात. "

तेवढ्यात त्यांचा धाकटा मुलगा भगवंत तिथं आला. आमचं बोलणं थांबलं. कोडकणीचा ठावठिकाणा कुमठ्याला गेल्यावरच विचारावा म्हणून मी गप्प राहिलो. त्यांची परवानगी घेऊन इकडं निघून आलो. त्यांच्या बायकोला चार गोष्टी सांगून काहीतरी पाठवीन असा मुख्य विषय मी त्यांना सांगितला. मी म्हणालो, "ताई, या मुलांच्या विद्याभ्यासात व्यत्यय येणार नाही याकडं लक्ष ठेवा. त्यांच्या शिक्षणानं

तुमचं भलं होईल. विद्याप्राप्तीसाठी त्यांना जे काही लागेल ते मी तुमच्या वडिलांच्या पैशांतून देऊ शकेन. आरोग्याच्या दृष्टीनंही मुलं बरी नाहीत. रोज त्यांना दूध-दही जास्त देत जा. काही काळजी करू नका. तुमच्या यशवंताकडून मधूनमधून पत्र पाठवीत जा. तुमचा मी एक वडील भाऊ आहे असंच समजा." एवढं सांगून मी आलो. घराची सीमा संपेपर्यंत ती व मुलं निरोप देण्यासाठी आली. यशवंतानं तर मला पेठेपर्यंत पोचवलं. नंतरच तो गेला. त्यानंतर मी कुमठा सोडण्यापूर्वी यशवंत मी असल्या ठिकाणी आला नि पुन्हा एकदा घरी मंजय्याची त्यानं भेट करविली.

अध्याय दहावा

"ओहो, तुम्ही त्यासाठी आला का ? चांगलं काम केलंत. होनगद्दे मंजय्या सगळं गमावून कंगाल झाला आहे. सासऱ्याच्या शिल्लक राहिलेल्या पैशांतून चार पैसे त्याला दिले तर योग्यच होईल. तसं पाहिलं तर त्याला पैशाचा तिळमात्र मोह नाही. पण बिचाऱ्याचं नशीब. त्याला तीन मुलं आहेत आणि तो तर शरपंजरी पडलेला."

"त्यांच्या दोन मुलींपैकी अेक 'याण' येथे आहे तर दुसरी केक्कार यांच्या घरी गेली आहे. त्या लोकांची स्थिती कशी काय आहे ?"

"ते होय ? आमच्या इकडच्या हव्यक घराण्यातील मोठ्या कुळांपैकी आहेत. त्यांना भेटण्याची आवश्यकताच नाही. . . . अजून तुम्ही सीतारामला भेटला नाहीत का ? त्याचं घर जवळच आहे. शंभर यार्डांचंसुद्धा अंतर नाही. "

"तुमचं त्यांचं कसं काय आहे ?"

"वरवरून तसं चांगलं आहे. पण आतून तशी आत्मीयता कमीच. त्याचं धोरण, त्याचा डामडौल मला मुळीच पसंत नाही. शिवाय– त्याचा कोणताही व्यवहार सरळ नाही. जगात कुणी संभावित असतील असं त्याला कधीच वाटत नाही."

ते ऐकून मला हसू आलं.

"का, हसत आहात ?" सभावंतांनी प्रश्न केला.

"जगात कोणी संभावित नाही असं म्हटलंत ना ? त्याचा मलाही अनुभव आला आहे."

"म्हणजे तुम्हा दोघांची भेट झाली म्हणायची ?"

"घर हुडकीत ते माझ्याकडं आले होते." आणि त्यावेळचं ते सर्व प्रकरण थोडक्यात मी त्यांना सांगितलं नि म्हणालो, "आता या गावी आलो आहे तर भेटावंच लागेल. भेटतो म्हणून सांगितल्यावर भेटलंच पाहिजे ना ? माझी भेट झाल्यावर त्यांनी मात्र वकिलामार्फत नोटीस पाठविली."

"एवढ्यातच इतकं झालं का? मग कशाला जाता? तुम्हाला का दुसरा उद्योग नाही?"

"गेलं तर माझं काय जाणार आहे? किती झालं तरी माझ्या मित्रांचे नातलगच ना? त्यांच्या आईला भेटून येऊ शकेन."

"तुम्हाला काही उद्योग नाही. अहो, यशवंत हेगडे गेल्याचं यांना का दुःख आहे? —ती आणि सितारामानी मिळूनच तर त्यांना पळवलं ना?'

"त्यांना कसला मनःक्लेश झाला कुणास ठावूक! संसार म्हटल्यावर काही ना काही कटकटी राहणारच."

"कुणाच्या? नवराबायको, बापलेक यांच्यात का कटकटी असाव्यात?'

"का असू नयेत? मुलं वयात आली की शेकडो घरात हे चालतंय."

"तसं व्हायला इथं काही वडिलोपार्जित संपत्ती राहिली नव्हती. सगळं काही त्यांनी इथं कुमठ्याला आल्यावर, घाटावर हात धुवून आल्यावर, राबून कमावली."

"तसं त्यांचं मन घट्ट होतं म्हणा. माझ्यापेक्षा ते दहा वर्षांनी मोठे होते. आपल्या बायकोच्या घरी येताना ते रिकाम्या हातानं आले. त्यानंतर एका सावकाराकडं गुमास्ता म्हणून राहिले. चार वर्षांपर्यंत डोळे झाकून नोकर होऊन राबले. व्यापाराची खुबी आपल्याला कळली असं वाटताच सासऱ्याकडून चार पाच हजार रुपये कर्जाऊ घेतले असावेत. स्वतः व्यापार सुरू केला. ते कर्ज त्यांनी तीनच वर्षांत फेडलं असं ऐकण्यात आलं. मुख्य म्हणजे त्यांचं दैवच चांगलं होतं. त्यामुळंच वखार काढल्यापासून त्यांचं नशीब खुललं. कुठल्याही रिकाम्या गप्पा न मारता 'आप भला नि व्यापार भला' असे वागले. लक्ष्मी प्रसन्न झाली. पैसा आला म्हणून व्यर्थ त्यांनी एकही पैसा खर्च केला नाही. पूर्वी ते कसेही असोत पण कुमठ्याला येऊन सुधारल्यावर आपल्या बायको-मुलांना काही कमी केलं नाही. सितारामाला शाळेत घातलं. तिन्ही मुलींची लग्नं लागली...

"पैसा त्यांनी अनाठायी खर्च केलाच नाही. घाटावर असताना आपल्या गावी त्यांनी पुष्कळ पैसा उडविला म्हणतात. इथं तसं केल्याचं माझ्या तरी पाहण्यात आलं नाही. त्यांच्या हाती पैसा आल्यावर कर्ज मागण्यासाठी चार माणसं त्यांच्याकडं गेली. कोणालाही अंगावर पडू दिलं नाही. अेकदा हात भाजले होते ना!"

"त्यांच्या व्यसनाबद्दलही ऐकण्यात आलं होतं."

सभावंत हसू लागले. "अहो त्याचं काय मोठंसं? मोठे म्हणविणाऱ्या आपल्या-पैकी अनेकांना असलेली ती एक चट. एक प्रकारचा तो शौक म्हणा ना. त्यांची एक रखेल होती हे खरं आहे. पण त्यांनी तिच्यासाठी बंगला बांधून दिला नाही की तिला वस्त्रालंकार दिले नाहीत. त्याचीही एक सीमा असते. त्यांचा तो एक दुर्गुण होता. मी तो लपवू शकत नाही."

"त्यामुळंच घरी असंतोष वाढला म्हणतात?"

"छे: छे: एवढ्याच कारणामुळे सारं घडलं नसावं. खरी गोष्ट याच्या विरुद्धही असू शकेल."

"म्हणजे?"

"ते बोलू नये... तुम्ही तिथं जाणार आहात ना? गेल्यावर ती महामाया कशी आहे हे तुम्हाला दिसून येईलच."

"एकटंच जायला मला..."

"त्याचं काय मोठंसं! मी येईन की त्या वेळी तुमच्याबरोबर."

सभावंतांनी धैर्य दिल्यामुळं दुसऱ्या दिवशी दुपारी जेवण झाल्यावर एक झोप काढून आम्ही दोघे सीताराम हेगडे याच्या वखारीवर गेलो. आमच्या येण्याची पूर्व-सूचना दिल्यामुळं की काय हसऱ्या मुखानं सीताराम हेगड्यांची स्वारी दारासमोर आली नि त्यानं स्वागत करून आपल्या दुकानात नेलं. दोन आराम खुर्च्यांवर आम्ही बसलो. तांबूल आलं. 'चहा करवू का?' म्हणून त्यानं विचारलं. 'नको, आताच झाला आहे' असं मी म्हणालो.

"अहो परगावचे आहेत. करवा." सभावंत म्हणाले. आत जाऊन त्यानं ती सूचना दिली नि परत आला. सभावंताबरोबर मग बराच वेळ तो सुपारीचा भाव, आठवड्याचा बाजार, व्यापार वगैरेविषयी बोलत बसला. मला सुपारी खाणं माहीत आहे. सुपारीचा भाव वगैरे बाबतीत मला काय कळणार? मी उदासीन असा बसून राहिलो. माझ्या घरी सीताराम आला होता त्या वेळी जसा मी अध्यापकाबरोबर गप्पा मारण्यात दंग झालो होतो तसाच तोही यावेळी सभावंतांशी बोलण्यात वेळ घालवीत होता. मलाही ते हवंच होतं. बोलून विरस होण्यापेक्षा मौनाचं सरसच बरं नव्हे का?

"फराळाचं झालं आहे. आत या." अशी बातमी एका मुलानं आतून येऊन दिली. मग मात्र माझ्या संकोचाला सुरुवात झाली. पहिल्यांदा भेटण्याची ही वेळ म्हणजे सुसंधी असं काही मला वाटलं नाही. ते दुर्भाग्यच खरं.

आम्ही आत गेलो. तिथं तीनचार पाट मांडण्यात आले होते. दोन आम्हा दोघांना व एक घरमालकिणीला. आम्ही पाटावर बसलो. ताट भरून फराळाच्या जिनसा आल्या. शिरा, शिकरण पुरी, खारा, कॉफी !

"एवढं सगळं कशाला करविलंत ?" मी उद्‌गार काढला.

"नुकतंच आम्ही घरी फराळ संपवून आलो." सभावंतांनी सांगितलं.

"मग तुम्ही सांगून का पाठविलंत ?" तो म्हणाला.

"तुम्ही आयत्या वेळी कुठं जाऊ नये एवढ्याचसाठी."

"या सीझनमध्ये दुकान सोडून मी कुठं जात असतो का ? शिकरण पुरी दोन्ही आरोग्याला चांगल्याच म्हणतात." सीताराम हेगडे हे मला उद्देशून सांगत असतानाच कमलम्माच्या स्वारीनं माझं लक्ष वेधलं.

"याच आमच्या मातोश्री." सीतारामानं परिचय करविला. बसल्या जागे-वरूनच मी नमस्कार केला.

नाकीडोळी नीटस अशी ती स्त्री होती. गोरं, धष्टपुष्ट शरीर, चालण्याची शैली मुलासारखीच. कपाळावरच्या कुंकवाचा लोप झाला नसता तर लहानशा खेड्याच्या गतकालीन राणीसारखीच दिसायची ती. कानांत अजूनही चमकदार अलंकार डुलत होते. अंगावर रेशमी साडी होती. अत्यधिक आत्मविश्वास असणाऱ्या स्त्रीप्रमाणं ती दिसत होती.

मी फराळ संपविण्यापूर्वीच सीतारामानं सभावंतांना आपल्याकडे बोलाबलं व "तुम्ही सावकाश बोलत बसा, आम्ही बाहेर बसतो." असं सांगून सभावंतासह बाहेर पडला.

"सावकाश होऊ द्या फराळ." ती माता म्हणाली. मी काही बोललो नाही.

"माझ्या मुलानं सगळं काही सांगितलं आहे. आमच्या यजमानाचे तुम्ही फार मर्जीतले होता म्हणे ?"

"फार कसलं ? गेल्या सहा वर्षांपासून त्यांची नि माझी ओळख."

"तरी पण एकावर एवढा विश्वास ठेवायचा म्हणजे ? आपली बायको, आपला पोटचा मुलगा यांवर विश्वास न ठेवणारे ते पुण्यात्मा . . ."

"तो एक स्वभाव म्हणायचा. काळाची एक गती समजायची. त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला हे खरं. पण का हे मलासुद्धा माहीत नाही."

"त्यांच्या संपत्तीला कोणी तरी उत्तराधिकारी हवा होता ना ? आपल्या माणसांना काही मिळू नये असा हट्ट धरल्यावर शेवटपर्यंत द्वेष ठेवायलाच हवा."

"अम्मा, त्यांचा उत्तराधिकारी मी कसा होईन? मुंबईला असताना त्यांनं कोणाशी अधिक संपर्क ठेवला नाही. त्यानंतर एकदा त्यांची माझी ओळख झाली तीही आगगाडीत झाली. मी पुण्याहून मुंबईला चाललो होतो तेव्हा. मी कानडी बोलतो हे त्यांना समजलं त्यामुळंही असेल कदाचित. शेवटी त्यांचा आजार वाढताच त्यांनी एका चिठ्ठीवर माझं नाव लिहून पत्ता लिहिला व शेजारच्या गृहस्थांना माझ्या नावे तार करायला सांगितली. शेजाऱ्यांनी मला तशी तार पाठविली म्हणून मला जावं लागलं."

"सीतारामानं ते सगळं सांगितलं आहे मला. शेवटी आपल्या बायकोवरचा द्वेष साधलाच ना! त्यांनी तुम्हाला पैसा पाठविला. हे तरी न्यायाला अनुसरून आहे असं तुम्हाला वाटतं का?"

"तसा मलाही संशयच आहे. त्यामुळंच मी संकटात पडलो आहे. तुमच्या मुलाचाही माझ्यावर संशय आहे. माझ्याजवळ असलेले सगळे कागदपत्र मी त्यांना दाखवल्यावरही तुमच्या मुलानं मला रजिस्टरनं नोटीस पाठविली..."

"हे सगळं करण्याऐवजी त्यांनी त्या धारेश्वर सरशीच्या नावानंच मृत्युपत्र करायला हवं होतं. त्यांच्या गादीचा वारसदार मुलगा आहे ना अजून शीन. त्याच्या नावानं तरी सगळं पाठवून ही आलेली संधी साधायची होती."

"ते सगळं मला कशाला सांगता बाई? माझ्यापुढं सांगण्यासारखं काय आहे?"

"तुम्हाला नको असलं तरी मला सांगावसं वाटतं. त्यामुळे आम्हाला किती कष्ट झाले. हा आमचा अपमान नव्हे का?"

"गेलेल्यांच्या बाबतीत एवढं काय मनाला लावून घ्यायचं? काही वाईट वाटलं तरी मेल्यावर विसरून जावं हाच धर्म."

"आता तुम्ही आम्हाला आमचा धर्म सांगायला आला आहात वाटतं? ते जिवंत असताना त्यांच्या मित्रांनी त्यांना धर्म शिकवायला हवा होता."

"ते जिवंत असताना.... आपल्या कुटुंबियांची त्यांनी कधी निंदा केली नाही. वाईटही चिंतिलं नाही. चांगलंही बोलले नाहीत."

"बोलायला तोंड पाहिजे ना?"

त्यावर मी काही उत्तर दिलं नाही. तीही गप्प बसेल असं वाटलं. पण ती द्वेषानं म्हणाली, "चोन्विलमनीच्या एका रांडेसाठी तुम्ही देऊळ बांधून दिलं असं ऐकलं ते खरं का?" ऐकताच मला आश्चर्याचा धक्काच बसला.

"अम्मा, तुमच्या मनात संतोष नाही हे मी जाणतो पण दुसऱ्याबद्दल असं बोलू नये."

"का बोलू नये ? लग्न झालेली त्यांची बायको घरी असताना ती रांड त्यांच्या-वर हुकूमत गाजवू लागली आणि तुम्ही तिला हुडकून तिच्या इच्छेनुसार देऊळ बांधवून दिलं नाही का ?"

"तिच्यासाठी मी बांधविलं नाही. तिचा चांगुलपणा आणि देवाची प्रेरणा यामुळं माझ्या हातून ते घडलं."

"बरं बाबा."

तिच्याबरोबर बोलण्याचं माझं कुतूहल मातीत मिसळून गेलं. एवढंच नव्हे तर विनायकाचं देऊळ बांधविण्याचा मला काय अधिकार होता हेही त्या वेळी समजल नाही. तिथून मुकाट्यानं उठलो. ते पाहून--

"उशीर झाला वाटतं. असो. या गावी कधी आला तर पुन्हा या." ती म्हणाली.

"बरं आहे." असं सांगून वाघाच्या हाती सापडून सुटलेल्या बोकडाप्रमाणं पळून बाहेर आलो. घाईघाईनं सीताराम हेगडेला "येतो" असं म्हटलं व जाऊ लागलो.

"चार दिवस राहणार का ?" त्यानं विचारलं.

"एक दोन दिवस राहीन."

"बरंय या. तुम्ही काही वाईट वाटून घेऊ नका. एवढ्या अल्प पैशासाठी आम्ही कोर्टाची पायरी चढायची नाही असा निश्चय केला आहे."

"चांगला विचार आहे. वडिलांबद्दल एवढातरी अभिमान दाखविलात ना."

"त्यांच्याबद्दल अभिमान म्हणून नव्हे तुमच्याबद्दल दोन स्नेह्यांनी चांगला अभिप्राय दिल्यामुळं माझं समाधान झालं म्हणून. तुम्ही तरी काय करणार ?"

"काही झालं तरी माझ्या मित्राच्या मुलामध्ये व माझ्यात वितुष्ट येता कामा नये."

"हे खरं का ?"

तो म्हणाला. त्या दाक्षिण्याच्या कचाट्यातून मी सभावंताबरोबर निसटून आलो.

"हात धरून आलेली बायको" म्हणाली होती कमलम्मा. त्या हातातून निसटून माझ्या मित्रांनी आत्महत्या केली असती तरी आश्चर्य वाटले नसते. पार्वत्यम्माच्या बाबतीत तिनं रांड असा दोन दोनदा उच्चार केला होता. त्या वेळी तिला स्वतःला आलेल्या वैधव्याची विस्मृती पडली होती का ? वैधव्य आल्यावरही तिने केस राखले होते तेच तिच्या धिटाईचं कारण असावं.

वाटेत येतायेता माझ्या मित्रांनी " तिच्याशी काय काय बोलणं झालं " असं विचारलं.

प्रत्युत्तर म्हणून मी म्हणालो, " अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा–" मूळ श्लोकानुसार या पाच कन्या नित्य स्मरणाला योग्य अशा. पण आमच्या खेड्यांच्या भाषेत त्या गटात रावणाची बायको मंदोदरीचा समावेश नाही. नवऱ्याच्या दुष्ट-पणाचा आरोप तिच्यावर करतात. एखादी बाई धीट किंवा नवऱ्याला न जुमानणारी असली तर तिच्या बाबतीत कोणी " ती कशी आहे " विचारताच " ती ना मंदोदरी आहे " असं म्हणतात. त्याच अर्थानं मी हा श्लोकार्ध म्हटला होता. सभावंताना ते कळलं म्हणून ते हसू लागले.

" पाचच क्षणात तुम्हालाही समजलं म्हणायचं. "

" तिच्या बोलण्यावरून तिचा पूर्ण स्वभाव समजला. तिची राहणी, तिचं बोलणं, तिचा दंभ पाहिला तर असं वाटतं की दहा गावं जिंकलेली ती राणीच आहे. यशवंतरावांनी हिच्या सहवासात कसे दिवस घालविले असतील असा विचार आता माझ्या डोक्यात येतो आहे.

" संसार म्हणजे दोन घोडे जुंपलेला रथ असं म्हटलं जातं. पण या संसाराला जुंपलेले प्राणी घोडे नव्हेत. पशूची उपमा द्यावयाची झाली तर त्याला हत्ती आणि वाघ जुंपलेला रथ म्हणावं लागेल. वाघाला जनावर म्हणता येत नाही. ते श्वापद. आणि यशवंतरावही जनावर नव्हेत. ते जनावर असते तर हिनं त्यांना गिळून टाकलं असतं. ते हत्ती होते म्हणूनच वाघाने रथ ओढला नाही तरी स्वतः त्यांनी तो ओढला. आपलं गांभीर्य ढळू दिलं नाही. शेवटी एके दिवशी जू टाकून इकडे आले.

" आईच्या सहवासानं सीतारामही तिच्याचसारखा झाला आहे असं वाटतं. पण पाहा, काल होनगट्टेला त्या मुलीला भेटून आलो ना ! जलजाक्षी नावाची त्यांची मुलगी. काय तिची चालचालणूक, काय तो विनय, किती सहनशीलता. तिचा नवरा मंजय्याही तसाच आहे. जाताना वाटेत त्यांचा मुलगा यशवंत मला भेटला. तोही तसाच. मी कोण हे कळण्यापूर्वीच केतरकी मंजय्याचं घर दाखवितो म्हणून निघाला. " मी सांगितलं.

"अहो चांगली मुलं होणं यालासुद्धा पुण्य पाहिजे. पैसा मिळतो. नशिबात असेल तर कोणालाही तो मिळतो. शील आणि गुण हे नशिबानं मिळणारे नव्हेत. पूर्वपुण्याईनं ते मिळतात. " सभावंत म्हणाले.

मी फक्त मान हलविली- आम्हाला जे कळत नाही त्याला ' आपण अदृष्ट, नशीब ' वगैरे म्हणतो आणि समजलं की ' पूर्वपुण्याई, प्रारब्ध, कर्म ' म्हणतो. खरं आहे. पण आपल्याला भविष्याच्या या अशा व्यवहारात काय स्थान आहे ? तुमच्यामुळंच जग चाललं आहे असं कोणी समजायचं कारण नाही. पण आपल्या शीलाला आपणच जबाबदार आहोत असं समजण्याचा माणसांनी प्रयत्न करायलाच पाहिजे. नाहीतर आत्मशक्ती नसलेल्या पदार्थाप्रमाणेच माणसाला मानावं लागेल. ही आत्मशक्ती निर्माण करायला, वाढवायला, रक्षण करायलाही एका प्रकारच्या शक्तीचीच आवश्यकता नाही का ? जेवढ्या सुलभ रीतीनं माझ्या मित्रांनी समाधान मिळवलं तेवढ्या सुलभतेनं ते आम्हाला मिळू शकेल का ?

सभावंतांना त्यांच्या घरी सोडून मी थोडासा समुद्रकिनारी जाऊन येतो असं सांगून पुढे निघालो. तिथं जाऊन पोचायला एक तास लागला. त्या संध्याकाळच्या भेटीमुळं माझं मन पूर्णपणे दुखावलं होतं. समुद्रकिनाऱ्यावर बसून, लोळून, किनाऱ्यावर येऊन आदळणाऱ्या लाटाकडं पाहात वेळ घालविला. आकाशात मावळणाऱ्या सूर्याचं बिंब लाल होऊन, मोठं होत होतं. दिगंताचं टोक गाठत होतं. विझणाऱ्या दीपाचा प्रकाश फार असं म्हणतात तसंच बुडणाऱ्या सूर्याचं सौंदर्यही वाढत जातं. वाद, प्रतिवाद, निंदा, हेटाळणी, स्तुती वगैरे अनेक गोष्टी मी माझ्या मित्राविषयी ऐकल्या. पण माझा नि त्यांचा परिचय झाला होता तो त्यांच्या जीवनाच्या शेवटी सायंसमयी. संध्याकाळच्या सूर्याप्रमाणे, भरलेल्या जीवाप्रमाणेच ते भासले. त्यांचा चेहरा, आकार, चाल, सगळ्यांत सौंदर्यच दिसलं. त्यांच्या मृत्यूनंतरही तसंच, माझ्यासमोर खरोखरीचा सूर्य बुडाला. तरी बराच वेळपर्यंत त्याचा सोनेरी रंग आकाशात दिसतो. सायंकालीन शांतता, सौंदर्य वगैरेंचं आकर्षण शिल्लक राहते. मला सोपवलेली यशवंताची रोजनिशी म्हणजे माझ्या वाट्याला आलेला सोनेरी प्रकाशच वाटतो.

सूर्य मावळला. उद्या तो पुन्हा उगवतो असाच आमचा अनुभव आहे. त्यामुळेच एके दिवशी माणसाला मरण आले तरी उद्याच्या दिवशी तो नवा देह धारण करून येतो अशी कल्पना मानवाच्या हृदयात अंकुरित झाली असावी. मृत्यूची भीती नसणाऱ्या मनाने तरी तशीच कल्पना रंगवावी. हा सूर्य स्वतःच्याच शरीरात उद्या येतो. परवाही येतो. प्रत्येक दिवशी येतच असतो. पण आम्ही ? शरीराचे वस्त्र फेडून जाणारे मानवी जीव ! पुनर्जन्मी दुसरं शरीर धारण करून येतो असे म्हणतात. हा सूर्य पुन्हा उगवला तरी काल हाच सूर्य येऊन गेला होता हे आपण ओळखतो. माणूस पुनर्देह धारण करून आल्यास ओळखू शकतो का ? कधीच नाही. आजपर्यंत कोणीही

ओळखले नाही. तरीपण तशी इच्छा, तसा विश्वास आपल्या भावनेत मुरला आहे. गेल्या जन्मी आपण काय होतो, पुढचा जन्म कोणता येईल हे कोणालाही कळणे शक्य नाही. तरीपण आपल्या देवाच्या सगळया जन्मांची आम्हाला ओळख आहे. भावनेच्या जगतात देवाचे सगळे अवतार मनुष्य ओळखतो.

चिरंतन जीवन जगता यावं याच आशेनं तो असं करीत असावा ना ?

माझ्या मनात समुद्राच्या लाटांप्रमाणे अशाच काही भावना उफाळून, उसळून आल्या. एक लाट दुसऱ्या लाटेचं अस्तित्व मिटवून आपणच मिरवते. मिरवून काही मिनिटांत तीही मिटतेच. आपण पाहात असलेली एक एक लाट लोटते, फुगते, मोडते, मिटते. पण समुद्रावर लाटा नाहीत असं कधी घडत नाही. एक ना एक लाट असतेच. एकामागून एक येतच असते. आपलं जीवनही असंच नाही का ? देह गेला तरी, व्यक्तीच्या लाटा मिटल्या तरी, लाटा चुकल्या नाहीत. तोच समुद्र, तेच पाणी, तोच वारा यापासून जीवनपरंपरा सदैव वाहातच असते. पुनर्जन्माचंही तसंच नाही का ?

अशा प्रकारची स्वप्नं रंगवीत मी समुद्रकिनारी उठून उभा राहिलो. आकाशाने आपली कांती गमावली होती. त्यात असंख्य तारे चमकू लागले होते. पुण्यात्म्यांचे जीव म्हणजेच आकाशातील तारे असं म्हणतात. स्वर्गात जाऊन मिरवणारी नक्षत्रं म्हणतात.

कल्पनेच्या घोड्याला मानवाची इच्छा तिथंही पळवीत असते. मरणानंतरही चिरायू होऊन राहण्याची त्याची इच्छा प्रबल असते. ध्रुव ताऱ्याला चिरंतन तारा असं म्हणतात. मानवाच्या आयुर्मर्यादेशी तुलना केली तर डोंगर, धोंडेसुद्धा चिरंतनच म्हणावे लागतील. नक्षत्रांची काय कथा ! नक्षत्रांच्या मालेत माझे मित्र यशवंतरावही गेले असं मला वाटलं. त्यांची मात्र तशी इच्छा नव्हती ; विश्वास तर मुळीच नसावा.

समुद्रतीरापासून एक मैलाचा रस्ता तुडवीत परत कुमठा पेठेत आलो. तेव्हा आठ वाजले होते. त्यावेळी माझे मित्र आपल्या स्नेह्यांबरोबर फिरायला गेले होते. त्याची ओसरी रिकामी दिसत होती. रात्रीचं जेवण नऊ किंवा दहा वाजता त्याच्या घरी होत असे. मग इथल्या खांबाला टेकून कशाला बसायचं ? आपल्या वकील मित्रांना भेटून सविस्तर बोलावं असं वाटून मी त्यांच्या घरी गेलो. सुदैवानं मुर्डेश्वर वकील घरीच होते.

" काय हो, कालही तुम्ही आला नाहीत आणि आजही दिवसभर दिसला नाहीत. " ते म्हणाले.

" आता आलो आहे ना? बोला काय आहे तुमच्या गावचा समाचार? प्रॅक्टिस वगैरे चांगली आहे ना? " मी चौकशी केली.

" हो. माझ्या आवश्यकतेपुरती आहे. सगळे दावे मी अंगावर ओढून घेत नसतो. जुने काही अशील मात्र सांभाळून आहे. एकाच माणसानं जीवनभर राबलं तर enjoy तरी केव्हा करायचं, सांगा? " ते म्हणाले.

" असं होय. आता तुम्हाला तसली लहर आली वाटतं?" मी विचारले. अशा आमच्या गप्पा रंगत चालल्या असताना अकस्मात त्यांनी प्रश्न केला.

" आमच्या सीताराम हेगडेकडं आपण जाऊन आला म्हणे? "

" तुम्हाला कुणी सांगितलं? म्हणजे तुमच्या गावच्या भिंतींनाही कान आहेत की काय? "

" तसं नव्हे. तो सीतारामच माझ्याकडे आला होता. चांगला परिचय आहे मला त्याचा. "

" फार दिवसांपासून का? "

" त्याच्या वडिलांच्या काळापासून. हा आपल्या बापासारखा नाही. फार संभावित आहे. हा आहे perfect gentleman.

" कोणी तरी असायलाच हवं. नाही का? '

" तुम्हा दोघांत एक वाद होता म्हणे. परवा जेव्हा तुम्ही मला भेटून गेला, त्यावेळी मला वाटलं त्यासाठीच आला असाल. तस तुम्ही आलात हे बरंच झालं म्हणा. तसं काही असलं तर आपसांतच राजीखुशीनं हे प्रकरण मिटवलेलं बरं.... शिवाय..... "

" आमचा काही वाद नाही. "

" असं कसं? त्यानं तुम्हाला रजिस्टरने नोटीस पाठविली होती ना? "

" नोटीस? हो पाठविली होती. वकिलांची ही तुमची पिढी असेपर्यंत या नोटिसांची फेरी चालणारच. "

" त्याची नक्कल मी पाहिली होती. "

" कशाची? "

" नोटिशीची व यशवंत हेगडे याच्या पत्राची. तुम्हाला आलेलं हे पत्र म्हणजे will नव्हे. 'मी येईपर्यंत माझा पैसा तुमच्याकडे राहू द्या.' असंच लिहिलं आहे ना? म्हणूनच म्हणतो हे एकप्रकारे राजीखुषीनं मिटवलेलं बरं. "

" राजीखुषीनं म्हणजे? "

"तुम्ही खर्च केलेला अल्प स्वल्प पैसा वजा करून राहिलेय। सीतारामाला देऊन टाका. एकूण या घाणीतून हात धुऊन घ्या."

"असं होय ?"

"का ? मी म्हणतो ते बरोबर नाही का ?"

"वकिली दृष्टीनं बरोबर आहे."

"दुसरी कोणती दृष्टी असते."

"यशवंतरावांची एक दृष्टी होती हे मी विसरू शकेन काय ?"

"तो एक शतमूर्ख पाहा; शुद्ध fool. या गावी तो असताना त्याचा माझा निकटचा संबंध होता. अहो आपली बायको, मुलं यांच्याबद्दल काही चिंता, करुणा असावी का नाही ? हा मात्र नसल्यासारखा वागला."

"अहो असताना त्यांना कुणी सुधारलं नाही म्हणून ते तसं वागले. आता तुम्ही आम्ही सुधारू शकतो काय ?" मी म्हणालो.

"ते आता शक्य नाही हे खरं आहे. पण लोकानुभव, न्याय, नीती, समजुतदार-पणा असणाऱ्या तुमच्यासारख्या माणसांनी तर्कानं, विचारानं त्याला सुधारावं."

"कुणाला ? कोणत्या गोष्टीला ?"

"मी त्याच्या पैश्याच्या बाबतीत बोलतो आहे."

त्यांचं बोलणं ऐकून मला पूर्णपणे कंटाळा आला. ही वकालत मला मानवली नाही. मुर्डेश्वर माझे जुने मित्र होते तरीपण ते पक्ष धरून बोलत होते हे स्पष्ट होतं. त्यामुळं मी म्हणालो, "मि. मुर्डेश्वर, आता आपण दुसरं काही बोलूया. आपसात वितुष्ट कशाला ?" त्यानंतर पैश्याविषयी ते काही बोलले नाहीत. माझ्या स्नेह्याबद्दल बोलू नये ते बोलून गेले. त्यांच्या दृष्टीनं कुमठ्यात "परम नीच" या पदाला एखादी व्यक्ती योग्य असेल, तर ती यशवंतरावच होय. अतिलोभी, अतिमूर्ख, क्रूर हृदय वगैरे त्यांनी अनेक नावं ठेवली. त्या उलट त्यांची बायको व मुलगा म्हणजे देवानुदेवच जणू !"

गांभीर्याची सीमा न ओलांडता त्यांनी अशी टीका केली असती तरी माझं मन दुखावलं नसतं. पण या बाबतीत त्यांनी सीमा ओलांडली होती त्यामुळे मला थोडासा राग आला.

"हे पाहा, वकीलसाहेब, यशवंतरावांची माहिती मला विशेष नसली तरी मी त्यांना पुरेसं जाणतो. पाच सहावर्षांपासून तरी त्यांचा मला चांगला परिचय आहे.

ते देव नव्हते हे जरी खरं असलं तरी तुम्ही म्हटल्याप्रमाणं ते राक्षसही नव्हते. त्यांना एक योग्य व्यक्ती म्हणता येईल एवढं मी निश्चित सांगू शकतो."

"ते होय......"

"आपल्या दोघांपेक्षा पुष्कळच योग्य होते. मला तेवढंच पुरे आहे. बरंय जाऊन येतो" असं म्हणून दुखावलेल्या मनानं त्यांच्या ओसरीवरून खाली आलो. त्यांनाही आपलं अती झालं हे कळलं असावं म्हणून त्यांनी म्हटलं,

"नाही हो, रागावता कशाला ? माणसानं sportive असायला पाहिजे."

"गेलेल्या माणसाबद्दल बोलताना आपण मात्र ते दाखविलं नाही. मीच तुमचा sport झालो."

"I am sorry"

"ज्यांच्याविषयी अन्यायाचे उद्‌गार काढलेत त्यांची क्षमा मागा." एवढंच म्हणून मी निघून आलो.

एका मागून एक विषम प्रसंग येऊन त्या दिवशी माझी डोकेदुखीच वाढली. तासभर समुद्रकिनाऱ्यावर बसून मिळविलेली शांती लुप्त होऊन गेली. वकील मुर्डेश्वर परके होते. निःपक्ष दृष्टीनं या विषयाकडं पाहू शकतील, माझ्या मित्राचं सत्यचित्र उभारू शकतील या आशेनं मी त्यांच्याकडं गेलो होतो. पण जे मिळालं ते मात्र त्याच्या विरुद्ध होतं.

सभावंताच्या घराकडं परत जात असताना रात्रीचे दहा वाजले होते. ते माझी वाट पाहात बसले होते. "काय हो, पुन्हा कुठं गेला होता ?" त्यांनी विचारलं. सांगणं मला योग्य वाटलं नाही.

"उशीर झाला. पानं मांडली आहेत. जेवायला चला. वाटल्यास नंतर सांगा." मला त्यांनी उठवलं. पानावर बसलो. पण मला काही नकोसं झालं होतं. यशवंतरावांविषयी वेडंवाकडं ऐकून मला अतिशय वाईट वाटलं होतं. म्हणजे मी यशवंतरावांचा पक्षपाती झालो की काय असा संशय माझा मलाच आला.

आपल्या स्वतःच्या प्रिय व्यक्तीबद्दल थोडासा मोह असल्यामुळे विवेक समदर्शित्व, तोल मी विसरलो असेन. नाहीतर माझं मन इतकं उद्विग्न का व्हावं ? सीताराम हेगडे आणि मुर्डेश्वर वकील यांच्या घरी माझी सहनशीलता कुठं गेली ? त्याउलट होनगद्दीला गेल्यावेळी वात्सल्य, प्रेम, स्नेह वगैरे का निर्माण व्हावेत ? मीही माणूस आहे. विविध प्रकारच्या भव्य रसांच्या आधीन. अप्रिय गोष्टी मलाही उद्वेग आणतात व प्रिय गोष्टी संतोष देतात. मी काही अलिप्त राहणारा जीव नव्हे.

त्या रात्री खीर केली होती. " खीरच ती, दोन चमचे जास्त खा " असे आग्रहाचे बोल माझ्या कानी पडले. पण हात धुवायला आल्यावेळी 'कसली खीर होती ?' असं कुणी विचारलं असतं तर मला खचितच सांगता आलं नसतं. माझं लक्ष जेवणात नव्हतंच मुळी. जेवणाची रुची म्हणून काही राहिली नव्हती. जीवनाच्या बाबतीत तसं घडलं तर ? कसं होईल ? माझ्या मित्रांच्या बाबतीत असंच घडलं असतं तर ? खिरीच्या जेवणाप्रमाणच ते झालं असतं म्हणजेच आग्रहानं, प्रेमानं वाढणाऱ्यांच्या बाबतीत मी पाषाणासारखाच झालो होतो नव्हे का ? ज्यांनी मला स्नेह दिला त्या परममित्र यशवंताच्या वाट्याला मी पाषाणासारखा झालो असतो. तेवढा निर्लिप्त-पणा नको रे बाबा. मनुष्यानं मनुष्य म्हणूनच राहणं योग्य आहे. पाषाण होणं काही भूषणास्पद ठरणार नाही. ओसरीवर येऊन बसल्यावर मला असं वाटलं.

पद्मपत्रमिवांभसि ।

पद्मपत्रावर पडलेल्या पाण्याच्या थेंबासारखं माणसानं कशालाही न चिकटता राहावं म्हणतात. आश्रय देणाऱ्यालाही आमचं मन चिकटून रहात नाही.

पाण्याचा थेंब तसा असेल. पाण्याला जीव नाही. सजीव पद्मपत्राला पाण्याच्या त्या स्नेहाबद्दल काय वाटेल हे मला माहीत नाही. पण त्याला पाणी नको असतं का ? जीवधारी माणूस तसा झाला तर ! 'जीव' असणाऱ्याची ओळखच मग राहणार नाही. विचित्र अशी उपमा आहे ही. शंभरांतून केवळ एक किंवा दोन गुणांत तरी उपमेच्या वस्तूत सादृश्यता असते. उपमाच थोडीशी गिळल्यास कसं ?

जेवण संपवून ओसरीवर पानाच्या तबकापुढं सभावंतांसमोर मी बसलो होतो. तरीपण माझं मन कुठंकुठं भटकत होतं. भावजीवन चूक आहे असं मला वाटलं नाही. वाटणारही नाही. मात्र ते विवेकाच्या आधीन असावं. सीमा ओलांडणारा उद्वेग चुकीचाच. त्यामुळं आपणहून मी सभावंतांना म्हटलं, " आज मी एक चूक केली असं वाटतं. तुम्ही घरी नसल्यामुळं मी वकिलाकडं गेलो होतो. "

" मुर्डेश्वर वकिलाकडे का ?"

"होय. तुमच्यासारखाच त्यांचाही बऱ्याच दिवसांपासून परिचय आहे. त्यांच्याबद्दल मला अभिमानही होता. आज त्याचा चुराडा झाला."

" म्हणजे ?"

थोडक्यात तिथं झालेली चर्चा मी त्यांना सांगितली आणि म्हणालो,

" संध्याकाळी हेगड्यांच्या घरी गेल्या वेळी माझं मन बिघडलं होतं. यांच्या घरी तरी समाधान मिळेल म्हणून गेलो, तर जखमेला मीठ चोळल्यासारखं झालं."

" अहो, त्यांचा यांचा फार स्नेह . . . आमच्या सीतारामाच्या घरचे हे वकील आहेत."

" ते मला माहीत नाही."

" बरं आता काय झालं तिथं ?"

जे काही झालं ते मी थोड्याशा विस्तारानं सांगितलं. माझ्या मित्रासंबंधी न शोभणारं विधान त्यांनी केल्यामुळं मला राग आला आणि मी त्यांना हिणवून बोललो. " स्नेह्याबरोबर मी रागानं बोलायला नको होतं नाही ?" मी म्हणालो.

" तुम्हाला प्रिय असणाऱ्या व्यक्तीबद्दल, मेलेल्या माणसाबद्दल त्यांनीही तसं बोलायला नको होतं."

" तशा प्रकारे पक्षपात करून ते बोलतील असं मला वाटलं नव्हतं."

" तर मग तुम्हाला एक गुपित सांगू का ?"

" कसलं गुपित ?"

" आपले मुर्डेश्वर वकील दिसतात तसे नाहीत. त्यांची कथा आम्हाला काही अपरिचित नाही. त्या बाईचा नि त्यांचा बरेच दिवसांपासून संबंध आहे."

" खरं का ?"

" निव्वळ जिभेचा चाळा म्हणून मी निंदा करतो असं समजू नका."

काही क्षण मी स्तंभित होऊन बसलो होतो. त्यानंतर सभावंतांनीच म्हटलं, " खूप उशीर झाला. आता झोपू या."

" आज चांदणं पडलं आहे. निजलं तरी मला झोप येण्यासारखी नाही. कुठंतरी फिरून येऊ या." मी म्हणालो.

" रात्री कधी मी फिरायला जात नाही . . . . तुम्ही म्हणत असाल तर . . ."

" एकट्यालाच कंटाळा येतो म्हणून. भीती वाटत नाही."

" कुठं जाऊ या ?"

" आणखी कुठं ? हायस्कूल असलेल्या टेकडीवर . . ."

अध्याय अकरावा

कुमठ्यातलं माझं काम संपल्यासारखंच होतं. पुन्हा एकदा होनगद्दे मंजय्याकडं जाऊन, त्यांच्या सुखदु:खाची चौकशी करून, माझं दुखावलेलं मन हलकं करून आलो. धारेश्वर शीन अथवा त्याची आई कुठं असते याची माहिती नव्हती. त्या शीनची बहीण कुठंतरी शिक्षिकेचं काम करते एवढी एक उडती वार्ता मंजय्याकडून समजली. या खेपेस त्यांच्या घरून येत असताना यशवंत, जयवंतच नव्हे तर छोटया भगवंतानंही मला बिलगून, हात धरून ओढत, 'पुन्हा एकदा यायला पाहिजे. जरूर यायला पाहिजे.' असा आग्रह केला. मंजय्याच्या बायकोनं. 'आमच्या आईकडं जाऊन आला ना ? सगळी माणसं चांगली आहेत ना ?' वगैरे विचारून माहेरच्या माणसाबद्दल कुतूहल दाखविलं.

त्यानंतर पुढचा विचार करीत सभावंतांच्या घराकडं चालत आलो. वाटेत माझ्या अविवेकाचं चित्र मला दिसू लागलं. माझ्या मित्रांनी मला सोपवलेल्या रकमेतून महिन्या महिन्याच्या मदतीला किती रुपये गेले असतील ? ते व्याजातून जायला हवेत ना ? मूळ धनातून विनायकाच्या देवळासाठी द्यावयाचं देऊन झालं. आता मंजय्याच्या मुलांच्या विद्याभ्यासाला सहाय्य करायचं कबूल केलं आहे. हे सगळं असंच चाललं तर तो पैसा किती दिवस पुरेल? मूळ धनातून [illegible] खर्च करीत गेलं तर या सगळ्यांना मदत मी किती दिवस करू शकेन ? असे अनेक विचार माझ्या मनात डोकावून गेले. या चिंतनातच मी सभावंतांच्या घरी प्रवेश केला.

सरशी आणि तिच्या मुलांच्या बाबतीत त्या घरी विचारता यावं काय ? त्यांना काही माहिती असेल का ? कुमठ्यापर्यंत आल्यासारखं हिच्या बाबतीत काही समजलं तर या बाबतीत माझी जबाबदारी किती हे स्पष्ट होईल. कदाचित धारेश्वर शीननं लिहिल्याप्रमाणं त्याच्या आईची प्रकृती बरी नसावी. यशवंतांची हिशेबाची वही, पावती वगैरे आठवून पाहिलं तर तिला पैसा पाठवल्याचं आढळून आलं नाही. यशवंतांचे आणि तिचे पूर्वसंबंध होते. त्या संबंधाचा शेवट विरसतेनं झाला नसावा. अनिवार्यपणे ते तुटले असावेत. तसं असेल तर यशवंतराव मुंबईला असताना त्यांचा परस्पर पत्र-

व्यवहार होत असे का ? कदाचित अगदी शेवटीच तिचे संबंध त्यांना आठवून, ऋणाची फेड करावी असं वाटून या मासिक मदतीचा निर्देश दिला असावा. मग तिचा पत्ता त्यांनी का दिला नाही. तिच्या मुलांचंच नाव का सुचविलं असावं. आपले पूर्वसंबंध मला कळू नये अशीच कदाचित त्यांची इच्छा असावी. आणि अशी सूक्ष्म व्यथा असणही स्वाभाविक आहे. म्हणूनच त्यांनी मुलांचं नाव सुचविलं असावं अशी माझी समजूत झाली.

अन्य बाबतीत माझे स्नेही सभावंतानाच मला विचारावं लागलं. मान उंच करून त्यांनी थोडासा विचार केला. काही वेळानं त्यांनी सांगितलं, " हे पाहा, तिचा मुलगा शीन जिवंत आहे हे खचित . मला वाटतं एक मुलगीही असावी. इथंच कुठं तरी असावी ती. सिद्धापूरच्या कुठल्याशा कोपऱ्यात असावी ती. अध्यापिका असून तिचं लग्नही झालं आहे असं वाटतं. कुमठ्यात या सरशीचे कुणी दूरचे नातेवाईक असतात. बघूया. आज आहात ना तुम्ही ? संध्याकाळपर्यंत विचारपूस करून कळवितो. "

त्या दिवशी दुपारचं जेवण झाल्यावर मला भरपूर वेळ होता : वेळ होता म्हणजे काय, मला दुसरं कामच नव्हतं. बराच वेळ उशीवर डोकं ठेवून घरच्या यजमानाप्रमाणं मी एक झोप काढली. त्या झोपेत नाही नाही ती स्वप्नं पडली. माझ्या कल्पनाकाशात यशवंत आणि सरशीच्या स्नेहसंबंधाची अनेक चित्रे नाचू लागली. कमलम्माच्या विरुद्ध तिचं रूप होतं. म्हणण्यासारखी काही रूपानं ती सुंदर नव्हती. संगीताचा अभ्यास तिनं चांगला केला होता. कुलवृत्तीच्याविरुद्ध तिचं कुलीन शील असावसं वाटलं. स्वप्नच ना ते ? माझा विश्वास यशवंतावर फार असल्यामुळं मला तसे दृश्य स्वप्नांत दिसले असावे. एक प्रसंग विकाराचाही दिसलाच – तो म्हणजे मी आदल्या दिवशी ज्या मुर्डेश्वर वकिलांशी भांडून आलो होतो ते माझे मित्र नसून, एके दिवशी सरशीच्या घरी गेल्यासारखं दिसलं. " तुमचं इथं काय काम आहे ?" तिनं विचारले. " यशवंत हेगडे आहेत का हे पाहायला आलो. " त्यांनी उत्तर दिलं. " त्याच्या घरीच तुम्ही त्यांना भेटू शकता ना ? " तिनं म्हटलं. तरीही ते तिथंच थांबून राहिल्याचं पाहून सरशीनं रागानं म्हटलं, " जा म्हटलं ना ? ते इथं नाहीत." अजून अशी किती दृश्ये दिसली असती कुणास ठाऊक ? माझ्याजवळच झोपलेल्या सभावंतांनी मला उठविलं. " अहो, कॉफीची वेळ झाली, उठा. " डोळे चोळीत मी उठून तोंड वगैरे धुऊन आलो. उपाहार संपताच माझे मित्र कामासाठी बाहेर निघून गेले. मीही फिरायला निघालो.

फार दूर जाण्याचं त्राण माझ्या पायात नव्हतं. मन तर पूर्णपणे मुग्ध झालं होतं. जवळच्या बंदरावर जावं म्हणून मी हळूहळू चालत बंदराच्या वाटेवर आलो. खाऱ्या पाण्याच्या खाडीत ओहोटीमुळं पाणी खूपच आत गेलं होतं. आठदहा होड्या चिखलात रुतल्या होत्या. समुद्रात होड्या जाऊन येण्यासाठी खाडीत पुरेसं पाणी नव्हतं. लहान लहान जाळ्या हातात धरून कोळ्यांची पोरं गढूळ पाण्यात पळत पळत मासे धरीत होती. जाळ्यात सापडलेले छोटे मासे हात घालून धरताच भिजलेले मासे निसटून जाण्याचा प्रयत्न करीत. त्यांचा जीवनाचा अंतही तेव्हाच. उसळी घेऊन खाली पडले एवढंच. लगेच ते कोळ्याच्या हातीच पडले. नारळाचे चिरलेले फादे घेऊन ते माशाच्या पोटात घुसवून तोंडावाटे बाहेर काढून त्यांची ती मुलं माळ गुंफीत होती. काही माशांचे जीव पूर्ण गेले नसल्यामुळे माळेतच धडपड करीत असलेले पाहून माझं कुतूहल संपलं नि मला करुणेनं तोंड फिरून बसावं लागलं. "मेल्यावरही त्यांची तडफड चुकली नाही ना ?" हाच विचार मनात घुमत होता.

मला दुसरं काय काम होतं ? खाडी पाहायची. रस्त्यात चाललेलं भांडण ऐकायचं. जाणाऱ्या येणाऱ्या गाड्या बघायच्या. एकचित्तानं ध्यान करायचं. कोळ्याचा आणखीन एक मुलगा येऊन नदीच्या काठावर बसला. बगलेत असलेल्या पिशवीत हात घालून लाल लाल गांडुळांचे तुकडे लहानशा लोखंडी गळाला अडकवून त्याने तो गळ पाण्यात फेकला. माझ्यासारखाच तोही तप करीत बसला. माझंही तपच होतं. त्याचंही तपच. त्याच्या तपाचं फळ म्हणून आठ दहा मासे तरी हाती लागले. एकेक मासा करंगळीएवढा होता. माझ्या तपाचं फळ – मनात चमकून गेलेले एकेक विचार, एकदोन क्षण तरंगून तोंड दाखवून अदृश्य झाले. माझ्या मित्रांच्या पूर्वेतिहासातून सुचलेले ते विचार नसून मी कल्पिलेल्या घटनाच होत्या. त्याला वास्तविक आधार नसल्यामुळं की काय माझ्या ध्यानाच्या गळाला एकही मासा गवसला नाही. तिथं मी किती वेळ बसून राहिलो न जाणे. संध्याकाळ झाली. प्रकाश कमी झाला हे जाणवलं. खुळ्यासारखा उठून मी सभावंताच्या घराकडं निघालो. त्याच वाटेवरून माझ्या समोरूनच सीताराम हेगडेला आपल्या मित्राबरोबर जाताना पाहिलं. आपणहून तो बोलला नाही. मीही त्याच्या वाटयास जाण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. सभावंतांच्या घरी जाऊन तिथल्या एका आराम खुर्चीवर टेकलो. मला झोप लागली असावी. जाग आली तेव्हा आठ वाजले होते. सभावंत माझ्या जवळच पानसुपारी 'चघळत बसले होते. त्यांनी मला उठविलं नाही. मी जागा होताच,

"काय हो आज झोपेवर झोप काढताहात? दुपारीही भारी झोप झाली. फार थकवा आला की काय?" असा त्यांनी प्रश्न केला.

त्यांचा प्रश्न माझ्या डोक्यात शिरायलाच दोन क्षण लागले. "हो, होय. खूप झोप झाली. काल रात्रभर धड झोप झाली नाही की जागरणही नाही. एक विचित्र नमुनाच म्हणाना!"

"तुमचं एक विचित्रच आहे. तुमच्या मित्राबद्दल ते मुर्डेश्वर वकील आणि सीतारामाच्या आईनं थोडंसं कमीजास्त बोलल्याचं ऐकून एवढं काय मनाला लावून घेता. मुळीच ते मनाला लावून घेऊ नका. अहो, कुत्रा भुंकला म्हणून देवलोक ओसाड होईल काय? कोणी काही म्हणोत, मी सांगतो ना यशवंत हेगडे म्हणजे सोन्यासारखा माणूस. त्याचा नि माझा तेवढा घरोबा नसला तरी मी त्याला जाणलेलं नि पाहिलेलं आहे." माझ्या मनाची व्यथा कमी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

"तिच्या बाबतीत विचारपूस करून आला का?" मी त्यांना विचारलं.

"होय. चौकशी करून आलो. तुम्ही आता सरळ आपल्या गावी जाऊ शकता. सिद्धापूर गिद्धापूरच्या भानगडीत पडायचं काही कारण नाही. असं कळलं की सरसीला मरण येऊन दोन वर्षं होऊन गेली. तिचा मुलगा शीन हा सिद्धापूरजवळच्या कोडकणी नावाच्या गावी राहतो. इथं कोडकणी नावाची दोनतीन गावं आहेत. तो राहतो ते कोडकणी गाव सिद्धापूरजवळचं."

"असं का?" मी चकित स्वरात विचारलं. एवढं सगळं कळूनही तिच्या-बाबतीत जास्त जाणण्याची माझी उत्सुकता होतीच

"आता ती नाही हे खरं आहे. पण तिचा मुलगा आहे, एक मुलगीही आहे. अलीकडं तिची बदली साणिकट्टीला झाली असं ऐकण्यात आहे. नवरा-बायको त्या गावी अध्यापक आहेत असंही कळलं. तेवढी तुमची उत्सुकता असली तर साणिकट्टी-पर्यंत जाऊन या. गोकर्णाहून दोन मैल अलीकडंच आहे. तिथपर्यंत बसही जाते. वाटल्यास नावेनंही साणिकट्टीला जाऊ शकता. तिच्या मुलीशी आणि जावयाशी बोलून या."

"तसं करता येईल."

"खरंच जाणार का? तुमचं एक वेडच आहे!"

"सरसीची मुलगी माझ्या मित्रांची मुलगी आहे ना? मी काय म्हणतो ते कळलं असेलच. 'सरस' शब्दाच्याविरुद्ध विरस शब्द आहे. दांपत्यप्रेमात अनुकूल

दांपत्य म्हणजे 'सरस दांपत्य' आणि प्रतिकूल असलं की 'विरस दांपत्य'. दांपत्य शास्त्रोकच असावं असं काही नाही. त्यांच्या शास्त्रोक्त दांपत्याचं एक फल पाहिलं, आता त्यांचं गांधर्व दांपत्य कसं होतं हे समजून घेण्याची उत्सुकता आहे."

"चांगलं वाईट दोन्हीतही असतंच. मंगळसूत्र बांधल्यानं किंवा न बांधल्यानं नवराबायकोचं ऐक्य सिद्ध होतं असं नाही, तसंच मुलांच्या बाबतीतही आढळून येईल. चांगल्याची मुलं चांगलीच होतील, वाईट होणार नाहीत असंही म्हणता येत नाही."

"ते तर नाहीच नाही."

"मग काय करणार तुम्ही?"

"साणिकट्टीला जाऊन येतो."

"तिथं गेलात तर जेवणाचं कसं करणार? रात्र होण्यापूर्वी येऊ शकाल. दुपारी लंघन होईल. उद्या सकाळी निघाला तर?"

"एखादं जेवण चुकलं तर असं काय होणार आहे?"

"धारेश्वर शीनला भेटायला जाणं नको. तो फार दूर राहतो."

"अजून तसं काही ठरविलं नाही मी. त्यानं माझी थोडीशी वंचना केली आहे. म्हणून त्याच्या बाबतीत अनुमान आहे." आणि तो सगळा प्रसंग समजावून सांगितला. "मोठे उपकार झाले असे आई म्हणते. तिने दोनतीन दिवस जेवणच सोडलं." असं त्यानं पत्र लिहिलं होतं. एकतर त्याची आई मेली हे खोटं असावं किंवा ते सत्य त्यानं लपविलं असावं. आणखी एका व्यक्तीनंही असाच धोका दिला होता ते नुकतंच सुधारून आलो. त्यामुळं शीनकडं जावं अशी इच्छा नाही. हिच्या गावी जाऊन येतो. साणिकट्टीला असते म्हणाला ना?"

"होय तिथल्याच शाळेत आहे. रस्त्याला लागूनच शाळा आहे. लहानशी शाळा. तशी काही मोठी नव्हे."

"शाळा कशी का असेना मला काय करायचं आहे?"

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून तोंड धुऊन कुमठ्याहून गोकर्णाला जाणारी पहिली मोटार मी धरली. फार दूरचा प्रवास नव्हता. सकाळची वेळ असल्यामुळं उन्हाचाही ताप नव्हता. वाटेच्या कडेला झाडेझुडपे, डोंगरदऱ्या, पुढं लागणारी नदी, नदी ओलांडून पुन्हा पुढे जाणारी वाट वगैरे दृश्य पाहून मनाला संतोष झाला. गेल्या दोन दिवसांपासून मनावर आलेलं दडपण आपोआप नाहीसं झालं. नावेतून

नदी ओलांडावयाला थोडासा उशीर झाला नसता तर नऊ वाजण्यापूर्वी मी साणिकट्टीला पोचलो असतो. तरीपण साडेनऊ वाजता वाटेच्या कडेला दिसलेल्या शाळेजवळ बस थांबवून मी खाली उतरलो. शाळेची दारं बंद होती हे पाहून 'हे काय इतका वेळ झाला तरी शाळेला कोणी कसं आलं नाही? मुलं तरी दिसायला हवीत?" असा विचार मनात आला. शाळेच्या ओटयावर जाऊन बसलो. अर्धा तास संपला तरी जिला भेटायला आलो ती चंद्रमती किंवा मुलं कुणीही येताना दिसेना. हे काय? आज शाळेला सुट्टी तर नसेल असा विचार आला. रविवार असल्यामुळं तो सुट्टीचाच दिवस होता. जवळपास राहणाऱ्या माणसांना त्या दांपत्याचा पत्ता न विचारता उगाचच बसून राहिलो असं वाटलं. उठून बाहेर आलो. शंभर यार्डाच्या आत दोन तीन घरं दिसली. जवळच्या घरी राहणाऱ्यांना चंद्रमती मास्तरणीचं घर कोणतं म्हणून विचारण्यासाठी निघालो असताना एक संशय आला. तिचं नाव चंद्रमती का इंदुमती? सभावंतानी कुठलं नाव सांगितले हे काही आठवेना. त्याच गोधळात पहिल्या घरापुढं जाऊन उभा राहिलो. बाहेर कोणी तरी येईल म्हणून वाट पाहिली पण कोणी बाहेर आलं नाही. मग मीच, "या शाळेचे मास्तर कुठं राहतात?" म्हणून मोठ्यानं विचारलं. एक बाई बाहेर आली. तिनं सांगितलं. "मास्तर गोकर्णाला गेले आहेत. ते सकाळीच गेले." मनावर दुसरा आघात झाला. ती अजून तिथंच उभी होती. मास्तरासंबंधी तिनं सांगितलं असल्यामुळं मास्तरांचं घर निश्चितच तेच असावं असावं असं वाटलं म्हणून तिलाच विचारलं. "मास्तराबद्दल विचारलं खरं पण मला मास्तरच हवे आहेत असं नाही. या शाळेत एक मास्तरीण आहे का?"

संशय आल्यामुळं की काय ती काहीच बोलली नाही. मी सगळं काही पाहात होतो. ती माझ्याकडंच टक लावून पाहात होती.

"आपण कुठले? कोण हवंय तुम्हाला?" तिनं कुतूहलानं विचारलं. तिच्या चेहऱ्याकडं पहात मी उत्तर दिलं, "हे पाहा, खरं म्हणजे मी तिचं नावच विसरून गेलो आहे. तिचं नाव चंद्रमती किंवा इंदुमती आहे. मी परगावचा आहे. असंच एका कामासाठी चौकशी करीत इथं आलो. या शाळेत दोन अध्यापिका आहेत का एकच आहे?" ती हसू लागली. त्या हास्यात होनगद्दीच्या जलजाक्षीच्या चेहऱ्याची छाया उमटल्याचं जाणवलं.

"आपण कुठले? आपलं नाव काय?" पुन्हा तिनं प्रश्न केला. मी दोन्ही सांगितलं. ते समजल्यावर ती म्हणाली, 'या, हेच घर आहे.' ऐकून मला आश्चर्य वाटलं. दोन पाऊलं पुढं जाऊन पुन्हा मी थांबलो.

" या ना. तुमचं नाव मी ऐकलं आहे. तुमची पुस्तकंही वाचण्यात आली आहेत."

हे ऐकून पुष्कळसं धैर्य आलं. माझी निवड चुकली असली तरी तिथं सगळं विवरण विचारायला संकोच राहिला नाही. ओसरीवर गेलो. तिथं असलेल्या एका बाकावर बसायला तिनं सांगितलं.

" मी चंद्रमती नव्हे माझं नाव इंदुमती. मीच मास्तरीण. माझे यजमानही इथंच मास्तर आहेत. आपण त्यांना भेटायला आलात का ? "

" नाही तुम्हालाच. "

" मला ? "

"होय. तू माझ्या मित्राची मुलगी आहेस. म्हणून आलो. दुसरं काही काम नव्हतं. फक्त तेवढयासाठी आलो. तुझा भाऊ शीन मला पत्र लिहीत असे. मी कुमठ्याला आलो होतो. सभावंतांनी कुणालातरी विचारून तुम्ही इथं असल्याची माहिती मिळवली म्हणून भेटून जाऊ या म्हणून आलो."

" शीनअण्णाची ओळख आहे का ? "

" प्रत्यक्ष ओळख नाही. पत्रावरूनच ओळख. त्याची माझी प्रत्यक्ष भेट झाली नाही. तुमच्या वडिलांची मात्र पूर्ण ओळख आहे. "

तिनं आपलं तोंड खाली घातलं. एक दोन क्षण काही बोलली नाही.

" काही संकोच वाटून घेऊ नका. मी यशवंतरावांचा घनिष्ठ मित्र आहे. "

" माझे वडील मला सोडून गेले तेव्हा मी एवढी होते. " तिनं जमिनीपासून दोन फुटावर हात करून दाखविला. "

" मी थोडसं ऐकलं आहे त्या बाबतीत. "

" आमचे वडील मुंबईत कुठंतरी आहेत ना ?"

" आता नाहीत. ते वारले. एक वर्ष होऊन गेलं. "

" काय ? गेले. त्यांचीच आठवण काढीत आमची आई दोन वर्षांपूर्वी मेली. आता तेही गेले का ? "

बराच वेळ ती काही बोलली नाही. मीही स्तब्ध झालो.

" सिद्धापूरजवळ कोडकणीत अण्णा असतो. मागं मीही तिथंच होते. आमची आईही तिथंच होती. कुमठ्याची आठवण तिला नकोशी झाली होती म्हणून आम्हा सगळ्यांना घेऊन ती तिथं गेली. शेवटी शेवटी आम्हाला फार त्रास झाला. पूर्णपणे कंगाल झाल्यावर कुणाकडून तरी पत्ता मिळवून अण्णाकडून तिनं एक पत्र लिहिलं. लगेच त्यांनी शंभर रुपय पाठवून दिले. ते मात्र आमच्या आईच्या शेवटच्या क्षणी

उपयोगी पडले. "आम्हाला ते विसरले नाहीत" या समाधानानेच आमच्या आईने प्राण सोडले. पुढं त्यांना पत्र लिहून ही बातमी कळवावी असा माझ्या मनात विचार आला होता. पण विचार करता करताच बरेच दिवस गेले. त्यानंतर सगळंच काही विसरून गेलं. विसरायला नको होतं पण मी विसरले. आता देवानं आमचं चांगलं चालविलं आहे. आमचे हे आणि मी दोघंही मास्तरकी करून इथे सुखानं रहात आहोत. अण्णाही बरा आहे. गावी संगीत, तबला वगैरे शिकवून संसार चालवीत आहे."

एवढं सांगून ती आत गेली. आणि थोडया वेळानं पोहे, उसळ वगैरे फराळाचे जिन्नस व एका पेल्यात सरबत आणून तिनं माझ्यापुढं ठेवलं. आणि मी बसलेल्या बाकाच्या दुसऱ्या टोकाला स्वतःही बसली. नंतर आपल्या वडिलासंबंधी तिने अनेक प्रश्न विचारले. सहज दांपत्यातून जन्मलेल्या मुलापेक्षा ही अधिक कुतूहलाने विचारीत असल्यामुळं मी मला माहीत असलेल्या हकीकती सांगितल्या.

ती म्हणाली, "आपण एवढ्यासाठी माझ्याशी मोठ्या गौरवानं बोललात. पण आमचं हे असलं कुळ. तुम्ही 'तुमचे वडील, तुमचे वडील' म्हटलंत ना तेव्हा मला प्रथम असं वाटलं होतं की तुम्ही माझी चेष्टा करीत आहात. त्यांच्या लग्नाच्या बायकोपेक्षाही अधिक आमची आई त्यांना मानीत असे. जगात त्याची कधी किंमत होईल काय? 'रखेल' 'रखेल' असंच जग म्हणेल. त्यावेळी मी लहान होते. आताही फार मोठी झाले असं मी समजत नाही. आमचा त्यांच्यावर फार जीव होता. आमची आई त्यांची पूजा करीत असे. तिच्या जागी आणखी कुणी असती तर त्यांचं सगळं गाठोडं हिसकावून घेऊन, ते सोडून गेले असते तरी आपल्या जीवनात वाटेल त्या सुखसोयी करून घेतल्या असत्या. आमच्या आईनं तसं काही केलं नाही. ती मर्यादेनं राहिली. गाव सोडून ते निघून गेले. त्यानंतर किती तरी वर्षांनी मला थोडीशी बुद्धी आली असं वाटल्यावर तिनं त्यांच्यासंबंधी एक हकीकत सांगितली. ती खोटी नसावी. आपल्या संसाराला विटून कुमठा सोडून जाण्यापूर्वी ते आमच्या आईकडं आले होते. येऊन त्यांनी आसवे गाळली असं तिनं सांगितलं. ते काय म्हणाले तेही तिनं त्यांच्या शब्दात सांगितलं की, 'सरसी, आजपर्यंत मी तुला अधिक काही दिलं नाही. काही केलं नाही. पण तू मात्र अग्निसाक्षीनं आणि सप्तपदी करून आलेल्या बायकोपेक्षा मला अधिक मानतेस. आता मला वनवासात जायाची वेळ आली आहे. मी कुठं जाणार आहे हे मलाच माहीत नाही. तुला काय पाहिजे ते साग. पैसा हवा असेल तर पैसा देतो. तुझ्या ऋणात मी राहू नये." मोठेपणाच्या अशा गोष्टी

किती लोकांच्या तोंडून निघतात त्यांना झालेले कष्ट आमची आई जाणत होती ? धनाचा तिला लोभ नव्हता. म्हणून ' तुमचा विश्वास आहे तेवढंच पुरं मला ' असे ती म्हणाली. या सगळ्या गोष्टी तिनंच मला सांगितल्या. आणि त्या खऱ्या आहेत असंच मी मानते. ' हे आपल्या हाती असलेलं सगळं देऊन कफल्लक होऊन एकटे कुठंतरी निघून जातील. आणि काही तरी करून घेतील. ' ही तिला भीती होती. सर्वांत मोठी तिला भीती होती की जीवनच नकोसं होऊन कुठंतरी ते आत्महत्या करून घेतील. कारण त्यावेळी त्यांची मन:स्थितीच तशी झाली होती.

आणि मग इंदुमती आपल्या आई-वडिलांच्या आठवणींनं रडू लागली. माझंही बोलणं खुंटलंच.

जनरूढीप्रमाणं चार समाधानाच्या गोष्टी सांगितल्या. दुखावणाऱ्या आठवणीनं किंवा आणखी कुठल्या गोष्टीनं तिचं समाधान झालं असतं का ? ' तुमच्या भावानं मात्र आई जिवंत आहे असं पत्रानं भासविलं ' असं तिच्या पुढं सांगून तिला दुखविण्याची माझी इच्छा नव्हती याऐवजी तिच्या कामाविषयी व नवऱ्याच्या क्षेम-समाचाराच्या गोष्टी काढल्या. ' होय खरंच ' चटकन् ती म्हणाली. ' आमचे वडील तुमचे मित्र होते ना ? तुमची त्यांची मैत्री चार पाच वर्षांपासून आहे असं म्हटलंत ना ? मग त्यांचा एखादा फोटो तुमच्याकडं असेलच. असल्यास पाठविता का ? " असं तिनं विचारलं.

" आहे एक. त्याची प्रत काढून पाठवितो. "

" निश्चित पाठवाल ना ? "

" हो अगदी निश्चित. बरं तुमच्या आईचं चित्र आहे का ? "

" कोडकणीत एक चित्र होतं. फारच जुनं चित्र. मळून गेलं आहे. कधी गावी गेले तर आणीन. "

" आणल्यावर माझ्याकडं पाठविलं तर चांगल्या चित्रकाराकडून मोठं करवून घेता येईल. तो फोटो पाहिल्याशिवाय आताच काही सांगता येणार नाही.'

" होय ते मळकं चित्र आहे. "

" मी आलेलं काम झालं आहे. बस केव्हा येते ? "

" अहो त्यांचा काय दुष्काळ ? वेळोवेळी येतात, जातात. तुम्ही आताच नका जाऊ. आमचे हे आताच घरी येतील. तुमची भेट त्यांच्याशी व्हायला पाहिजे. त्यांनी तुमची पुस्तकं वाचली आहेत. "

" मी पुस्तकं लिहितो म्हणूनच फजिती होत आहे. "

" आपण धारवाडी भाषा बोलता ?"

" मला धारवाड, कुमठा, मंगळूर सगळे सारखेच आहेत. " मी असं म्हणत असतानाच एक बस रस्त्यावर येऊन थांबली. थांबल्याचा आवाज ऐकूनच ' आले वाटतं ! ' म्हणत आनंदानं इंदुमती पाहू लागली. पाच मिनिटांतच मास्तरांची स्वारी आली. ओसरी ओलांडून परसाच्या दाराकडं इंदुमती धावत गेली. नवऱ्याच्या खांद्या-वर दोन्ही हात ठेवून, मान पाठीमागं वळवून तिनं मला दाखवीत माझी माहिती दिली असावी. घरच्या पायऱ्या उत्साहानं चढत येऊन त्यानं मला नमस्कार केला. परिचयाची भूमिका इंदुमतीनं उरकली. जणू काही मी परका नाही अशाच भावानं तो माझ्याशी बोलत बसला.

त्या दिवशी दुपारचं जेवण तिथंच उरकलं. तरीही त्या दंपतीनं मला सोडलं नाही. माझ्या गावाची माहिती विचारली. माझ्या बाबतीतही विचारलं. संध्याकाळी साणिकट्टीच्या मिठागराकडं त्यांनी मला नेलं. अतिविस्तृत अशा वाफ्यातून खारे पाणी वाहवून, साठवून, आटवून, मीठ मिळविणं हे त्या स्थळाचं वैशिष्ट्य आहे. तो अतिविस्तार, धुक्याचा पांढरटपणा चमकणाऱ्या मिठाच्या राशी वगैरे सुंदर दृश्य तिथं दिसत होतं. संध्याकाळपर्यंत आम्ही तऱ्हेतऱ्हेच्या गप्पा करीत वेळ घालविला. सूर्यास्त झाल्यावर घराकडं परतलो.

इंदुमती व जलजाक्षी या दोघींच्या स्वभावात, गुणात मला विशेष साम्य दिसून आलं. दिसायलाही साम्य होतंच. इंदूचा वर्ण जलजाक्षीपेक्षा थोडासा सावळा होता. पण चालण्याची ढब, बोलण्याची शैली सारखीच होती. थोडंसं तारतम्यच दाखवायचं झालं तर जलजाक्षी तीन मुलांची आई होती. संसारात पुरेसं रमलेली. आणि इंदुमती दांपत्य-जीवनाच्या उंबरठ्यावर उभी असलेली. बाल्याचा संधिकाळ संपवून यौवनात पदार्पण केलेली. तिचा नवरा सदानंदही तिला अनुरूप असाच सहचर वाटतो. निष्कपट सरळपणा या दोघांतही दिसून आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी साणिकट्टीहून बसमध्ये जात असताना त्या दोघांनी मिळून मला निरोप दिला. जाताना इंदुमतीने " फोटो पाठवायचं लक्षात राहिलं ना ? " अशी पुन्हा आठवण दिली. कुमठ्याला आल्यानंतरच्या तीनचार दिवसांतल्या हर्षखेदांना मनाच्या तराजूत तोलीत निघालो. या जोखण्यानं माझा लाभच झाला असंच मला आढळून आलं. दहा दुःखाच्या क्षणांना सुखाचा एक क्षण भुलवून टाकतो ना या जगात? शंभर आसवांना एक हास्य भुलायला लावतं.

हजारो अशांतीचा विसर पडतो चार सहा शांत प्रसंग लाभल्यानंतर. म्हणूनच य. प्रवासानं माझा विशेष लाभच झाला नाही का ? त्यामुळं समावंतांचा निरोप घेऊन कुमठ्याहून दुसऱ्या दिवशी आपल्या गावी परत जात असता वाटेत कुठल्याच प्रकारचा कंटाळा आला नाही. इकडं येताना उन्हाचा वगैरे जो ताप झाला होता, तो परत येताना मुळीच जाणवला नाही. कुमठ्याहून कुंदापूरला गेलो. तिथून ठिकठिकाणी मुक्काम करीत निश्चित मनाने मी गावी परत आलो.

घरी येताच एक दिग्विजय करून आल्यासारखा उत्साह मनात दाटून आला. यशवंतरावांचे आता तरी मी संपूर्ण चित्र कल्पू शकलो. कल्पनेत सामावू शकणारे सगळे दोष त्यात असू शकतील. पण ती कल्पना निराधार नव्हे. एकमुखी चित्र नव्हे. नाण्याच्या दोन्ही अंगाचे मला दर्शन घडले आहे. चलनातून गेलेली नाणी, हजारो हातांच्या हाताळण्यामुळे अक्षरे मिटून गुळगुळीत झालेली नाणी. गतकालीन जीवन असंच असतं. पण हे नाणं कसलं नाणं आहे ? याला ओळखण्याचे अनेक दाखले मला मिळालेले आहेत. ते कोणत्या काळातलं, कुठल्या धातूचं, ते छापलं कुणी ? त्याचं मूल्य काय ? चलनातून गेल्यावरही राहिलेलं त्यांचं मूल्य काय ? हे सगळंच मी सांगू शकेन ?

माझं हे नाणं खोटं नाही. जस्ताच्या नाण्याप्रमाणं ते केवळ सांकेतिक नाणंही नव्हे. कागदाची नोट असते ना . . . . एक रुपया, दहा रुपये असे रुपये. तत्कालीन मूल्य त्याला असते. ते मानणाऱ्यांना मात्र इतरांना कागदा इतकंही मूल्य त्यात नसतं. तसलं नाणं तर मुळीच नाही. माझं हे धातूचं नाणं निकलबरोबर काही तरी मिसळून केलेलं. वितळविल्यावर कुठल्याही कामाला न येणारं नाणंही नव्हे. जुन्या काळातला निबरट तांब्याचा पैसाही नव्हे किंवा शुद्ध मोहरही नव्हे. थोडंसं तांबं मिसळलेलं सोन्याचं नाणं असावं ही माझी कल्पना. सोनाराप्रमाणं यात इतक्या वजनाचं हे नाणं आहे. यात इतकं सोनं मिळू शकेल अशी हमी मी धैर्यानं देऊ शकणार नाही. दुसऱ्या एका कसोटीलाच हे घासून बघायला पाहिजे मात्र तो दगड कसोटीचाच दगड हवा.

माझी एक कसोटी म्हणजे यशवंतरावांनी लिहून ठेवलेली रोजनिशी. स्मृतिग्रंथ. निर्भीडपणे लिहिली असल्यामुळं ती एक कसोटीच होऊ शकेल. दुसरी कसोटी म्हणजे पुण्यात राहणारे श्री. विष्णुपंत घाटे. त्या स्थानाला योग्य अशी कसोटी ते ठरतील असं त्यांना भेटण्यापूर्वी मी सांगू शकणार नाही. सवड काढून चार दिवस पुण्याला जाऊन खात्री करून घ्यावी तर सवडही नाही. तोपर्यंत त्यांची रोजनिशीच वाचून संपवावी.

सरसीच्या बाबतीत प्रत्यक्ष असोत की परोक्ष असोत माझ्या मित्रांनी चार गोष्टी लिहिल्या नसतील का ? आवडत्या आठवणी कुणी विसरू शकेल का असंही वाटलं. पण ती रोजनिशी वारंवार वाचल्यावर त्यात काही तसं लिहिलं नसावं असंच वाटलं. तरीपण पुन्हा एकदा कुतूहलानं रोजनिशी आमूलाग्र वाचून काढली. शेवटच्या पानापर्यंत गेलो. अगदी शेवटच्या पानावर "शिरसीच्या माझ्या 'घरी'" असे शब्द पाहून थक्क झालो. सिरसी गाव नव्हे का ? स्वादीजवळचं ते एक गाव याच भावनेनं मी मागं वाचताना पानं उलटली होती. या सत्याची मला त्या वेळी कल्पना नव्हती. शिरसी म्हणजे 'सरसी' अशा भावनेनं ते पुन्हा एकदा वाचल्यावर आश्चर्य वाटलं.

शेवटचं पान रोजनिशीच्या पुठ्ठ्याला चिकटवलेलं होतं. ते उकलून वाचलं. तोच विषय पुढं चालू होता. त्यांनी ते मुद्दाम झाकून ठेवलं असावं, आपल्या जीवनात तिचं स्थान लपविल्याप्रमाणं. व्यंग नसलेलं एका तिकिटाएवढ्या आकाराचं रेखाचित्रही यात होतं. सौम्य लक्षणानं मुक्त असं ते 'सरसी'चं सुंदर मुखचित्र होतं. स्वतःला हवं तेव्हा यशवंतांना चित्र काढता येत असे अशी कल्पना त्या छोट्या चित्रानं माझ्या मनात बिंबविली.

अध्याय बारावा

"जीवनात मला सुख मिळालं ते शिरसीच्या घरी, आणि मला वाढविणाऱ्य पार्वत्यम्माच्या हाती.

"मल्लिकालतेचा विचार येताच, ती आपल्यासाठी जगते, आम्रवृक्षासाठी नव्हे ही भावना माझ्या मनातून मिटणं शक्य नाही. मनाची किती समजूत घातली कं आम्रवृक्षाप्रमाणं मी, किती झाल तरी मला लपेटून वाढलेली, ती देत असलेली फुलं माझीच मानली तरी ती लता माझी झाली नाही. लतेला चिकटलेली फुले माझी झाली नाहीत. त्यापासून गळालेली फुलं वास्तविक जगतात माझीही नव्हेत व त्या लतेचीहं नव्हेत. माळणाऱ्यांची ती फुलं. तशा फुलांना तरी माझी आठवण राहील. लतेला मात्र शेवटपर्यंत आठवण राहिली नाही.

"शिरसीचे तसं नाही. लोकनिंदेला बळी पडणारे कुळ जरी असले तरी कुळानेच शीलाची परीक्षा होत नाही. भोपळ्याच्या वेलीच्या फळांची एकेक तऱ्हा असते. एक फळ दारू पीत असतं, तर दुसरं तंबोऱ्याच्या मधुर नादाचं प्रेरक बनतं. शिरसी तसलंच फळ आहे. तंबोऱ्याचं साम्य माझ्या मनात का आलं? माझ्यासाठी तो हाती धरून तारा जुळवून ती गात असल्यामुळं का? पैसा देऊन गाणं ऐकता येईल. पैसा देऊन शरीरसुखही मिळविता येईल. पण मनाच्या समाधानासाठी, हृदयाला शांती लाभण्यासाठी मन फुलवणारे हवेत, आपल्याशी भावतल्लीन होणारे हवेत.

"शिरसी तसलीच नाही का? तरीपण तिला सोडून आलो. यात्रेला निघालो मी जणू आणि तिनं निरोप दिला. तिचा विरोध असता तर माझी काय गती झाली असती कुणास ठाऊक! कोणत्याही प्रकारे घरच्या गायीप्रमाणं बांधून धार काढता आली असती तिला. तुला काय पाहिजे असं विचारलं असता, "तुमचा माझ्यावर विश्वास आहे तेवढंच पुरे." म्हणाली होती. इतके दिवस झाले तरी माझ्या स्मरणातून तिचे गुण, तिची उदार बुद्धी कधी जाणं शक्य नाही. तिचा त्याग मोठा आहे. "चार मुलांना संगीत शिकवून माझं पोट भरणार नाही का? तुम्ही किती म्हणून

कष्ट कराल ?" असं म्हणणारी शिरसी असामान्यच नव्हे का ? मात्र त्या विश्वासाला मी पात्र आहे असं वाटत नाही."

वरील उद्गारावरून इंदुमतीची आई कशी होती याचं चित्र माझ्या डोळ्यापुढं तरळू लागलं. इंदुमतीचा चेहरा बापाच्या चेहऱ्याशी जुळणारा होता. तिचा रंगही तसाच. गुणाची आठवण झाली तेही तसेच असावेत. तिच्या भावाच्या बाबतीत मात्र चांगल्या भावना झाल्या नाहीत. थोड्या धनाच्या आशेने मृत आई जिवंत आहे असं भासविण्याची त्याची पद्धती मनाला रुचली नाही. शंभू हेगडेनं एका प्रकारे वंचना केली होती. यानं दुसऱ्या प्रकारे केली.

गावी येऊन महिना होऊन गेला. आरंभाच्या नक्षत्रांच्या पावसाने उन्हाळ्याच्या तापाचा परिहार केला आहे. वातावरणात एक आगळे सौंदर्य आले आहे. माझा पत्ता घेतलेल्या इंदुमतीनं." माझ्या वडिलांचा फोटो पाठविण्यास आपण विसरला वाटतं ?" असं स्मरणपत्रच पाठविलं व भावाकडून आपल्या आईचं चित्र मागवून माझ्याकडं पाठविलं. या दोहोंना मिसळून एक भावचित्र काढता आले तर किती चांगलं होईल अशी इच्छाही मनात निर्माण झाली. पण योग्य असा चित्रकार मिळायला हवा ना ? त्या चित्रकाराला मीच त्या व्यक्तीचं वर्णन करून सांगायला पाहिजे. तसं झालं तरच नुसता आकार, रंगच नव्हे तर लक्षणानं युक्त असं चित्र निर्माण होऊ शकेल. माझ्या एका चित्रकार मित्राची मला त्या वेळी आठवण झाली. इकडे यशवंताच्या फोटोची एक प्रत मी इंदुमतीला पाठविली. इंदुमतीच्या आठवणीबरोबरच मंजय्याची बायको जलजाक्षीची आठवण होणं स्वाभाविकच होतं. त्यांच्याकडंही एक प्रत पाठविली, जूनचा महिना आल्यामुळं, " यशवंत पास झाला का ? जयंत हायस्कूलमध्ये गेला का ? अशी चौकशी केली व महिन्याला पाठविण्याच्या पंचवीस रुपयांत आणखी पंचवीस मिळवून पाठविले. जलजाक्षीनं यशवंताकडून माझ्या पत्राचं योग्य उत्तर पाठविलं. तो पास झाला होता. दोन्ही धाकटे भाऊही परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. जयंतानं हायस्कूलमध्ये प्रवेश मिळविला आहे या समाचाराबरोबरच " आजोबांचा फोटो पाहून आम्ही आनंदाने नाचलो. आईच्या डोळ्यांत पाणी आलं. आपल्या झोपण्याच्या खोलीत भितीवर टांगून बाबा देवाप्रमाणे रोज एक फूल त्यावर वाहत असतात. " असंही कळविलं होतं. आपल्या पूर्वजाच्याविषयी असणारी भक्ती अशीच हवी. जवळ असताना ऋण फेडता आलं नाही तर दूरचं ऋण कसं फेडता येईल ? डोळ्यांना न दिसणाऱ्या देवाची कल्पना कशी करता येईल ? भक्तिभावालासुद्धा स्पष्ट अशी भूमिका असू नये का ?

हर्षोद्‌गाराने भरलेलं इंदूचं एक प्रदीर्घ पत्र आलं होतं. " मी त्यांना लहानपणीच पाहिलं होतं. त्यांच्या मांडीवर नाचले असले तरी हे चित्र पाहिल्यावर त्या चेहऱ्याची ओळख आपोआपच पटली. फोटो आल्या दिवशी तर पोट भरल्याहूनही अधिक आनंद मला झाला. खरंच त्या दिवशी जेवल्याचं मला आठवत नाही. मी त्यांची मुलगी आहे याच अभिमानात तरळत राहिले. आमची आई असती तर तिनं ते चित्र आपल्या छातीला लावून घेतलं असतं. जग वाटेल ते बोललं तरी आपली माणसं ती आपलीच राहतात. "

आता विचार करावयास लावणारा एकच विषय म्हणजे विष्णुपंतांना भेटणं. त्यांच्याकडं जाऊन, संभाषण करून भूक मिटविणं. पण सवड केव्हा मिळेल न जाणे. पुणं काही जवळचं गाव नाही. म्हणून पत्रच लिहिलं.

" श्रीमान घाटे,

तुमच्या पुस्तकाचं काम, संशोधन का लेखन कुठंपर्यंत आलं ? तुमच्याकडं येऊन त्यासंबंधी बोलायची संधी मिळायला किती दिवस लागतील हे सांगता येत नाही. तोपर्यंत माझी उत्सुकता आवरणं कठीण आहे. आपली प्रकृती बरी असेल तर थोडक्यात का होईना आपला नि यशवंतांचा स्नेह कसा जुळला ? त्यांना कोण-कोणते विषय प्रिय होते ? धर्म, मत, विश्वास , भक्ती वगैरे विषयांवर त्यांनी आपल्याशी चर्चा केली का वगैरे कळवावे. आपण धर्मशास्त्राशी संबंधित कुठल्यातरी विषयावर लिहीत आहा. माझ्या समजुतीप्रमाणं त्यांचा विश्वास या जुन्या मान्यतेवर नव्हता. आपण मात्र श्रद्धावान आहात असं वाटतं. मग तुमचा आणि त्यांचा मनाचा मेळ कसा जमला ? हे सगळं पत्रात लिहिणं शक्य होईल असं मला वाटत नाही. तरीपण आपण पंडित आहात, दहाच ओळीत लिहून सांगितलं तरी मला संतोष होईल. या महिन्याचे रुपये यासोबतच पोस्टल ऑर्डरद्वारे पाठवीत आहे. या रुपयांचा आणि माझ्या प्रश्नांचा काही संबंध आहे असे मात्र आपण कृपा करून समजू नये. "

पत्र पाठवून प्रत्युत्तराची मी दररोज वाट पाहू लागलो.

दहा दिवसांच्या आत त्यांचं एक प्रदीर्घ पत्र आलं. त्यामुळं मनाला बरंच समाधान वाटलं पण माझी तहान भागण्यापेक्षा वाढली असं म्हटल्यास चूक होणार नाही. आतापर्यंतची त्यांची पत्रे कार्डावर लिहिलेली असत. " आरोग्य चांगले आहे. " अथवा " आरोग्य चांगले नाही. " अशा प्रकारचं लेखनच असायचं. " आपण केलेल्या उपकाराबद्दल मी आपला ऋणी आहे. " अशा थोड्याच वाक्यात पत्र

संपत असे. गेल्या महिन्यात आपल्या मनाचा संदेह त्यांनी एका कार्डातून व्यक्त केला होता.

" माझ्यावर दया दाखवून यशवंतांनी ' तुमचं हे काम संपेपर्यंत दरमहा रु. 25 देत जाईन- ' असं सांगितलं होतं. त्यांना जरी हे फारसं वाटलं नाही तरी मला ते घेताना संकोच वाटायचा. माझ्या जावयाकडूनही मला आता पैसे मिळत आहेत. मुलगा मोठा झाला असून नोकरीच्या शोधात आहे. माझे लेखन कार्य संपत आलं आहे. त्याच्या प्रकाशनाचं कार्य मात्र मोठं असल्यामुळं माझ्या मनाला तळमळ लागून राहिली आहे. " असं त्यांनी कळविलं होतं.

त्या बाबतीत पुढचं मागचं मला काही माहीत नसल्यामुळं कुठल्याही प्रकारचं समाधान मी त्यांना देऊ शकलो नाही. माझ्याकडून ग्रंथ-प्रकाशनाची सरळ अपेक्षा त्यांनी व्यक्त केली असावी का? असा संदेहही आला. पण पत्राच्या आरंभी लिहिलेल्या गोष्टीवरून आपणहून मागण्यासाठी हात पसरणारा त्यांचा स्वभाव नसावा असंही दिसून आलं. त्यांचा स्वभाव, त्यांचं शील वगैरेसंबंधी मला काही कल्पना नसल्यामुळं तो विचार मी तेथेच सोडून दिला होता.

त्यांच्या आताच्या पत्रात बऱ्याच गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या. पूर्ण पत्र मी इथं देणार नाही; त्याचा सारांश फक्त सांगतो. " महोदय " अशा आडंबरपूर्ण मायन्यानं पत्राला त्यांनी सुरुवात केली होती. संस्कृत पंडित असल्यामुळं शब्दांचा वापर ते औदार्यानं करतात म्हणून मला हसू आलं. मी पत्र वाचण्यास आरंभ केला.

" आपण यशवंतरावांच्या बाबतीत जाणण्याची जी उत्सुकता दाखविलीत ती साहजिकच आहे. मला जेवढी माहिती आहे तेवढी सांगणं योग्यच. पण त्यांना मी पूर्णपणे जाणलं आहे. असं सांगण्याइतका अहंभाव माझ्यात नाही. दृष्टिकोणात ते उत्तर ध्रुव होते तर मी दक्षिण ध्रुव. मी श्रद्धावान वैदिक, जुन्या परंपरेवर प्रगाढ असा माझा विश्वास आहे. तुमच्या मित्रांना तर तुम्ही जाणताच. आपल्याच मान्यता झाडून पुसून, उचलून ते तोलू शकत असत. वादात मला ते चेतवीत असत, चिडवीत असत.

" पंडित आहात आपण, वाडवडिलांनी लावलेल्या वटवृक्षाला आलिंगून बसणारे हजार दोन हजार वर्षांचे हे मूळ तळ सोडणार नाही. तुम्ही त्यालाच घट्ट धरून बसणारे. स्वतंत्र विचार कराल तरच ना तुम्हाला चिंता. " असा माझा परिहास करीत.

" महाबळेश्वर येथे ते पहिल्यांदा आले तेव्हा.........एकटेच आले होते. घर हुडकीत होते. वाटलं तर माझ्या झोपडीतला अर्धा भाग मी भाड्यानं देईन असं मी त्यांना सांगितलं. माझ्या झोपडीचे दोन भाग पाहून ते म्हणाले, " बरं आहे. मला काही मोठा बंगला नको आहे. मनाच्या शांतीसाठी इथं आलो आहे. हे डोंगर, पर्वत पाहिले की एक प्रकारचा आनंद होतो. मनात आलं तर इथं बसून चित्र काढीन, नाहीतर नाही. ' अशा निर्धारानं दोन महिने ते माझ्या घरी राहिले. तेव्हा ते स्वतःच आपल्या हाताने स्वयंपाक करीत.

" किती झालं तरी माणसाचा हा जन्म. वय झालेलं. तेवढं धष्टपुष्ट शरीरही नाही. माझ्यासारखे आजारी नव्हते तरी पण आपणच स्वयंपाक करून जेवायचं म्हणजे त्रासाचंच. माणसाला दिवस घालवायला माणसाची सोबत पाहिजे. अशा रीतीनं अगदी एकाकी वाटलं की माझ्याकडं येत. ' काय पंडितजी, काय चाललंय ?' असं विचारीत. मी सांगत असे. दमा खोकल्यानं बेजार झालेला मी. शरीरश्रम मला मुळीच माहीत नव्हते, वाडवडिलांपासून चालत आलेला संस्कृतचा अभ्यास केल्यामुळे धर्मशास्त्रात आस्था होती. म्हणून मधून मधून शास्त्राचा अभ्यास करीत असे. शेकडो ग्रंथ वाचून काढले. एकदा मनात आलं की मी वाचलेलं सगळं वाऱ्यावर उडून जाऊ नये. मला जे समजलं आहे ते इतर न समजणाऱ्यांसाठी, संस्कृत न येणाऱ्या आपल्या मराठी लोकांसाठी मराठीत लिहून काढावे. म्हणून ' आपले धर्मशास्त्र ' या नावाचा ग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त झालो. असं एक काम हाती घेतल्याचं मी यशवंतरावांच्या एका प्रश्नाचं उत्तर देताना सांगितलं होतं.

" त्यानंतर दररोज ते एक तासभर माझ्या कोठडीत येऊन बसत असत. ' हे कागद कसले ? हा ग्रंथ कोणता ? त्यात काय सांगितलं आहे ? कोणत्या काळातलं ? ' असे अनेक प्रश्न विचारीत असत. मला जे काही समजलं आहे ते मी त्यांना सांगत असे. एके दिवशी भगवद्गीतेसंबंधी गोष्ट निघाली.

" श्रीकृष्ण परमात्म्यानं असं सांगितलं आहे " मी म्हणालो.

" मी काही ऐकलेलं नाही. " ते म्हणाले, " भगवद्गीतेचा काळ कोणता ? " त्यांनी प्रश्न केला.

" महाभारताचा काळ. सहा हजार वर्षे तरी होऊन गेली असतील. "

" गीता भारताचंच एक अंग आहे ना ? "

" होय. "

" व्यासांनीच भारत लिहिलं ना ? "

" होय. "

" व्यासांचा काळ ? "

" भारताचा. "

" ही गोष्ट सोडा. चारित्रिक दृष्टीनं व्यास नावाच्या कवीनं लिहिलेल्या महाभारताचा कोणता काळ तुमचे विद्वान मानतात ? "

वैद्यांचा अभिप्राय मी सांगितला.

" मग गीता त्याच काळातली ठरते ना ? पाच हजार वर्षांपूर्वीच्या कृष्णाच्या तोंडून व्यासानं वदविलेली गीता ही. "

" श्रीकृष्ण परमात्म्यानं....." मी पुढं सांगण्यापूर्वीच त्यांनी............

" पाच हजार वर्षांनंतर व्यासाच्या तोंडून वदविलं. " अशी वाक्याची पूर्ती केली.

" त्या दृष्टीनं मी पाहात नाही. " मी म्हणालो.

" ब्रम्ह्यानेच स्वत: येऊन सांगितलं असं तुम्ही म्हणाला. "

" नाही का मग ? "

" तसं असेल तर मग आपण त्या विषयाची आपसात चर्चाच करू नये. "

अनेक विषयांवर अशा प्रकारची चर्चा दररोज आम्ही करीत असू. म्हणूनच मी म्हटलं आहे की ते उत्तर ध्रुव आणि मी दक्षिण ध्रुव. मला त्याचं आश्चर्य नाही. दारिद्र्य असूनही धर्मशास्त्रावर मी एक मराठी ग्रंथ लिहीत असल्याचं पाहून त्यांनी, " लिहा. लिहायलाच पाहिजे ' असं प्रोत्साहन दिलं हे पाहून मला आश्चर्य वाटलं.

" तुमची बोलण्याची पद्धतीच विचित्र आहे, यशवंतराव. मला तरी तुमच्या बोलण्याचा अर्थच लागत नही. माझा मार्ग तुम्हाला मान्य नाही. धर्मशास्त्र म्हणजे हजारो लोकांचा, विविध महानुभावांचा विश्वास आहे असं म्हणता. आणि पुन्हा तेच लिहून काढा म्हणता. याचा मला विस्मय होतो. " ऐकून ते हसतील असं मला वाटलं होतं. पण ते म्हणाले,

" हे पाहा घाटे तुम्ही म्हणजे मी तर नव्हे ना ?"

" ते कसं शक्य आहे ? "

" म्हणूनच म्हणतो तुम्ही ते लिहायला पाहिजे. माझी मान्यता, माझा विश्वास माझ्यापुरता. तुमचा तुम्हाला. कदाचित तुमचंच सत्य असेल. माझं सत्य नसेल. कदाचित

दोघांची चूक होत असेल. अथवा आपल्या विचारसरणीत सत्य व मिथ्या यांचं मिश्रणही असेल. "

" असेल. ते शक्य आहे. "

" कबूल करता ना ? "

" कबूल. "

" मग तुमचं जीवन, तुमचे विचार आपल्या लोकापर्यंत पोचायला पाहिजेत. आपण किती जरी बुद्धिमान असलो, कितीही बरोबर असलो तरी प्रत्यक्षानं स्वतः दिसलेल्या प्रकाशात चालणंच योग्य. आपणा सगळ्यांच्या जीवनाला आपण द्यावयाचं ऋण म्हणजे हेच. हेच खरं, तेच खरं म्हणत दुसऱ्याचा गळा दाबून वाणीवर बंधन घालणं हा समाजघातक गुन्हा ठरेल. " ते म्हणाले.

" त्यांचं बोलणं ऐकून मला खरोखरच आश्चर्य वाटलं. विद्वानांच्या वर्गात मोडणारे आम्ही म्हणा किंवा आपला आचार्यवर्ग म्हणा आमच्या मुळापासूनच वाढत आलेला दोष म्हणजे आम्ही केलेला वादच बरोबर, आपण सांगितलेला अर्थच खरा. बाकीचं जग मूढ आहे, मूर्ख आहे. असं म्हणणं. हीच परंपरा चालत आलेली आहे. सहस्र कोटी मतामतांच्या गोंधळात सत्य केवळ आपल्याच बळावर शिल्लक राहू शकेल. आपल्या अधिकारानं, प्रतिवादीचं तोंड धरल्यानं, कुतर्कानं ते शिल्लक राहू शकणार नाही. हेच खरं. यशवंतरावांनी माझे डोळे उघडले. अजून त्यांच्याविषयी मी काय लिहू सांगा ? ती फार मोठे व्यक्ती होती. दिसणारं शरीर त्याचं नव्हतं, मी न पाहू शकेन असं भव्य शरीर होतं त्याचं. त्यानंतर ते म्हणाले, " हे काम उत्साहानं चालू ठेवा. जे काम तुम्ही करू शकता ते काम तुम्हीच करायला पाहिजे. जास्त मदत करणं मला शक्य झालं नाही तरी कागद, शाई, चारसहा आधार-ग्रंथ विकत घ्यावयाला लागणारा पैसा मी देईन. "

" त्यांच्या ठेवीतून आपण जसं दर महिन्याला पैसे पाठवीत आहात तसेच तेही देत असत.

" आता मला मोठी भीती आहे. या महिन्याच्या आरंभीच पाचशे पृष्ठांचा ग्रंथ मी मोठ्या कष्टानं लिहून संपविला आहे. मी संप्रदायवादी आहे असं पूर्वीच सांगितलं आहे. मला वारंवार यशवंतराव छेडीत असत. ' हा काल कोणता ? अगोदर सांगितलेली गोष्ट कोणती ? त्यानंतर कुणी सांगितलं ? या श्लोकाचा हाच अर्थ आहे हे सिद्ध कराल काय ? ' या प्रकारे छेडण्याची आठवण झाली की मला कामातील

अडचणींची जाणीव होते. माझ्या कृतीत मला अनेक शंका येतात. मला उमजलेले जे काही आहे ते चुकीचं आहे की ग्राह्य हे ठरविण्यासाठी हा ग्रंथ मी समाजापुढं ठेवतो. विद्वानापुढं ठेवतो. आपल्या आगमनाची प्रतीक्षा मी केव्हा करावी ? " असा प्रश्न करून त्यांनी पत्र संपविले होते.

पावसाळा संपला. इथं एक तिथं एक असे ढग विस्कटून आकाशात तरंगत होते. तरीपण आमची धरती सस्यसमृद्धीने आणि वर्षाकालातील अभिषेकाने निर्मल झाली होती. थंडी, वारा, पावसाच्या उपद्रवामुळे भिऊन, लपून जगत असलेले पशु-पक्षी आता स्वच्छंदानं झाडाझाडांवर झेप घेत आहेत. आहारसमृद्धीमुळं त्या सगळ्यांच्या कष्टाचे निवारण झाले आहे. नाव ठाऊक नसलेले असे अनेक पक्षी संगीत शास्त्रात नसलेले गीत गात आहेत. त्यांच्या कंठातून निघणारा उत्साही नाद निसर्गात भरून राहिला आहे. आतापर्यंत आभाळाआडून लपंडाव खेळणारा सूर्य आता प्रकृतिदेवीने धारण केलेले लावण्य पाहून हर्षातिरेकानं नीलाकांशात तरंगत आहे. समोवतालचा निसर्गच इतका प्रसन्न असल्यावर मानवप्राणी आपल्या आळसात गुरफटून झोप कशी घेईल ?

मला मुंबईची आठवण झाली. युद्धाच्या निमित्तानं आमच्या गावाहून मुंबईला जाणाऱ्या बोटी बंद पडल्या आहेत. पण प्रवासाला निघायचे मनात आले. बसचा प्रवास केला. त्यात बसून सह्याद्रीच्या पाठीवर चढलो. मलनाडच्या पदरी घुसलो नि पुढं गेलो. बयलू सीमेच्या कडूर येथे रेल्वेत शिरलो. बयलू सीमेत आमच्या गावची किंवा मलनाडची समृद्धी नाही. तरी पावसाळ्याची कृपा झाली असल्यामुळं वाटेवर लांबच लांब काळ्या भूमीवर ज्वारी, कापूस, काळे तीळ वगैरे पिकांची हिरवी शाल अनेक योजने अंथरलेली दिसत होती. गाडीच्या खिडकीत बसलो. वाऱ्याच्या झोतामुळं हिरव्या रानात तरंग उठतात ते पाहून आपल्या हृदयातही आनंद तरंग उठतातच. म्हणून रस्ता सरलेला कळतही नाही. बेळगाव नगर लागे-पर्यंतही हे हिरवं आमंत्रण जियंतियं होतंच. पुढं अंधार झाला. बेळगावला गाडी बदलली. त्या डब्यात प्रवाश्यांची दाटीवाटी किंवा कोलाहल काहीच नव्हते. सुखानं झोपलो. सकाळी जागा झालो तो पुण्यालाच.

विष्णुपंतांच्या पत्रावरून घरीच चिकटून बसणारे ते गृहस्थ आहेत अशी माझी समजूत झाली होती. गाडीतून उतरताच एक टांगा करून शनिवार पेठेतल्या त्यांच्या घरी गेलो. त्यावेळी ते घरी नव्हते. ते आपल्या जावयाच्या घरी रहात

असत. घरी त्यांची मुलगी व जावई मात्र होते. काही कामानिमित्त घाटे नासिकला गेल्याचे त्यांच्याकडून समजले. माझ्यावर मात्र नासिका खाजविण्याची पाळी आली.

" कधी येणार ?" म्हणून विचारलं.

" उद्याच येणार आहेत. "

त्यांनी विचारल्यामुळे मी कोण, काय वगैरे सांगावं लागलं. पंत परत येई-पर्यंत राहण्याचा त्या दंपतीनं आग्रह केला. मला मात्र पंत नसताना तिथं राहणं प्रशस्त वाटलं नाही. " आठ दिवसांत मी येतो. निश्चित येईनच. " असा भरवसा दिला. त्यांनी दिलेल्या उपाहाराचा स्वीकार केला. पंतांना एक चिठ्ठी लिहून ठेवली. त्यानंतर मुंबईच्या प्रवासास त्वरेनं निघालो.

मला कंटाळा आला किंवा उत्साह वाटला तर मुंबईत मी चार सहा दिवस घालवितो. जनसंख्या, गोंधळ कमी असलेलं माझं गाव आहे. पण मुंबई म्हणजे मुंबईच. लक्षावधी लोकांना आपलसं करणारं ते शहर म्हणजे जनारण्य. यशवंत-रावांच्या भाषेत सांगायचं म्हणजे अरण्य मोठं असेल तर झाडांची मालिका मोठी असते. कुठलंही औषधी झाड मिळू शकतं. झाडांची माहिती असेल तर हवं ते सर्व मिळू शकतं.

त्याचप्रमाणं मी त्या नगरात काही वृक्षांची माहिती मिळविली होती. हे वृक्ष म्हणजे माणसं. " मुंबई सोडून हलणार नाही. माझा जन्म इथं, जगायचं इथं आणि मरणही इथंच ' असं म्हणणारी काही मित्रमंडळी इथं आहे. तसे वटवृक्ष पाहण्यात वेळ घालविला.

माझ्या मनात एका कामाचा अजून भार आहे. मला हवे असलेले एक चित्रकार येथे आहेत. आल्यावर पहिल्याच दिवशी त्यांच्या घरी जाऊन त्यांना भेटून, " नेहमी-सारखा मी यावेळी आलो नाही. तुमची परीक्षा घेण्यासाठी आलो आहे. " असं अभिमानानं सांगितलं. आणि यशवंतांनी काढलेली चार सहा चित्रे माझ्या बॅगेतून काढून त्यांच्यापुढं ठेवली. त्याबरोबर यशवंतरावांचा एक फोटोही होता. त्या मित्रांनी यशवंतरावांच्या फोटोकडं लक्षच दिलं नाही. तेव्हा तो फोटो मी आपल्या खिशात घातला. पंधरा मिनिटापर्यंत प्रत्येक चित्र त्या मित्रांनी मोठ्या कुतूहलानं पाहिलं. गुरं, पारडू, दादा, रीमा, अशी चित्रे तिथं होती. ती पाहून ते हसू लागले.

" का हो हसू आलं ? " मी विचारलं.

" आपल्याजवळ नाही असा एक डोळा यांच्याजवळ आहे. चित्र काढण्याचं तंत्र काही पुरेसं नाही, हे खरं. ते शिकावं लागतं हेही खरं. यांना तंत्र साध

नाही पण काहीचं माहिती नाही असंही म्हणता येणार नाही. पूर्ण पाहिलं आहे जणू यांनी. दृष्टी मात्र खोल आहे. कुणी काढली ही चित्रे ? " त्यांनी प्रश्न केला.

खिशात घातलेला फोटो काढून मी दाखविला.

"कुठं असतात हे ? "

" स्वर्गावात. "

" स्वर्गाव कुठलं हे ? "

" स्वर्गाचा गाव हेच स्वर्गाव. "

" वारले काय ? "

" आता धैर्य आलं ना ? आपण चित्रकार तेही एक चित्रकार. पण ते तुमचे प्रतिस्पर्धी होऊ शकणार नाहीत याची खात्री झाली ना ? " आणि मग मुंबईतच तेही रहात असत हेही सांगितलं.

माझा उद्देश साधण्यासाठी त्यांच्या जीवनाचा कथाभागही वर्णन करून सांगितला. आणि हळूच, ' हे पहा माझं गद्य लिखाण. त्यांचं हे जीवनचरित्र आहे पण जीवनचरित्र म्हणता येणार नाही. असं एक कथानक माहीत आहे. तुम्ही यांना पाहिलं अस्तं तर बरं झालं असतं. पण तुम्ही त्यांना पाहिलं नाही. जे गेले त्यांना दाखविणं मलाही साध्य नाही. त्याऐवजी हा फोटो ठेवून घ्या. त्याबरोबर हेही असू द्या. " म्हणत मी सरसीचं मळकं चित्र त्यांच्या हाती दिलं. शिवाय रोज-निशीच्या शेवटच्या पानावर असलेलं पोस्टाच्या तिकिटाएवढं रेखाचित्रही बरोबर आणलं होतं. तेही त्यांच्यापुढे ठेवलं. त्यांच्या दांपत्य-जीवनात विरस झाल्याचं सांगून 'सरशी'च्या जीवनासंबंधीही त्यांना सांगितलं. " मी चार दिवसांनी परत येतो. ही चित्रे ठेवून घ्या आणि काय करू शकता हे पाहा. तुमच्याकडून काम होणार नाही असं वाटलं तर आमच्या गावी एक ड्राईंग टीचर आहेत त्यांना हे काम सोपवीन. अशा कामाला ते सदैव तयार असतात. मेलेल्या माणसाचं नावसुद्धा न विचारता किंवा जिवंत असणाऱ्याचंसुद्धा चित्र वाढवून, रंग फासून, जरतारी रुमाल बांधून, जवळ एक फुलदाणी ठेवून खेडवळ महाराजाप्रमाणं पेंटिंग करीत असतात. एकतर तुम्ही हे काम केलंच पाहिजे नाहीतर त्यांनी काढलेलं चित्र बघून आत्महत्या करायला पाहिजे अशी मी थट्टा केली.

माझे चित्रकार मित्र म्हणाले, " मी आताच काही सांगू शकणार नाही. तुमचं नशीब. कदाचित् माझ्यावर आत्महत्या करण्याचा प्रसंगही येईल. आलाच तर एक कप कॉफीत उडी घेऊन प्राण सोडेन. "

चौथ्या दिवशी त्यांच्या घरी गेलो तेव्हा चित्र तयार झालं होतं. तंबोरा हाती घेऊन निरलंकृत सुंदरी अशी सरस्वती गात आहे व जवळच माझे मित्र यशवंतराव बसून भावतल्लीन झाले आहेत अशा प्रकारचं ते भावचित्र त्या मित्रांनी काढलं होतं.

"ओहो! हे चित्र पाहून इंदुमती हर्षानं उड्या मारील." असे उद्‌गार निघाले.

"ही इंदुमती कोण ?" चित्रकारांनी विचारले. तेव्हा तिच्या बाबतीतही सांगावं लागलं.

माझं मुख्य काम झाल्यानंतर मुंबईतील वृक्षांचे पाने, फुले, वगैरे संग्रह करण्या-सारखे सर्व खुडून पुणे नगरी गेलो. यावेळी मी जाताच विष्णुपंत घाटयांनीच आपल्या घराचे दार उघडले. विष्णुपंत घाटे सामान्य शरीराचे, गोऱ्या अंगाचे, पूर्ण दुर्बल असे गृहस्थ होते. आदराने माझे त्यांनी स्वागत केलं. व आपण लिहिण्यासाठी बसत असलेल्या मृगाजिनावर मला बसविले. नंतर त्यांनी संभाषणाला सुरुवात केली. यशवंतरावांविषयी त्यांना भलताच अभिमान असलेला दिसून आला. त्यानंतर त्यांनी स्वतः लिहिलेल्या "धर्मशास्त्र विचार" नामक ग्रंथाची हस्तलिखित प्रत माझ्यापुढं ठेवली. आनंदानं त्याकडं बघत ते म्हणाले, "त्यांनी मला पैशांची मदत केली एवढेच नव्हे तर काम करण्यास प्रोत्साहन देऊन माझ्या हातूनही कृती लिहिली जावी अशी परिस्थिती निर्माण केली. हा ग्रंथ छापला जाईल. लोक वाचतील याची काही खात्री नाही. मी काही महान व्यक्ती नाही. केवळ कर्तव्य म्हणूनच कर्तव्य केलं आहे.

"आणखी एक गोष्ट सांगतो. मात्र तुम्ही वाईट वाटून घेऊ नये. हे काम संपल्यावर मी तुमच्याकडून यशवंतरावांचे पैसे घेणार नाही."

त्यांचे वरील विचार ऐकून मी थक्क झालो.

तो संबंध दिवस विष्णुपंताबरोबर मी आत्मीयतेनं घालविला असं म्हटलं तर चुकणार नाही. माझ्याशी बोलताना मराठीऐवजी इंग्रजीत बोलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण ते सफल झालं नाही.

त्यांच्या जावयाच्या मदतीनं इंग्लिश भाषेत आम्ही परस्परांना जाणले. आरंभी मला आलेली त्यांची पत्रे मराठीतच असत. तेव्हा अनुवादकाची मदत घ्यावी लागे. नंतर मात्र जावयाकडून इंग्लिशमध्ये पत्र पाठवीत असत. आताही त्यांच्या जावयानंच आम्हा दोघांमध्ये दुभाष्याचं काम केलं.

यशवंतरावांचं नि त्यांचं झालेलं संभाषण अनेक वेळा त्यांनी सविस्तर सांगितलं. धार्मिक विषयात घाटे यांना आस्था असल्यामुळं त्या दोघांत ही चर्चा होई ती त्या विषयाशीच संबंध असे. मान्यतेचा आधार, प्रयोजन, जीवनाची समस्या, मत, धर्माची इतिमिती वगैरे त्यांच्या चर्चेचे विषय होत. त्यांनी म्हटल्याप्रमाणं दोघांची मते मात्र परस्पर भिन्न– दक्षिण आणि उत्तर ध्रुवासारखी.

" मते काहीही असोत आम्ही दोघेही भिन्न संस्कारांत वाढले होतो. म्हणून मतांमध्ये भिन्नता असणं स्वाभाविकच होतं. पण त्यांची मानवता मोठी होती म्हणूनच त्यांनी मला इतकी मदत दिली. तुम्ही तुमच्याच मार्गानं जायला पाहिजे असा त्यांनी मला पाठिंबा दिला. जीवनातील प्रामाणिकता हीच नव्हे का ?"

ऐकून मी नुसती मान हलवली. "पंत , आत्म्या-परमात्म्याच्या बाबतीत व जन्मांतराविषयी तुमची नि त्यांची मते काय होती ?"

" तिथंही दक्षिण आणि उत्तर ध्रुवच. विष्णुपंत हा विष्णुपंत आणि यशवंत हे यशवतच."

" त्यांची मते काय होती हे तरी स्पष्टपणे तुम्हाला कळल का ?"

" एका प्रकारे अद्वैतच. त्याला आधुनिक अद्वैत म्हणता येईल. शंकराचार्यांना द्वैतमतवाद्यानी नास्तिक म्हटल्याप्रमाणं मीही काही तरी नाव ठेवू शकेन. पण ते तसे नव्हतेच. व्यक्तीच्या जीवनाला ते मानीत असत. व्यक्तिगत आत्म्याला मानीत नसत. त्यामुळ त्यांना परमात्म्याचा प्रश्न मुख्य वाटत नाही. भक्ती, मोक्ष या बाबतीतही त्याचा विश्वास नव्हता. मी एकदा त्यांना विचारलं. ' मग देवच नाही म्हणता का ?' त्यानी उत्तर दिलं, ' ते तुम्हालाच माहीत.' आणि मलाच उलट त्यांनी प्रश्न केला, " तुम्ही पाहिला आहे का ?"

" वेदांत सांगितलं आहे. प्रत्येक धर्म हेच सांगतो." मी म्हणालो.

" तुम्ही ऐकलेला प्रत्येक धर्म सांगतो का ?" देवासंबंधी काही न सांगणारेही धर्म आहेत. असे धर्म स्वतःला माहीत नसलेले सांगण्याच्या भानगडीत पडत नाहीत असं म्हणतात."

" सनातन धर्मच श्रेष्ठ धर्म आहे" असं मी म्हटलं तर हसत ते म्हणत," मानणाऱ्याला तो पूर्ण श्रेष्ठ."

" ते नास्तिक होते का ?" म्हणून आपण प्रश्न कराल. यावत् जगतातल्या जीवांना त्यांनी ममतेनं पाहिलं आहे. त्यांच्या विशाल मनाला सगळे जीवन समानच

वाटत असे. अशा जीवनाच्या, जीवाच्या बाबतीत पूर्वीचे आणि उद्याचे अशा प्रकारचा भेदभाव न बाळगणारी त्यांची अेक विशिष्ट अद्वैत विचारसरणी होती. यालाच अद्वैत म्हणावयाचे. आपल्या परीने त्यांचा तो अद्वैत. एक सांप्रदायिक विचारसरणी तर ती मुळीच नव्हे."

विष्णुपंतांना यशवंतरावांची विचारसरणी मान्य नव्हती तरीपण त्यांच्या व्यक्तित्वाबद्दल त्यांना आदर वाटत असलेला दिसून आला.

पुण्याला ज्या कामासाठी आलो ते संपल्यासारखेंच होते. संपतच आलं होते. पंतांचा निरोप घेण्यापूर्वी मी त्यांना विचारले,

"ग्रंथछपाईची आपली काय योजना आहे ?"

"काही नाही." ते म्हणाले.

"किती खर्च येईल ?"

"तीन हजार तरी लागतील असं आर्यभूषण छापखान्यातली माणसं म्हणतात."

"कुठला तरी प्रकाशक गाठला का ?"

"नाही. नुसतं भेटून काय होणार ? याचा खप कुठं होणार ? ही काही कादंबरी नव्हे. सध्याच्या काळी धर्मशास्त्र कुणाला हवं आहे ?" ते म्हणाले. ऐकून हसू आलं. "हे पाहा, मी कथा-कादंबऱ्या लिहितो. लोक त्या वाचतात. हा ग्रंथ कसा वाचतील ? आपल्या लोकांची आधुनिकता अशीच आहे. आकाशातून निघून जमिनीवर येऊन बसलेली. ती केव्हाची ? अगदी आताची, इतके आधुनिक आम्ही ! या ठिकाणी काही वाढलं असलं ते किती जरी आधुनिक असलं, बी रुजून मुळाच्या आधारानं अंकुरित होअून त्याला शाखा फुटून वृक्ष होऊन त्याला फुलं जरी आली तरी त्याची किंमत नाही लोकांना. तरीपण आपण मात्र शक्य तो प्रयत्न कराच." अशा रीतीनं त्यांचं समाधान करून मी त्यांचा निरोप घेतला.

अतिशय आनंदाने मी आपल्या गावी परत आलो असा तुमचा तर्क असेल. माझी समस्या सुटत आली होती. यशवंतांनी माझ्यावर सोपविलेल्या कामगिरीची जबाबदारी निभावणं तितकंस कठीण जाणार नाही. पार्वत्यम्मा गेली. विनायकाच्या देवळाला दोन हजार रुपयांचा खर्च आला. शीनची आठवण मी विसरू शकेन. मंजय्या आणि त्यांच्या मुलांना मी विसरू शकणार नाही. आता काय राहिलं ?' दिलेले किती, राहिलेले किती ? याचा हिशेब घातला. यशवंतासाठी आणखी अेक विनायकाच

देऊळ बांधावंच असं वाटलं. ते म्हणजे पंतांच्या ग्रंथाचं प्रकाशन करायचं. त्यासाठी यशवंतरावांच्या नांवानं तीन हजार रुपये द्यावयाचे. राहिलेले रुपये माझ्या मित्राच्या जावयाच्या कुटुंबाच्या मदतीसाठी कोणत्या ना कोणत्या रूपानं राखून ठेवायचे, असा निर्धार केला. आवश्यक ती व्यवस्था करण्याचं ठरविलं. मंजय्याला विचारलं. पंतांना पत्र लिहिलं. इंदुमतीलाही 'तुझ्या वडिलांची आठवण म्हणून काय पाहिजे' म्हणून विचारलं. प्रत्युत्तर मागवून तशी व्यवस्था केली. माझ्याकडं ठेवून घेतलं ते फक्त स्मरण ग्रंथ— त्याची रोजनिशी.

एकूण हिशेब घालून बघतो. माझा हिशेब नव्हे, माझ्या समजुतीप्रमाणं—जीवन जगलेल्या यशवंतरावांचा हिशेब. त्यांच्या सिद्धान्ताप्रमाणं आपण संसारापासून, समाजापासून जे मिळविलं त्यापेक्षा इतरांना कमी दिलं का जास्त दिलं ? याचा हिशेब. ऋणफेडीच्या दृष्टीनं कोण कुणाचा ऋणी आहे ?

सगळ्याच दृष्टीनं पाहिलं तर यशवंतानी स्वत: जे काही मिळविलं त्यापेक्षा काही दिलं ते कमी पडेल का ?

हाच प्रश्न माझ्यापुढे उभा आहे.

जुपिटर आफसेट प्रैस 10/3 बी, झिलमिल इंडस्ट्रियल एरिया, जी.टी रोड, शाहदरा, दिल्ली-110032 द्वारा मुद्रित।